
11) The book of the new moral world" openlibrary. org (English भोषत) 18 oct 2022.

12) "origin of the Family, Private Property and the State "(PDF) Marxists. org (English भाषेत).

13) स्त्रीवादी साहित्य (PDF) unishivaji yac.in (Marभाषे)18 oct 2022.

14) Kate Millett in Sexual Politics (1970) (PDF) monoskop.org (English भाषेत) 18 oct 2022.

15) स्त्रीमुक्ती, स्त्रीवादी आणि लेनिन (maharastratimes (मराठी भाषेत) 26 May 2013

16) " सती' (loksatta.com (Marathi भाषेत) 30 Nov 2013 archived from original on 18 oct 2022

17) "महात्मा जोतीराव फुले (PDF) unishivaji.ac.in (marathi भाषेत) 18 otc 2022

18) बापू और स्त्री mkgandhi.org (Hindi भाषेत) 18 oct 2022

19) " डॉ. राममनोहर लोहिया की दृष्टी में स्त्री (PDF) Csirs org.in (Hindi भाषेत.) 18 Octo 2022 Archived from original on 18 octo 2022

20) Dalit Women Talk Differently " Economics and Political Weekly (इं. भाषेत) 30(-1). 2015-06-05.

21) पवार, उर्मिला आणि मून, मीनाक्षी (२०००) आम्हीही इतिहास घडविला सुगावा प्रकाशन, पुणे

22) आंबेडकरी चळवळीतही स्त्री नेतृत्वाला दुय्यम स्थान – Maharashtra Times हिंदी भाषेत (86) 211911) 2018-11-09 || Rege Sharmila (1998)." Dalit Women Talk Differently

23) Rege Sharmila (1998) “Dalit women talk differently” A critic of difference and towards a dalit feminist stand point position - Economic and political weekly.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No.36 Sept-Oct 2023

भारतीय शास्त्रीय संगीतात गुरु शिष्य परंपरेचे महत्व

प्रा. डॉ. प्रतिभा पवित्रकार
संगीत विभाग प्रमुख, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोट.
Corresponding Author- प्रा. डॉ. प्रतिभा पवित्रकार
DOI- 10.5281/zenodo.10337066

सारांश –

भारतीय संगीतामध्ये गुरुंचे महत्वाचे स्थान आहे . गुरुशिष्य परंपरा संगीत शिक्षणामध्ये सर्वांत प्राचीन आणि सर्वश्रेष्ठ प्रणाली मानल्या जाते. वैदिक काळापासूनच संगीत शिक्षण हे गुरु मुखातून दिल्या जात होते . गुरुकुलातच राहुन गुरुंनी ठरवून दिलेल्या कठोर नियमांचे पालन, संयमित जिवन जगून गुरुंच्या मार्गदर्शनाखाली मिळालेले शिक्षण साधना व तप करून ग्रहण करणे हेच साधन होते . प्राचीन काळापासून मध्यकाळाच्या अंतापर्यंत ज्ञान प्राप्तीचे एकमेव साधन केवळ गुरुमुख हेच होते. त्या काळातील ज्ञानाचे भांडार हे वेदशास्त्र , दर्शन आणि कला या चार प्रकारांमध्ये विभाजित केले होते . ग्रंथनिर्मितीचा अभाव असल्याकारणाने विद्यार्थ्यांना आपला अभ्यास मुखोदगत करावा लागत असे . विद्यादानाचे हे काम समाजातील विव्दान , त्यागी , सदाचरणी गुरुजनांव्दारे केल्या जात असे . ज्ञान प्राप्तीचे एकमेव मार्ग गुरु असल्या कारणाने प्राचीन आणि मध्यकालामध्ये गुरुजनांना अतिशय महत्वाचे स्थान होते . एखादा मुर्तिकार ज्याप्रमाणे मातीच्या गोळ्यापासून किंवा एखादया दगडापासून एक सुंदर मुर्ती तयार करतो अगदी त्याचप्रमाणे एखादा साधारण व्यक्ती गुरुंच्या संस्कार आणि मिळालेल्या ज्ञानातून असाधारण आणि गुणसंपन्न व्यक्ती घडतो . खरंतर ही गुरुंची महिमाच म्हणावी लागेल . संपूर्ण विश्वामध्ये हिंदूस्थानी शास्त्रीय संगीताला कलेचा उत्कृष्ट नमुना म्हणुन मानल्या जाते आणि हा कलेचा ठेवा गुरुशिष्य परंपरेमुळे आजपर्यंत सुरक्षित आहे परंतू काळानुरूप यामध्ये परिवर्तन होत गेले. आणि आज आपण त्याच संगीताचे परिवर्तीत रुप बघत किंवा अनुभवत आहोत ज्याला आमच्या पूर्वजांनी जतन करून त्याला समृद्ध केले. प्रस्तुत शोध निबंधामध्ये यावर सविस्तर चर्चा केलेली आहे .

प्रस्तावना :–

शिक्षणाचे मुख्य कार्य संस्कृती आणि सभ्यतेला सुरक्षित ठेवणे . संगीत हे मानव समाजातील कला संस्कृती व परंपरेचे मूर्तिमंत प्रतीक आहे.संस्कृती व परंपरेला एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे कार्य हे संगीत करते . कला ही संस्कृतीचा आरसा असून संस्कृती ही कलेची प्रेरणा होय . संगीत व संस्कृतीचा विकास एक दुसऱ्याशी निगडित आहे मानवाचा सम्यक विचार , उत्कृष्ट चरित्र निर्माण , नियमित व अनुशासित बौद्धिक विकास , तसेच सामाजिक उत्थाना प्रति जागरूक राहून प्रेरित करणे हे संगीत शिक्षणाचे उद्देश मानल्या गेले आहे. अशाप्रकारे भारतीय संस्कृतीमध्ये प्राचीन काळापासूनच संगीत शिक्षणाचे महत्त्व दिसून येते . शिक्षणाचा अर्थ ज्ञानार्जन करणे होय . या शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये विद्यार्थी हा गुरूंच्या जवळ राहून अध्ययन करतो आणि त्यानंतर देखील संपूर्ण आयुष्यभर तो विदयार्थी काही ना काही शिकतच असतो व आपलं व्यक्तिमत्व घडवत असतो , शिक्षणाच्या माध्यमातूनच मानवाचा शारीरिक , मानसिक , सामाजिक व आध्यात्मिक विकास होतो यावर वैदिक काळातच शिक्कामोर्तब झालेले आहे . प्राचीन शिक्षण पद्धतीवर कुठल्याही राज्य सरकार राजनैतिक किंवा सांप्रदायिक संस्थेचे नियंत्रण नसल्यामुळे शिक्षण हे केवळ गुरूंच्या नेतृत्वातच दिल्या जात असे . वैदिक काळातील लिहिलेल्या ग्रंथांमध्ये संगीत जगतातील गुरु शिष्य पद्धती ही सर्वात प्राचीन मानल्या जाते तेव्हा ही पद्धती कशी होती हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

प्राचीन शिक्षण प्रणाली :- संगीत एक अशी कला आहे जी बुद्धी द्वारे कमी आणि हृदयाद्वारे अधिक ग्राह्य आहे. तेव्हा मौखिक रूपाने प्राप्त तसेच अभ्यास आणि साधना द्वारा परिपूर्ण ही विद्या योगाप्रमाणे साधन व साध्य बनुन संगीताला आध्यात्मिक उंचीपर्यंत पोहोचवते . वैदिक काळापासूनच संगीत शिक्षणामध्ये आध्यात्मिक बाबींवर अधिक भर दिल्या जात असे , साम संगीताचे शिक्षण देताना सुरुवातीला आर्थिक आणि नंतर ग्रंथाचे शिक्षण दिल्या जात होते . ज्यामुळे ऋचांचे गायन कंठस्थ होऊन त्यानंतरच योग्य ते परिवर्तन आणि परिवर्धन करण्याचे शिक्षण दिल्या जात असे . यातून प्रेरणा घेऊनच संगीत शिक्षणामध्ये आधी

बंदीश शिकवून रागाची प्रतिमा उतरवल्या जात असे आणि त्यानंतर बंदीशीमध्ये रागा अनुकूल रूप , भेद , परिवर्तन व राग विस्तार इत्यादी करण्याचे शिक्षण हे श्रेष्ठ संगीतकार द्वारे होत असे . रामायणामध्ये दशरथाने आपल्या चारही मुलांना आणि महाभारतात पांडव आणि कौरवांनी आश्रमामध्ये राहून वरील पद्धतीने शिक्षण घेतले आश्रमामध्ये गुरुद्वारा वेदांचे पठण व इतर विषयांसोबत संगीत देखील शिकविल्या जात असे . मुनी वाल्मिकी द्वारा लव आणि कुश ला दिल्या गेलेल्या स्वर , पद , ताल , प्रमाण , मुर्छना इत्यादीच्या उदाहरणाने हे लक्षात येते की त्या काळात संगीत शिक्षणाचे स्वरूप हे व्यवस्थित होते ज्या अंतर्गत संगीतातील शास्त्र आणि क्रियात्मक दोन्ही समाविष्ट होते . महाभारतात देखील विश्वबंधु गांधर्वाच्या परंपरेने अर्जुनाने गीत वाद्य व नृत्याचे प्रशिक्षण घेऊन गांधर्व विशारद पूर्ण केले अशाप्रकारे वेदांचे पठण - पाठण हा उद्देश असल्यामुळे गायन व वादन विद्येचे ज्ञान आवश्यक मानल्या जात होते.

कालांतराने संगीतामध्ये परिवर्तन होत गेले जे संगीत पूर्वी धार्मिक उद्देश सफल करण्यासाठी उपयोगात येत असे त्याचा वापर नंतर मनोरंजनासाठी होऊ लागला याला कारण म्हणजे प्राचीन परंपरेने चालत आलेल्या व्यवस्थेवर विदेशी आक्रमण होऊन देशी आणि विदेशी सभ्यतेच्या मिश्रणामुळे एक नवीन समाज म्हणून वेगळी शिक्षण पद्धती तसेच राजनैतिक परिस्थिती बदलल्यामुळे जनजीवन आणि शिक्षण पद्धतीमध्ये आमुलाग्र बदल झाला . तेव्हा या परिवर्तनाचा प्रभाव संगीत शिक्षणावर देखील झाला . त्या काळात राजा आणि नवाब आपल्या दरबारात श्रेष्ठ गुरूंना आमंत्रित करून स्वतः सोबत सर्व दरबारीना संगीत शिक्षण घेण्यासाठी प्रेरित करीत असत यातून गुरु आणि शिष्याचे आदान-प्रदान दिसून येत होते . परंतु या काळात संगीत शिक्षण विशिष्ट वर्गापुरते मर्यादित होते अर्थात ब्राह्मण क्षत्रिय इत्यादींना संगीत शिक्षणाची मुभा होती आणि ही परंपरा पुढे घराण्याच्या स्वरूपात दिसू लागली .

घराणे पद्धतीतील संगीत शिक्षण ;- संगीत शिक्षण हे घराण्याच्या रूपात परिवर्तित झाले जिथे गुरु आपल्या शिष्याला संगीत शिक्षण तर देत असे परंतु यामध्ये शिष्यांचे वेगवेगळे वर्ग केल्या जात होते या संबंधात डॉक्टर अमरेशचंद्र चौबेजी लिहितात की घराण्यांमध्ये मुख्यरूपात शिष्यांचे तीन प्रकार असत ज्यांना गुरूंचे ऐकूनच अधिकाधिक शिक्षण प्राप्त करावे लागत असे ते सामान्य अर्थात गुरु आपल्या शिष्यावर व्यक्तिगत लक्ष ठेवत नसत . दुसऱ्या क्रमांकाचे शिष्यांमध्ये असे शिष्य असत की ज्यांच्यावर गुरूंना विश्वास असायचा ते शिष्य म्हणजे गुरूंची शैली आत्मसात करून वेळोवेळी विशेष तालीम मिळवत असत याव्यतिरिक्त या शिष्यांना बरेचदा गुरूंसोबत साथसंगत करण्याची संधी मिळत असे त्याचप्रमाणे वैयक्तिक शिक्षणासोबत गाणे वाजविणे वगैरे होत असे . तर तिसरा वर्ग खास-उल-खास या नावाने परिचित होता जे त्यांचे वंशज होते, शिष्य परिवार आपली गुरु सेवा आणि वैयक्तिक प्रगतीच्या भरवशावर गुरुकृपा प्राप्त करीत असे आणि असे शिष्य पट्ट शिष्य म्हणून ओळखल्या जात हे पट्टशिष्य आणि वंशजांना सीना - ब - सीना तालीम दिल्या जात असे . यावरून सांगता येईल की पट्टशिष्य गुरूंचा उत्तराधिकारी बनत असून त्यांच्यामुळेच घराण्याचा मान आणि मर्यादा सुरक्षित राहत असे .अशाप्रकारे गुरु शिष्य परंपरेमध्ये घराण्याचा शिरकाव झाला आणि या माध्यमातून संगीत शिक्षण होऊ लागले. परंतु कालांतराने यामध्ये काही अडचणी दिसून आल्या त्या काळात शिक्षणाचा प्रचार प्रसार कमी असल्यामुळे ,शिष्यांमध्ये असलेल्या शिक्षणाच्या अभावामुळे गुरूंनी सांगितले तिच पूर्व दिशा असायचचि, गुरूंना प्रति प्रश्न करण्याची सोय नव्हती, गुरूंना एखादे उत्तरं न आल्यास त्याचा अपमान वाटत असे आणि यामुळे गुरूंकडे जाण्याचा मार्ग बंद होत असून गुरूंच्या मर्जीप्रमाणे समोर बसूनच शिष्यांना आपले शिक्षण घ्यावे लागत असे गुरु मध्ये असलेले दोष स्वीकारुन अध्ययन करावे लागायचे कारण त्यावेळी गुरुकुल पद्धती शिवाय पर्याय नव्हता . आजच्या काळामध्ये सर्व सुखाचा त्याग करून गुरु गृही राहून आपलं संपूर्ण आयुष्य केवळ संगीत शिकणारा शिष्य दिसुन येत नाही ,त्याचप्रमाणे शिष्याला आपल्या घरी मुक्कामी ठेवून सर्व जबाबदारी घेऊन संगीत शिक्षण देणारा गुरु सुद्धा दिसून येत नाही.

विद्यालयीन शिक्षण पद्धती :- गुरु शिष्य पद्धतीमधील काही घटकांमुळे संगीत विकासामध्ये अडचणी निर्माण झाल्या ब्रिटिश शासन काळामध्ये संगीत शिक्षणामध्ये बदल होत गेले पश्चिम संस्कृती मुक्त जीवनशैली तसेच सामाजिक शिक्षण संस्थांची निर्मिती या सर्वांमुळे सर्व विषयांच्या शिक्षण पद्धतीमध्ये परिवर्तन येऊ लागले अशा काळात दोन महापुरुष महाराष्ट्रात जन्माला आले पं.वि.ना. भातखंडे आणि पं.वि.दि.पलुस्कर. संगीत ही उच्च दर्जाची कला आहे, शास्त्रशुद्ध व तर्कसंगत पद्धतीने संगीताचे अध्ययन व्हायला हवे हा विचार दोन्हीं विष्णुद्वयांचा होता .समाजामध्ये या विचारांना मान्यता मिळून याचे रूपांतर विद्यालयीन शिक्षण पद्धतीमध्ये झाले लाहोर येथे गांधर्व महाविद्यालयाची स्थापना मॉरिस कॉलेज , माधव संगीत विद्यालय , भारतीय संगीत विद्यालय अशा विद्यालयांची सुरुवात झाली या पद्धतीमुळे साचेबद्ध अभ्यासक्रम आणि योग्य व नियमितपणे शिकविणारे शिक्षक परीक्षा पद्धती तसेच वेळेवर होणारे मूल्यमापन प्रमाणपत्र अशा किती किती गोष्टी अगदी व्यवस्थित होऊ लागल्या यामुळे क्रियात्मक आणि शास्त्र दोन्हींना महत्त्व दिल्या गेले

शास्त्रशुद्ध स्वर लेखन करून ग्रंथांची निर्मिती केली स्वरलिपीची निर्मिती करून भारतीय संगीत जिवंत ठेवले अशाप्रकारे विषयाला उच्च स्थानी नेऊन पोहोचवले . गुरु शिष्य परंपरा किंवा गुरुकुल पद्धतीचा उद्देश हा फक्त कलाकार तयार करणे हा होता परंतु विद्यालयीन संगीत पद्धतीचा केवळ हाच उद्देश नसून जो शीष्य कलाकार बनू शकला नाही तो शिक्षक नाहीतर कमीत कमी चांगला श्रोता तरी होईल हा आहे. पदवी प्राप्त करून नोकरी मिळवण्याच्या आशेने तसेच फक्त छंद म्हणून संगीत शिकणारे याच शिक्षण पद्धतीची उपज आहे त्याचप्रमाणे विद्यालयीन संगीत शिक्षण पद्धतीमध्ये संगीताचा प्रचार व प्रसार होऊन सन्मान मिळवणे हा देखील उद्देश आहे परंतु विद्यालयीन शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढली असून या विद्यार्थ्यांच्या प्रमाणात गुरूंची संख्या देखील वाढली गुरु शिष्यप्रणाली मध्ये गुरु हे स्वतः कलाकार असणे आवश्यक होते किंबहुना गुरूंना मान सन्मान देखील असायचा परंतु विद्यालयीन संगीत शिक्षणामध्ये वरील बाबींचे महत्त्व कमी होत असल्याचे दिसते अशा प्रकारे दोन्ही पद्धतींची तुलना केल्यास विद्यालयीन संगीत पद्धतीमध्ये काही कमतरता दिसून येते .

आधुनिक काळाचा विचार केल्यास प्राचीन गुरु शिष्य प्रणाली ही आवश्यक असून त्या प्रणालीमध्ये आधुनिक काळातील परिस्थिती , सामाजिक स्वरूप लक्षात घेऊन संगीत शिक्षण प्रणाली मध्ये वैज्ञानिक व सुनियोजित रूप देण्याची आवश्यकता आहे या पद्धतीनुसार गुरु शिष्य परंपरेला पुनर्जीवित करण्याचे काम अनेक संस्था करीत आहेत प्राचीन काळातील गुरुकुल प्रमाणे वातावरण तयार करून विश्वविद्यालयात प्रवेशित विद्यार्थी आपल्याला योग्य वाटेल अशा गुरूंची निवड करून अधिकाधिक गुरूंच्या सहवासात राहून संगीताचे सखोल अध्ययन करीत आहेत.

निष्कर्ष:-

भारतीय शास्त्रीय संगीताच्या विकासामध्ये गुरुशिष्य परंपरेने विशेष आणि महत्त्वपूर्ण भूमिका वठविलेली आहे . आधुनिक काळात संस्थागत आणि महाविद्यालय संगीत पद्धती असून सुद्धा संपूर्ण भारतभर गुरुकुल संगीत पद्धती टिकून आहे आणि त्याचं महत्त्व देखील पहिल्याप्रमाणेच आहे ज्या विद्यार्थ्याला यशस्वी कलाकार व्हायचे आहे त्यांच्या करीता ही गुरुशिष्य संगीत पद्धती अधिक फायदेशीर ठरत आहे . अशा प्रकारे वैदिक काळापासून आधुनिक काळातील संगीत व्यवस्थेचे अध्ययन केले असता आपल्याला सुदृढ गुरुशिष्य परंपरेचे दर्शन होते . प्राचीन काळापासून आधुनिक काळा पर्यंत संगीत प्रस्तुतीकरणांमध्ये परिवर्तन होत गेले परंतु गुरु शिष्य परंपरेचा इतिहास कायम आहे.

संदर्भ सुची : -

1. भारतिय संगीत का इतिहास - भगवतचरण शर्मा
2. निबंध संगीत - डॉ लक्ष्मीनारायण गर्ग
3. संगीत मैनुअल - डॉ मृत्युंजय शर्मा , राम नारायण त्रिपाठी
4. सुरेल निबंधमाला – प्रा. संदिप जगदाळे

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No.36 Sept-Oct 2023

भरड धान्याचे पोषण विषयक महत्व आणि आतंरराष्ट्रीय धोरण

डॉ. वैशाली रा. मोरे
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख, श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय
मेहकर जिल्हा बुलढाणा

DOI- 10.5281/zenodo.10337108

प्रस्तावना:-

हरित क्रांतीमुळे देशाच्या अन्नधान्य उत्पादनात बरीच वाढ झाली .मात्र 'आधुनिक जीवनशैली'च्या नावाखाली अनेकांच्या आहाराच्या सवयीत पालट झालेले आहेत. संयुक्त राष्ट्रांनी वर्ष २०२३ हे 'आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष' म्हणून घोषित केले आहे. भरड धान्यात ज्वारी, बाजरी, राजगिरा, कोद्रो, कुटकी, सावा, राळा, वरई (भगर), नाचणी या पिकांचा समावेश होतो. जागतिक भरड धान्य उत्पन्नाच्या ४१ टक्के उत्पन्न भारतात होते. याचे आहारातील महत्त्व जाणून घेऊन त्यांचा वापर दैनंदिन आहारामध्ये होणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी या धान्याचे लाभ जनसामान्यांच्या मनावर विविध स्तरांतून बिंबवणे आवश्यक आहे. गरिबांच्या आहारातील ठोस पदार्थ आहे यापासून भरपूर कर्जतके मिळतात ही धान्य कोणत्याही भौगोलिक परिस्थितीत उत्पादित करता येतात. या गटात येणाऱ्या नद्यांचा रंग रूप आकार त्यात बदल असला तरी आंतररचना व घटकांच्या स्वरूपात बदल नसतो मानवाला आवश्यक असणाऱ्या कॅलरींपैकी 70 ते 80 टक्के कॅलरी तृणधान्यांपासून प्राप्त होतात. भरड धान्य पिकांची वैशिष्ट्ये म्हणजे ही अल्प पावसाच्या परिस्थितीत शुष्क आणि अर्ध-शुष्क भागात वाढतात. यांपासून ॲलर्जीचा धोका नाही. या पिकांमध्ये रासायनिक खते आणि कीटकनाशके यांचा वापर अल्प प्रमाणात होतो त्यामुळे आरोग्य दृष्ट्या महत्त्वाची आहे .या पिकांमध्ये उच्च पौष्टिक मूल्ये असून ती 'पौष्टिक तृणधान्य (न्यूट्री-सिरियल्स)' म्हणून ओळखली जातात आणि पचायला हलकी असतात.

भरड धान्याचे आरोग्यदृष्ट्या महत्त्व-

भरड धान्याच्या स्वरूपात अंकुरलेले हरभरे प्रत्येक दृष्टीकोनातून फायदेशीर आहे. बाजरी हा कॅल्शियम, प्रथिने, लोह आणि मॅग्नेशियमचा प्रमुख स्त्रोत आहे. ज्वारी ग्लुटेन मुक्त आहे, त्यात प्रामुख्याने फॉस्फरस, मॅग्नेशियम, रिबोफ्लेविन असते. व्हिटॅमिन बी-2, बी-6, झिंक आणि मॅग्नेशियम राजगिरामध्ये मुबलक प्रमाणात आढळते. नाचणीमध्ये लोह आणि कॅल्शियम भरपूर प्रमाणात असते. ही धान्ये पाण्याची टंचाई, रोगराई इत्यादी प्रतिकूल परिस्थितीला तोंड देण्यास सक्षम आहेत. ते साठवून संग्रहित करणे सोपे आहे आणि बर्याच काळासाठी उपयुक्त स्थितीत राहतात.सर्वेक्षणातून असे दिसून आले आहे की बाजरी, ज्याचा भारतीय आहारातील 40 टक्के वाटा आहे, त्यांचे अनेक फायदे असूनही, हरित क्रांतीनंतर सामान्य भारतीय थाळीचा भाग बनण्यात मागे पडले आहेत. त्यांची जागा गहू आणि तांदूळाने घेतली. 2018 मध्ये, भरड धान्य शेतीला चालना देऊन भारत सरकारने 'पोषण धान्य' चा दर्जा दिला. 154 विकसित वाण तयार करण्यात आले होते, जे उत्पादकतेच्या पातळीवर चांगले होते आणि रोगांशी लढण्यास अधिक सक्षम होते. पौष्टिक भरड तृणधान्ये देखील केंद्र सरकारच्या 'मध्यान्ह भोजन योजने'चा एक भाग बनवण्यात आली होती.

"श्री अन्न " भरड धान्य चे आहारातील स्थान

भरड धान्यास 'श्रीअन्न' म्हटले जाते. भरड धान्ये पौष्टिक तृणधान्य म्हणजे 'न्यूट्री-सिरियल्स' म्हणून देखील ओळखली जातात. भरड धान्य ऊर्जा व पोषण तत्त्वाचे आगार आहे. तसेच ती पचायला देखील हलकी असतात. जगाच्या अनेक भागांमध्ये भरड धान्य हे स्थानिक पीक आहे. भरड धान्याच्या जगातील एकूण उत्पादनांपैकी ४१ टक्केपेक्षा जास्त भरड धान्य हे भारतात पिकविले जाते व निर्यात केले जाते. - डॉ. विलास सावंत, शास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र, किर्लोस. भरड धान्य हा लहान-बीज असलेल्या तृण वर्गीय पिकांचा एक अत्यंत वैविध्यपूर्ण गट आहे, भरड धान्ये ही आकाराने बारीक, गोलाकार असतात. पूर्वीच्या काळी उखळ आणि मुसळ वापरून या धान्यावरील साल-साळ किंवा कवच भरडून काढले जात असे. त्यानंतर याचे गरजेनुसार जात्यावर दळून पीठ देखील केले जात असे. यामुळे या धान्याला 'भरड धान्य' असे म्हटले जात असे. ज्वारी आणि बाजरी ही आकाराने मोठी असलेली धान्ये असून त्यांना 'ग्रेटर मिलेट' म्हणतात. आकाराने बारीक असलेली नाचणी, वरी, राळा, कोदो, बर्टी, प्रोसो व

ब्राऊनटौप ही सर्व 'मायनर मिलेट' अथवा 'बारीक धान्ये' म्हणून ओळखली जातात. राजगिरा आणि कुट्टू यांना 'स्युडो मिलेट्स' असे म्हणतात. भरड धान्ये सुमारे सात हजार वर्षांपासून मनुष्य प्राण्याच्या आहारातील एक मुख्य धान्य आहे. हे तृणवर्गीय कुटुंबातील लहान-दाणेदार, वार्षिक, उबदार हवामानातील तृणधान्य आहे. हे पीक कोरडवाहू शेतीसाठी उत्तम पर्याय आहे. भरड धान्य पिके दुष्काळ, रोग आणि इतर विपरित परिस्थितीला उत्तम सहनशील असतात. याशिवाय इतर प्रमुख तृणधान्यांइतकेच यात पोषक घटक असतात. भारतातून अनेक देशांमध्ये भरड धान्ये निर्यात होतात. यात बाजरी, नाचणी, कांगणी, राळे, वरी, राजगिरा ज्वारी आणि कुट्टू हे येते. आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष साजरे केले जावे, यासाठी भारताने संयुक्त राष्ट्रांमध्ये दिलेल्या प्रस्तावाला ७२ देशांनी पाठिंबा दिल्यानंतर युनायटेड नेशनने २०२३ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष' म्हणून घोषित केले आहे. भरड धान्यात पोषक तत्व आणि आहारातील फायबर जास्त असतात. ते प्रथिने, सूक्ष्म पोषकतत्व आणि फायटोकेमिकल्सचा चांगला स्रोत म्हणून काम करतात. भरड धान्यात ७-१२ टक्के प्रथिने, २-५ टक्के मेद, ६५-७५ टक्के कर्बोदके आणि १५-२० टक्के आहारातील फायबर असतात. तृणधान्यातील प्रथिनांप्रमाणेच भरड धान्याची प्रथिने हे लाइसिनचे अल्प स्रोत आहेत; परंतु ते लाइसिन-समृद्ध भाज्या (शेंगायुक्त) आणि मांसाहारी प्रथिने यांच्याशी उत्तम प्रकारे पूरक आहेत, जे उच्च जैविक मूल्यांचे पौष्टिकदृष्ट्या संतुलित संमिश्र तयार करतात. काही भरड धान्ये ही फॉस्फरस आणि लोहाचा चांगला स्रोत आहेत. ही धान्ये फायटेट्स, पॉलीफेनॉल्स, टॅनिन, अँथोसायनिन्स, फायटोस्टेरॉल आणि पिनाकोसॅनॉलसह अँटिऑक्सिडंट क्रियाकलापांमध्ये योगदान देतात. ज्यामुळे वृद्धत्व आणि चयापचयाच्या आजारात यांची भूमिका महत्त्वाची ठरते. सर्व प्रकारची भरड धान्ये ही उच्च 'अँटिऑक्सिडेंट'ने परिपूर्ण असतात. भरड धान्यांचे आहारातील महत्त्व जाणून घेऊन त्यांचा वापर दैनंदिन आहारामध्ये होणे अत्यंत आवश्यक आहे. यांच्या सेवनाने शरीरातील रोगप्रतिकार शक्ती अधिक वाढते. ऊर्जा व पोषण देणाऱ्या भरड धान्यांपासून मिळणारे आरोग्यसंबंधीचे फायदे खूप असल्याने त्याविषयी जनजागृती होऊन वाढणे आवश्यक आहे.

<u>भरड धान्याचे आंतरराष्ट्रीय महत्त्व व पोषणविषयक धोरण</u>

पोषक धान्यांच्या निर्यातीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने, केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने प्रमुख कृषी निर्यात संस्थेच्या माध्यमातून भारतीय भरड धान्यांच्या निर्यातीला जगभरात अधिक प्रोत्साहन देण्यासाठी उपयुक्त ठरेल असे व्यापक धोरण तयार केले आहे.आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष साजरे केले जावे यासाठी भारताने संयुक्त राष्ट्रांमध्ये दिलेल्या प्रस्तावाला 72 देशांनी पाठींबा दिल्यानंतर, 2023 हे वर्ष आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष म्हणून साजरे केले जाईल अशी घोषणा संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने 5 मार्च 2021रोजी केली. त्या पार्श्वभूमीवर देखील सरकारचा हा भरड धान्ये निर्यात प्रोत्साहन कार्यक्रम महत्त्वाचा ठरणार आहे. वर्ष 2021-22 मध्ये भारतातून 34.32 दशलक्ष अमेरिकी डॉलर्स इतक्या किमतीच्या भरड धान्यांची निर्यात झाली.भारतीय भरड धान्ये आणि त्यांची मूल्यवर्धित उत्पादने जगभरात लोकप्रिय करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकार राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष साजरे करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करीत आहे.

भारतीय भरड धान्यांच्या निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारने 16 आंतरराष्ट्रीय व्यापार प्रदर्शने तसेच खरेदीदार-विक्रेता भेटींच्या माध्यमातून निर्यातदार, शेतकरी आणि व्यापाऱ्यांचा सहभाग वाढविण्याची योजना केंद्र सरकारने तयार केली आहे.भरड धान्यांच्या वापराला प्रोत्साहन देण्याच्या सरकारच्या धोरणानुसारआंतरराष्ट्रीय कीर्तीचे शेफ तसेच डिपार्टमेंटल स्टोर्स, सुपरमार्केट्स यांसारखे सक्षम खरेदीदार निश्चित करणे असे विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.

त्याचबरोबर, ' रेडी टू इट अर्थात लगेच खाता येतील अशी उत्पादनांसह भरड धान्यांवर आधारित विविध उत्पादनांचे प्रदर्शन भरविण्यात येतील. भारतीय भरड धान्यांच्या वापरला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने जागतिक पातळीवरील मंचांवर भरड धान्ये आणि त्यांच्या मूल्यवर्धित उत्पादनांचे प्रदर्शन करण्याची योजना आखली आहे.भारत हा जगातील भरड धान्ये उत्पादक देशांपैकी एक प्रमुख देश आहे आणि जगात उत्पादित होणाऱ्या एकूण भरड धान्यांपैकी 41% उत्पादन एकट्या भारतात होते. भारतात वर्ष 2021-22 मध्ये आधीच्या वर्षीपेक्षा 27% अधिक भरड धान्य उत्पादन झाले.

भारतात राजस्थान, महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये भरड धान्यांचे सर्वाधिक उत्पादन होते. मात्र देशातील एकूण भरड धान्य उत्पादनापैकी केवळ 1% भरड धान्यांची निर्यात होते.भारतीय भरड धान्य आणि त्यापासून बनणाऱ्या पोषण-मूल्यवर्धित उत्पादनांच्या जाहिरातीसाठी केंद्रसरकारने प्रत्येक लक्ष्यित देशासाठी 30 ई-माहिती पुस्तिका तयार केल्या आहेत. यामध्ये निर्यातीसाठी उपलब्ध असलेली भारतामधील विविध प्रकारची भरड धान्ये आणि त्यापासून बनणाऱ्या पोषण-मूल्यवर्धित उत्पादनांची माहिती पुस्तिका परदेशातील भारतीय दूतावास, आयातदार, निर्यातदार, स्टार्ट-अप्स आणि अन्य भागधारकांपर्यंत प्रसारित केली जाईल.नूडल्स, पास्ता, न्याहारीसाठी सिरियल्स, बिस्किटे, कुकीज, मधल्या

वेळी खायचे तयार पदार्थ, मिठाई यासारख्या इ.रेडी टू इट (आरटीई) आणि रेडी टू सर्व्ह (आरटीएस) श्रेणीमधील पोषण-मूल्यवर्धित उत्पादनांच्या निर्यातीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भरड धान्ये आणि संबंधित पोषण-मूल्यवर्धित उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने आयसीएआर-इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मिलेट्स रिसर्च (आयआयएमआर), हैदराबाद, आयसीएमआर-नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ न्यूट्रिशन, हैदराबाद, सीएसआयआर-सेंट्रल फूड टेक्नॉलॉजिकल रिसर्च इन्स्टिट्यूट (सीएफटीआरआय), म्हैसूर आणि शेतकरी उत्पादक संस्था (एफपीओ) यांच्या सहयोगाने पंचवार्षिक धोरणात्मक योजना तयार करायला सुरुवात केली आहे.

केंद्रसरकारने बाजरी आणि अन्य भरड धान्यांसह संभाव्य उत्पादनांच्या निर्यातीला चालना देण्यासाठी आणि पोषणमूल्ययुक्त तृणधान्यांच्या (न्यूट्री सिरियल्स) पुरवठा साखळीतील अडथळे दूर करण्यासाठी न्यूट्री सिरियल्स निर्यात मंचाची स्थापना केली आहे.भरड धान्यांच्या 16 प्रमुख प्रकारांचे उत्पादन आणि निर्यात होते. यामध्ये सोरगम (ज्वारी), बाजरी, फिंगर मिलेट (नाचणी), मायनर मिलेट (कांगणी), प्रोसो मिलेट (चीना), कोडो मिलेट (कोडो), बार्नयार्ड मिलेट (वरी/सांवा/साणवा/झांगोरा), लिटिल मिलेट (कुटकी), टू स्युडो मिलेट (बकव्हीट/कुट्टू), अमेरॅन्थस (राजगिरा) आणि ब्राऊन टॉप मिलेट आदी भरड धान्यांचा समावेश आहे.

अपेडाने 'आहार खाद्य मेळा', या आशियामधील सर्वात मोठ्या आंतरराष्ट्रीय बी2बी (B2B) खाद्य आणि आदरातिथ्य मेळया दरम्यान सर्व वयोगटांसाठी, परवडण्याजोगी 5 ते 15 रुपये किमतीची विविध प्रकारची भरड धान्ये प्रदर्शित (लाँच) केली आहेत.

संदर्भ:

1. मानवी पोषण आणि आहारशास्त्र - डॉ. संगीता जवंजाळ डॉ. किरण बेलूरकर
2. पोषण आणि स्वास्थ - डॉ. मीनाक्षी तारणेकर
3. Fundamentals of Foods and Nutrition: Sumati R. Mudambi, M.V. Rajagopal

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No.36 Sept-Oct 2023

हिन्दी साहित्य में अस्मितामूलक विमर्ष – स्त्री विमर्ष

दिपाली प्र. तोटे
षोध छात्रा
ब्वततमेचवदकपदह ।नजीवत. दिपाली प्र. तोटे
DOI- 10.5281/zenodo.10337142

महावीर प्रसाद द्विवेदीजीने कहा है कि, 'साहित्य समाज का दर्पण है।' जो निसंदेह सत्य है। हिन्दी कथा साहित्य में स्त्री-विमर्ष के संदर्भ में स्थापित पितृसत्तात्मक पुरूशप्रधान समाज की सत्ता है। जो समाज के सकारात्मक एवं नकारात्मक दोनों रूपों का सम्यक चित्रण करता है जो यथार्थ प्रतीत होता है। पुरूश प्रधान सत्ता के समकक्ष नारी खड़ी होना चाहती है। पुरूश के प्रति नारी का सह संघर्श नहीं है, अपितु समाज में नारी को समान हक दिलाने के एक सौहार्दपुर्ण और सामंजस्यसे परिपुर्ण तरीका है। दर्पण में केवल समाज का यथार्थ चित्रण होता है, जबकि साहित्य में समाज कैसा होना चाहिए? इस प्रष्न का प्रत्यक्ष एवं अप्रत्यक्ष रूप से विवेचन होता आ रहा है। हिन्दी साहित्य में नारी विमर्ष के अंतर्गत घर के भीतर स्त्री के उपर पुरूश का दबाव और अपने अधिकार के विरूध्द संघर्श, परिवारद्वारा किए गए उनके षोशण के विरूध्द संघर्श, कार्यस्थान में उनकी गिरी हुई स्थिती, समाज, संस्कृति और धर्म के नामपर उन्हे दिए गए नीचे दर्जे के विरूध्द संघर्श तथा अपने बच्चों को जन्म देकर उन्हे अकेले पालने के साथ-साथ समाज के विरूध्द संघर्श का अध्ययन होता है। इसप्रकार स्त्री-विमर्ष के अंतर्गत स्त्रियों का न केवल भेदभाव के विरूध्द संघर्श करना है, बल्कि सत्ता, समाज, संस्कृति और पुरूशों के द्वारा किये जानेवाले अन्याय-अत्याचार के विरूध्द स्वतंत्र और मुक्त होने के लिए भी लड़ना हैं। आज के वैज्ञानिक युग में नारी हर क्षेत्र में, हर परिस्थिती में अपने अस्तित्व को टिकाए रखने के लिए संघर्श करती दिखाई देती है। हर क्षेत्र में स्त्रियाँ षोशण, दबाव और दमन तीनों का षिकार होती है जैसे- असमान वेतन, कम मजदूरी, पुरूश अधिपत्य, स्त्रियों के प्रति हिंसा आदि। नर और नारी दोनो समाज के महत्वपुर्ण अंग है। परंतु नारी हमेषा समाज और संसार के दो पाटों के बीच पिसती चली आ रही है। समात की आधी आबादी नारी हैं किन्तु प्राचीन काल से लेकर आजतक वह अपने मानवीय रूप को ढुँढ रही है। **नोबेल षांति पुरस्कार प्राप्त इरान की षरीन एबादी के मतानुसार – "स्त्री आंदोलन अब मानवाधिकार आंदोलन ही होना चाहिए। ..... महिला अधिकार की लड़ाई मानवाधिकार की ही लड़ाई और वह विष्वषांति के लिए जरूरी है।" १**

रांगेय राघव के अनुसार – "नारी की मुख भूमि सृश्टि है।"२ नारी जननी है, षक्ति है, बुध्दिमान है प्रकृति की हर सुंदरता नारी में है। नारी ही सृश्टि के सृजन का बीज है परंतु फिर भी नारी के अस्तित्व को हमेषा नकारा जाता है और उसके बौध्दिक एवं निजी मुल्यों का अवमूल्यन किया जाता है। स्त्री-विमर्ष का जन्म एषिया में तब हुआ जग लोगों की अपने अधिकारों की चेतना जागृत हुई और अपने मुलभुत अधिकारों के प्रति आधी से ज्यादा जनता को वंचित रखे जाने के अन्याय के प्रति जागरूकता पैदा हुई। स्त्री स्वतंत्रता के विरूध्द उठी आवाजों ने अनेक मांगो का रूप लेकर विधवा पुनिर्विवाह, बहुविवाह प्रथा, सती प्रथा और पर्दा प्रथा को रोककर स्त्रियों के लिए षिक्षा एवं कानून संवैधानिक स्वतंत्रता का मार्ग प्रषस्त किया।

नारी को प्राचीन काल से निम्न दृश्टि से देखा जा रहा है। नारी को अबला की दृश्टि से देखनेवाले यह नहीं जानते कि, संकट और समस्या के समय नारी सबला बनकर उनका बड़ीही निड़रता से सामना करती है। मुलतः समाज को प्रगतीषील और विकासषील बनाने में पुरूश जितनी महत्वपूर्ण भूमिका निभाता है, उतनीही स्त्री भी।

"नारी सत्यम् षिवम् सुंदरम् बाकि सब झुठा है। कदम-कदम पर इस अबला को हर किसीने लुटा है। "

नारी को हमेषा अपने अस्तित्व को टिकाए रखने के लिए संघर्श करना पड़ता है। इतिहास के पन्नो का या हिन्दी साहित्य के चरणबध्द अध्ययन करें तो यह यथार्थ सामने आता है कि, उस काल में समाज, संस्कृति और नारी की स्थिती क्या रही होगी। जहां एक ओर आदिकाल में नारी उच्च पदस्थ, प्रतिश्ठित, पुजनीय देवी का रूप थीं, वहीं दुसरी ओर मध्यकाल और आधुनिक काल में आते-आते उसकी स्थिती में ऐसे बदलाव आए की वह अपने अस्तित्व को ही भूल गई। पुरूश प्रधान संस्कृति और समय के आघात ने नारी जीवन को कलुशित एवं कुंठाग्रस्त कर दिया और वह केवल एक भोगविलास की वस्तु बनकर रह गई। किंतु आज की नारी अपने उन सारे नये-नये सवालों के जवाब इस स्वार्थी और मरणोन्मुख समाज से माँग रहीं है, जो नारी को केवल पुरूशों की अनुगामिनी बनाकर समाज के हाषिए पर चलने के लिए मजबुर करता है।

नारी जो कभी अत्यंत पुजनीय थीं, आज वहीं अपने षराबी पति की मार से पीड़ित है एवं गरीबी के चलते अपना जिस्म बेचने पर मजबुर। यह पुरूश प्रधान समाज नारी के बीना अधुरा है। इस संदर्भ में अनेक विद्वानों ने अपने मंतव्य को व्यक्त करते हुए कहा है कि बिना स्त्री के पुरूश ही अधुरा ही नहीं बल्कि समाज भी निश्प्राण है। समाज में नारी को मान-स्थान दिलाने के लिए अनेक लेखकों, साहित्यकारों तथा समाज सुधारकों ने भी अथक प्रयत्न किए है। जिसमें वह काफि हद तक सफल भी हुए है किंतु अपेक्षित मात्रा में कामयाब नहीं हुए यह खेद की बात है। जिसप्रकार समाज में परिवर्तन होता गया उसके साथ-साथ नारी को देखने के दृश्टिकोण में भी बदलाव होने लगे। प्राचीन एवं आधुनिक नारी की चारित्रिक, बौध्दिक एवं मानसिक आदि गुणों में बहुत अंतर दिखाई देने लगे। जैसे-जैसे नारी हर क्षेत्र में सबल बनती गई वैसे-वैसे उसकी चारित्रिक और व्यावहारिक विषेशताएं उभरने लगी।

स्त्री-विमर्ष की आरंभिक दषा में स्त्री सषक्तीकरण एक कल्पना मात्र ही रही किंतु समय के साथ-साथ उसमें परिवर्तन होकर वह समस्त विष्व में फैल गई। अगर आज के आधुनिक साहित्य की बात करें तो आज के साहित्य के केंद्र में नारी ही है जो अत्यंत गंभीर और सुक्ष्म विशय हो चुका है। आधुनिक काल कके हर दुसरे साहित्यिक ग्रंथ में नारी-विमर्ष दृश्टिगोचर होता है। इन सारी बातों पर अगर गौर किया जाए तो यह ध्यान में आता है कि, हर सषक्त साहित्य का केंद्रबिंदु नारी बनती ता रही है। नारी की दयनीय स्थिती और समाज में उसके साथ होनेवाले दुर्व्यवहार एवं अन्याय का यहीं कारण है कि, साहित्य में लेखक एवं लेखिकाओं को नारी के प्रति होनेवाले इस अन्याय अत्याचार के विरूध्द कलम उठानेपर विवष कर देती है। स्त्री-विमर्ष एक सार्थक प्रयास है, नारी को अपने अस्तित्व से रू-ब-रू करवाने का। **स्त्री-विमर्ष के संदर्भ में आषारानी व्होरा का मंतव्य है कि – "स्त्री सरोकार वास्तव मे मात्र स्त्री से समस्याओं की व्याख्या और विष्लेशण न होकर पुरे समाज की चौराहे पर खड़ी दुविधाग्रस्त मानसिकता की गहरी पड़ताल है।"३**

बीसवीं सदी के भारत में सामाजिक, आर्थिक एवं प्रौद्योगिकीय क्षेत्र में तीव्र परिवर्तन होने लगा उसके साथ-साथ नारी की स्थिती और दृश्टिकोण में भी बदलाव होने लगे और स्त्री अपने बारे में सोचने लगी। ८ मार्च १९५७ का अमेरिका में निर्मित नारीवाद विष्वभर में फैलने लगा। **"सन १९७५ में बर्लिन में हुए सम्मेलन को 'विष्व महिला सम्मेलन' घोशित किया गया। इससे पूर्व २९ फरवरी १९७२ में जिनेवा की संयुक्त राश्ट्रसंघ की बैठक में महिला वर्श आयोजित करने का प्रस्ताव रखा गया था। जिसका मुख्य लक्ष्य महिलाओं का सामाजिक, राजनीतिक और मानवीय पक्षों का विकास करना था।"४** पाष्चात्य दार्षनिक प्लेटो, जॉन स्टुअर्ट मिल और कार्ल मार्क्स ने नारी-पुरूश समानता का विचार समाज के सामने रखा जिसका आधार 'नारी-विमर्ष' था। इनके विचार से प्रभावित होकर उदार नारीवादी, मार्क्सवादी नारीवादी, मनोविष्लेशक नारीवादी, अराजक नारीवादी एवं समाजवादी नारीवादी विचारधारायें उत्पन्न हुई और नारी के विविध पहलुओंपर चर्चा करके 'नारी-विमर्ष' विष्व व्यापक बन गया। जिसके परिणामस्वरूप अनेक महिला संगठन एवं नारीवादी विचारधाराओं का आरंभ हुआ। **"सन १९७७ ई. में महिला दक्षता समिती, स्त्री-षक्ति संगठन, स्त्री-संघर्श समिति, पुरोगामी स्त्री-संगठन बने। इसी वर्श 'मानुशी' पत्रिका का प्रकाषन आरंभ हुआ, जो भारतीय नारीवादी आंदोलन के लिए एक महत्वपूर्ण घटना है।"५**

देखा जाय तो प्राचीन काल से लेकर अबतक संपुर्ण विष्व में नारी का इतिहास फैला हुआ है। लेकीन अमेरिका और युरोप से षुरू यह आंदोलन भारतीय समाज तक भी पहुँकर भी विष्वव्यापी बन गया । भारत में विविध

समाज सुधारकोंद्वारा स्वतंत्रता आंदोलन प्रारंभ हुआ उसके साथही महिलावादी दृश्टिकोण जिसकी नींव पष्चिमी देष में रखी गई थी वह भी विस्तार पाने लगा। जिसके परिणामस्वरूप भारत के आरंभिक आंदोलनकर्ताओं में स्त्रियाँ ही प्रमुख थी। जिसमें पंडिता रमाबाई और सावित्रीबाई फुले जिन्होने स्त्री षिक्षा को मजबुत बनाने के लिए संघर्श किया। पंडिता रमाबाई ने स्त्रियों के अधिकारों के लिए संघर्श कर हिन्दु धर्म कि रूढिवादी परंपराओं पर आघात कर उन्नीसवीं षताब्दि की स्त्रियों की स्वतंत्रता की बात को समाज के सामने रखा। साथही सावित्रीबाई फुले ने स्त्री षिक्षा का महत्वपूर्ण काम किया। स्त्रियों स्वतंत्र स्कुल खोले और अथक परिश्रम कर स्त्रियों को षिक्षित करने का काम किया। एक तरह से हम उन्हे देष की पहली षिक्षिका कह सकते है।

भारत के स्त्री संघर्श का पहला चरण स्त्री का अपना वैयक्तिक जीवन व समाज था, तो दुसरा चरण सामंतवाद, पूँजीवाद, उपभोक्तावाद, बाजारवाद तथा बाहयषक्तियों के विरूध्द विद्रोह एवं आक्रोष भी तो था। आज की महिलाओं की माँगे, उनके विचार निरंतर बदलते रहते है किंतु समस्या और विशय तो वहीं है - स्त्रियों की स्वतंत्रता, समकक्षता, समाज में उनका दर्जा और इज्जत आदी। वर्तमान युगीन महिला लेखिकाओं ने यदि अपने साहित्य में धार्मिक, सामाजिक पक्ष को चुनौती दी तो उनका यह कृत्य कुछ समाज कंटकोद्वारा समाज विरोधी और धर्म विरोधी बनाकर उन्हे सांस्कृतिक परंपराओं की विरोधी ठहराया जाता है। क्योंकि हमारा समाज पुरूश प्रधान समाज है, जिसमें हर सामाजिक, धार्मिक एवं राजनीतिक विधी-विधान पुरूशोंद्वारा निर्मित है जिसे पुरूश ने अपनी सुविधानुसार बनाया है और स्त्री को उसकी देह रचना के कारण कमजोर एवं अबला बना दिया है।

स्त्री-स्वतंत्रता का विष्वव्यापी आंदोलन जिसमें भारतीय स्त्रियाँ भी एकत्रित होकर षामिल हो गई है। मुलतः महत्वपूर्ण बात यह है कि, दक्षिण एषियाई महिला जिन मुद्दो को उठा रही है वह अत्यंत षुध्द देषी एवं महत्वपूर्ण है। दहेज, घरेलू हिंसा, बलात्कार, असमान मजदूरी, पक्षपाती कानून, स्त्रियों के दमन के लिए किए गए धार्मिक प्रयोग एवं जनमाध्यम में स्त्रियों का नकारात्मक चित्रण आदि स्थानीय मुद्दे है। इस बात में कोई संदेह नहीं है कि, पिछले दो सौ वर्शो में प्राचीन कालखण्ड की अपंक्षा वर्तमान समय के सामाजिक परिप्रेक्ष्य में नारीयों के लिए अनेक मार्ग प्रषस्त हुए है। पुरूशों की अपंक्षा नारीयों में अनेक गुण दिखाई दे रहा है जिसके कारण उन्हे अपने मार्ग का चयन करने का पूर्ण अधिकार है। कुछ औरतो के लिए कुछ सामाजिक बन्धन भी कम हुए है। हमारे तथा हर देष के संविधान ने महिलाओं को काफी हदतक समान अधिकार दिए है किन्तु इसके बावजुद भी स्त्रियों को ना ही बराबर का दर्जा मिला है और पुरूश सत्ता का ही बोलबाला है। यहाँतक की औदयोगिक क्षेत्र भी इससे अछुता नहीं रहा है, जहाँ आधुनिक मषीनरी का उपयोग कर महिलाओं को काम से निकाल दिया जाता है और उनकी जगह पुरूशों को दे दि जाती है। इसका सबसे खराब उदाहरण भारत के कपडा उदयोग में देखने को मिलता है, जहाँ हजारों औरतों को काम से हटवा दी गई और जो औरते बच गई उनकी आवाज को इतना कम करवा दिया गया की वह अपने अधिकार के लिए कभी आवाज न उठा सके।

प्राचीन काल से ही नारी पितृसत्तात्मक परिवेष में कैद रही हैं वर्चस्ववादी पुरूश हमेषा नारी से यही अपेक्षा करता है कि वह हमेषा संस्कृति और समाज से हर परिस्थिती में अधीनस्थ और समर्पित रहे। यहीं कारण है कि नारी हमेषा परवषता का षिकार रहीं है। **''प्रभा खेतान ने नारीवादी आन्दोलनों की तात्विक विवेचना करते हुए 'स्त्री विमर्ष के अन्तर्विरोध' पीर्शक निबंध में मात्र पुरूश होने के कारण उसे षोशक कहना उचित नहीं कहा है अपितु नारी को भी अपनी स्वतंत्रता, अधिकार और सम्मान के लिए अग्रसर होने की दृश्टि से जिम्मेदार माना है।''**६ मार्क्सवादी दृश्टिकोण से देखा जाए तो समाज में नारी की स्थिती दलितों के समान जान पड़ती है। अनेक नारीवादी विचारधाराओं के माध्यम से पाष्चात्य नारी चेतना के सार्थक पहलुओं का उभारा गया है, जिसमें समाजवादी नारीवाद, मार्क्सवादी नारीवाद, श्लेक नारीवाद तथा दलित नारीवाद का समावेष है। भारतीय परिवेष में नारीयों ने अपने सम्मान, अस्तित्व और स्वतंत्रता कके लिए अनेक लड़ाईयाँ लड़ी है, परंतु एक आंदोलन के रूप में अपनी अलग पहचान प्रस्थापित नहीं कर पायी है।

स्त्री-विमर्ष का अभिप्राय स्त्री को प्राचीन कालसे चली आ रहीं अमानवीय रूढ़ी और परंपराओं की बेड़ीयों से मुक्त कर नारी की अस्मिता, सम्मान, स्वतंत्रता तथा अस्तित्व के सार्थक जीवनमूल्यों के प्रति नारी को सचेत एवं जागरूक कर पुरूशप्रधान संस्कृति की अधीनस्थता को स्वीकार करने के बजाय स्त्री के उत्थान और उन्नयन के लिए निरंतर प्रयत्नषील रहना। मुलरूप से देखा जाय तो नारी जीवन की समस्याओं को खुलकर समात के सामने रखना तथा स्त्री अस्मिता, समाज एवं परिवार में स्त्री की सम्मानजनक भूमिका, स्त्री के अधिकार और अस्तित्व पर चिंतन करना स्त्री-विमर्ष है। समाज में नित् नई-नई समस्याओं का उद्भव हां रहा है, जिसके परिणामस्वरूप नारी के स्थिती में बदलाव होकर नारी-विमर्ष की अवधरणा विस्तार पा रही है। नारी विमर्ष अर्थात नारी चिंतन। स्त्री जीवन की समस्यायें और उसके निवारण के उपाय इसपर लेखन होने लगा है किंतु इसका सम्यक आकलन करना अत्यंत आवष्यक है।

स्त्री-विमर्ष को लेकर अनंक साहित्याकारों की अपनी-अपनी अलग राय नहीं है। सबकी यहीं धारणा हैं कि, स्त्री विमर्ष अर्थात स्त्री द्वारा स्त्री के संदर्भ में स्त्री की दृश्टि से लिखा जाना। समाज के साथ-साथ साहित्य में भी नारी उपेक्षित रही है और पुरूश वर्चस्व के रूप में दब गई हैं। स्त्रीवादी विचारधारा का मानना है कि, स्त्री लेखन में स्त्री के अनुरूप गुण होने चाहिए। 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता' वाली स्त्री 'अबला नारी हाय तुम्हारी यही कहानी, आँचल में है दुध आँखों में है पानी' वाली नारी पर स्त्री-विमर्षकार **प्रभा खेतान का कहना है - ''स्त्री न स्वयं गुलाम रहना चाहती है और नही पुरूश को गुलाम बनाना चाहती है। वह चाहती है मानवीय अधिकार।''**७ स्त्री-विमर्ष का मुख्य लक्ष्य है कि, स्त्री को मानव रूप में देखना। स्त्री को मानव समझकर उसकी स्वतंत्रता, उसकी अस्मिता, उसके गुण, उसकी पहचान को निखारने दे, किंतु हमारी पुरूश प्रधान संकृति के कारण धर्म और परंपराओं के कारण स्त्री पुरूश की गुलाम और एक भोग की वस्तु बन गई है। इन्ही बातों का विरोध स्त्री विमर्ष है। जिसपर **डॉ. प्रज्ञा षुक्ला कहती है - ''नारीवाद एक विचारधारा या चिंतनमात्र है, जो स्त्रियों को उसकी परंपरागत भूमिका के विशय में पुनः सोचकर उसके स्वतंत्र अस्तित्व की पहचान स्थापित करने के लिए उसे एक नई दिषा प्रदान करता है।''**८ विष्व के सभी धर्मो में नारी को दुय्यम स्थान ही मिला है। उसीके परिणास्वरूप स्त्री विमर्ष नारी को एक व्यक्ति ही नहीं बल्कि एक स्वायत्त व्यक्ति बनाना चाहता है। **महान विचारक पायथागोरस इसपर अपने विचार व्यक्त करते हुए कहते है कि, ''जो अच्छे सिध्दांत है, वो पुरूश की व्यवस्था एवं उजाले को जन्म देते है। मनुसंहिता के अनुसार स्त्री एक निकृश्ट वस्तु है, जिसे बंधनों में रखना चाहिए। 'रोम कानून' औरतों को संरक्षण में रखने के लिए कहता है, ताकि उसकी मूढ़ता पर लगाम लगाई जा सके। कैनन का कानून औरतो को षैतान कीता है, जबकि कुरान औरत के प्रति भयानक उपेक्षा रखता है।''**९ परंतु आज की नारी षिक्षित बनकर परंपराओं और कुरीतियों को तोड़कर अपने अस्तित्व और आत्मबोध से समृध्द होकर इन अन्यायी श्रृंखलाओं को तोड़कर आगे बढ़ रही है। स्त्री विमर्ष इसी बात पर जोर दे रहा है कि, नारी को अपने अस्तित्व एवं स्वतंत्रता के लिए धर्म और जाति के अनचाहे बंधनों से मुक्ति पाना अनिवार्य है।

स्त्री-विमर्ष में नारी को आर्थिक स्वतंत्रता भी आवष्यक है। आर्थिक रूप से सक्षम स्त्री को भी अपने परिवार के पुरूशों के अधीन रहना पड़ता है तथा घर में भेदभाव का सामना करना पड़ता है। आर्थिक स्वतंत्रता की लड़ाई स्त्री के संपूर्ण संघर्श का एक अंष मात्र है। षहरी तथा निम्नवर्ग की स्त्रियां जो बाहर जाकर काम करके कमाती है, उनका भी अपनी कमाई पर कोई अधिकार नहीं रहता। बाहर जाकर पैसे कमाने का यह अर्थ नहीं हैं कि स्त्रियों को आर्थिक स्वतंत्रता दी गई है उनकी ज्यादातर कमाई पिता, पति या परिवार के पुरूश सदस्यों के हाथ में चली जाती है और स्वयं के पैसों का खर्च करने का निर्णय उनके हाथो से छिन लिया जाता है। इसप्रकार नोकरी करना उनकी मजबूरी बन जाती और वह घर और बाहर दोनों तरफ काम का बोझ उठाते-उठाते षोशण का षिकार होती रहती है। घर के काम जैसे खाना पकाना, सफाई करना, पानी भरना, बच्चों की देखभाल करना, उनका पालन-पोशण करना, परिवार संभालना आदि कामों के साथ-साथ कारखाने, खेत, दफ्तर तथा बागान में घंटो मेहनत करनी पड़ती है। इसप्रकारसे स्त्रियाँ अपनी दोहरी जिंदगी का बोझ उठ़ाती है, परंतु षिकायत नहीं करती। वह सवैतनिक और अवैतनिक दोनों का भी भार साथ-साथ उठ़ाती है और वह भी खुषी से।

नारी के अनेक रूप हैवह एक माँ, बहन, बेटी, पत्नी आदि के होते हुए भी अपने आप में भी कहीं भी नहीं है। उसका अपना स्वतंत्र अस्तित्व ही नहीं है, वह इन रूपो के नीचे दब गया है। उसी दबे हुए अस्तित्व और व्यक्तित्व का बोध 'स्त्री-विमर्ष' कराता है और स्त्री को विकसित होने तथा आत्मनिर्भर बनाने में निरंतर गतीषील है। नारी स्वतंत्रता की हकदार है और साथ ही पारिवारीक मर्यादा, परंपरा, सभ्यता एवं संस्कृति तथा नैतिक मूल्यों की संवाहिका है। स्त्री-विमर्ष का संबंध स्त्रियों से जुड़े सवालों से तो है ही लेकिन इन्हि सवालों तक यह सीमित नहीं है। यह केवल सामाजिक समस्या या पारिवारिक जिम्मेदारीयों तक सीमित न होकर हर उस मुद्दे से जुड़ा हुआ है जो स्त्री को प्रभावित करता है। क्योंकि वह एक स्त्री होने के साथ-साथ एक

मनुश्य भी है, संसार की आधी आबादी है यदयपि संसार का हर विशय उनसे संबंध रखता है। **''स्त्री-विमर्ष का मतलब पुरूश वर्चस्व, पुरूश दर्प, पुरूश मानस की विकृत सोच से सभी की मुक्ति है न कि स्त्री पुरूश संबंधों से उसकी मुक्ति।''१०**

नारीमुक्ति ही स्त्री-विमर्ष का लक्ष्य है। स्त्री-विमर्ष सभी प्रकार की असमानता, दबाव, अन्याय ओर दमन को हटाकर राश्ट्रीय एवं अंतरराश्ट्रीय स्तरपर समान रूप से आर्थिक, सामाजिक और न्यायिक स्थापना कर हर मुद्दों को अपनाना चाहते है। स्त्री का अपना एक स्वतंत्र दृश्टिकोण होता है अतः उन्हे हर विशय पर अपने मतों और विचारों को व्यक्त करना चाहिए। देष की राजकिय स्थिती, आर्थिक स्थिती संबंधी विकास की नीतियाँ, मानवाधिकार, जातिव्यवस्था, धार्मिक स्थिती, तथा सांप्रदायिकता आदी मुद्दोपर अपने विचारों और दृश्टिकोण को व्यक्त करना चाहिए। सच बात तो यह है कि, सिमित साधन होने के बावजूद भी स्त्री संगठन उपर्युक्त मुद्दो के लिए अनेक कार्य कर अपना बहुमुल्य योगदान दे रहे है।

डॉ. क्षमा षर्मा के अनुसार,''स्त्रीत्ववादी विमर्ष न तो मजाक है न अपवाद वह एक ही समय हमारे देषकाल और पुरी दुनिया से जुड़ा है। वह हमारे समय की जरूरत है। वह समग्र आर्थिक, राजनीतिक, सामाजिक, भाशिक और सांस्कृतिक विमर्ष है।''११ भारतीय जीवन मुल्यों में नये संदर्भ की पुनः स्थापना कर स्त्री को सामंती व्यवस्था की गुलामी से नारी विमर्ष मुक्त कराना चाहता है। **डॉ. सुमन राजे के मतानुसार,''स्त्री-विमर्ष साहित्य में उपेक्षा की वस्तु नहीं है। लेकीन उसकी परिभाशा का खुला हुआ वृत्त होना चाहिए। कहा जा सकता है कि महिला लेखन में स्त्री-विमर्ष स्त्री की दृश्टि से देखा गया और अभिव्यक्त किया गया ऐ संपूर्ण गतिमय संसार है जो उसे षेश सृश्टि से जोड़ता है, कांटता नहीं है।''१२** इन्ही से मिलते-जुलते विचार स्त्री विमर्षकार **डॉ. सूर्यबाला के भी है। उन्होने आने एक लेख में कहां है कि,''स्त्री के संपूर्ण अंतरंग और बहिरंग को समझने की कोषिष आवरणों और जकड़नों को भेदकर बाहर आई स्त्री का मन, स्त्री की सोच, दृश्टि, समस्याओं, स्थितियों और मनःस्थितीयों का विष्लेशण मेरी समझ में स्त्री विमर्ष है।''१३** स्त्री का मनोविज्ञान ध्यान में लाकर उसके समग्र अंगो को उसकी मानसिक स्थिती के साथ लेखिका यहां विष्लेशित करना चाहती है। नारीवाद की मान्यताप्राप्त व्यापक विष्लेशक **डॉ. प्रभा खेतान कहती है,''नारीवाद वह दृश्टिकोण है, वह विचारधारा है, जो परिवार, कार्य जगत और समात में स्त्री के दमन और षोशण के प्रति अवबोध रखता है और उन स्त्री-पुरूशों से सजक सक्रियता की अपेक्षा रखता है, जिन्हे ऐसी परिस्थितीयाँ स्वीकृत नहीं। इस परिभाशा के अनुसार कोई भी व्यक्ति वह चाहे स्त्री हो या पुरूश चाहे वह किसी जाति, वर्ग का क्यों न हो, यदि वह समाज में प्रचलित, यौवनवाद, पुरूश अधिपत्य और पितृसत्ता के दमन के खिलाफ अपनी आवाज उठ़ाता है, वह संघर्श करता है तो उसे नारीवाद कहा जायेगा।''१४**

स्त्री अधिकारों की कट्टर समर्थक अनामिका स्त्री उत्पीड़न का अपराधी पुरूश को नहीं मानती। स्त्री विमर्ष की यथार्थ तस्वीर स्पश्ट करते हुए वह कहती है,**''दोश तो पितृसत्तात्मक समाज का है, जो किंचित पुर्वाग्रहों ओर कंडीषनिंग प्रषिक्षण दोश के कारण पुरूशों को भेड़ियाँ और स्त्रियों को भेड़ बनाती है। मगर एक दमन चक्र का जवाब दूसरा दमन चक्र नहीं होता।''१५** अर्थात स्त्री विमर्ष कोई दमन चक्र नहीं है। वह तो नारी-जीवन से जुड़ी समस्याओं को खुलकर समरज के सामने रखने का एक जरीया हैं जो स्त्री की अस्मिता, समाज और परिवार की सम्मानजनक भूमिका एवं स्त्री अधिकारों और दायित्वों पर चिंतन करता है। स्त्री-विमर्ष का लक्ष्य केवल नारी की स्थिति के उत्थान एवं विकास से सीमित न होकर नारी का सर्वांगीण विकास करना है। स्त्री-विमर्ष का मुख्य उद्देष नारी को सकारात्मक मार्ग दिखाना, सबल पथप्रदर्षन करना, जीवन में आनेवाली हर समस्याओं का सामना कर सचेत रहना, नारी के सामर्थ्य की खोज करके उसे उससे परीचित करवाना तथा परंपरागत दृश्टिकोण एवं मानसिकता से परे उसे 'स्व' का साक्षात्कार करना आदि रहा है। देखा जाए तो स्त्री-विमर्ष व्यापक अर्थ में पारी जीवन के अनजाने और अनछुए पहलुओं को व्यक्त करता है और साथही किसी स्थिती में आँसू न बहाकर जिम्मेदार तथ्यों की खोज करना भी सिखाता है।

विधाता द्वारा निर्मित नारी एक सुंदरतम कृति है, जिसकी सामाजिक, राजनैतिक एवं धार्मिक स्थिती एवं निरंतरता में महत्वपूर्ण भूमिका रही है। स्त्री वास्तव में पुरूश के समकक्ष एवं सहज संवेदनाओं को समाज की गतिषीलता, स्थिरता एवं निरंतरता को सबल दृश्टि देनेवाला चिंतन है। तथापि, प्राचीन काल से लेकर अबतक स्त्री की स्थिती में बदलाव होते आ रहे है। पुरूश-प्रधान समाजद्वारा स्त्री हमेषा अपने अधिकारों से वंचित रहीं है, जिनकी प्राप्ति के लिए नारी-विमर्ष एक संघर्श का सहज मार्ग प्रषस्त कर, हमें एक नवीन चिंतन एवं जागरण की विचारधारा प्रस्तुत करता है।

अंतः स्त्री-विमर्ष वास्तव में स्त्री को माता के रूप में समाज में प्रतिश्ठापित करने का एक महायज्ञ है। आरंभ में स्त्री-विमर्ष का जो बीजारोपण हुआ था अबतक वटवृक्ष के समान उसकी षाखाएँ साहित्यरूपी भूमिपर फैल चुकि है।

संदर्भ ग्रंथसुची

१) व्होरा आषारानी - आधुनिक समाज में स्त्री - पृ. क्र १६७
२) डॉ. सौ. कप्पीकेरे मंगला - साठोत्तरी हिंदी लेखिकाओं की कहानियों में नारी - पृ. क्र. २६
३) व्होरा आषारानी - स्त्री सरोकार अपनी बात
४) डॉ. बोडके बबनराव - बीसवीं षताब्दि के अंतिम दषक की कहानियों में नारी - पृ. क्र.०६
५) वही - पृ. क्र. १०
६) सम्पादक, चतुर्वेदी जगदीष्वर - स्त्री अस्मिता : साहित्य और विचारधारा - पृ. सं. ३४
७) डॉ. भारद्वाज षैलजा - हिंदी साहित्य में युगीन बोध - पृ. क्र. ३८८
८) सौ. कप्पीकेरे मंगला - साठोत्तरी हिंदी लेखिकाओं की कहानियों में नारी - पृ. क्र. १०३
६) डॉ. देषपांडे वैषाली - स्त्रीवाद और महिला उपन्यासकार- पृ. क्र. १४
१०) सं. डॉ. वेरेकर षोभा - हिंदी उपन्यास : नारी विमर्ष - पृ. क्र १४
११) षर्मा क्षमा - स्त्रीत्ववादी विमर्ष - समाज और साहित्य - भूमिका - पृ. क्र ०५
१२) डॉ. भारद्वाज षैलजा - हिंदी साहित्य में युगीन बोध - पृ. क्र. २६६
१३) वही - पृ. क्र. २६६
१४) वही - पृ. क्र. २६६ - २७०
१५) मधुमती- मार्च २०११ - पृ. क्र. १०

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No.36 Sept-Oct 2023

शास्त्रीय संगीत अध्ययन अध्यापनातील स्थित्यंतरे

डॉ. अभय अरविंद गद्रे
संगीत विभाग प्रमुख, श्रीमती सु.रा.मोहता महिला महाविद्यालय,खामगांव
Corresponding Author- डॉ. अभय अरविंद गद्रे
DOI- 10.5281/zenodo.10337198

प्रस्तावना :-

संगीत ही अतिशय प्राचीन ललित कला आहे. प्राचीन शिल्पांमधील विविध वाद्ये, नृत्य,सांगित्कि मुद्रा इ. बाबी संगीताचे प्राचिनत्व अधोरेखीत करतात. मानवाच्या विकासाबरोबरच संगीत कलेचाही विकास होत गेला. या विकासाचा महत्वाचा टप्पा म्हणजे शास्त्रीय संगीताची आणि त्याच्या शास्त्राची निर्मीती होय. शास्त्रीय संगीत ही एक मौखिक आणि प्रदर्शनात्मक कला असली तरीही प्राचीन काळापासून तो एक अध्ययन अध्यापनाचाच विषय ठरला आहे.

गुरूशिष्य परंपरा

संगीताचे जतन मौखिक परंपरेतूनच झाले आहे. ती एक गुरूमुखी कला असल्याने शिष्याने गुरू समोर बसुनच ही कला साध्य होउु शकते. असा विश्वास दृढ आहे. हया पध्दतीचे वैशिष्टय असे-

१.वर्षानुवर्षे संगीताचा संस्कार शिष्यावर होत असतो. २. मेहनत आणि सातत्यपूर्ण रियाज यातून संगीत चिंतन घडते. ३. प्रत्येक गुरूची शिकविण्याची पध्दत भिन्न असते. ४. शिष्याची क्षमता, नैसर्गिक जाण या व्यक्तिभिन्नतेचा विचार या शिक्षण पध्दतीचा मुलाधार आहे. ५. यामध्ये एकच गुरू भिन्न भिन्न क्षमतेच्या शिष्यांना त्यांना झेपेल असे ज्ञान देत असतो. ६. भिन्न भिन्न घराण्यांचे अस्तित्व ,विविधता या पध्दतीने टिकून राहिल्या आहेत आणि संगीत सरीतेला विस्तीर्ण रूप बहाल करण्यात ही पध्दत अत्यंत सक्षम ठरली आहे. ७. एकावेळी एकाच शिष्याला शिकवितांना शिष्यामधील त्रूटी आणि बलस्थाने गुरूंना जाणवत असल्याने अध्यापनात योग्य बदल करता येतो. ८. एकच अभ्यासक्रम सर्व विद्यार्थ्यांवर लादण्याची आवश्यकता या परंपरेत नाही.

मर्यादा

या पध्दतीतील सर्वात मोठा दोष म्हणजे ज्या व्यक्तीत सांगित्यीक गुण जसे-आवाज,ताल-लयीचे भान जन्मत:च दिसून येतात त्यांनाच संगीत शिकण्याची संधी प्राप्त होते. त्यामुळे गुणात्कदृष्टया ही पध्दत उपयुक्त असली तरी संख्यात्मकदृष्टया फार सिमीत व्यक्तींनाच संगीत शिकण्याची संधी प्राप्त होते आणि संगीत प्रचार प्रसारावर त्याचा विपरीत परीणाम होतो. योग्य शिष्यांमुळे उत्तम परंपरांचा /घराण्यांचा विकास होतो हे खरे पण अत्यंत सिमीत शिष्यसंख्येमुळे या परंपरा क्षिण होतात आणि कधीकधी लुप्त देखील ! केवळ गुरूवंशातील व्यक्तींनाच '' खास उल खास तालिम'' मिळाल्याने सामान्य शिष्यांमध्ये असंतोष निर्माण होतो. या पध्दतीतील आणखीन एक समस्या म्हणजे या शिक्षणात कोणताही निश्चित अभ्यासक्रम किंवा समयसीमा नसल्याने वर्षानुवर्षे हे अध्ययन अध्यापन सुरू राहून देखील कोणतेही प्रमाणपत्र विद्यार्थ्यास प्राप्त होत नाही. हुबेहुब म्हणणे गुरू आणि शिष्य दोघांनाही अपेक्षीत असल्याने वैयक्तिक प्रतिभेवर, सृजनशीलतेवर या पध्दतीचा आघात होतो. अर्थाजनासाठी वेगळी वाट शिष्यांना धरावी लागते. संगीत हे उपजीविकेचे साधन होत नाही.

संस्थागत शिक्षण पध्दती

उदय :- संगीत शिक्षणातील उपरोक्त मर्यादा संगीत विचारवंतांना लक्षात आल्याने १९ व्या शतकात संस्थात्मक शिक्षण पध्दतीचा उदय झाला. यातून सर्वसामान्यांना संगीत शिक्षणाच्या समान संधी प्राप्त होउु लागल्या. संगीताचा प्राचार-प्रसार जोमाने होउु लागला. संगीत शिक्षणात नियमबध्दता , प्रमाणिकरण तसेच शास्त्र व कला यांच्यात समतोल साधल्या जाउु लागला.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धानंतर निर्माण झालेल्या विविध संस्था

अ.क्र	स्थापना वर्ष	संस्थेचे नांव	संस्थापक
१	१८७१	कलकत्ता संगीत विद्यालय	श्री.मोहन गोस्वामी
२	१८७४	भारत गायन समाज, मुंबई	----
३	१८८०	गायनोत्तेजक मंडळ, जामनगर	श्री. पंडीत आदित्यराम
४	१८८५	सितार प्रशिक्षण केंद्र, दिल्ली	श्री.पन्नालाल गोसाई
५	१८८६	बडोदा संगीत विद्यालय (बडोदा स्टेट म्युजिक स्कूल)	श्री.महाराजा गायकवाड
६	१९०१	गांधर्व संगीत महाविद्यालय,लाहोर	श्री.पंडीत वि.दि.पलुस्कर
७	१९१८	भातंखंडे संगीत विद्यालय, ग्वालियर	पं. वि.ना. भातखंडे
८	१९२०	भातंखंडे संगीत विद्यालय, बडोदा	पं. वि.ना. भातखंडे
९	१९२६	भातंखंडे संगीत विद्यालय, लखनउु	पं. वि.ना. भातखंडे
१०	१९२६	अलाहबाद ,प्रयाग संगीत समिती	पं. वि.ना. भातखंडे
११	१९३०	जालंदर संगीत समिती	--
१२	१९५०	बनारस हिंदू विश्वविद्यालय संगीत विभाग	--

बनारस हिंदू विश्वविद्यालयानंतर दिल्ली विश्वविद्यालय, मुंबई विश्वविद्यालय आणि अनेक विश्वविद्यालयामध्ये संगीत विभाग सुरू करण्यात आले. या विश्वविद्यालयांशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये इतर विषयाप्रमाणेच संगीत विभाग सुरू झाले. तसेच अ.भा.गांधर्व मंडळ,भारत गायन समाज पुणे, प्रयाग संगीत समीती आणि यांच्या सारख्याच अनेक संस्था शास्त्रीय संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत. या संस्थांशी संलग्नित अनेक संगीत संस्था भारतातील सर्व राज्यातील विविध शहरांमधून , गावांमधून सुरू झाल्या असून प्रारंभिक ते अलंकार- आचार्य अशा अनेक प्रमाणपत्र परीक्षा या संस्थामार्फत घेतल्या जात आहेत. कला पक्ष आणि शास्त्र यांच्यामध्ये संतुलन स्थापीत करण्याकडे या संस्थांचा कल आहे.

मर्यादा

गुरूशिष्य परंपरेत जे समर्पण दिसून येते ते संस्थागत शिक्षण घेउुन संगीत शिकणा-या विद्यार्थ्यामध्ये आभावानेच दिसून येते. त्यामुळे आज केवळ परीक्षार्थी निर्माण होत आहे. केवळ पदवी मिळून स्वत:ची संगीत विद्यालये उघडली जात आहेत. कलेचा स्तर खुप घसरत असून या संस्था

कलाकार बनवण्यास असमर्थ ठरत आहेत. पाठयक्रम संपवण्यावर विशेष लक्ष केंद्रीत केल्या जाते आणि प्रत्यक्ष गळयाची तयारी , कंठ साधना, पहाटेची मंद्र साधना याकडे दुर्लक्ष होउन केवळ खानापुर्ति करण्याकडे शिक्षक आणि विद्यार्थी यांचा कल दिसून येतो. डॉ. वसंतराव देशपांडे यांनी '' मारवा'' रागाचा रियाज १२ वर्षे केला, पं.भिमसेन जोशी यांनी अनेक वर्षे १८-१८ तास रियाज केला आणि नंतर '' सांधे नांदे गला करके चला'' ही अवस्था त्यांना प्राप्त झाली. अशी मेहनत , जिद्द, ज्ञानलालसा या गोष्टी संस्थागत शिक्षण पध्दतीत कुठेच दिसत नाहीत.

गुणवत्तावाढीसाठी उपाय योजना

संस्थागत शिक्षण प्रणालीने शास्त्रीय संगीत शिक्षणाची समान संधी निर्माण केली हे खरे असले तरी गायक- वादकांची गुणवत्ता वाढविण्यासाठी काही ठोस उपाय योजना करणे नितांत गरजेचे आहे. विशारद- अलंकार-एम.ए.-पीएच.डी इ. परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यासाठी ज्येष्ठ गुरू, कलाकार, कंठसाधना मार्गदर्शक यांचे मार्गदर्शन उपलब्ध करुन द्यावयास हवे. या विद्यार्थ्यांचे वेळोवेळी मंच प्रदर्शनाचे कार्यक्रम आयोजित करुन संगीत अभ्यासक श्रोत्यांना त्यासाठी आमंत्रित करावयास हवे. उत्तम मंचप्रदर्शन करणा-या विद्यार्थ्यांचे पु:नश्च वेगळे समुह तयार करुन आणखीन उच्चस्तरीय मार्गदर्शन , विविध ठिकाणी कार्यक्रम इ. बाबी उपलब्ध करुन दिल्यास त्यांना प्रोत्साहनही मिळेल आणि एकूणच संगीत क्षेत्राचि गुणवत्ता वाढेल.

कला व तंत्रज्ञान यांचा मेळ

शिक्षणक्षेत्रात तंत्रज्ञानाने शिरकाव केल्याने शिक्षणक्षेत्रात आमुलाग्र बदल आणि प्रगती दिसून येत आहे. संगीतक्षेत्रातही तंत्रज्ञानाने अनेक चांगले बदल घडवून आणले आहेत. कला सादरीकरणात या तंत्रज्ञानामुळे अनेक फायदे दिसून येतात. एखाद्या भव्य सभागृहात किंवा मोकळया प्रांगणात हजारो लोक अत्याधुनिक ध्वनिक्षेपण व्यवस्थेमुळे एकाचवेळी गायन,वादन,नृत्य यांचा आस्वाद घेउ शकातात. गायकांना तर विनासायास त्यांच्या आवाजातील बारकावे, सुक्ष्म सौंदर्यस्थळे, मींड, मुर्की,खटका इ. श्रोत्यापर्यंत आवाजावर अवास्तव ताण न आणता पोहचविता येतात. नृत्याविष्काराचा आनंदही कला रसिकापर्यंत मोठमोठया पडद्याद्वारे पोहचतो. इलेक्ट्रॉनिक माध्यमामुळे युटयुब वर दिग्गज कलाकारांचे कार्यक्रम सामान्य रसिकांना तसेच अभ्यासकांना बघता व ऐकता येउ लागले. जगातील कोणत्याही कानाकोप-यात होणारे भव्यदिव्य संगीत कार्यक्रम घरबसल्या दृकश्राव्य झाले आहेत. पारंपारिक वाद्यांची जागा इलेक्ट्रॉनिक वाद्यांनी घेतली असल्याने प्राथमिक स्तराच्या अभ्यासकांना देखिल सुर-ताल सहज उपलब्ध होउ लागले आहेत.

ऑनलाईन संगीत अध्यायन अध्यापन

शास्त्रीय संगीतातील गुरुशिष्य परंपरा मागे पडून संस्थागत संगीत शिक्षणाने त्याची जागा घेतली. परंतू गेल्या १०-२० वर्षात तंत्रज्ञान इतक्या झपाटयाने प्रगत होत आहे की वरील दोन्हीही पध्दती कालबाहय होतात की काय अशी रास्त भिती वाटू लागली आहे. शिक्षण-नोकरी-व्यवसाय निमित्याने देशातील नागरिक फार मोठया प्रमाणावर इतर देशांमध्ये स्थलांतरीत होत आहेत पण आपली संस्कृती, आपले संगीत,कला या गोष्टीबद्दल त्यांच्या मनातील आकर्षण-प्रेम ही सहज प्रवृत्ती आहे. संगीत शिक्षण विविध वाद्ये ज्येष्ठ कलाकारांचे कार्यक्रम या सर्व गोष्टी प्रगत तंत्रज्ञानामुळे आज सहज उपलब्ध होत आहेत. परंतू त्यामुळे कलेला अत्यंत व्यावसायिक स्वरुप प्राप्त होउ लागले आहे. कलेवरील प्रेम,निष्ठा,सातत्य ही मुल्येच चांगले कलावंत घडवू शकतात. आठवडयातील ठराविक दिवस, ठराविक तास हे कला शिकण्यासाठी पुरेसे नाही. ऑनलाईन शिक्षणातील काही तांत्रिक अडचणी देखील अध्ययन,अध्यापनात खुप अडचणी व अडथळे निर्माण करतात. उदा. शिक्षकाने गायलेली किंवा वाजविलेली ओळ विद्यार्थ्याला काही वेळाने ऐकू येते. त्यामुळे हा जो टाइम -लॅग निर्माण होतो त्याने एखादी बंदिश ,तिचा विस्तार,आलाप,तान इ. बाबी विद्यार्थ्याच्या गळी उतरविणे अत्यंत कठिण होउन बसते. ज्या विद्यार्थ्याने ४-५ वर्षे गुरु समक्ष बसुन संगीत शिक्षण घेतले आहे अशा विद्यार्थ्यासच ऑनलाईन अध्यापनाचा फायदा होउ शकतो. आभासी कार्यक्रमांमुळे प्रत्यक्ष मंचावरील गायनाच्या कार्यक्रमाची संख्या खुप कमी होत आहे. त्याची झळ गुणी व व्यावसायिक कलाकारांच्या कार्यक्रम संख्येवरही होत असल्याने कार्यक्रमातून होणारी धनप्राप्तीही कमी झाली आहे. त्यामुळे हे कलाकार देखील आभासी पध्दतीने शिक्षण देण्याचे काम करु लागले आहेत. शिक्षण घेणा-यांसाठी ही इष्टापत्ती ठरु शकते परंतू या गुणी व दिग्गज कलाकाराकडून शिक्षण घेण्याची पात्रता अंगी आणण्यासाठी आधी काही वर्षे पारंपारिक पध्दतीने गुरुमुखी शिक्षण घेणे अगत्याचे ठरते.

संदर्भ ग्रंथ :-

१) शास्त्रीय संगीत शिक्षा समस्याएं एवं समाधान
स्पादक :- डॉ.अलकनंदा पलनीटकर
२) इंडियन म्यूजिकल ट्रेडिशन्स - वामन हरि देशपांडे
३) संगीत की संस्थागत शिक्षण प्रणाली - अमरेशचंद्र चौबे
४) कलाविहार , लोकसत्ता,महाराष्ट्र टाईम्स इ. वृत्तपत्रामधील विविध लेख

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No.36 Sept-Oct 2023

जेनेरिक औषधी आणि विपणन

डॉ. अरुण सदाशिव घायाळ
सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग,स्व.भास्करराव शिंगणे कला,
प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे महाविद्यालय , साखरखेर्डा
Corresponding Author- डॉ. अरुण सदाशिव घायाळ
DOI- 10.5281/zenodo.10337253

प्रस्तावना

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात वस्तू व सेवांच्या सर्वच क्षेत्रात मोठमोठ्या कंपन्या कार्यरत आहेत. वस्तू व सेवांच्या सर्वच क्षेत्र विकसित होत असून त्यासोबत बाजारपेठेचे स्वरूप सुद्धा बदलत आहे. आज बाजारपेठेत अनेक वस्तू च्या पर्यायी वस्तू असून योग्य दरात ह्या वस्तू उपलब्ध होत आहेत. यामधील मानवी आरोग्य संदर्भातील औषधी बाजारपेठ खुप महत्वाची आहेत, कारण औषधींवर होणारा खर्च खूप जास्त असतो कारण ग्राहकाला ह्या वस्तू घेणे गरजेचे असते, त्यामुळे यासाठी ग्राहक जास्त किंमत देण्यासाठी तयार होतो. ग्राहकांना कमी किमतीत योग्य औषधी मिळावी या उद्देशाने जेनेरिक औषधी बाजारपेठ याचा विचार समोर आला.जेनेरिक औषधे ही अशी असतात ज्यांचे स्वतःचे ब्रँड नाव नसते आणि बाजारात फक्त त्यांच्या जेनेरिक नावाने ओळखले जातात .औषधांची ब्रँड नावे असली तरी ती खूप स्वस्त आहेत आणि जेनेरिक औषधांच्या श्रेणीत येतात जरी काही . जेनेरिक औषधांबाबत सर्वसामान्यांमध्ये अनेक गैरसमज आहेतजेनेरिक औषधांच्या कमी किमतीमुळे त्यांच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह . कारण ते स्वस्त .बद्दल लोकांचे गैरसमज दूर करण्याची गरज आहेनिर्माण झाले आहे आणि तज्ञांचे मत आहे की जेनेरिक औषधां आणि प्रभावी दोन्ही आह यामुळे ग्राहकांना आर्थिक फायदा होऊ शकतो.

जेनेरिक औषधी स्वस्त असण्याची कारणेकोणतेही विकास शुल्क नाही

जेव्हा एखादा व्यवसाय नवीन औषध विकसित करतो तेव्हा तो संशोधन, विकास, विपणन, जाहिरात आणि ब्रँडिंगवर खूप पैसा खर्च करतो, परंतु जेनेरिक औषधे प्रथम विकसकांचे पेटंट संपल्यानंतर त्यांची सूत्रे आणि क्षार वापरून तयार केली जातात. परिणामी, जेनेरिक औषध निर्मात्यांना कमी संशो धन आणि विकास खर्च येतो. तसेच, मूळ उत्पादकांनी मानवांवर आणि प्राण्यांवरील सर्व क्लिनिकल चाचण्या आधीच पूर्ण केल्यामुळे, जेनेरिक फार्मास्युटिकल्सच्या उत्पादनाच्या खर्चामध्ये घट होते .

कोणतेही विपणन खर्च नाहीत:

जेनेरिक औषधे प्रामुख्याने सोप्या मार्गांनी ऑफर केली जातात. ज्यात विपणन, जाहिराती किंवा विक्री धोरणांचा समावेश नाही. त्यामुळे इतर ब्रँडेड औषधांच्या किमतींपेक्षा कितीतरी पटीने कमी असलेल्या या औषधांच्या किमतींवर लक्षणीय परिणाम होत आहे. शिवाय, या औषधांसाठी विशिष्ट आणि ब्रँड-विशिष्ट पॅकेजिंग आवश्यक नाही. परिणामी, ही औषधे अधिक किफायतशीर आणि सामान्य लोकांसाठी उपलब्ध होतात.

जेनेरिक आणि ब्रँड-नाव

नाव आणि किंमत हे जेनेरिक आणि ब्रँड-नाव औषधांमधील प्राथमिक फरक आहेत. ब्रँड-नाव औषधे विकसित केलेल्या फार्मास्युटिकल फर्मद्वारे विशिष्ट ब्रँड नाव दिले जात असताना, जेनेरिक औषधे त्यांच्या सक्रिय घटकाचे नाव वापरून विकली जातात. संशोधन, विकास आणि विपणनाशी संबंधित कोणतेही खर्च नसल्यामुळे, जेनेरिक औषधे सामान्यत: कमी खर्चिक असतात.

जेनेरिक आणि ब्रँडनावाच्या औषधांमधील रंग-, आकार आणि आकारातील फरक शक्य आहे .जेनेरिक उत्पादक ट्रेडमार्क निर्बंधांमुळे तंतोतंत समान स्वरूप असलेल्या वस्तू तयार करू शकत नाहीत .

जेनेरिक औषधाची बाजारपेठ ओळख

जेनेरिक औषधांना वारंवार त्यांच्या ब्रँड-नेम समकक्ष (पेटंट औषधे) सारखीच किंवा समान नावे दिली जातात. केमिस्ट जेनेरिक औषधांमध्ये वापरल्या जाणाऱ्या क्षारांची माहिती घेतात आणि ग्राहकांना ही माहिती देऊ शकतात. औषध ओळखण्यासाठी सर्वात महत्त्वपूर्ण चिन्हांपैकी एक म्हणजे त्याचे नाव. त्याचप्रमाणे, मिठाचे नाव वापरून जेनेरिक औषधांचा शोध इंटरनेटवर घेतला जाऊ शकतो, ज्यामुळे त्यांची ओळख पटण्यास मदत होते. परिणामी, जेनेरिक औषधांमध्ये त्यांच्या ब्रँड-नावाच्या समकक्षांसारखेच धोके आणि फायदे आहेत. जेनेरिक औषधे सर्व सुरक्षा आणि गुणवत्ता आवश्यकता पूर्ण करतात याची पडताळणी करण्यासाठी सखोल तपासणीनंतरच त्यांना मान्यता दिली जाते. ब्रँडिंग, पॅकेजिंग, चव आणि रंग हे जेनेरिक आणि ब्रँड नेम औषधांमधील मुख्य फरक आहेत. त्यांच्या विपणन

धोरणांमध्ये देखील फरक आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या उपचारांच्या किंमती मोठ्या प्रमाणात बदलतात. शिवाय, समान परिणाम प्रदान करताना जेनेरिक औषधे ब्रँड-नावाच्या औषधांपेक्षा कमी खर्चिक असतात. बाजारात जेनेरिक औषधांच्या वापराबाबत अनेक गैरसमज आणि निषिद्ध आहेत. जेनेरिक औषधे कुचकामी आहेत असे त्यांचे मत आहे. ही औषधे कृती करण्यास बराच वेळ घेतात, ती निकृष्ट घटकांसह बनविली जातात आणि धोकादायक असतात. तथापि, या सर्व गृहीतके चुकीच्या आणि निराधार असल्याचे सिद्ध झाले आहे. जेनेरिक औषधे पूर्णपणे सुरक्षित, परिणामकारक, मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आणि किफायतशीर आहेत. ग्राहकांना कमी किमतीत योग्य औषधी उपलब्ध झाली तर निश्चितच ग्राहकांना याचा फायदा होईल

संदर्भ :-

1) https://infomarathi07.com/generic-medicine-information-in-marathi/

2) https://iplmemes.com/jenerik-medical-information-in-marathi/

3) https://en.wikipedia.org/wiki/Generic_drug

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No.36 Sept-Oct 2023

स्वच्छता के बेहतर परिणाम और परिवर्तन में महिलाओं की भूमिका

Dr Babarao Amrutrao Sangle
Director of Physical Education and Sports, B S Patel Arts, Commerce and Science College, Pimpalgaon Kale, Tq Jalgaon Jamod, Dist Buldhana, pin code - 443403
Corresponding Author- Dr Babarao Amrutrao Sangle
E-mail:- phydirector.bspcpk@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.10348197

सारांश

घरेलू स्तर पर पेयजल, सफाई और स्वच्छता प्रबंधन के लिये काफी हद तक महिलाएँ ही ज़िम्मेदार होती हैं, अतः इन बुनियादी सेवाओं की कमी के दौरान उन्हें स्वास्थ्य, सुरक्षा और मनोवैज्ञानिक चुनौतियों का सामना करना पड़ता है।अधिकांश घरों में जहाँ पीने के पानी के स्रोत आवासीय परिसर के बाहर हैं, वहाँ पानी लाने की ज़िम्मेदारी महिलाओं और लड़कियों की ही होती है। जल लाने की ज़िम्मेदारी उन पर अवैतनिक घरेलू काम के बोझ में वृद्धि करती है, साथ ही इससे उनको अन्य आयजनक गतिविधियों में शामिल होने हेतु कम समय मिलता है, साथ ही यह उनके अवकाश तथा गैर-व्यावसायिक गतिविधियों को भी प्रभावित करती है। महिलाओं को मासिक धर्म, गर्भावस्था, प्रसव के बाद की अवधि और बीमार परिवार के सदस्यों या छोटे बच्चों की देखभाल के दौरान जलयोजन (Dehydration), स्वच्छता तथा सफाई के लिये पानी की आवश्यकता अधिक होती है। जब ये बुनियादी ज़रूरतें पूरी नहीं होती हैं, तो महिलाएँ और लड़कियाँ समाज में समान रूप से भाग नहीं ले पाती हैं। घरेलू स्तर पर पेयजल की व्यवस्था के साथ स्वच्छता तथा सफाई में महिलाओं एवं लड़कियों की केंद्रीय भूमिका को स्वीकार किया जाता है हालाँकि वृहद् रूप में महिलाओं को जल, सफाई और स्वच्छता के प्रबंधन तथा ऐसे संसाधनों पर घरेलू निर्णय लेने का अधिकार बहुत ही कम होता है। उदाहरण के लिये स्वच्छता से संबंधित मामलों जैसे कि शौचालय का निर्माण और उपयोग से जुड़े निर्णयों में महिलाओं का परामर्श नहीं लिया जाता है। वर्तमान में जल, स्वच्छता और स्वास्थ्य रक्षा के सतत् प्रबंधन के लिये पुरुषों तथा महिलाओं की भागीदारी की अनिवार्यता को स्वीकार करना बहुत ही आवश्यक है। शिक्षकों के रूप में महिलाओं की भूमिका को कम करके नहीं आंका जाना चाहिए. अगर शिक्षा की शुरुआत घर से होती है, और जो हम घर पर सीखते हैं वह जीवन भर हमारे साथ रहता है, तो बड़े स्वच्छता लक्ष्यों को प्राप्त करने के लिए अंतर-पीढ़ीगत व्यवहार परिवर्तन को ढालने का सबसे अच्छा तरीका माताओं को शिक्षित करना और उन्हें सशक्त बनाना है.

प्रस्तावना

जल और स्वच्छता के अधिकार को अन्य सभी मानव अधिकारों को प्राप्त करने के लिये मौलिक माना जाता है। हालाँकि वैश्विक स्तर पर 2.1 बिलियन लोगों को अपने घर पर स्वच्छ पेयजल उपलब्ध नहीं हो पाता है, वहीं 2.3 बिलियन लोगों के पास बुनियादी स्वच्छता की सुविधा नहीं है और लगभग 1 बिलियन लोग अभी भी खुले में शौच करते हैं। इन सबके बीच महिलाएँ सबसे सुभेद्य वर्ग का हिस्सा होती हैं। जल, स्वच्छता और सफाई सुविधाओं तक पहुँच की कमी महिलाओं और लड़कियों को असमान रूप से प्रभावित करती है। घरेलू स्तर पर पेयजल, सफाई और स्वच्छता प्रबंधन के लिये काफी हद तक महिलाएँ ही ज़िम्मेदार होती हैं, अतः इन बुनियादी सेवाओं की कमी के दौरान उन्हें स्वास्थ्य, सुरक्षा और मनोवैज्ञानिक चुनौतियों का सामना करना पड़ता है। ऐसे में जल और स्वच्छता तक समान पहुँच महिलाओं को आर्थिक और सामाजिक रूप से सशक्त बनाती है। परंतु इसकी कमी हर घर और समुदाय में महिलाओं की स्थिति को कमज़ोर कर सकती है। देश में अधिकांश स्थानों पर, विशेषकर ग्रामीण क्षेत्रों में, महिलाएं दैनिक उपयोग के लिए पानी लाने के लिए प्रतिदिन मीलों तक पैदल सफर तय करती हैं. उन्हें अक्सर घरेलू जरूरतों के लिए पानी इकट्ठा करने का काम सौंपा जाता है. महिलाओं को आम तौर पर न केवल खुद के लिए बल्कि परिवार में दूसरों के लिए भी स्वच्छता और स्वच्छता को बनाए रखने का काम सौंपा जाता है. बड़े पैमाने पर परिवारों और समाज में उनकी भूमिका को देखते हुए, महिलाएं स्थायी जल,

स्वच्छता और स्वच्छता (वॉश) के परिणामों को प्राप्त करने में महत्वपूर्ण भूमिका निभा सकती हैं. महिलाएं महत्वपूर्ण हितधारक हैं और अवसर मिलने पर समावेशी स्वच्छता की दिशा में 360 डिग्री बदलाव ला सकती हैं.केंद्र सरकार के महत्वाकांक्षी योजना स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) के तहत जमीनी स्तर पर महिलाएं महत्वपूर्ण भूमिका निभा रही हैं. उन्होंने सुरक्षित स्वच्छता प्रथाओं के लिए समुदाय के सदस्यों को लामबंद करने, जागरूकता अभियान चलाने और स्थायी स्वच्छता के लिए व्यवहार परिवर्तन को क्रियान्वित करने में महत्वपूर्ण भूमिका निभाई है. अधिक से अधिक महिलाओं को स्वच्छता और स्वच्छता के बारे में शिक्षित किया जाना चाहिए, और स्वच्छता लक्ष्यों को प्राप्त करने में मदद करने की उनकी क्षमता को महसूस किया जाना चाहिए. पानी के भंडारण का उचित तरीका, इसे पीने के लिए सुरक्षित बनाने के लिए इसका उपचार, हाथ धोने का महत्व, और इस तरह के अन्य पाठ पारंपरिक रूप से महिलाओं द्वारा घरों में अगली पीढ़ी को दिए गए हैं. महिलाएं अपने घरों में साफ-सफाई और साफ-सफाई की प्रथाओं को लागू करने में मदद कर सकती हैं और अपने बच्चों, रिश्तेदारों और दोस्तों को उनके बारे में सिखा सकती हैं. सामाजिक परिवर्तन लाने के लिए उनकी सामूहिक शक्ति का उपयोग किया जा सकता है.

स्पष्टीकरण

जल, सफाई व्यवस्था और स्वच्छता' एवं महिला अधिकारों का परस्पर संबंध

पेयजल के संदर्भ में महिलाओं का उत्तरदायित्व: अधिकांश घरों में जहाँ पीने के पानी के स्रोत आवासीय परिसर के बाहर हैं, वहाँ पानी लाने की ज़िम्मेदारी महिलाओं और लड़कियों की ही होती है। जल लाने की ज़िम्मेदारी उन पर अवैतनिक घरेलू काम के बोझ में वृद्धि करती है, साथ ही इससे उनको अन्य आयजनक गतिविधियों में शामिल होने हेतु कम समय मिलता है, साथ ही यह उनके अवकाश तथा गैर-व्यावसायिक गतिविधियों को भी प्रभावित करती है। यह प्रथा महिलाओं के स्वास्थ्य, कार्यभार और उनके द्वारा खर्च की गई कैलोरी को प्रत्यक्ष रूप से प्रभावित करती है। जब लड़कियों को पानी लाने के लिये लंबी दूरी तय करनी पड़ती है, तो इसके कारण उन्हें शिक्षा पर ध्यान देने के लिये कम समय उपलब्ध होता है।

स्वच्छता की पहुँच और लिंग-आधारित हिंसा: वर्तमान में स्वच्छता से संबंधित लिंग आधारित हिंसा के पर्याप्त प्रमाण देखने को मिलते हैं जो शौचालय जैसी कई अन्य मूलभूत सुविधाओं की अनुपलब्धता में महिलाओं के लिये उत्पन्न होने वाली चुनौतियों को रेखांकित करते है। साथ ही ऐसी संभावित हिंसा का भय महिलाओं को स्वतंत्र रूप से कहीं भी आने-जाने और उनके लिये समान अवसरों की संभावनाओं को भी प्रभावित करता है।

जल, स्वच्छता और सफाई आवश्यकताएँ: महिलाओं को मासिक धर्म, गर्भावस्था, प्रसव के बाद की अवधि और बीमार परिवार के सदस्यों या छोटे बच्चों की देखभाल के दौरान जलयोजन (Dehydration), स्वच्छता तथा सफाई के लिये पानी की आवश्यकता अधिक होती है। जब ये बुनियादी ज़रूरतें पूरी नहीं होती हैं, तो महिलाएँ और लड़कियाँ समाज में समान रूप से भाग नहीं ले पाती हैं।

सतत् विकास लक्ष्य (SDG) से संबंध: संयुक्त राष्ट्र द्वारा निर्धारित SDG अपने लक्ष्य 6.2 के माध्यम से 'जल, स्वच्छता और सफाई' (SDG-6) तथा 'लैंगिक समानता व सशक्तीकरण' (SDG-5) को जोड़ने के लिये एक प्रारंभिक पहल करता है।

SDG के लक्ष्य 6.2 में स्वच्छता, सफाई तथा महिलाओं की अन्य ज़रूरतों की समान पहुँच पर विशेष ज़ोर दिया गया है। इसके अतिरिक्त SDG-10 के तहत देशों की सीमाओं के भीतर और दो देशों के बीच असमानताओं को कम करने का लक्ष्य रखा गया है।

चुनौतियाँ:

निर्णय लेने में महिला भागीदारी की कमी: घरेलू स्तर पर पेयजल की व्यवस्था के साथ स्वच्छता तथा सफाई में महिलाओं एवं लड़कियों की केंद्रीय भूमिका को स्वीकार किया जाता है। हालाँकि वृहद् रूप में महिलाओं को जल, सफाई और स्वच्छता के प्रबंधन तथा ऐसे संसाधनों पर घरेलू निर्णय लेने का अधिकार बहुत ही कम होता है।उदाहरण के लिये स्वच्छता से संबंधित मामलों जैसे कि शौचालय का निर्माण और उपयोग से जुड़े निर्णयों में महिलाओं का परामर्श नहीं लिया जाता है।

आँकड़ों की कमी: वर्तमान में इन चुनौतियों के कारण महिलाओं पर पड़ने वाले अतिरिक्त भार या उनके द्वारा उपलब्ध अवसरों का लाभ न उठा पाने के रूप में चुकाई जाने वाली लागत को मापने का कोई विशेष तंत्र मौजूद नहीं है। साथ ही जल, स्वच्छता और सफाई संबंधी निर्णय तथा स्वायत्तता के मामले में महिला सशक्तीकरण के प्रयास भी बहुत सीमित हैं। पर्याप्त अवसंरचना का अभाव: भारत के कई हिस्सों में (विशेषकर ग्रामीण भारत में) स्वास्थ्य देखभाल केंद्रों में जल, स्वच्छता और सफाई की व्यवस्था पर्याप्त रूप से उपलब्ध नहीं है। स्कूलों में मासिक धर्म की

चुनौतियों से निपटने के लिये आवश्यक बुनियादी ढाँचा, गोपनीयता, मार्गदर्शन और आवश्यक सामग्री आदि के अभाव को उत्पीड़न, यौन शोषण, मनोसामाजिक प्रभावों, लड़कियों की स्कूल में उपस्थिति दर में गिरावट तथा उनके पढ़ाई छोड़ने या ड्रॉप-आउट होने से जोड़कर देखा जाता है।

आगे की राह:

तटस्थ लैंगिक दृष्टिकोण: वर्तमान में जल, स्वच्छता और स्वास्थ्य रक्षा के सतत् प्रबंधन के लिये पुरुषों तथा महिलाओं की भागीदारी की अनिवार्यता को स्वीकार करना बहुत ही आवश्यक है।

महिला नेतृत्त्व के लिये नीतिगत रूपरेखा: जल और स्वच्छता के क्षेत्र में महिलाओं के नेतृत्व तथा उनके निर्णय लेने की भूमिका बहुत ही महत्त्वपूर्ण हैं। अतः इस क्षेत्र में स्थानीय, राष्ट्रीय और वैश्विक स्तर पर महिला नेतृत्व तथा इसे बनाए रखने के लिये संसाधनों, प्रशिक्षण एवं राजनीतिक इच्छाशक्ति के समर्थन के साथ एक मज़बूत नीतिगत ढाँचे का होना बहुत ही आवश्यक है।

स्वच्छ भारत मिशन पर विशेष ध्यान: स्वच्छ भारत मिशन (SBM) के "सत्याग्रह से स्वच्छाग्रह" अभियान की मांग से भारत में स्वच्छता की आदतों में महत्त्वपूर्ण बदलाव आया है। SBM के अगले चरण में ऐसे स्थायी व्यवहार परिवर्तन के समाधान खोजने की परिकल्पना की जानी चाहिये, जो महिलाओं और उनकी स्वच्छता ज़रूरतों पर केंद्रित हों।

समाज की भूमिका: महिलाएँ पहले से ही अवैतनिक गतिविधियों में पुरुषों की तुलना में 2.6 गुना अधिक समय खर्च करती हैं, जिसमें देखभाल और घरेलू काम शामिल हैं। जल और स्वच्छता प्रबंधन में महिलाओं की भूमिका के महत्त्व को रेखांकित करने तथा उनके लिये विकास के समान अवसर उपलब्ध कराने हेतु सामाजिक जागरूकता लाना बहुत ही आवश्यक है।

स्वयं सहायता समूहों की भूमिका: हाल में देश भर में ऐसे उदाहरणों की संख्या में वृद्धि देखने को मिली है जहाँ महिलाएँ स्वयं सहायता समूहों (SHGs) या सामुदायिक प्रयासों के माध्यम से आगे बढ़ने और बड़े सुधार लाने में सफल रहीं हैं। इसलिये महिला SHGs को जल, स्वच्छता और सफाई का मुद्दा उठाने के लिये बढ़ावा दिया जाना चाहिये। इस संदर्भ में झारखंड का उदाहरण अनुकरण योग्य है। जहाँ प्रशिक्षित महिला राजमिस्त्रियों ने एक वर्ष के अंदर 15 लाख से अधिक शौचालयों का निर्माण किया और इसकी सहायता से राज्य को 2 अक्तूबर, 2019 की राष्ट्रीय कट-ऑफ तारीख से बहुत पहले ही खुले में शौच मुक्त (ग्रामीण) राज्य घोषित कर दिया गया।,,,,, असम के बारपेटा जिले में स्वच्छ भारत मिशन की जिला समन्वयक अर्पणा अधिकारी ऐसा ही एक उदाहरण हैं. शौचालय निर्माण के संबंध में पुरुषों की प्रतिक्रिया की कमी पर, अर्पणा ने स्वयं सहायता समूहों (एसएचजी) से 22 महिलाओं को चुना और उन्हें राजमिस्त्री बनने के लिए प्रशिक्षित किया. इन महिलाओं ने कई शौचालयों के निर्माण में मदद की है. महिलाओं को कारण के लिए प्रेरित किया जाता है, और राजमिस्त्री के रूप में उनका काम अच्छा होता है. समुदाय, विशेष रूप से महिलाओं को एक साथ लाने से, जिले के आसपास के कई परिवारों के लिए सकारात्मक सामाजिक परिवर्तन आया है. अधिकांश घरों में, चाहे वे गरीब हों या अन्य, अब शौचालय बन गए हैं. बारपेटा में स्वच्छता का स्तर काफी बढ़ गया है. जमीनी स्तर पर, कई महिला स्वच्छता कार्यकर्ताओं ने घरेलू शौचालयों के निर्माण और अपने गांवों को खुले में शौच मुक्त बनाने के लिए समुदायों को संगठित करने में महत्वपूर्ण भूमिका निभाई है. महिलाओं को प्रशिक्षित करना और उन्हें दूसरों को प्रशिक्षित करने के लिए सशक्त बनाना एक समुदाय में सभी के लिए सुरक्षित स्वच्छता सुनिश्चित करने का एक शानदार तरीका बन गया है. जब भी उन्हें कोई जिम्मेदारी दी जाती है, वे सफलतापूर्वक पूरा करते हैं, और यह जल और स्वच्छता के बारे में निर्णय लेने और नीति कार्यान्वयन में उनकी बढ़ी हुई भूमिका को आवश्यक बनाता है. सरकार ने महिलाओं के योगदान को भी मान्यता दी है, और स्वच्छ भारत मिशन (शहरी) 2.0 और जल जीवन मिशन के तहत दिशानिर्देश कार्यक्रमों के कार्यान्वयन में महिलाओं के लिए एक बड़ी भूमिका को अनिवार्य किया. महिलाओं द्वारा अपनाई जाने वाली सुरक्षित स्वच्छता प्रथाओं को उनके बच्चों के जीवन में उतारा जा सकता है. महिलाओं को कार्यशालाओं में प्रशिक्षित किया जा सकता है, और वे अपने ज्ञान को अपने समुदाय में दूसरों तक पहुंचा सकती हैं. न केवल स्वच्छता के महत्व से जुड़े पाठ हैं, बल्कि सरल और प्रभावशाली स्वच्छता प्रथाएं समय के साथ पूरे समुदाय में व्याप्त हो सकती हैं. किसी के जीवन को प्रभावित करने वाले निर्णय लेने या प्रभावित करने की शक्ति किसी भी समुदाय को सशक्त बनाने में पहला कदम है. सामुदायिक स्तर के कार्यों में सक्रिय एजेंसी का प्रयोग करने से न केवल महिलाओं को अपने जीवन पर नियंत्रण की भावना महसूस करने में मदद मिलती है बल्कि आत्मसम्मान और आत्मविश्वास पर भी सकारात्मक प्रभाव पड़ता है. शिक्षकों के रूप में महिलाओं की भूमिका को कम करके नहीं आंका जाना चाहिए. अगर शिक्षा की शुरुआत घर से होती है, और

जो हम घर पर सीखते हैं वह जीवन भर हमारे साथ रहता है, तो बड़े स्वच्छता लक्ष्यों को प्राप्त करने के लिए अंतर-पीढ़ीगत व्यवहार परिवर्तन को ढालने का सबसे अच्छा तरीका माताओं को शिक्षित करना और उन्हें सशक्त बनाना है.

निष्कर्ष:

वर्तमान में जब विश्व के सभी देश सतत् विकास लक्ष्यों को प्राप्त करने का प्रयास कर रहे हैं, ऐसे में स्वच्छ जल और स्वच्छता की पहुँच इन लक्ष्यों की प्राप्ति तथा व्यापक सामाजिक परिवर्तन में उत्प्रेरक का कार्य कर सकती है। जल और स्वच्छता से जुड़ी नीतियों में महिलाओं को केंद्रीय भूमिका में रखने के साथ ही उन्हें परिवर्तन के एजेंट के रूप में सक्षम बनाना बहुत ही आवश्यक है। स्वच्छता के बेहतर परिणाम और परिवर्तन महिलाएं ला सकती है।

साथ ही वर्तमान में सरकारों, व्यवसायों, गैर-सरकारी संगठनों और शैक्षणिक संस्थानों के लिये यह देखना आवश्यक है कि वे स्थानीय समितियों से लेकर अंतर्राष्ट्रीय मंचों तक जल, स्वच्छता और सफाई के क्षेत्र में महिलाओं के नेतृत्त्व को मज़बूत करने पर किस प्रकार कार्य कर रहे हैं।

संदर्भ सूची :

1. Mission Swachhta Aur Paani, World Toilet Day 2022.
2. *The Hindu, The Indian Express, Business Line , 2 Jan 2021.*
3. जल, स्वच्छता और महिला अधिकार - Drishti IAS.
4. Mridula Sinha Dr R K Sinha, SWACHH BHARAT, Prabhat Prakashan, 2016. Mridula Sinha Dr R K Sinha, Saaf Hath Swastha Jeevan, Prabhat Prakashan, 2016.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No.36 Sept-Oct 2023

बदलत्या काळातील बालसंगोपनाच्या पध्दती

प्रा. डॉ.सौ.मेधा वि.देशपांडे
प्रोफेसर, गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्रीमती. सु.रा.मो. महिला महाविद्यालय, खामगांव
Corresponding Author- प्रा. डॉ.सौ.मेधा वि.देशपांडे
Email id- deshpande.medha01@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.10348251

प्रस्तावना –

' मातृत्व ' ही निसर्गाने स्त्रिला बहाल केलेली अभुतपूर्व देणगी आहे. स्त्रिला 'आई' होणार असल्याचा आनंद अवर्णनीय असतो. आई होणे नैसर्गिक असले तरी 'आईपण' मात्र शिकावे लागते. कारण मुलाला जन्म देण्यापुर्वी पासुनच म्हणजे गर्भवस्थेपासुनच स्त्रिला स्वतः बरोबरच उदरात वाढत असणाऱ्या गर्भाची काळजी सर्वतोपरी घ्यायची असते. जसे : पोषण, आहारविहार, स्वास्थ इत्यादी. मुल जन्माला घातल्यावर तर ही सर्वच जबाबदारी कैकपटीने वाढते, वास्तविक ही जबाबदारी केवळ स्त्रीची एकटीची नसुन तिच्या पतीची व तिच्या कुटूंबातील प्रत्येक सदस्यांची असते जसे. गर्भवतीला कोणत्याही स्वरुपाचा ताण न देता आनंदी ठेवणे. पुर्वीच्या काळी एकत्र कूटूंब पध्दती असल्याने एखादी स्त्री गर्भवती असेल तर तिला योग्य सल्ला, तिची काळजी व जन्माला आल्यावर बाळाची काळजी, मार्गदर्शन संपूर्ण कूटूंब घेत असे काही अडचण आली तर सांभाळुन घेणारी आई, आजी, आत्या असायची परंतु औद्योगिककरणामुळे तसेच ग्रामीण विभागातील शिक्षणाच्या सोईच्या अभावामुळे विभक्त कूटूंब पध्दतीचे प्रमाण वाढते आहे. ग्रामीण भागातुन शहरी विभागात वास्तव्यास जाण्याचे प्रमाण दिवसागणिक वाढत चालले आहे त्यामुळे गर्भारपण, बालकाचा जन्म व नंतरचे संगोपन ही सगळी जबाबदारी समर्थपणे पती व पत्नीलाच पेलावी लागते.या सर्व पार्श्वभुमीवर बदलत्या काळात बालसंगोपनाच्या कशा प्रकारे केले जाते कोणत्या पध्दतींचा वापर केला जातो या जिज्ञासोपोटी प्रस्तुत अभ्यास करण्यात आला.

मुख्य षब्द – पालकत्व, कुटूंबाचे योगदान

उद्दिष्ट्ये –

1) पालकत्वाची संकल्पना जाणुन घेणे.
2) बालसंगोपनाच्या पध्दतींचा आढावा घेणे.
3) कौटुंबिक योगदानाची भुमिका समजुन घेणे.
4) बदलत्या काळातील बालसंगोपन पध्दती अभ्यासणे.

पालकत्व –

प्रत्येकच व्यक्तीला आयुष्यात विविध भुमिका वठवाव्या लागतात. पालकत्व ही अनेक भुमिकांपैकी एक महत्वपुर्ण भुमिका आहे. बालकाच्या जन्मपुर्व अवस्थेपासुन सुरु होणारी ही भुमिका बालकाचे योग्य व्यक्तिमत्व घडविणे किंबहुना एक चांगली व्यक्ती, उत्तम नागरीक घडविण्यापर्यंत सातत्याने म्हणजे जीवनभर चालु असणारी आहे. गर्भावस्थेत आईची घेतल्या जाणाऱ्या काळजीवरच जन्माला येणाऱ्या बालकाचे सुदृढपण अवलंबुन असते.

Parenting हा शब्द लॅटिन भाषेतील Parere या शब्दापासुन तयार झाला ज्याचा अर्थ विकसित करणे , पुढे आणणे असा आहे. पालकत्व ही सकारात्मक संगोपन क्रिया आहे. ही अशी क्रिया आहे ज्यामध्ये बालक, पालक व कूटूंबातील इतर सदस्य जीवनभर व्यस्त असतात.

परीभाषा

बालकाचे जगणे व विकास हे लक्ष ठेवुन ज्या हेतु पुरस्सर क्रिया केल्या जातात, त्याला पालकत्व असे म्हणतात. Parenting is the process of raising children and providing them with Protection and care in order to ensure their healty development into adulthood. सिअर्सच्या मते, बालसंगोपन ही सातत्याने चालणारी एक प्रक्रिया आहे. बालक जे क्षण पालकांबरोबर घालवत असतो, त्याचा परीणाम बालकांच्या वर्तन व क्षमतेवर झालेला दिसुन येतो. बालकाचे उत्तम संगोपन करण्याकरीता किंवा पालकत्व उत्तमरित्या सांभाळण्याकरीता पालक देखील सक्षम असणे गरजेचे असते. बेर्पोवसउे यांच्या मते "The biggest business in the world, the most important business in the world and the most worthwhile business in the world is the business of raising children" त्यांनी जगातील सर्वात योग्य, महत्वाचा व सर्वांत मोठा उद्योग म्हणजे बालसंगोपन अशा शब्दात शिशु वा बालसंगोपनाची महती सांगितली आहे.

पालकत्वाचे महत्व

पालकत्व हे समाधान देणारे असले तरी जबाबदारीचे ओझे समर्थपणे पेलणे ही बाब अत्यंत महत्वाची ठरते, पालकबालक संबंध हे सुदृढ, मजबुत असतील तर बालक शारीरीक, मानसिक, भावनिक, भाषिक, सामाजिक दृष्ट्या सक्षम तर घडतच म्हणजे त्याचा सर्वांगीण विकास निकोप होतो. त्याचबरोबर पालकत्व आनंददायी ठरायला मदत होते.

१) बालकांना लहानपणापासुन पालकांचे प्रेम मिळाले असेल, प्रेमळ वातावरण लाभले तर अशी बालके इतरांसोबत उत्तम संबंध प्रस्थापित करु शकतात.

२) बालकांना योग्य प्रोत्साहन पालकांकडुन दिले जात असेल, त्यांनी केलेल्या कामाला पसंती दिली जात असेल तर बालकांचा आत्मविश्वास व आत्मसम्मान वाढतो.

३) जी बालके सुरक्षित वातावरणात वाढतात ती भावनांवर नियंत्रण ठेवायला लवकर शिकतात. कठीण परिस्थितीला सामोरे जायला तयार असतात. अशी बालके निष्ठावान बनतात.

४) पालक बालकाकडे दैनंदिन जीवनात लक्ष देत असतील तर बालक सामाजिक व शैक्षणिक कौशल्य उत्तम रित्या अंगिकारतात.

५) पालकांचे लक्ष बालकाकडे असेल तर भावनिक , भाषिक, मानसिक विकास सुदृढपणे व्हायला मदत होते.

६) बालकाच्या एखाद्या समस्येत पालक जर खंबीरपणे त्याच्या पाठीशी उभे असतील तर बालकाला भावनिक सुरक्षितता तर लाभतेच त्याचबरोबर पालकांविषयी प्रेम, जिव्हाळी, आपुलकी व आदर निर्माण होतो.

७)पालकांकडुन नैतिक मुल्ये व वागण्याच्या पध्दती, शिस्त इ. सर्व जीवन जगण्याकरीता आवश्यक बाबी अनुकरण व निरीक्षणाच्या माध्यमातुन बालक शिकत असते.

जसे – पालक सहनशील असतील तर मुले संयमी होतात. बालकांसमोर पालक जर सारखी कोणाबद्दलही टिका करीत असतील तर मुलंही तसेच करतात. पालकांमध्ये सतत भांडणे होत असतील तर मुले भांडखोर होतात. तसेच बालकाची योग्य

ठिकाणी स्तुती केली जात असेल तर ती बालके अधिकाधिक उत्कृष्ट काम करायला, मेहनत घेण्याकरीता प्रोत्साहीत होतात.

कुटूंबाचे योगदान – बालसंगोपनात केवळ पालकांची भुमिका महत्वपुर्ण नसुन कुटूंबाचे म्हणजेच कुटूंबातील प्रत्येक सदस्याचे योगदान अत्यंत मोलाचे ठरत असते. कूटूंब हीच बालकाची पहिली पाठशाळा असते. बालक अनुकरणप्रिय असल्याने त्यांचे आईवडील व कुटूंबातील सदस्यांचे बालक निरीक्षण करुन अनुकरण करीत असतो. म्हणुन बालकाच्या सर्वांगीण विकासात व बालसंगोपनात कुटूंबाची भुमिका महत्वपुर्ण ठरते.

1) बालकाला सुरक्षिततेची भावना कूटूंबातुनच मिळत असते. कारण कूटूंब म्हणजे स्थिर समुह व या समुहातील आपण एक आहोत ही भावना भावनिकदृष्ट्या सुरक्षितता प्रदान करणारी आहे.

2) बालकाचा स्विकार तसेच प्रेम हे कुटूंबाद्वारा मिळत असते.

3) कुटूंबावर बालक शारीरीक व मानसिकदृष्ट्या अवलंबुन असतो.

4) कुटूंबातुनच बालकाला कारक, भाषिक व सामाजिक कौशल्ये शिकण्यासाठीची पायाभरणी होत असते.

5) शालेय व सामाजिक जीवनातील यश प्राप्ती साठीच्या आवश्यक क्षमतांचा विकास कुटूंबातुनच केला जातो.

6) बालकामध्ये सुप्तवस्थेत असलेले व आवड पारखुन त्यांना योग्य मार्गदर्शन, संधीची उपलब्धता, प्रशिक्षणाची सोय कुटूंबातच केली जाऊ शकते.


पालकांची अभीवृत्ती – पुर्वी बालक एकत्र कूटूंबात वाढत असल्याने आईवडील व बालक कोणामध्येच एकटेपणाची भावना येत नसे. सतत बालकाच्या अवतीभवती माणसांचा वावर असल्याने त्याचा सामाजिक, भाषिक, मानसिक व भावनिक विकास हा अडथळ्याविना निकोप व्हायचा. एकत्र कुटूंबात कोणीही कुणाच्याही मुलांना रागावल्यास प्रसंगी मारल्यास कोणालाही आक्षेप नसे कारण आपल्या अपत्याच्या भल्या करीताच ही कृती केली गेली यावर आईवडील ठाम असत. इतकेच नव्हे तर बालक शाळेत जावु लागल्यानंतर शिक्षकांविषयी पालकांना आदर व विश्वास असायचा त्यामुळे 'छडी लागे छम छम, विद्या येई घमघम' ही म्हण प्रचलित होती व पालक शिक्षकांवर आपल्या पाल्याची जबाबदारी सोपवित असत व तुम्ही याला/हिला रागावु , मारु शकता ही मुभा दिली जायची.परंतु बदलत्या काळाबरोबर हळुहळु एकत्र कुटूंब पध्दती लोप पावत चालली आहे हे विधान धाडसाचे ठरु नये. त्यामुळे कुटूंबातील व्यक्तींच्या, नातलगांच्या भेटीच दुरापास्त तिथे योग्य संगोपनाकरीता रागावणे, मारणे ह्या बाबींना थाराच कसा असणार ६ हल्ली शिक्षकांनी रागावणेच आईवडिलांना खपत नाही तर मारणे फारच दुर ! पुर्वी कडक शिस्तीला जास्त महत्व दिले जायचे तसेच मुलांसमोर त्यांची स्तुती केल्यास तो बिघडेल ही धारणा असल्याचे आढळते परंतु सद्यस्थितीत बालसंगोपनाकरीता कोणत्या पध्दती अवलंबिल्या जातात. या जिज्ञासेपोटी विविध आर्थिक स्तरातील ६० बालकांचे सर्वेक्षण करण्यात आले. सदर सर्वेक्षण निम्न आर्थिक स्तराकरीता खामगांव येथील सुटाळपुरा, रुळापलिकडील झोपडपट्टी येथील २० बालके व मध्यम आर्थिक स्तराकरीता सिव्हील लाईन्स येथील २० बालके तर उच्च आर्थिक स्तराकरीता गायकवाड हॉस्पीटल जवळ, गोकुळ नगर, अमृत नगरातील काही भागातील २० बालकांची मुलाखत व अनुसुची द्वारा माहिती घेण्यात आली त्यानुसार

तक्ता क्र. १

अ.क्र	आर्थिक स्तर	बालकाचे वय	संख्या	एकुण
१	निम्न	३-५ वर्षे ६-८ वर्षे ९-११ वर्षे	६ ६ ८	२०
२	मध्यम	३-५ वर्षे ६-८ वर्षे ९-११ वर्षे	१० ६ ४	२०
३	उच्च	३-५ वर्षे ६-८ वर्षे ९-११ वर्षे	६ ८ ६	२०

सदरहु अभ्यासा करीता निम्न आर्थिक स्तरातील ३ ते ५ वर्षे वयोगटातील ६ बालके, ६ ते ८ वर्षे वयोगटातील ६ बालके व ६ ते ११ वर्षे वयोगटातील ८ बालके निवडण्यात आली.तसेच मध्यम आर्थिक स्तरातील ३ ते ५ वर्षे वयोगटातील १० बालके, ६ ते ८ वर्षे वयोगटातील ६ व ६ ते ११ वर्षे वयोगटातील ४ बालके निवडण्यात आली.उच्च आर्थिक स्तरातील ३ ते ५ वर्षे वयोगटातील ६ बालके, ६ ते ८ वर्षे वयोगटातील ८ बालके व ६ ते ११ वर्षे वयोगटातील ६ बालके निवडण्यात आली.

तिन्ही आर्थिक स्तरातील बालके बालवाडी व स्तरांनुसार शाळेत म्हणजे काही नगरपरीषद, जिल्हा परीषदांच्या शाळेत तर काही मुले खाजगी तर उच्चभ्रु स्तरातील बालके प्ले ग्रुप व कॉन्व्हेंट मध्ये जात असल्याचे दिसुन आले.त्यांना विचारलेल्या प्रश्नांवरुन खालील बाबी निदर्शनास आल्या निम्न आर्थिक स्तरात काही बालकांना अनुभुती पुर्ण – वागणुक दिली जाते म्हणजे त्यांना त्यांच्या इच्छेनुसार वागता येते परंतु काहीच निर्बंध त्यांच्यावर घातले जातात. पालकांना बालकांविषयी प्रेम असल्याचे दिसुन येते. अत्यंत अल्प मुलांच्या बाबतीत नाकारलेपण असल्याचे दिसुन येते. पक्षपात करणारे पालक म्हणजे मुलगी व मुलगा यामध्ये भेद करणारे दिसुन आले. बालकाकडुन अपेक्षा ठेवणारे उदा –मोठ्या मुलाकडुन लहान भावंडाचा सांभाळ करण्याची अपेक्षा, मोठा बनुन पैसा कमव, शिकुन हापिसर बन ही अपेक्षा तर काही पालकांचे शिकुन काय हापिसर बनणार आहे का ही भुमिका आढळुन आली. मध्यम आर्थिक स्तरातील पालक बालकांना स्विकारणारे, काही प्रमाणात मुलगा, मुलगी किंवा मुलीमुलींमध्ये म्हणजेच स्वतःच्या अपत्यांमध्ये भेदभाव करणारे दिसुन आले. पालकांची भुमिका अनुभुतिपुर्वक (च्मतउपेपअमदमे) म्हणजे कुटूंबात बालकाला केंद्रस्थानी ठेवणारी आढळुन आली. तर काही पालक स्वतःच्या अपुर्ण इच्छा बालका कडुन पुर्ण व्हाव्या ही अपेक्षा ठेवणारे आढळुन आले. उदा. मला डॉक्टर होता आले नाही तेव्हा तुला व्हावेच लागेल हा अट्टाहासीपणा दिसुन आला. तर काही प्रमाणात वर्चस्व गाजविणारे पालकही दिसुन आले.तर उच्च आर्थिक स्तरातील पालक बालकाचे अतिसंरक्षण करणारे, अवाजवी लाड करणारे, काही प्रमाणात स्वतःच्या महत्वाकांक्षा बालकावर लादणारे उदा. बिझीनेसच करायचा तसेच काही पालक मुलांच्या म्हणण्यानुसार वागणारे म्हणजे बालकाच्या आधीन असल्याचे आढळुन आले. अत्यंत अल्प पालक वर्चस्व गाजवणारे आढळुन आले या बालकांनी आईवडील कमी प्रमाणात वाट्याला येत असल्याची तक्रार नोंदविली. अर्थार्जनानिमीत्ताने निम्न व मध्यम आर्थिक स्तरातील बहुतांशी आईवडील घराबाहेर शेतमजुरी व नोकरी करण्याकरीता पडत असल्याचे आढळुन आले. तर उच्च आर्थिक स्तरातील पालक व्यवसायानिमित्त घराबाहेर किंवा बाहेरगावी असल्याचे आढळुन आले.



अधिकारयुक्त बालसंगोपन पध्दती ही लोकशाही पध्दत मानली जाते. यात पालक व बालक दोघेही एकमेकांच्या हक्कांचा विचार करतात. आवश्यक असेल तरच पालक नियंत्रण ठेवतात अन्यथा मुलांच्या भावभावना व विचारांना स्वातंत्र्य असते. पालकांकडुन बालकांना प्रेम व सुरक्षित मिळते त्यामुळे मुलांमध्ये आत्माविश्वास चांगला दिसुन येतो. मुलांच्या मतांना किंमत दिली जाते, मुलांच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन दिले जाते त्यामुळे बालसंगोपनाची ही उत्कृष्ट पध्दत होय.हुकूमशाही पध्दतीत पालक म्हणतील तीच पुर्व दिशा असते. या पध्दतीत कडक शिस्त, शिक्षेचा वापर केला जातो. पालकांचे पुर्ण नियंत्रण असते. बालकाला स्वातंत्र्य असत नाही. बालकांमध्ये भीती, चिंता काळजी, दु:ख भावना आढळतात बालकांमध्ये असुरक्षितता आढळुन येते ज्यामुळे स्वावलंबनास अडथळे येतात व आत्माविश्वास वाढत नाही. आईवडिलांच्या प्रेमाची कमी. मुक्त बालसंगोपन पध्दतीत बालकांवर कुठली बंधने नसतात अगदी शिष्टाचार पाळण्याची सुध्दा. पालकांकडुन मार्गदर्शनाचा अभाव, नियंत्रणाचा अभाव त्यामुळे या संगोपन पध्दतीत वाढणारी मुले अपरीपक्व वर्तन करणारी, हट्टी स्वभावाची , बंडखोर, शालेय वातावरणात मागासलेली, चुकीच्या मार्गावर जावु शकतात.दखल न घेणारी बालसंगोपन पध्दतीत पालक तटस्थ असतात, वर्तणुकीबाबत नियम घालुन देत नाही आर्थिक परीस्थिती निम्न दर्जाची व बालकाच्या विकासाकडे पालकांचे लक्ष्य नसते.

तक्ता क्र. २ बालसंगोपनाच्या पध्दती

अ.क्र	पध्दती	बालकाची संख्या	टक्केवारी
१	अधिकारयुक्त	३९	६५:
२	हुकुमशाही	८	१३.३३:
३	मुक्त	७	११.६७:
४	दखल न देणारी	६	१०:
	एकुण	६०	१००:

अधिकारयुक्त बालसंगोपन पध्दतीत वाढणारी मुले ६० पैकी ३९ दिसुन आली या पध्दतीतील मुले ६५ : सर्वात जास्त असल्याचे दिसुन येते. तर हुकूमशाही पध्दतीत असणारी मुले १३.३३: व मुक्त बालसंगोपन पध्दतीत वाढणारी मुले ११.६७: आणि पालकांची अजिबात दखल नसणाऱ्या पध्दतीत केवळ १० : मुले असल्याचे दिसुन येते. सद्यस्थितीत बालसंगोपनाकडे आईवडिल कसोशीने प्रयत्न करीत असल्याचे दिसुन येते. कारण जास्तीत जास्त पालक ६५ : अधिकारयुक्त बालसंगोपन पध्दती अंमलात आणात असल्याचे दिसुन येते.

निष्कर्ष :-

१) अधिकतर पालक बालसंगोपन लोकशाही पध्दतीने करीत असल्याचे आढळुन येते.

२) बालकाला आवश्यक तिथे स्वातंत्र्य व गरजेनुसार पालकांचे नियंत्रण यानुसार संगोपन केले जात असल्याचे दिसुन येते.

३) पालकबालक संबंध मजबुत सुदृढ , निकोप असतील तर बालकाचा सर्वांगीण विकास योग्य रित्या होत असल्याचे दिसुन येते.

४) बदलत्या काळाबरोबर पालकांनी देखील विचारपुर्वक बालसंगोपन पध्दतीत बदल केल्याचे आढळुन येते.

५) काही पालक मात्र अजुनही बालकांना अतिलाड, अतिसुरक्षितता तर काही कडक शिस्त व शिक्षेचा वापरही करीत असल्याचे दिसुन येते.

६) लहानपणापासुनच मुलामुलींची कामे वेगळी करु नये. / मुलामुलींना समान वागणुक द्यावी

७) मुलांची कोणाशीही तुलना करु नये.

८) पालकांनी सर्व (अति) अतिरेक टाळावा.

उदा. अतिअपेक्षा , अतिलाड, अतिजागरुकता, अतिसुरक्षा, अतिकडकशिस्त , अतिसुचना इ.

९) बालकांमध्ये स्वधारणा निर्मीती होण्याकरीता पालकांची भुमिका अत्यंत महत्वपुर्ण ठरत असल्यामुळे मुलांमध्ये न्यूनगंड किंवा अहंगंड निर्माण होवु देवु नये.

१०) आईबाबा दोघांमध्ये एकवाक्यता असावी.

शिफारसीरू. बालसंगोपन करतांना पालकांनी लक्षात घ्यावयाच्या बाबी

१) पालकत्वाच्या जाणीवेत सहजता असावी

२) बालकांना वाचन करण्यास, गोष्टी, कविता सांगणे व लिहिणे, नाटक लिहिणे व बसविणे याकरीता पालकांनी प्रोत्साहित करावे.

३) मुलांच्या कल्पकतेला भरपुर वाव द्यावा. जसे - शब्दकोडी, चित्रकोडी सोडवायाला देणे.

४) मुलांच्या मनात कसलीच भीती निर्माण करु नये.

५) बालकाला क्षुल्लक चुकांबद्दल दोषी ठरवु नये.

संदर्भग्रंथ सुची

1. डॉ. आर्य, सुभाष २००२ संगोपन बाळ गोपाळांचे रोहन प्रकाशन पुणे पा.क्र.१३, १४
2. डॉ.तारणेकर, मिनाक्षी २००६ बालविकास आणि बालसंगोपन विश्व पब्लिशर्स ॲन्ड डिस्ट्रीब्युटर्स, नागपुर पा.क्र २१२, २१६
3. डॉ. नार्वेकर, श्रीधर २००२ संगोपन बालकांचे जन्मावस्था ते पौगंडावस्था मनोविकास प्रकाशन मुंबई पा.क्र. १२०
4. डॉ. मराठे, रमा २००३ असे घडवा मुलांचे व्यक्तिमत्व मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, पा.क्र.-८४,८५

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No. 36 Sept-Oct 2023

स्त्रीवादी साहित्य – भूमिका , स्वरुप आणि चळवळ – एक दृष्टिक्षेप

प्रा.डॉ.एच.डी आकोटकर
मराठी विभाग प्रमुख जी.एस.कॉलेज खामगांव जि.बुलढाणा ४४४३०३
Corresponding Author- प्रा.डॉ.एच.डी आकोटकर
Eamil-hdakotkar2017@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.10348317

सारांश :

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात जसा लोकषाहीचा प्रचार व प्रसार झाला तसाच षिक्षणाचाही प्रचार व प्रसार झाला. सर्व समाज षिकू लागला व जागृत झाला. यामध्ये स्त्रियांचाही सहभाग मोठा होता लोकषाहीचा व षिक्षणाचा विचार जसा समाजाच्या सर्व थरापर्यंत पोचला तसा तो स्त्रियांपर्यंतही पोचला. स्त्रिया षिकू लागल्या त्याबरोबरच लिहू लागल्या, या काळात नवनवीन वाड्मय प्रवाह निर्माण झाले.यामध्येच 'स्त्रीवादी साहित्य' हा एक महत्वाचा वाड्मय प्रवाह आहे स्त्रियांनी आपले प्रष्न साहित्यातून मांडायला सुरुवात केली. कविता, कथा, कादंबरी, आत्मचरित्रे इत्यादी अनेकविध प्रकारातून त्या अभिव्यक्त होऊ लागल्या. त्यांच्या लेखनाचा सूर कधी संयत तर कधी परिपक्व असल्याचे त्यांच्या साहित्य लेखनावरुन व त्यांच्या एकंदर स्वरुपावरुन दिसून येते. पुढे पुढे या साहित्य लेखनाचा रेटा एवढा वाढला की स्त्रांची एक चळवळच उभी राहिली. स्त्रियांमध्ये एव्हाना पुरेषी जागृती निर्माण झालेली होती. चळवळीच्या रुपाने व या माध्यमातुन एक दमदार व सषक्त विचारपीठ स्त्रियांना प्राप्त झाले. स्त्रिया अधिकाधिक व्यक्त होऊ लागल्या. भाषणे, चर्चासत्रे, लेखन , मेळावे इत्यादींच्या माध्यमातून या चळवळीला बळ मिळत गेले व ही चळवळ अर्थपूर्ण होत गेली. कालांतराने तिच्यात सामर्थ्य निर्माण झाले. स्त्रिंची पारंपरिक प्रतिमा मागे पडून तिचे रुप पालटले. या चळवळीमुळे स्त्रियांमध्ये नवीन चेतना निर्माण झाली स्त्रियांचे षिक्षण, संघटन, यामुळे चळवळ दिवसेंदिवस बाळसेदार व प्रभावी बनत गेली. चळवळीमुळे स्त्रिचा उदोउदो होऊ लागला. स्त्री शक्तीचा जागर होऊ लागला आणि स्त्रियांनाही चळवळीप्रती आत्मीयता वाटू लागली.

बीज शब्द: स्त्रीवादी, पाष्चात्य, भारतीय, मुस्तत्ववादी, पर्यावरणवादी, फ्रेंच, ब्रिटिष, जहाल, मवाळ, चळवळ, स्त्रीयुक्ती

प्रस्ताविक :–

पाष्चात्य देषातील स्त्रीवादानंतर भारतातही त्याचे पडसादर उमटू लागले. फ्रान्स, अमेरीकेनंतर भारतातही स्त्रीमुक्तीचे वारे वाहु लागले. स्त्रीवादी विचारसरणीच्या लेखनाची सर्वत्र चर्चा होऊ लागला. भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतीय समाज आणि माणसाच्या मनात राजकीय आकांक्षा वाढल्या षिक्षण आणि लोकषाहीच्या विचार समाजाच्या अनेक घटकांपर्यंत पोचला सर्व स्तरातील लोक षिक्षणाच्या प्रसारामुळे जागे होऊ लागले. सर्वदुर षिक्षणाच लोण पसरंल. षिक्षणाचं लोकषाहीकरण सुरु झालं. समता, न्याय, स्वातंत्र्य, बंधुता आणि स्वाभिमान या मानवी मुल्यांची जाण आल्यामुळे राष्ट्र, समाज आणि व्यक्ती यांच्च्या जीवनात क्रांतिकारक बदल घडु लागल. सर्व समाज हळुहळु निघु लागल त्याचेच प्रतिबिंब लेखनात उमटू लागले. या काळात विविध वाड्.मयीन प्रवाह निर्माण झाले. स्त्रीवादी वाड्.मय हा त्यातीलच एक महत्वाचा वाड्.मयप्रवाह आहे. स्त्रीवादी साहित्य म्हणजे काय ६ त्याचे प्रथमतः स्त्रीमुक्तीची चळवळ समजुन घेणे अगत्याचे ठरते.

स्त्रीवाद म्हणजे काय ?

'' स्त्रीवाद म्हणजे स्त्रीला आपल्या स्वत्वाची जाणीव होणे. तिल आपल्या व्यक्तिमत्त्वाचा अर्थ कळणे. तिल तिच्या अस्मितेचा सार्थ अभिमान वाटणे. तिल तिच्या माणुसपणाबद्दल आत्मियता वाटणे ''.१ स्त्रीला तिच्या अवलुल्यनाची जाणीव होणे व स्वत्वाखली सजग होणे म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीवादाचे स्वरुप मांडताना ते व्यक्तिपरत्वे वेगवेगळया दृष्टिकोनातुन सांगितले गेले. समाजातील स्त्रीचे स्थान अत्यंत दुखत मानले गेल्यामुळे तिची या दुय्यम स्थानातुन सुटका व आत्मसन्मानाची तिल आपले जीवन कसे जगता येईल याचा विचार प्रामुख्याने पुढे आल.

'' स्त्रीवादामध्ये स्त्री-पुरुष समानतेचे समान प्रतिष्ठेचे, समान संधी देणारे माणुसपणाचे तत्त्वज्ञान अभिप्रेत आहे. स्त्रीयुक्तीचे पुढचे पाऊल स्त्रीवाद आहे. आणि स्त्रीयुक्ती म्हणजे पुरुषांपासुन युक्ती किंवा कुटूंब जीवन नाकारणे असे नाही. '' २ कुटूंबात राहुनच , कुटूंबाषी नाक जोडलेली ठेवुनच स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची जपणुक हे खऱ्या अर्थाने स्त्रीवादाचे तत्व असल्याचे दिसुन येते.

स्त्रीवादी साहित्याची भुमिका –

समान हक्क, समान संधी, समान दर्जा, आणि स्वातंत्र्य हा स्त्रीवादाचा गाभा आहे. स्त्रीवादाने स्त्री-पुरुष अषा भेदभावाल कठोर विरोध केलेल आहे. पुरुषाच्या बरोबरीने स्त्रीला जीवनाच्या सर्वच क्षेत्रात समान दर्जाने वागविले पाहिजे. ''पाष्चिमात्य देषांमध्ये सन १९७० नंतर स्त्रीवादी साहितयाच्या विविध अंगानी अभ्यास सुरु झालेला दिसतो. अमेरीकेत जिमक्या विपुल आणि समग्रपणे स्त्रीवादी लेखन आलेले आहे. तितके मराठीमध्ये आलेले आढळत नाही. मुळातच पाष्चिमात्य स्त्रीला आपल्या हक्कांसाइी खुप लढे द्यावे लागले आहेत. आपल्याकडे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सर्वांना समान लेखले जाऊ लागले आणि एक माणुस एक मुल्य, सर्वांना समान संधी असे तत्व घोषित केले. त्यामुळे भारतीय स्त्रीच्या लेखनात स्त्रीवादी प्रेरणा प्रबळपणे व्यक्त झालेल्या आढळतात.''३ प्रखरपणे स्त्रीवाद उभा करणे , स्त्रीला आत्मसन्मान मिळवुन देणे. तिला संपुर्ण व्यक्तिमत्व १ अभिव्यक्ती प्रदान करणे ही स्त्रीवादी साहित्याची मुख्य भुमिका असल्याचे दिसुन येते.

स्त्रीवादी साहित्याचे स्वरुप -

कविता, कथा, कादंबरी, आत्मचारीत्रे या सर्वच साहित्य प्रकारातुन स्त्रिया अभिव्यक्त होऊ लागल्या. यातुन स्त्रिचा सर्वाधिक हुंकार पाहायला मिळतो. कोणताही आवेष नाही, अभि निवेष नाही, आहे केवळ तो समानतेचा प्रतिनिधीक सुर. '' स्त्री आणि पुरुषाचे मन एकच आहे, असे आजपर्यंत गृहित धरले जायचे. त्यामुळे लेखकांनी स्त्रियांचे अनुभव कल्पनेने मांडलेले दिसतात. त्यामध्ये स्त्रीवाद व्यक्त झालेला दिसत नाही. पुरुषाला स्त्रीविषयी अनुभव मांडता येणार नाहीत अषी स्त्रीवादाची भुमिका आहे. '' स्त्रीवादी साहित्य प्रवाहात जहाल, मवाळ, स्त्रीवाद मुल्तत्त्ववादी, पर्यावरणवादी, स्त्रीवाद, ब्रिटीश, भारतीय, फ्रेंच स्त्रीवाद अषा विविध प्रवाहांचा विचार प्रामुख्याने पुऐ येतो. या सर्व प्रवाहाची दिषा मात्र स्त्रीच्या आत्मषोधाची आणि अस्पितेची आहे. हे मान्य करवे लागते. स्त्री आणि पुरुष हे समाजव्यवस्थेचे दोन महत्वपुर्ण घटक, एकमेकांना पुरक व सुसंगत आहेत, म्हणुन दोघांच्या समसमानतेचा विचार लेखनातुन दिसतो.

स्त्रीवादी चळवळ -

भारतीय स्वातंत्र्यानंतर म्हणजे १९६० नंतर स्त्रियांची चळवळ हळुहळु संघटित होऊ लागली. १९७५ ते १९८५ या आंतरराष्ट्रीय यादीत दषकात स्त्रियांच्या हक्क आणि अधिकाराविषयी जागृती निर्माण करण्याचे प्रयत्न झाले. याच दषकात स्त्रीयुक्ती चळवळीचा पाया रोवला गेला. ''स्त्रिला एक व्यक्ती म्हणुन पुरुषाच्या बरोबरीने समानतेने वागविले पाहि अषा प्रकारचे विचार स्त्री युक्ती चळवळीत मांडले गेले. ही चळवळ सुरुवातीला पुरुषांच्या वर्चस्वाविरुध्द टीका करण्यात गुंतली'' ५ परंतु पुढेपुढे मात्र या चळवळीला विदग्ध धुर असल्याचे दिसुन येते. नवीन स्त्रीवादी दिषेने वाटचाल करता स्त्रियामध्ये व स्त्रियांबाबत विचारमंथन, चर्चा, संघटन हे माणुसक्तीच्या व भारतीय संस्कृतीच्या पायावर उभे करणे गरजेचे झाले आहे. त्याबाबत भान सुटू न देण्याची फार मोठी जबाबदारी स्त्रीवादी विचारसरणीवर आहे.'' स्त्रीवाद ही केवळ सैध्दांतिक विचार प्रणाली नुसन ती गतीषिल आणि कृतीनिष्ठ स्वरुपाची एक व्यवस्था आहे.'' ६ स्त्रियांची आजची लेखनव्यवस्था आणि चळवळ अत्यंत संयततेने मार्ग करीत असल्याचे दिसुन येते.

निष्कर्ष -

१. स्त्रीवाद हा स्वातत्र्योत्तर वाड्.मय प्रवाह असुन त्यातुन स्त्रियांचे विचार उभे झालेले आहे.
२. स्त्रीवादाला, स्त्रीस्वातंत्र्य अभिप्रेत आहे.
३. स्त्रीवाद सहव्यवस्था स्विकारतो.
४. स्त्रीवाद वैचारीक विदग्धतेकडे वाटचाल करीत आहे.

संदर्भ सुची-

१. चौधरी ए.एस - २१ व्या शतकातील मराठी साहित्य प्रवाह, प्रषांत पब्लिकेषन्स, ३, प्रतापनगर श्री. संत ज्ञानेष्वर मंदीर रोड, नुतन मराा महाविद्यालय जवळ, जळगांव - १ प्रथम आवृत्ती, २५ जाने २०१६ पृ.क्र २६
२. नत्रैव, पृ.क्र. ३०
३. नत्रैव, पृ.क्र. २७
४. स्वातंत्र्योत्तर वाड्.मयीन प्रवाह, यचममुत्व प्रथम प्रकाषन, सप्टें २००१, नत्रैव, पृ.क्र. १०४
५. चौधरी ए.एल - नत्रैव, पृ.क्र. ३३

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No.36 Sept-Oct 2023

संगीताचे बदलते स्वरूप - संगीत चिकित्सा

प्रा. डॉ. प्रिती मंगेश कुलकर्णी
श्रीमती सु.रा.मोहता महिला महाविद्यालय, खामगाव, जी. बुलडाणा, महाराष्ट्र
Corresponding Author- प्रा. डॉ. प्रिती मंगेश कुलकर्णी
Email:kpriti1975@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.10348359

सारांश

भावनांच्या अभिव्यक्ती बरोबरच प्राचीन काळापासून संगीताचा उपयोजन अन्य क्षेत्रातही केले जात होते. त्याच परंपरेच विकसत रुप म्हणजे संगीत चिकित्सा होय. संगीत चिकित्सा आधुनिक काळात अतिशय लोकप्रिय होत आहे एक पूरक चिकित्सा पद्धतीच्या स्वरूपात संगीत चिकित्सा आज संपूर्ण विश्वात स्वीकारली गेली आहे. या चिकित्सेत कोणत्याही प्रकारचे संगीत निश्चित नाही. हे क्षेत्र आज प्रयोगांना स्वीकार करते तसंच नवीन विचारांना परंपरेला जोडून परंपरेचे अतिशय सुंदर पद्धतीने निर्वहन करते आहे. प्रस्तुत लेखामध्ये भारतीय चिकित्सा पद्धतीच्या प्राचीन स्वरूपावर विशेष प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला गेला आहे. तसेच तणावाच्या आजारावर संगीत कशा पद्धतीने कार्य करते हे देखील या लेखात दिले आहे.

पारिभाषिक शब्द: संगीत - गीतं वाद्यम तथा नृत्य त्रयम संगीत उच्चते
नाद - संगीतोपयोगी मधुर ध्वनी चिकित्सा - कोणत्याही व्याधी पासून मुक्तता मिळवण्याचा मार्ग
आयुर्वेद - जे शास्त्र आयु म्हणजे जीवनाचे ज्ञान आपल्याला घडवते त्याला आयुर्वेद म्हणतात.

न नादेन बिना गीतं नादेन बिना स्वरा ।
न नादेन बिना नृतं तस्मान्नादात्मकं जगत् ॥

अर्थात - नादाशिवाय कोणतेही संगीत किंवा संगीत सृजन नाही. हे संपूर्ण जग नादातमक आहे . प्रसिद्ध कवी 'नीरज' यांच्या शब्दात "गीत ही आदी गीत मध्य गीत ही अंत बिना गीत विश्व केवल मरगट के समान" नाद जर नसेल तर मनुष्याचे जीवन हे केवळ स्मशानासारखे होऊन जाते. याच वरून मानवाचा संगीताशी किती घनिष्ठ संबंध आहे या गोष्टीची पुष्टी केली जाऊ शकते सृष्टीची निर्मिती नादानेच झालेली आहे आणि हा नाद म्हणजे ओमकार आहे निर्वातात निर्माण होणारा नाद ओंकार आहे सृष्टीच्या प्रत्येक सजीव तथा निर्जीव आपला स्वतःचा असा एक नाद आहे नासाद्वारे सूर्याचा ध्वनी रेकॉर्ड केला गेला आहे आणि तो स्पष्ट रूपाने ओम असा ऐकू येतो सृष्टीचे सृजन सृष्टीकर्त्याने निश्चितच काही विशेष उद्देशाने केले आहे आणि त्याची निर्मिती ही नादातून झाली आहे. यातूनच नादाची महत्ता स्पष्ट होते. नादाची महत्ता ही निर्विवाद आहे. एक विशिष्ट ध्वनी द्वारा कोणती ना कोणती ऊर्जा प्रसारित होत असते. हा ध्वनी संगीतात स्वर म्हणून ओळखला जातो. संगीताचे स्वर हे सामान्य नाहीत. या स्वरांच्या योग्य प्रयोगाने असाध्य ही साध्य केले जाऊ शकते. "मला काही सांगायचं आहे" या मूलभूत भावनेतून कलांची निर्मिती झालेली आहे. भावनांना व्यक्त करण्यासाठी मानवाने रंग, स्वर, रेखा, आकार आदी माध्यमातून प्रयोग केला. आणि याच प्रयोगातून कलांनी आपले स्वरूप धारण केले. कला आणि मनुष्य यांनी एक दुसऱ्याचे परस्पर सहाय्यक होऊन आपल्या प्रगतीपथावरती मार्गक्रमण करत आले आहेत. सर्व कलांची निर्मिती मानव कल्याण या हेतूने झाली आहे. मानव कल्याण या हेतूचा सर्वाधिक पुरस्कार संगीत कलेंने प्रभावी स्वरूपाने केलेला दिसून येतो. नाद शब्दाची व्युत्पत्ती 'नद' धातूपासून होते. 'नन्दति इति नाद:' अर्थात जो ध्वनि नंदन करतो. मनाला आनंद देतो त्याला 'नाद' असे म्हणतात. प्रथम नाद ॐ मानला गेला आहे. ॐकारातूनच ब्रह्मांड निर्माण झाले आहे. या ब्रह्मांडातील प्रत्येक घटक एका विशिष्ट गतीने भ्रमण करते आहे. या भ्रमणाचे असंख्य आवर्तने झालीत, होत आहेत आणि होत राहतील. हि आवर्तने उत्पत्ती - स्थिती - लय या नियमांनी बद्ध आहे. हेच आवर्तन आपल्याला सर्वत्र दिसून येते. पृथ्वीची गती - आवर्तन, आकाशगंगा की गती - आवर्तन, पृथ्वीवरील ऋतुंची गती - आवर्तन, दिवस रात्र यांची गती - आवर्तन, पृथ्वीवरील प्रत्येक जीवाचा जन्म - मृत्यू यांची गती - आवर्तन, इतकेच नाही तर आपल्या शरीरांत पेशींची निर्मिती - त्यांचे कार्य करणे - मृत्यू पावणे याचीही गती - आवर्तन, हृदयाची गती - आवर्तन अशा

प्रकारे आपल्याला सर्वत्र गती - आवर्तनं दिसून येतात. म्हणूनच म्हटले जाते पिंडी ते ब्रम्हांडी. संगीतात हीच लय गती आहे. ब्रम्हांडातल्या प्रत्येक वस्तूत वस्तूला आपला नाद आहे. हा नाद मानवी कंठात धारण केला गेला आहे. या प्रकारे मनुष्याची प्रत्येक कृती संगीताशी जोडली गेलेली आहे. म्हणूनच संगीत हे मानव कल्याण हेतूच प्रयोज्य आहे हे स्पष्ट होते.

वैदिक काळापासून मानवी जीवनाचा उद्देश ईश्वर प्राप्ती हाच राहिला आहे. संगीत साधना या उद्देशाची प्राप्ती करणे मानवासाठी होते. संगीत केवळ इंद्रिय ग्राह्य सौंदर्याच्या अनुभूतीसाठी नाही. तर ते ध्यानस्थ मनासाठी तथा ध्यानस्थ अवस्था प्राप्तीसाठी आहे. ही अवस्था प्राप्त करण्यासाठी एकाग्रता आवश्यक आहे. एकाग्रता टिकण्यासाठी स्वरसाधना ज्याला नादानुसंधान असे म्हटले गेले आहे ते अतिशय महत्त्वपूर्ण आहे. कारण मानव हा सृष्टीची रचना आहे तर नाद हा सृष्टीचा गुण आहे. संपूर्ण ब्रम्हांड नादाचेच परिणाम स्वरूप आहे. नादाच्या आधीन आहेत. तसेच नाद किंवा स्वर मानवाला सर्वाधिक प्रभावित करत असतात. स्वरसाधनेने जी लय बनते त्यातच तो लीन होऊन जातो. त्याचे मन स्थिर होते आणि तो साधनेच्या अवस्थेला प्राप्त करू शकतो. यातूनच तो सर्व विचारांपासून मुक्त होऊ शकतो. अशा प्रकारे स्वरसाधना नादानुसंधानमुळे मन एवं बुद्धी एकाग्र करण्यासाठी मदतच होत असते.

सर्व चिन्ता परित्याजय सावधानेन चेतसे।
नाद एवानुसन्धये योग साम्राज्य भिच्छत:॥
वराहपोनिषद् ३/८३

अर्थात - जो योग साम्राज्य सिद्धीची कामना करतो त्याने सर्व प्रकारचे चिंतन सोडून अवधानयुक्त चित्ताने नादाचेच अनुसंधान करावयास हवे.

संगीत साधने द्वारा अद्वैत अवस्थेची प्राप्ती केली जाऊ शकते. ही अद्वैता अवस्था ईश्वराच्या अधिकतम जवळची अवस्था आहे. ही अवस्था प्राप्त करण्यासाठी मनुष्याची शारीरिक स्वस्थता देखील आवश्यक आहे. भारतीय योगशास्त्रामध्ये मानवी शरीरात जे मुख्य सात चक्र सांगितले गेले आहेत, या चक्रांना जागृत करण्यात केल्याने मोक्षप्राप्ती होऊ शकते. सात स्वरांना विशिष्ट लई मध्ये गायल्याने शरीराच्या संबंधित चक्र स्पंदित होतात आणि ते जागृत होतात या चक्रांना विविध देश तथा विविध परंपरांनी भारतीय परंपरेने प्रभावित होऊन त्यांचा स्वीकार केला आहे. जापानी क्यूई यांची अवधारणा ही भारतीय अवधारणांनी प्रेरित अशी आहे. पाश्चात्य लेखक चार्ल्स वेबस्टर यांनी आपले पुस्तक जोहान जॉर्ज गिल्टेल यांनी मांडलेल्या गोष्टींची पुष्टी करत योगशास्त्रांत वर्णित चक्रांना आंतरिक शक्तींची केंद्र सांगितली आहे. भारतीय उपनिषदांत चक्रांचा उल्लेख मनोचिकित्सेचा भोवरा अशा अर्थाने केला गेला आहे. या चक्रांना जागृत केल्याने अनेक गोष्टी साध्य होतात. परंतु या करिता मनाने शांत स्थिर एकाग्र असणे तसेच मेंदूचा तणाव किंवा चिंता यापासून मुक्त असणे आवश्यक आहे. वर्तमान काळात मनुष्याचे जीवन हे संघर्षाने भरलेले आहे. या संघर्षांची तसेच समस्यांशी लढता लढता मनुष्याच्या मेंदूवर निरंतर ताण पडत असतो आणि यामुळे तो तणावग्रस्त बनतो. अशा प्रकारची स्थिती अनेक रोगांच्या निर्मितीसाठी कारण ठरत असते. हीच रोगग्रस्त अवस्था मनुष्याच्या एकाग्रते वरती आणि परिणाम स्वरूप ईश्वरप्राप्तीच्या मार्गामध्ये अडथळे निर्माण करत असते. आयुर्वेद सांगते "शरीर एवं धर्म:" अर्थात शरीर हाच धर्म आहे. जे आपल्याला सृष्टिकर्त्याने दिले आहे. त्याला निरोगी तथा स्वस्थ राखणे आपले नैतिक कर्तव्य आहे. आपल्या शरीरात वात, कफ आणि पित्त हे त्रिदोष असतात. या तिघांत अथवा कोणा एकात असंतुलन झाले तर शरीर रोगग्रस्त होते. तर शरीरातील सात चक्रांद्वारे प्राप्त शक्तीमुळे शरीर निरोगी राहते. या चक्रांची नावे पुढीलप्रमाणे

१ मूलाधार
२ स्वाधिष्ठान
३ मणिपूर
४ अनाहत
५ विशुद्ध
६ आज्ञा
७ सहस्त्रार अथवा मानस

नाडीसंस्थान आणि स्नायू संस्थान यांचे संचालन या चक्रांद्वारे होते. या संचालन व्यवस्थेत आलेला अडथळा शरीर रोगी बनवते. शरीर रोगग्रस्त बनते त्यावेळी आपल्याला ताण जाणवतो. तणावग्रस्त झाल्याने शरीरामध्ये नेमकी काय क्रिया होते हे बघणे अत्यंत आवश्यक आहे. जेव्हा आपला मेंदू तणावाची अनुभूती प्राप्त करतो त्यावेळी मेंदू द्वारा शरीरामध्ये कॉर्टिसोल नामक द्रव्य सोडले जाते. त्याचबरोबर आपल्या शरीराची संचित शक्ती असते ती देखील या वेळेला कार्य करायला सुरुवात होते. सामान्य परिस्थितीमध्ये अशी क्रिया तेव्हा होते ज्यावेळी आपण सात ते आठ दिवस जेवण करत नाही. अशा वेळेला संचित शक्ती आणि कॉर्टिसोल याद्वारे शरीराला आवश्यक जेवणाच्या घटकांची पूर्ती केली जाते. पण ज्यावेळी तणाव निर्माण होतो त्यावेळी देखील ही संचित शक्ती आणि कॉर्टिसोल शरीरामध्ये सोडले जाते. त्यामुळे ज्या वेळेला खरोखरच शरीरावर रोग येतो त्यावेळेला रोगाशी लढण्याची शक्ती ही आधीच वापरली गेली असल्याने संपून जाते. अशा वेळेला जे कॉर्टिसोल रोग आलेल्या परिस्थितीमध्ये कार्य करायला हवे ते त्यावेळेला आपल्याला मदतीला येत नाही. शरीर रोगाने ग्रस्त झाल्यावर

आपल्याला पुन्हा ताण येतो आणि अशा वेळेला आपण रोग ताण आणि पुन्हा रोग अशा या चक्रामध्ये अडकून जातो. तणाव केवळ शरीरावर परिणाम करतो असे नाही तर त्याचा परिणाम हा मन भावना तसेच वर्तनावर देखील होत असतो. तणावाने निराशा, भय, आत्मविश्वासात कमी, नकारात्मकता अशा गोष्टी वाढिस लागतात. वर्तमान काळात तणावासाठी कोणताही आयुवर्ग हा या पासून अलिप्त नाही. तणाव अधिक दहा अशा गोष्टींचा असतो की ज्या गोष्टींवर आपले नियंत्रण नसते.तणावाची अनुभूती आपण स्वतः घेत असल्याने त्याचा प्रबंध सुद्धा आपल्याला स्वतःलाच करायला हवा. याकरिता संगीत आपल्याला उत्तम रीतीने सहाय्य करते. संगीताच्या मदतीने आपण उत्तम स्वास्थ्य प्राप्त करू शकतो. उत्तम स्वास्थ्य काय आहे याची एक व्याख्या जागतिक आरोग्य संघटने द्वारे प्रसिद्ध केली गेली आहे ज्यात केवळ आरोग्य हे शारीरिक नसून ते शारीरिक मानसिक सामाजिक आणि आध्यात्मिक दृष्टीने देखील उत्तम असणे त्यालाच उत्तम स्वास्थ्य म्हटलं गेलं आहे. आणि याच व्याख्येच्यानुसार जर आपल्यास उत्तम स्वास्थ्य प्राप्त करायचे असेल तर संगीत चिकित्सा ही अत्यंत प्रभावी अशी सहचिकित्सा सिद्ध होत आहे. संगीत तणाव मुक्तीसाठी 100% सहाय्यक सिद्ध होते. संगीत हे मेंदू करिता अभ्यंग स्नान आहे. संगीत सकारात्मक बदल घडवून आणण्याचे प्रभावी माध्यम आहे. एका संशोधनाच्या प्राप्त परिणामां नुसार संगीताद्वारे मेंदू ने कॉर्टिसोल स्त्रवण्याच्या मात्रेमध्ये 40% घट घडवून आणते. शरीराच्या उत्तम आरोग्यासाठी जसा व्यायाम आहे तसेच मेंदूच्या उत्तम आरोग्यासाठी संगीत आहे. मेंदूच्या सुप्त भागांना उद्दीपित करण्यासाठी राग संगीत सकारात्मक कार्य करते. मेंदू , मन आणि संगीत यांचा एक दुसऱ्याशी घनिष्ठ असा संबंध आहे याच कारणाने त्यांचा परस्परांवरती अतिशय परिणामकारक असा प्रभाव पडत असतो. संगीत लहरी या मेंदूच्या लिंबिक सिस्टमवर आपला अत्यंत चांगला असा प्रभाव पाडत असते. या लहरी ऑटोनोमिक नर्व्हस सिस्टम द्वारे संपूर्ण शरीरात प्रवाहित होऊन रोगांचे निवारण करण्यात सहाय्यक ठरत असतात.

निष्कर्ष-

यावरून असे लक्षात येते की संगीत ही एक संपूर्ण उपचार पद्धती आहे. ज्याद्वारे जागतिक आरोग्य संघटनेच्या परिभाषेनुसार अत्यंत उत्तमरीत्या चिकित्सा पद्धती म्हणून संगीत आपण मान्य करू शकतो. असे म्हटले जाते की, म्युझिक इज स्पा फॉर ब्रेन. संगीत मनामध्ये आणि शरीरात सकारात्मक बदलाव घडवून आणते. याची पूर्णतः अनुभूती आज संपूर्ण विश्वभरामध्ये होत असलेल्या संगीत चिकित्सेच्या प्रभावी प्रयोगांमध्ये मिळते. भारताची ही परंपरा आज विश्वभरामध्ये स्थल, काल आणि समयानुसार आवश्यक ते परीवर्तन करून लोकप्रिय होत आहे. पाश्चात्य देशात देखील प्रगत रूपामध्ये यावरती अनेक प्रयोग होत आहेत. त्याचे फळस्वरूप ही परंपरा एका नव्या स्वरूपात आपल्यासमोर येत आहे. ईश्वराचा अंश असणाऱ्या मानवाला मनुष्य जन्मात येणाऱ्या शारीरिक आणि मानसिक अडचणींवर मात करण्यासाठी ईश्वर द्वारा निर्मित संगीत हाच एक मात्र उपाय आहे मानवी जीवनाची एकच अभिलाषा असते की त्याने दुखापासून दूर राहून सुखमय जीवन व्यतीत करावे आणि सगळयांच्या मंगलाची कामना करावी.

सर्वे सुखीन भवन्तु सर्वे संतु निरामयः ।
सर्वे भद्राणी पश्यन्तु मा कश्चित दुःख माप्नुयात॥

संदर्भ ग्रंथ सूची-

1. आचार्य शर्मा पं.श्रीराम, सामवेद संहिता सरल भावार्थ सहित, संपादक भगवति देवी शर्मा, युग निर्माण योजना, गायत्री तपोभूमी
2. विजयलक्ष्मी एम, नारद, संगीत मकरंद, संगीताध्याय, ज्ञानप्रकाश हाऊस ISBN: 978-81-2120-526-9
3. डॉ. सिन्हा सुरेखा, संगीत चिंतन, पंचशील प्रकाशन, जयपूर ISBN: 978-81-7056-440-9
4. डॉ. सिन्हा ज्योति, राग, रोग व रोगी (संगीत चिकित्सा) ओमेगा पब्लिकेशन, दरियागंज, नई दिल्ली ISBN: 978-81-8455-546-2

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No.36 Sept-Oct 2023

संगीताचे बदलते स्वरूप - संगीत चिकित्सा

प्रा. डॉ. प्रिती मंगेश कुलकर्णी
श्रीमती सु.रा.मोहता महिला महाविद्यालय, खामगाव, जी. बुलडाणा, महाराष्ट्र
Corresponding Author- प्रा. डॉ. प्रिती मंगेश कुलकर्णी
Email:kpriti1975@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.10348359

सारांश

भावनांच्या अभिव्यक्ती बरोबरच प्राचीन काळापासून संगीताचा उपयोजन अन्य क्षेत्रातही केले जात होते. त्याच परंपरेच विकसत रुप म्हणजे संगीत चिकित्सा होय. संगीत चिकित्सा आधुनिक काळात अतिशय लोकप्रिय होत आहे एक पूरक चिकित्सा पद्धतीच्या स्वरूपात संगीत चिकित्सा आज संपूर्ण विश्वात स्वीकारली गेली आहे. या चिकित्सेत कोणत्याही प्रकारचे संगीत निश्चित नाही. हे क्षेत्र आज प्रयोगांना स्वीकार करते तसंच नवीन विचारांना परंपरेला जोडून परंपरेचे अतिशय सुंदर पद्धतीने निर्वहन करते आहे. प्रस्तुत लेखामध्ये भारतीय चिकित्सा पद्धतीच्या प्राचीन स्वरूपावर विशेष प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला गेला आहे. तसेच तणावाच्या आजारावर संगीत कशा पद्धतीने कार्य करते हे देखील या लेखात दिले आहे.

पारिभाषिक शब्द: संगीत - गीतं वाद्यम तथा नृत्य त्रयम संगीत उच्चते
नाद - संगीतोपयोगी मधुर ध्वनी चिकित्सा - कोणत्याही व्याधी पासून मुक्तता मिळवण्याचा मार्ग
आयुर्वेद - जे शास्त्र आयु म्हणजे जीवनाचे ज्ञान आपल्याला घडवते त्याला आयुर्वेद म्हणतात.

न नादेन बिना गीतं नादेन बिना स्वरा ।
न नादेन बिना नृतं तस्मान्नादात्मकं जगत् ॥

अर्थात - नादाशिवाय कोणतेही संगीत किंवा संगीत सृजन नाही. हे संपूर्ण जग नादातमक आहे . प्रसिद्ध कवी 'नीरज' यांच्या शब्दात "गीत ही आदी गीत मध्य गीत ही अंत बिना गीत विश्व केवल मरगट के समान" नाद जर नसेल तर मनुष्याचे जीवन हे केवळ स्मशानासारखे होऊन जाते. याच वरून मानवाचा संगीताशी किती घनिष्ठ संबंध आहे या गोष्टीची पुष्टी केली जाऊ शकते सृष्टीची निर्मिती नादानेच झालेली आहे आणि हा नाद म्हणजे ओमकार आहे निर्वातात निर्माण होणारा नाद ओंकार आहे सृष्टीच्या प्रत्येक सजीव तथा निर्जीव आपला स्वतःचा असा एक नाद आहे नासाद्वारे सूर्याचा ध्वनी रेकॉर्ड केला गेला आहे आणि तो स्पष्ट रूपाने ओम असा ऐकू येतो सृष्टीचे सृजन सृष्टीकर्त्याने निश्चितच काही विशेष उद्देशाने केले आहे आणि त्याची निर्मिती ही नादातून झाली आहे. यातूनच नादाची महत्ता स्पष्ट होते. नादाची महत्ता ही निर्विवाद आहे. एक विशिष्ट ध्वनी द्वारा कोणती ना कोणती ऊर्जा प्रसारित होत असते. हा ध्वनी संगीतात स्वर म्हणून ओळखला जातो. संगीताचे स्वर हे सामान्य नाहीत. या स्वरांच्या योग्य प्रयोगाने असाध्य ही साध्य केले जाऊ शकते. "मला काही सांगायचं आहे" या मूलभूत भावनेतून कलांची निर्मिती झालेली आहे. भावनांना व्यक्त करण्यासाठी मानवाने रंग, स्वर, रेखा, आकार आदी माध्यमातून प्रयोग केला. आणि याच प्रयोगातून कलांनी आपले स्वरूप धारण केले. कला आणि मनुष्य यांनी एक दुसऱ्याचे परस्पर सहाय्यक होऊन आपल्या प्रगतीपथावरती मार्गक्रमण करत आले आहेत. सर्व कलांची निर्मिती मानव कल्याण या हेतूने झाली आहे. मानव कल्याण या हेतूचा सर्वाधिक पुरस्कार संगीत कलेंने प्रभावी स्वरूपाने केलेला दिसून येतो. नाद शब्दाची व्युत्पत्ती 'नद' धातूपासून होते. 'नन्दति इति नाद:' अर्थात जो ध्वनि नंदन करतो. मनाला आनंद देतो त्याला 'नाद' असे म्हणतात. प्रथम नाद ॐ मानला गेला आहे. ॐकारातूनच ब्रह्मांड निर्माण झाले आहे. या ब्रह्मांडातील प्रत्येक घटक एका विशिष्ट गतीने भ्रमण करते आहे. या भ्रमणाचे असंख्य आवर्तने झालीत, होत आहेत आणि होत राहतील. हि आवर्तने उत्पत्ती - स्थिती - लय या नियमांनी बद्ध आहे. हेच आवर्तन आपल्याला सर्वत्र दिसून येते. पृथ्वीची गती - आवर्तन, आकाशगंगा की गती - आवर्तन, पृथ्वीवरील ऋतुंची गती - आवर्तन, दिवस रात्र यांची गती - आवर्तन, पृथ्वीवरील प्रत्येक जीवाचा जन्म - मृत्यू यांची गती - आवर्तन, इतकेच नाही तर आपल्या शरीरांत पेशींची निर्मिती - त्यांचे कार्य करणे - मृत्यू पावणे याचीही गती - आवर्तन, हृदयाची गती - आवर्तन अशा

प्रकारे आपल्याला सर्वत्र गती - आवर्तनं दिसून येतात. म्हणूनच म्हटले जाते पिंडी ते ब्रम्हांडी. संगीतात हीच लय गती आहे. ब्रम्हांडातल्या प्रत्येक वस्तूत वस्तूला आपला नाद आहे. हा नाद मानवी कंठात धारण केला गेला आहे. या प्रकारे मनुष्याची प्रत्येक कृती संगीताशी जोडली गेलेली आहे. म्हणूनच संगीत हे मानव कल्याण हेतूच प्रयोज्य आहे हे स्पष्ट होते.

वैदिक काळापासून मानवी जीवनाचा उद्देश ईश्वर प्राप्ती हाच राहिला आहे. संगीत साधना या उद्देशाची प्राप्ती करणे मानवासाठी होते. संगीत केवळ इंद्रिय ग्राह्य सौंदर्याच्या अनुभूतीसाठी नाही. तर ते ध्यानस्थ मनासाठी तथा ध्यानस्थ अवस्था प्राप्तीसाठी आहे. ही अवस्था प्राप्त करण्यासाठी एकाग्रता आवश्यक आहे. एकाग्रता टिकण्यासाठी स्वरसाधना ज्याला नादानुसंधान असे म्हटले गेले आहे ते अतिशय महत्त्वपूर्ण आहे. कारण मानव हा सृष्टीची रचना आहे तर नाद हा सृष्टीचा गुण आहे. संपूर्ण ब्रम्हांड नादाचेच परिणाम स्वरूप आहे. नादाच्या आधीन आहेत. तसेच नाद किंवा स्वर मानवाला सर्वाधिक प्रभावित करत असतात. स्वरसाधनेने जी लय बनते त्यातच तो लीन होऊन जातो. त्याचे मन स्थिर होते आणि तो साधनेच्या अवस्थेला प्राप्त करू शकतो. यातूनच तो सर्व विचारांपासून मुक्त होऊ शकतो. अशा प्रकारे स्वरसाधना नादानुसंधानमुळे मन एवं बुद्धी एकाग्र करण्यासाठी मदतच होत असते.

सर्व चिन्ता परित्याजय सावधानेन चेतसे।
नाद एवानुसन्धये योग साम्राज्य भिच्छत:॥
वराहपोनिषद् ३/८३

अर्थात - जो योग साम्राज्य सिद्धीची कामना करतो त्याने सर्व प्रकारचे चिंतन सोडून अवधानयुक्त चित्ताने नादाचेच अनुसंधान करावयास हवे.

संगीत साधने द्वारा अद्वैत अवस्थेची प्राप्ती केली जाऊ शकते. ही अद्वैता अवस्था ईश्वराच्या अधिकतम जवळची अवस्था आहे. ही अवस्था प्राप्त करण्यासाठी मनुष्याची शारीरिक स्वस्थता देखील आवश्यक आहे. भारतीय योगशास्त्रामध्ये मानवी शरीरात जे मुख्य सात चक्र सांगितले गेले आहेत, या चक्रांना जागृत करण्यात केल्याने मोक्षप्राप्ती होऊ शकते. सात स्वरांना विशिष्ट लई मध्ये गायल्याने शरीराच्या संबंधित चक्र स्पंदित होतात आणि ते जागृत होतात या चक्रांना विविध देश तथा विविध परंपरांनी भारतीय परंपरेने प्रभावित होऊन त्यांचा स्वीकार केला आहे. जापानी क्यूई यांची अवधारणा ही भारतीय अवधारणांनी प्रेरित अशी आहे. पाश्चात्य लेखक चार्ल्स वेबस्टर यांनी आपले पुस्तक जोहान जॉर्ज गिल्टेल यांनी मांडलेल्या गोष्टींची पुष्टी करत योगशास्त्रांत वर्णित चक्रांना आंतरिक शक्तींची केंद्र सांगितली आहे. भारतीय उपनिषदांत चक्रांचा उल्लेख मनोचिकित्सेचा भोवरा अशा अर्थाने केला गेला आहे. या चक्रांना जागृत केल्याने अनेक गोष्टी साध्य होतात. परंतु या करिता मनाने शांत स्थिर एकाग्र असणे तसेच मेंदूचा तणाव किंवा चिंता यापासून मुक्त असणे आवश्यक आहे. वर्तमान काळात मनुष्याचे जीवन हे संघर्षाने भरलेले आहे. या संघर्षांची तसेच समस्यांशी लढता लढता मनुष्याच्या मेंदूवर निरंतर ताण पडत असतो आणि यामुळे तो तणावग्रस्त बनतो. अशा प्रकारची स्थिती अनेक रोगांच्या निर्मितीसाठी कारण ठरत असते. हीच रोगग्रस्त अवस्था मनुष्याच्या एकाग्रते वरती आणि परिणाम स्वरूप ईश्वरप्राप्तीच्या मार्गामध्ये अडथळे निर्माण करत असते. आयुर्वेद सांगते "शरीर एवं धर्म:" अर्थात शरीर हाच धर्म आहे. जे आपल्याला सृष्टिकर्त्याने दिले आहे. त्याला निरोगी तथा स्वस्थ राखणे आपले नैतिक कर्तव्य आहे. आपल्या शरीरात वात, कफ आणि पित्त हे त्रिदोष असतात. या तिघांत अथवा कोणा एकात असंतुलन झाले तर शरीर रोगग्रस्त होते. तर शरीरातील सात चक्रांद्वारे प्राप्त शक्तीमुळे शरीर निरोगी राहते. या चक्रांची नावे पुढीलप्रमाणे

१ मूलाधार
२ स्वाधिष्ठान
३ मणिपूर
४ अनाहत
५ विशुद्ध
६ आज्ञा
७ सहस्त्रार अथवा मानस

नाडीसंस्थान आणि स्नायू संस्थान यांचे संचालन या चक्रांद्वारे होते. या संचालन व्यवस्थेत आलेला अडथळा शरीर रोगी बनवते. शरीर रोगग्रस्त बनते त्यावेळी आपल्याला ताण जाणवतो. तणावग्रस्त झाल्याने शरीरामध्ये नेमकी काय क्रिया होते हे बघणे अत्यंत आवश्यक आहे. जेव्हा आपला मेंदू तणावाची अनुभूती प्राप्त करतो त्यावेळी मेंदू द्वारा शरीरामध्ये कॉर्टिसोल नामक द्रव्य सोडले जाते. त्याचबरोबर आपल्या शरीराची संचित शक्ती असते ती देखील या वेळेला कार्य करायला सुरुवात होते. सामान्य परिस्थितीमध्ये अशी क्रिया तेव्हा होते ज्यावेळी आपण सात ते आठ दिवस जेवण करत नाही. अशा वेळेला संचित शक्ती आणि कॉर्टिसोल याद्वारे शरीराला आवश्यक जेवणाच्या घटकांची पूर्ती केली जाते. पण ज्यावेळी तणाव निर्माण होतो त्यावेळी देखील ही संचित शक्ती आणि कॉर्टिसोल शरीरामध्ये सोडले जाते. त्यामुळे ज्या वेळेला खरोखरच शरीरावर रोग येतो त्यावेळेला रोगाशी लढण्याची शक्ती ही आधीच वापरली गेली असल्याने संपून जाते. अशा वेळेला जे कॉर्टिसोल रोग आलेल्या परिस्थितीमध्ये कार्य करायला हवे ते त्यावेळेला आपल्याला मदतीला येत नाही. शरीर रोगाने ग्रस्त झाल्यावर

आपल्याला पुन्हा ताण येतो आणि अशा वेळेला आपण रोग ताण आणि पुन्हा रोग अशा या चक्रामध्ये अडकून जातो. तणाव केवळ शरीरावर परिणाम करतो असे नाही तर त्याचा परिणाम हा मन भावना तसेच वर्तनावर देखील होत असतो. तणावाने निराशा, भय, आत्मविश्वासात कमी, नकारात्मकता अशा गोष्टी वाढिस लागतात. वर्तमान काळात तणावासाठी कोणताही आयुवर्ग हा या पासून अलिप्त नाही. तणाव अधिक दहा अशा गोष्टींचा असतो की ज्या गोष्टींवर आपले नियंत्रण नसते.तणावाची अनुभूती आपण स्वतः घेत असल्याने त्याचा प्रबंध सुद्धा आपल्याला स्वतःलाच करायला हवा. याकरिता संगीत आपल्याला उत्तम रीतीने सहाय्य करते. संगीताच्या मदतीने आपण उत्तम स्वास्थ्य प्राप्त करू शकतो. उत्तम स्वास्थ्य काय आहे याची एक व्याख्या जागतिक आरोग्य संघटने द्वारे प्रसिद्ध केली गेली आहे ज्यात केवळ आरोग्य हे शारीरिक नसून ते शारीरिक मानसिक सामाजिक आणि आध्यात्मिक दृष्टीने देखील उत्तम असणे त्यालाच उत्तम स्वास्थ्य म्हटलं गेलं आहे. आणि याच व्याख्येच्यानुसार जर आपल्यास उत्तम स्वास्थ्य प्राप्त करायचे असेल तर संगीत चिकित्सा ही अत्यंत प्रभावी अशी सहचिकित्सा सिद्ध होत आहे. संगीत तणाव मुक्तीसाठी 100% सहाय्यक सिद्ध होते. संगीत हे मेंदू करिता अभ्यंग स्नान आहे. संगीत सकारात्मक बदल घडवून आणण्याचे प्रभावी माध्यम आहे. एका संशोधनाच्या प्राप्त परिणामां नुसार संगीताद्वारे मेंदू ने कॉर्टिसोल स्त्रवण्याच्या मात्रेमध्ये 40% घट घडवून आणते. शरीराच्या उत्तम आरोग्यासाठी जसा व्यायाम आहे तसेच मेंदूच्या उत्तम आरोग्यासाठी संगीत आहे. मेंदूच्या सुप्त भागांना उद्दीपित करण्यासाठी राग संगीत सकारात्मक कार्य करते. मेंदू , मन आणि संगीत यांचा एक दुसऱ्याशी घनिष्ठ असा संबंध आहे याच कारणाने त्यांचा परस्परांवरती अतिशय परिणामकारक असा प्रभाव पडत असतो. संगीत लहरी या मेंदूच्या लिंबिक सिस्टमवर आपला अत्यंत चांगला असा प्रभाव पाडत असते. या लहरी ऑटोनोमिक नर्व्हस सिस्टम द्वारे संपूर्ण शरीरात प्रवाहित होऊन रोगांचे निवारण करण्यात सहाय्यक ठरत असतात.

निष्कर्ष-

यावरून असे लक्षात येते की संगीत ही एक संपूर्ण उपचार पद्धती आहे. ज्याद्वारे जागतिक आरोग्य संघटनेच्या परिभाषेनुसार अत्यंत उत्तमरीत्या चिकित्सा पद्धती म्हणून संगीत आपण मान्य करू शकतो. असे म्हटले जाते की, म्युझिक इज स्पा फॉर ब्रेन. संगीत मनामध्ये आणि शरीरात सकारात्मक बदलाव घडवून आणते. याची पूर्णतः अनुभूती आज संपूर्ण विश्वभरामध्ये होत असलेल्या संगीत चिकित्सेच्या प्रभावी प्रयोगांमध्ये मिळते. भारताची ही परंपरा आज विश्वभरामध्ये स्थल, काल आणि समयानुसार आवश्यक ते परीवर्तन करून लोकप्रिय होत आहे. पाश्चात्य देशात देखील प्रगत रूपामध्ये यावरती अनेक प्रयोग होत आहेत. त्याचे फळस्वरूप ही परंपरा एका नव्या स्वरूपात आपल्यासमोर येत आहे. ईश्वराचा अंश असणाऱ्या मानवाला मनुष्य जन्मात येणाऱ्या शारीरिक आणि मानसिक अडचणींवर मात करण्यासाठी ईश्वर द्वारा निर्मित संगीत हाच एक मात्र उपाय आहे मानवी जीवनाची एकच अभिलाषा असते की त्याने दुखापासून दूर राहून सुखमय जीवन व्यतीत करावे आणि सगळयांच्या मंगलाची कामना करावी.

सर्वे सुखीन भवन्तु सर्वे संतु निरामयः ।
सर्वे भद्राणी पश्यन्तु मा कश्चित दुःख माप्नुयात॥

संदर्भ ग्रंथ सूची-

1. आचार्य शर्मा पं.श्रीराम, सामवेद संहिता सरल भावार्थ सहित, संपादक भगवति देवी शर्मा, युग निर्माण योजना, गायत्री तपोभूमी
2. विजयलक्ष्मी एम, नारद, संगीत मकरंद, संगीताध्याय, ज्ञानप्रकाश हाऊस ISBN: 978-81-2120-526-9
3. डॉ. सिन्हा सुरेखा, संगीत चिंतन, पंचशील प्रकाशन, जयपूर ISBN: 978-81-7056-440-9
4. डॉ. सिन्हा ज्योति, राग, रोग व रोगी (संगीत चिकित्सा) ओमेगा पब्लिकेशन, दरियागंज, नई दिल्ली ISBN: 978-81-8455-546-2

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No.36 Sept-Oct 2023

बदलत्या काळातील पोषणाच्या दृष्टीने भरडधान्याचे महत्व

प्रा.डॉ.स्वप्ना देशमुख(लोखंडे)
सहाय्यक प्राध्यापक (गृहअर्थशास्त्र विभाग), श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद
Corresponding Author- प्रा.डॉ.स्वप्ना देशमुख(लोखंडे)
Email-pnadeshmukh1406@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.10352245

प्रस्तावना :

जागतिकीकरणामुळे कुटुंबीयांची जीवनशैली विशेषत: आहाराबाबात खुपच बदलत गेलेली आहे. त्यामुळे निर्माण होणारे आहार व पोषणविषयक प्रश्न, विविध आजार जसे स्थुलता,लठ्ठपणा, उच्च रक्तदाब, हृदयविकार, मधुमेह रोग प्रतिकार शक्ती कमी असल्यामुळे होणारे आजार, पचनसंस्थेचे आजार अशा आजारांच प्रमाण वाढत आहे. मात्र या सर्व समस्येवर आपल्या सुजलाम सुफलाम भारत देशातील विचारांनी लोकांना पारंपारीक भरडधान्य तृणाधान्य च्या उपयोगाव्दारे उपाय शोधता येईल, पर्यायाने भरडधान्याचे महत्व वाढेल.

बीज शब्द :– भरडधान्याची उपयुक्तता,पोषण. तृणधान्य/भरडधान्याच्या उपयोगाचे उद्देश.

१. विदयार्थीनी आणि सर्व लोकांमध्ये भरडधाण्याविषयी जागरूकता निर्माण करणे.
२. भरडधाण्यापासुन पदार्थ तयार करण्याकरीता प्रवृत्त करणे.
३. आहार पोषणाचा दर्जा वाढवण्याकरीता भरडधाण्याबाबत संशोधन करणाऱ्या संशोधकांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे.
४. उत्तम आरोग्याप्राप्तीकरीता भरडधाण्य मिलेटसचे उपयोग फायदे स्पष्ट करणे.

भरडधाण्याचा ईतिहास आणि विकास

शेतीची सुरवात झाली आणि हे धान्य सर्वप्रथम मानवाने जवळ केले आशिया आणि आफ्रिका खंडात सापडलेले धान्य जगातील असंख्य संस्कृती सोबत नांदु लागले इंग्रजीत त्यांना मिलेट म्हणतात. मिनी म्हणजेच लहान आकाराच्या एका दाव्यांपासुन असंख्य दाने मिळविता येतात. भारतातील वेगवेगळया ठिकाणी यांना रामधान्य, देवधान्य, जादुईधान्य,श्रीधान्य असे नाव आहेत.अगदी यजुर्वेदमध्येही या धान्याचा उल्लेख आढळतो याचाच अर्थ भारतीय कास्ययुगापासुन मिलेट खाल्ल जात (इ.स पुर्व ४५००) भारताव्यतिरीक्त अफ्रिका,चीन, जपान, कोरीया आदि देशांमध्ये फार पुर्वीपासुन मिलेट खाल्ले जात असल्याचे पुरावे आढळतात थोडक्यात काय तर आपले पुर्वजही मिलेट खात होते. मिलेट आहारातुन जाण्याची कारण असंख्य आहेत. भारताच्या प्रत्येक राज्यात वेगवेगळया प्रकारचे मिलेट घेतले जात असत जिथे ४५० मि.मी पेक्षा कमी पाऊस पडतो अशा सगळया भागात मिलेट घेतलया जाते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ज्या प्रकारे आपल्या देशात सिंचनाच्या सुविधा उपलब्ध झाल्या त्याच प्रमाणात लागवडी खाली असलेल्या गव्हाचे, तांदळाचे उत्पादन वाढू लागले. साधारण १९७० आणि ७१ च्या काळात एकुण अन्नधान्य लागवडीपैकी ४५.९ टक्के एवढी मिलेट लागवड होती. मात्र १९९६ च्या काळात तीच लागवड ३१.५ टक्यावर आली. याचाच अर्थ असा की, तांदुळ आणि गव्हाच्या उत्पादनात प्रचंड वाढ झाली. शिवाय पीडीएस (Public Distribution System) म्हणजेच शिधापत्रिकेवर संपुर्ण देशात गहु आणि तांदुळच दिला जाऊ लागला त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना मिलेटमधुन मिळणारे आर्थिक उत्पादन कमी झाले. कोणत्याही प्रकारच्या कस नसलेली कमी पाण्याच्या जमिनीत शिवाय खडकाळ जमिनीतही मिलेट उगवून येत शिवाय मिलेट कोणत्याही प्रकारच्या रसायनशिवाय उगवु शकतात मिलेटमध्ये इतर धान्याच्या तुलनेत प्रोटीन, कॅल्शियम, फायबर जास्त प्रमाणात आढळून येतात. त्यामुळे आपल्या देशातील कुपोषणाचे प्रमाण तसेच अन्नधान्यामध्ये पोषणतत्वांचे कमी प्रमाण ही समस्या सोडविता येईल. पाऊस कमी झाला किंवा मोठाली वादळ आली तरीही अशा जमिनीत टिकुन असणारे मिलेट शेतकऱ्याला हुकमी उत्पादन मिळवुन देते शिवाय वाढती जागरूकता आणि ग्राहकाची मागणी यामुळे शेतकऱ्याला परवडणारे पीक आहे. मिलेटसहित कडधान्य तेलबिया आपल्याला मिश्रपीक पध्दतीने देखील करता येतात. सगळे मिलेट खरीप हंगामात पेरले जातात. काही मिलेट वरई,नाचणी भातासारखी लावणी करून करतात. काही नुसते फेकुन करतात तर काही पेरणी केली जाते सगळया मिलेटची पीक अवस्था २ ते ४ महिण्यात येते शिवाय रब्बी हंगाम आणि उन्हाळयात देखील घेतले जातात.मोठे तृणधान्य म्हणजे ज्वारी आणि बाजरी आणि छोटे तृणधान्य म्हणजे नाचणी, भगर, राळ कोद्रो, सावा, वरी, ब्राउन टॉपमिलेट छोटया तृणधान्यांना विविध भागात नागली, मोर, कांगणी असे वेगवेगळयाा नावाने ओळखले जाते, पुर्वीच्या काळात बाजरी,नाचणी ही पिके खळयात मळणे या प्रक्रियेने तयार केली जात असत. पण छोटया तृणधान्याचे वरील आवरण टणक असल्यामुळे भरडावे किंवा कांडावे लागत असे म्हणुन त्यांना भरडधान्य म्हटली जातात. काळाच्या ओघात शेतात पीक कमी घेतले जावु लागले तसेच भरडणे आणि कांडणे ही मौल्यवान तृणधान्य नाहिशी झाली. समाजात आहार आणि आरोग्याविषयी जागरूकता आल्यानं भरडधान्य आता प्रत्येकाच्या आहारात उपयोगात येत आहे. भारताच्या प्रयत्नाने २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष म्हणुन साजरे केले जात आहे. आणि जनजागृतीविषयी विविध कार्यक्रम, उपक्रम आयोजित केले जात असल्याने नागरीकांना भरडधान्याचे महत्व कळत आहे.

मधुमेह आजारात भरडधान्य मिलेट्सची उपयुक्तता :

कोणत्याही मधुमेह झालेल्या व्यक्तिला ग्लायसमिक इंडेक्स कमी असलेली धान्य खाण्यास सांगितले जाते त्यामागचं कारण अस की ग्लायसेमिक इंडेक्स कमी असलेले धान्य आपल्या शरीरामध्ये ग्लुकोज हळुहळु सोडत त्यामुळे शरीरामध्ये साखरेची पातळी योग्य राखली जाते. तांदुळ आणि ज्वारीमध्ये साखरेचे प्रमाण जास्त असल्याने मधुमेह बळावण्याची शक्यता असते परंतु पिवळया रंगाचे धान्य म्हणजेच फॉक्सटेल मिलेट किंवा राळ हे धान्य खाल्याने रक्तातील साखरेची पातळी कमी होते आणि हळुहळु इन्सुलिन घ्यायचं बंद होऊन मधुमेहात होणाऱ्या जखमा देखील ताबडतोब बऱ्या होतात म्हणुन याला मॅजिकल मिलेटस देखील म्हणतात दुसरा प्रकार तटस्थ धान्य अशी धान्य ज्यामुळे आपले निरोगी शरीर निरोगी राहण्यास मदत होईल यात ज्वारी, नाचणी, बाजरी असे धान्य येतात. भारतीय कडधान्य (मिलेट) अनुसंधान संस्था (Indian Institute of millets Research) हैद्राबाद मध्ये कार्यरत आहे (Odisha

Millets Mission) अंतर्गत ओडीसा सरकार शिधापत्रिकेवर (Ration Card) नाचणीचे वाटप करते.

लहान मुलांना भुक लागत नसल्यास मिलेट्सची उपयुक्तता :

लहान मुलांना भुक लागत नसल्यास साव्याची अंबील किंवा लापशी आठवडयातुन दोनदा दिली तर फरक पडतो. मिलेट चविला गोडसर असल्याने ते मुलांना आवडते कुणाही व्यक्तीला आहारात मिलेटची सुरवात करायची असेल तर हे मिलेट एक उत्तम सुरवात होऊ शकते. ६४ ग्रॅम कर्बोदके, ९ ग्रॅम प्रथिने, ६ग्रॅम तंतुमय पदार्थ शरीर स्वच्छ ठेवण्याचे काम हे मिलेट करत. उपवासाच्या काळात उपयुक्त भरडधान्य – वरई भारतात पुरातन काळापासुन उपवासाला चालणारी पचनाला हलकी असणारी वरई साबुदाण्यापेक्षा कितीतरी श्रेष्ठ आहे. वरईत प्रोटीन असते. हे मिलेट जखम भरून येण्यासाठी अगदी उपयुक्त आहे. सध्या भारतात मध्यप्रदेश, उडीसा, झारखंड या राज्यात मोठया प्रमाणात वरईचे उत्पादन होते. वरईचे पोषणमुल्य ६२ ग्रॅम कार्बोदके,८ ग्रॅम प्रोटीन ९.८ ग्रॅम तंतुमय पदार्थ, ४.२ चरबी हे मिलेट आपल्या शरीराला हळुहळु उर्जा पुरवते. म्हणुनच नुसत्या वरईवर आपल्याला संपुर्ण उपवास करता येतो. उत्तर भारतात याला व्रत का चावल असेही म्हणतात. काही भागात उपवासाला वरईची भाकरी देखिल बनवली जाते. आणि नवरात्रात उपवासाला हमखास वरईची भाकरी देखील बनवली जाते. प्राचीन भारत आणि जगातही इतरत्र काही देशात उगवणारे मिलेट म्हणजे फॉक्सटेल मिलेट याला हिंदीत कांग, मराठीत राळा आणि संस्कृतमध्ये प्रियांगु, भावज्य,रजिका म्हणतात.

आरोग्यवर्धीनी बाजरी आणि नाचणीची उपयुक्तता. थंडीत कुणाला ताप आला, सर्दी आली तर आपल्या शरीराला गरम ठेवणारी बाजरी सगळयात उत्तम असते. प्रथिनं, लोह, झिंक, फॉस्फरस, मॅग्नेशियम ब जीवनसत्व असलेली बाजरी एकदम पोष्टिक. देशाच्या एकुण बाजरी उत्पादनापैकी महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात, उत्तरप्रदेश, हरीयाणा या राज्यात ९० टक्के गाजरी उगवली जाते. थोडी पांढरी, थोडी पिवळी, थोडी करडी, थोडी निळी अशा विविध रंगांनी नटलेली बाजरी अगदी मोत्यासारखी दिसते म्हणुन याला इंग्रजीत पर्ल मिलेट असे म्हणतात. साधारण इस पुर्व ४००० मध्ये अफ्रिकेत सहारा वाळवंटाच्या पश्चीम भागातील सुदान येथे बाजरीची शेती केली जाऊ लागली भारतात साधारण इ.स पुर्व १००० ते २५०० मध्ये उत्तर भारतात हडप्पा संस्कृती तसेच गंगेच्या खोऱ्यात बाजरी पिकवली जात असे. नंतर साधारण इ.स पुर्व १५०० च्या काळात ती दक्षिण भारतात पिकवली जाऊ लागली नाचणीही प्राचीन काळापासुन धान्य अगदी डोंगर माथ्यापासुन ते हिमालयापर्यंत नाचणी उगवते जिथे चांगला पाण्याचा निचरा होतो तिथे नाचणी उगवते नुसत्या कर्नाटक राज्यात आपल्या देशातील ६० टक्के नाचणी होते. प्रथिने, कॅल्शियम, तंतुमय पदार्थांनी भरपुर असलेली नचणी स्त्रियांना तर जरूर खावी सगळीकडे मोठया प्रमाणात लहान मुलांना दिला जाणारा नाचणी सत्व हा एक प्रकार सहा महिन्याच्या पुढील बाळाला आहार देतांना नाचणी सत्व दिले जाते नाचणी सत्व बनविण्यासाठी प्रथम नाचणी स्वच्छ पाण्याने दोन तीन वेळा धुतली जाते. त्यानंतर तिला बारा तास पाण्यात भिजवुन मोड आणले जातात मोड आणतांना नाचणीला साधारण दोन तीन तास वाळवले जाते नंतर एका भांडयात हलकेसे गरम करून मग त्यांचे पीठ केले जाते. असे पीठ लहान बाळ असो अगर आबालवृध्द यांनी गुळातुन खाल्यास किंवा खीर बनुवून खाल्यास अतिशय उपयुक्त ठरते. काही अभ्यासकांच्या मते अफ्रिकेतील टांझानिया पश्चिम भागात किंवा इथोपियाच्या उंच सखल भागात नाचणीचा उदय झाला तिथुन ती इतिहासपुर्वकाळातच भारतात आली. कधीही कीड न लागणारे कोणत्याही पर्यावरणात तग धरून राहणारे असे बियाने जवळजवळ दशकभर टिकुन राहते.

आहारतज्ञ अर्चना रायरीकर सांगतात मिलेटसमध्ये आपल्याला ज्वारी,बाजरी, नाचणी माहित आहेत पण राळा,सावा,कोदो ही अत्यंत उपयुक्त आणि प्रामुख्याने महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेश मध्ये घेतली जाणारी मिलेटस फारशी परिचीत नाहीत सर्वच मिलेट्स अत्यंत उपयुक्त असुन ॲसिडीटीपासुन अगदी कॅन्सर पेशंटपर्यंत सर्वांसाठी ती गुणकारी आहेत. अर्थात मिलेटसोबत बाकीचा आहार संतुलित असणं, दही, डाळ, भाज्या योग्य प्रमाणात आहारात असणं नियमित व्यायाम या गोष्टींचं काटेकोर पालन आवश्यक आहे. आणखी महत्वाचं म्हणजे या धाण्यासाठी किटकनाशक खत याची गरज लागत नाही. त्यामुळे ती पर्यावरणपुरक आहेत.

मिलेटमॅन ऑफ इंडीया डॉ. खादर वली यांनही मिलेट्स सोबत काही गाईडलाईन्स आखुन दिल्या आहेत भारतीय कृषी संशोधन परिषदेअंतर्गत असलेल्या भारतीय कदन्न (मिलेट्स) संशोधन परिषदेनही मिलेटसमध्ये मधुमेह,कर्करोग,हायपरटेन्शन रोधी गुणधर्म असल्याच म्हटलं आहे. मिलेटस पोषणासाठी, आरोग्यासाठी, पर्यावरणासाठी कशी महत्वाची आहेत ते बहुतांश करून सेंद्रिय पध्दतीने पिकवली जाणारी ही पोष्टिक तृणधान्य पशुपक्षांसाठीही उपयोगाची आहेत.

मिलेट वापरतांना लक्षात ठेवायच्या बाबीरू

१. कोणतेही मिलेट वापरतांना ते पहिल्यांदा स्वच्छ धुन नंतर आठ तास भिजवुन त्याचा कुठलाही पदार्थ करावा कारण मिलेट आठतास भिजल्याने त्यात असणारे तंतुमय पदार्थ मोकळे होतात. मोकळे झालेले तंतुमय पदार्थ आपल्या शरीराला पचवायला हलके असतात. शिवाय मिलेट भिजवल्यानेच त्यातील सगळे पोषणमुल्य आपल्याला मिळतात. न भिजवता खाल्यास पचनाला त्रास होण्याची शक्यता आहे. मिलेटसचा रवा किंवा पीठ करतांना सुध्दा हिच पध्दत वापरणे अनिवार्य आहे.

२. मिलेट भिजवतांना वापरलेले पाणी फेकुण देऊ नये ते पुन्हा वापरावे कारण रात्रभर पाण्यात भिजल्याने काही पोषकमुल्ये पाण्यात विरघळतात. तेच पाणी फेकुन दिल्याने चवीत आणि पोषणात फरक पडतो. जसे की, कोडो मिलेट लगेच आपला काळसर रंग पाण्यात सोडते.

३. मिलेट खरेदी करतांना वेगवेगळे रंग असलेले अथवा नुसती वरची साल काढलेले मिलेटस खरेदी करावे म्हणजेच मिलेटला रंग असतो पुर्णपणे सफेद असलेले मिलेट विकत घेउ नये जसे की राळ हे पिवळया रंगाचे असते. वरई हे त्वचेच्या रंगाचे असते तर कोडो हे काळपट असते मिलेटला असणारा रंग हे त्याच्या मध्ये असणारे गुणधर्म दर्शवितो.

४. मिलेट धुतांना जर रंग गेला तर ती नैसर्गिक क्रिया आहे. त्यामुळे दोन वेळा पेक्षा जास्त मिलेट धुवू नये कारण एखादया धान्याचा जास्त रंग गेला म्हणजे आपण ते जास्त धुतो. त्यात घाण आहे असे आपल्याला वाटते परंतु मिलेटचा रंग जाणे नैसर्गिक आहे. जास्त वेळा धुतल्यास त्यातील पोषणमुल्य कमी होते.

५. मिलेट कधीही कुकरमध्ये शिजवु नये लोखंडी भांडे किंवा मातीच्या भांडयाचा वापर करावा कारण कोणतेही धान्य कुकरमध्ये शिजवल्यास शिट्टीमधुन पोषकमुल्य निघुन जातात मातीच्या भांडयात मंद आचेवर शिजवुन त्याची चव अबाधित राहते लोखंडाच्या भांडयात केल्याने शरीराला आवश्यक असणारे लोखंड आपल्याला मिळते.

मिलेट कुणी व किती खावे-

वय वर्ष ५ ते वय वर्ष १०० पर्यंत कुणीही व्यक्ती मिलेट खाऊ शकतात मिलेट आकाराने लहान असले तरी शिजवुन झाल्यावर मिलेट फुलतात एका व्यक्तीला पुरतात म्हणजेच चार लोकांसाठी चार मुठी पुरतात. जितके मिलेट घेऊ त्याच्या चारपट पाणी घालावे मिलेटपासुन खिचडी, भात,थालीपीठ, सांजा, नुडल्स, आंबिल, ठोंबरा असे विविध पदार्थ करून पोषणमुल्य वाढवुन विविध अवस्थेतील जसे,

गर्भावस्था वाढीच्या अवस्था, बाल्यावस्था, किशोरावस्था, प्रौढावस्था व वृध्दावस्थेतील सर्वांना लाभ मिळु शकतो.

सारांश-

जागतिकरणामुळे कुटुंबाची जीवनशैली बदललेली आहे. त्यामुळे पोषणविषयक समस्या वाढलेल्या आहे या समस्यांवर उपाययोजना म्हणुन भरडधान्याचे महत्व आहे. प्रस्तुत अभ्यासात भरडधान्य/मिलेटचा इतिहास व विकास म्हणजेच अगदी यजुर्वेदापासुन, इसपुर्व ४५०० म्हणजेच भारतीय कास्ययुगापासुन हे धान्य खाल्ल जात असत याला रामधान्य, देवधान्य, जादुईधान्य, श्रीधान्य असेही संबोंधले जाते काळाच्या ओघात शेतात हे पीक कमी घेतले जाऊ लागले. भरडणे व कांडणे ही प्रक्रिया कठीण वाटल्यामुळे आहारातुन ही भरडधान्य कमी होऊ लागली असे स्पष्ट केले आहे. मधुमेह आजारात भरडधान्याची उपयुक्तता उपवासाच्या काळात भरडधान्याची उपयुक्तता, बाजरी आणि नाचणीची महिलांना, लहान बालकांना,वध्दांना हाडे मजबुतीकरीता लोह व कॅल्शियम प्राप्तीकरीता उपयुक्तता स्पष्ट केली आहे त्याचबरोबर मिलेट वापरतांना लक्षात ठेवायच्या बाबी देखील स्पष्ट केल्या आहे. प्रस्तुत अभ्यासामुळे विदयार्थिनी आणि सर्व लोकांमध्ये भरडधान्याविषयी जागरूकता निर्माण होईल आणि भरडधान्यापासुन पदार्थ तयार करण्याकरीता प्रवृत्त होतील. आहारपोषणाचा दर्जा वाढविण्याकरीता भरडधाण्याबाबत संशोधन करण्यास संशोधक तयार होतील. उत्तम आरोग्यप्राप्तीकरीता भरडधान्य मिलेटसचे उपयोग स्पष्ट झाल्याने रोगप्रतिकारकशक्ती वाढल्यामुळे लोकांचे स्वास्थ्य सुधारण्यास मदत होईल. सेंद्रिय पध्दतीने पिकवली जाणारी ही पौष्टीक तृणधान्य पशुपक्षांसाठीही उपयोगाची आहेत. रोग आणि किडीची समस्या कमी असल्यान पाणी कमी लागत असल्यानं शेतकऱ्यांसाठी धान्य फायदयाची आहेत तेव्हा मिलेटस पिकवुया, खाऊया आणि आरोग्य व पर्यावरण जपुया, सुजलाम,सुफलाम देश बनविण्यास सज्ज होवु या असा निर्धार केल्यासच २०२३ हे मिलेट वर्ष म्हणुन खऱ्या अर्थाने साजरे होईल.

संदर्भसुची-

1) डॉ. खादरवली सिरीधान्य, रैतुनेस्तम पब्लीकेशन हैद्राबाद
2) शोभा वाघमारे (नाईक) आहारोपचार आणि सामुदायिक पोषण विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा, औरंगाबाद
3) अर्चना ठोंबरे आपल्या आरोग्यात
4) तृणधान्याचे महत्व https:/Marathi.abplive.com7health

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No.36 Sept-Oct 2023

बदलत्या काळातील पोषणाच्या दृष्टीने भरडधान्याचे महत्व

प्रा.डॉ.स्वप्ना देशमुख(लोखंडे)
सहाय्यक प्राध्यापक (गृहअर्थशास्त्र विभाग), श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद
Corresponding Author- प्रा.डॉ.स्वप्ना देशमुख(लोखंडे)
Email-pnadeshmukh1406@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.10352245

प्रस्तावना :

जागतिकीकरणामुळे कुटुंबीयांची जीवनशैली विशेषत: आहाराबाबात खुपच बदलत गेलेली आहे. त्यामुळे निर्माण होणारे आहार व पोषणविषयक प्रश्न, विविध आजार जसे स्थुलता,लठ्ठपणा, उच्च रक्तदाब, हृदयविकार, मधुमेह रोग प्रतिकार शक्ती कमी असल्यामुळे होणारे आजार, पचनसंस्थेचे आजार अशा आजारांच प्रमाण वाढत आहे. मात्र या सर्व समस्येवर आपल्या सुजलाम सुफलाम भारत देशातील विचारांनी लोकांना पारंपारीक भरडधान्य तृणाधान्य च्या उपयोगाव्दारे उपाय शोधता येईल, पर्यायाने भरडधान्याचे महत्व वाढेल.

बीज शब्द :– भरडधान्याची उपयुक्तता,पोषण. तृणधान्य/भरडधान्याच्या उपयोगाचे उद्देश.

१. विदयार्थीनी आणि सर्व लोकांमध्ये भरडधाण्याविषयी जागरूकता निर्माण करणे.
२. भरडधाण्यापासुन पदार्थ तयार करण्याकरीता प्रवृत्त करणे.
३. आहार पोषणाचा दर्जा वाढवण्याकरीता भरडधाण्याबाबत संशोधन करणाऱ्या संशोधकांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे.
४. उत्तम आरोग्याप्राप्तीकरीता भरडधाण्य मिलेटसचे उपयोग फायदे स्पष्ट करणे.

भरडधाण्याचा ईतिहास आणि विकास

शेतीची सुरवात झाली आणि हे धान्य सर्वप्रथम मानवाने जवळ केले आशिया आणि आफ्रिका खंडात सापडलेले धान्य जगातील असंख्य संस्कृती सोबत नांदु लागले इंग्रजीत त्यांना मिलेट म्हणतात. मिनी म्हणजेच लहान आकाराच्या एका दाव्यांपासुन असंख्य दाने मिळविता येतात. भारतातील वेगवेगळया ठिकाणी यांना रामधान्य, देवधान्य, जादुईधान्य,श्रीधान्य असे नाव आहेत.अगदी यजुर्वेदमध्येही या धान्याचा उल्लेख आढळतो याचाच अर्थ भारतीय कास्ययुगापासुन मिलेट खाल्ल जात (इ.स पुर्व ४५००) भारताव्यतिरीक्त अफ्रिका,चीन, जपान, कोरीया आदि देशांमध्ये फार पुर्वीपासुन मिलेट खाल्ले जात असल्याचे पुरावे आढळतात थोडक्यात काय तर आपले पुर्वजही मिलेट खात होते. मिलेट आहारातुन जाण्याची कारण असंख्य आहेत. भारताच्या प्रत्येक राज्यात वेगवेगळया प्रकारचे मिलेट घेतले जात असत जिथे ४५० मि.मी पेक्षा कमी पाऊस पडतो अशा सगळया भागात मिलेट घेतलया जाते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ज्या प्रकारे आपल्या देशात सिंचनाच्या सुविधा उपलब्ध झाल्या त्याच प्रमाणात लागवडी खाली असलेल्या गव्हाचे, तांदळाचे उत्पादन वाढू लागले. साधारण १९७० आणि ७१ च्या काळात एकुण अन्नधान्य लागवडीपैकी ४५.९ टक्के एवढी मिलेट लागवड होती. मात्र १९९६ च्या काळात तीच लागवड ३१.५ टक्यावर आली. याचाच अर्थ असा की, तांदुळ आणि गव्हाच्या उत्पादनात प्रचंड वाढ झाली. शिवाय पीडीएस (Public Distribution System) म्हणजेच शिधापत्रिकेवर संपुर्ण देशात गहु आणि तांदुळच दिला जाऊ लागला त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना मिलेटमधुन मिळणारे आर्थिक उत्पादन कमी झाले. कोणत्याही प्रकारच्या कस नसलेली कमी पाण्याच्या जमिनीत शिवाय खडकाळ जमिनीतही मिलेट उगवून येत शिवाय मिलेट कोणत्याही प्रकारच्या रसायनशिवाय उगवु शकतात मिलेटमध्ये इतर धान्याच्या तुलनेत प्रोटीन, कॅल्शियम, फायबर जास्त प्रमाणात आढळून येतात. त्यामुळे आपल्या देशातील कुपोषणाचे प्रमाण तसेच अन्नधान्यामध्ये पोषणतत्वांचे कमी प्रमाण ही समस्या सोडविता येईल. पाऊस कमी झाला किंवा मोठाली वादळ आली तरीही अशा जमिनीत टिकुन असणारे मिलेट शेतकऱ्याला हुकमी उत्पादन मिळवुन देते शिवाय वाढती जागरूकता आणि ग्राहकाची मागणी यामुळे शेतकऱ्याला परवडणारे पीक आहे. मिलेटसहित कडधान्य तेलबिया आपल्याला मिश्रपीक पध्दतीने देखील करता येतात. सगळे मिलेट खरीप हंगामात पेरले जातात. काही मिलेट वरई,नाचणी भातासारखी लावणी करून करतात. काही नुसते फेकुन करतात तर काही पेरणी केली जाते सगळया मिलेटची पीक अवस्था २ ते ४ महिण्यात येते शिवाय रब्बी हंगाम आणि उन्हाळयात देखील घेतले जातात.मोठे तृणधान्य म्हणजे ज्वारी आणि बाजरी आणि छोटे तृणधान्य म्हणजे नाचणी, भगर, राळ कोद्रो, सावा, वरी, ब्राउन टॉपमिलेट छोटया तृणधान्यांना विविध भागात नागली, मोर, कांगणी असे वेगवेगळयाा नावाने ओळखले जाते, पुर्वीच्या काळात बाजरी,नाचणी ही पिके खळयात मळणे या प्रक्रियेने तयार केली जात असत. पण छोटया तृणधान्याचे वरील आवरण टणक असल्यामुळे भरडावे किंवा कांडावे लागत असे म्हणुन त्यांना भरडधान्य म्हटली जातात. काळाच्या ओघात शेतात पीक कमी घेतले जावु लागले तसेच भरडणे आणि कांडणे ही मौल्यवान तृणधान्य नाहिशी झाली. समाजात आहार आणि आरोग्याविषयी जागरूकता आल्यानं भरडधान्य आता प्रत्येकाच्या आहारात उपयोगात येत आहे. भारताच्या प्रयत्नाने २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष म्हणुन साजरे केले जात आहे. आणि जनजागृतीविषयी विविध कार्यक्रम, उपक्रम आयोजित केले जात असल्याने नागरीकांना भरडधान्याचे महत्व कळत आहे.

मधुमेह आजारात भरडधान्य मिलेट्सची उपयुक्तता :

कोणत्याही मधुमेह झालेल्या व्यक्तिला ग्लायसमिक इंडेक्स कमी असलेली धान्य खाण्यास सांगितले जाते त्यामागचं कारण अस की ग्लायसेमिक इंडेक्स कमी असलेले धान्य आपल्या शरीरामध्ये ग्लुकोज हळुहळु सोडत त्यामुळे शरीरामध्ये साखरेची पातळी योग्य राखली जाते. तांदुळ आणि ज्वारीमध्ये साखरेचे प्रमाण जास्त असल्याने मधुमेह बळावण्याची शक्यता असते परंतु पिवळया रंगाचे धान्य म्हणजेच फॉक्सटेल मिलेट किंवा राळ हे धान्य खाल्याने रक्तातील साखरेची पातळी कमी होते आणि हळुहळु इन्सुलिन घ्यायचं बंद होऊन मधुमेहात होणाऱ्या जखमा देखील ताबडतोब बऱ्या होतात म्हणुन याला मॅजिकल मिलेटस देखील म्हणतात दुसरा प्रकार तटस्थ धान्य अशी धान्य ज्यामुळे आपले निरोगी शरीर निरोगी राहण्यास मदत होईल यात ज्वारी, नाचणी, बाजरी असे धान्य येतात. भारतीय कडधान्य (मिलेट) अनुसंधान संस्था (Indian Institute of millets Research) हैद्राबाद मध्ये कार्यरत आहे (Odisha

Millets Mission) अंतर्गत ओडीसा सरकार शिधापत्रिकेवर (Ration Card) नाचणीचे वाटप करते.

लहान मुलांना भुक लागत नसल्यास मिलेट्सची उपयुक्तता :

लहान मुलांना भुक लागत नसल्यास साव्याची अंबील किंवा लापशी आठवडयातुन दोनदा दिली तर फरक पडतो. मिलेट चविला गोडसर असल्याने ते मुलांना आवडते कुणाही व्यक्तीला आहारात मिलेटची सुरवात करायची असेल तर हे मिलेट एक उत्तम सुरवात होऊ शकते. ६४ ग्रॅम कर्बोदके, ९ ग्रॅम प्रथिने, ६ग्रॅम तंतुमय पदार्थ शरीर स्वच्छ ठेवण्याचे काम हे मिलेट करत. उपवासाच्या काळात उपयुक्त भरडधान्य – वरई भारतात पुरातन काळापासुन उपवासाला चालणारी पचनाला हलकी असणारी वरई साबुदाण्यापेक्षा कितीतरी श्रेष्ठ आहे. वरईत प्रोटीन असते. हे मिलेट जखम भरून येण्यासाठी अगदी उपयुक्त आहे. सध्या भारतात मध्यप्रदेश, उडीसा, झारखंड या राज्यात मोठया प्रमाणात वरईचे उत्पादन होते. वरईचे पोषणमुल्य ६२ ग्रॅम कार्बोदके,८ ग्रॅम प्रोटीन ९.८ ग्रॅम तंतुमय पदार्थ, ४.२ चरबी हे मिलेट आपल्या शरीराला हळुहळु उर्जा पुरवते. म्हणुनच नुसत्या वरईवर आपल्याला संपुर्ण उपवास करता येतो. उत्तर भारतात याला व्रत का चावल असेही म्हणतात. काही भागात उपवासाला वरईची भाकरी देखिल बनवली जाते. आणि नवरात्रात उपवासाला हमखास वरईची भाकरी देखील बनवली जाते. प्राचीन भारत आणि जगातही इतरत्र काही देशात उगवणारे मिलेट म्हणजे फॉक्सटेल मिलेट याला हिंदीत कांग, मराठीत राळा आणि संस्कृतमध्ये प्रियांगु, भावज्य,रजिका म्हणतात.

आरोग्यवर्धीनी बाजरी आणि नाचणीची उपयुक्तता. थंडीत कुणाला ताप आला, सर्दी आली तर आपल्या शरीराला गरम ठेवणारी बाजरी सगळयात उत्तम असते. प्रथिनं, लोह, झिंक, फॉस्फरस, मॅग्नेशियम ब जीवनसत्व असलेली बाजरी एकदम पोष्टिक. देशाच्या एकुण बाजरी उत्पादनापैकी महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात, उत्तरप्रदेश, हरीयाणा या राज्यात ९० टक्के गाजरी उगवली जाते. थोडी पांढरी, थोडी पिवळी, थोडी करडी, थोडी निळी अशा विविध रंगांनी नटलेली बाजरी अगदी मोत्यासारखी दिसते म्हणुन याला इंग्रजीत पर्ल मिलेट असे म्हणतात. साधारण इस पुर्व ४००० मध्ये अफ्रिकेत सहारा वाळवंटाच्या पश्चीम भागातील सुदान येथे बाजरीची शेती केली जाऊ लागली भारतात साधारण इ.स पुर्व १००० ते २५०० मध्ये उत्तर भारतात हडप्पा संस्कृती तसेच गंगेच्या खोऱ्यात बाजरी पिकवली जात असे. नंतर साधारण इ.स पुर्व १५०० च्या काळात ती दक्षिण भारतात पिकवली जाऊ लागली नाचणीही प्राचीन काळापासुन धान्य अगदी डोंगर माथ्यापासुन ते हिमालयापर्यंत नाचणी उगवते जिथे चांगला पाण्याचा निचरा होतो तिथे नाचणी उगवते नुसत्या कर्नाटक राज्यात आपल्या देशातील ६० टक्के नाचणी होते. प्रथिने, कॅल्शियम, तंतुमय पदार्थांनी भरपुर असलेली नचणी स्त्रियांना तर जरूर खावी सगळीकडे मोठया प्रमाणात लहान मुलांना दिला जाणारा नाचणी सत्व हा एक प्रकार सहा महिन्याच्या पुढील बाळाला आहार देतांना नाचणी सत्व दिले जाते नाचणी सत्व बनविण्यासाठी प्रथम नाचणी स्वच्छ पाण्याने दोन तीन वेळा धुतली जाते. त्यानंतर तिला बारा तास पाण्यात भिजवुन मोड आणले जातात मोड आणतांना नाचणीला साधारण दोन तीन तास वाळवले जाते नंतर एका भांडयात हलकेसे गरम करून मग त्यांचे पीठ केले जाते. असे पीठ लहान बाळ असो अगर आबालवृध्द यांनी गुळातुन खाल्यास किंवा खीर बनुवून खाल्यास अतिशय उपयुक्त ठरते. काही अभ्यासकांच्या मते अफ्रिकेतील टांझानिया पश्चिम भागात किंवा इथोपियाच्या उंच सखल भागात नाचणीचा उदय झाला तिथुन ती इतिहासपुर्वकाळातच भारतात आली. कधीही कीड न लागणारे कोणत्याही पर्यावरणात तग धरून राहणारे असे बियाने जवळजवळ दशकभर टिकुन राहते.

आहारतज्ञ अर्चना रायरीकर सांगतात मिलेटसमध्ये आपल्याला ज्वारी,बाजरी, नाचणी माहित आहेत पण राळा,सावा,कोदो ही अत्यंत उपयुक्त आणि प्रामुख्याने महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेश मध्ये घेतली जाणारी मिलेटस फारशी परिचीत नाहीत सर्वच मिलेट्स अत्यंत उपयुक्त असुन ॲसिडीटीपासुन अगदी कॅन्सर पेशंटपर्यंत सर्वांसाठी ती गुणकारी आहेत. अर्थात मिलेटसोबत बाकीचा आहार संतुलित असणं, दही, डाळ, भाज्या योग्य प्रमाणात आहारात असणं नियमित व्यायाम या गोष्टींचं काटेकोर पालन आवश्यक आहे. आणखी महत्वाचं म्हणजे या धाण्यासाठी किटकनाशक खत याची गरज लागत नाही. त्यामुळे ती पर्यावरणपुरक आहेत.

मिलेटमॅन ऑफ इंडीया डॉ. खादर वली यांनही मिलेट्स सोबत काही गाईडलाईन्स आखुन दिल्या आहेत भारतीय कृषी संशोधन परिषदेअंतर्गत असलेल्या भारतीय कदन्न (मिलेट्स) संशोधन परिषदेनही मिलेटसमध्ये मधुमेह,कर्करोग,हायपरटेन्शन रोधी गुणधर्म असल्याच म्हटलं आहे. मिलेटस पोषणासाठी, आरोग्यासाठी, पर्यावरणासाठी कशी महत्वाची आहेत ते बहुतांश करून सेंद्रिय पध्दतीने पिकवली जाणारी ही पोष्टिक तृणधान्य पशुपक्षांसाठीही उपयोगाची आहेत.

मिलेट वापरतांना लक्षात ठेवायच्या बाबीरू

१. कोणतेही मिलेट वापरतांना ते पहिल्यांदा स्वच्छ धुन नंतर आठ तास भिजवुन त्याचा कुठलाही पदार्थ करावा कारण मिलेट आठतास भिजल्याने त्यात असणारे तंतुमय पदार्थ मोकळे होतात. मोकळे झालेले तंतुमय पदार्थ आपल्या शरीराला पचवायला हलके असतात. शिवाय मिलेट भिजवल्यानेच त्यातील सगळे पोषणमुल्य आपल्याला मिळतात. न भिजवता खाल्यास पचनाला त्रास होण्याची शक्यता आहे. मिलेटसचा रवा किंवा पीठ करतांना सुध्दा हिच पध्दत वापरणे अनिवार्य आहे.

२. मिलेट भिजवतांना वापरलेले पाणी फेकुण देऊ नये ते पुन्हा वापरावे कारण रात्रभर पाण्यात भिजल्याने काही पोषकमुल्ये पाण्यात विरघळतात. तेच पाणी फेकुन दिल्याने चवीत आणि पोषणात फरक पडतो. जसे की, कोडो मिलेट लगेच आपला काळसर रंग पाण्यात सोडते.

३. मिलेट खरेदी करतांना वेगवेगळे रंग असलेले अथवा नुसती वरची साल काढलेले मिलेटस खरेदी करावे म्हणजेच मिलेटला रंग असतो पुर्णपणे सफेद असलेले मिलेट विकत घेउ नये जसे की राळ हे पिवळया रंगाचे असते. वरई हे त्वचेच्या रंगाचे असते तर कोडो हे काळपट असते मिलेटला असणारा रंग हे त्याच्या मध्ये असणारे गुणधर्म दर्शवितो.

४. मिलेट धुतांना जर रंग गेला तर ती नैसर्गिक क्रिया आहे. त्यामुळे दोन वेळा पेक्षा जास्त मिलेट धुवू नये कारण एखादया धान्याचा जास्त रंग गेला म्हणजे आपण ते जास्त धुतो. त्यात घाण आहे असे आपल्याला वाटते परंतु मिलेटचा रंग जाणे नैसर्गिक आहे. जास्त वेळा धुतल्यास त्यातील पोषणमुल्य कमी होते.

५. मिलेट कधीही कुकरमध्ये शिजवु नये लोखंडी भांडे किंवा मातीच्या भांडयाचा वापर करावा कारण कोणतेही धान्य कुकरमध्ये शिजवल्यास शिट्टीमधुन पोषकमुल्य निघुन जातात मातीच्या भांडयात मंद आचेवर शिजवुन त्याची चव अबाधित राहते लोखंडाच्या भांडयात केल्याने शरीराला आवश्यक असणारे लोखंड आपल्याला मिळते.

मिलेट कुणी व किती खावे-

वय वर्ष ५ ते वय वर्ष १०० पर्यंत कुणीही व्यक्ती मिलेट खाऊ शकतात मिलेट आकाराने लहान असले तरी शिजवुन झाल्यावर मिलेट फुलतात एका व्यक्तीला पुरतात म्हणजेच चार लोकांसाठी चार मुठी पुरतात. जितके मिलेट घेऊ त्याच्या चारपट पाणी घालावे मिलेटपासुन खिचडी, भात,थालीपीठ, सांजा, नुडल्स, आंबिल, ठोंबरा असे विविध पदार्थ करून पोषणमुल्य वाढवुन विविध अवस्थेतील जसे,

गर्भावस्था वाढीच्या अवस्था, बाल्यावस्था, किशोरावस्था, प्रौढावस्था व वृध्दावस्थेतील सर्वांना लाभ मिळु शकतो.

सारांश-

जागतिकरणामुळे कुटुंबाची जीवनशैली बदललेली आहे. त्यामुळे पोषणविषयक समस्या वाढलेल्या आहे या समस्यांवर उपाययोजना म्हणुन भरडधान्याचे महत्व आहे. प्रस्तुत अभ्यासात भरडधान्य/मिलेटचा इतिहास व विकास म्हणजेच अगदी यजुर्वेदापासुन, इसपुर्व ४५०० म्हणजेच भारतीय कास्ययुगापासुन हे धान्य खाल्ल जात असत याला रामधान्य, देवधान्य, जादुईधान्य, श्रीधान्य असेही संबोंधले जाते काळाच्या ओघात शेतात हे पीक कमी घेतले जाऊ लागले. भरडणे व कांडणे ही प्रक्रिया कठीण वाटल्यामुळे आहारातुन ही भरडधान्य कमी होऊ लागली असे स्पष्ट केले आहे. मधुमेह आजारात भरडधान्याची उपयुक्तता उपवासाच्या काळात भरडधान्याची उपयुक्तता, बाजरी आणि नाचणीची महिलांना, लहान बालकांना,वध्दांना हाडे मजबुतीकरीता लोह व कॅल्शियम प्राप्तीकरीता उपयुक्तता स्पष्ट केली आहे त्याचबरोबर मिलेट वापरतांना लक्षात ठेवायच्या बाबी देखील स्पष्ट केल्या आहे. प्रस्तुत अभ्यासामुळे विदयार्थिनी आणि सर्व लोकांमध्ये भरडधान्याविषयी जागरूकता निर्माण होईल आणि भरडधान्यापासुन पदार्थ तयार करण्याकरीता प्रवृत्त होतील. आहारपोषणाचा दर्जा वाढविण्याकरीता भरडधाण्याबाबत संशोधन करण्यास संशोधक तयार होतील. उत्तम आरोग्यप्राप्तीकरीता भरडधान्य मिलेटसचे उपयोग स्पष्ट झाल्याने रोगप्रतिकारकशक्ती वाढल्यामुळे लोकांचे स्वास्थ्य सुधारण्यास मदत होईल. सेंद्रिय पध्दतीने पिकवली जाणारी ही पौष्टीक तृणधान्य पशुपक्षांसाठीही उपयोगाची आहेत. रोग आणि किडीची समस्या कमी असल्यान पाणी कमी लागत असल्यानं शेतकऱ्यांसाठी धान्य फायदयाची आहेत तेव्हा मिलेटस पिकवुया, खाऊया आणि आरोग्य व पर्यावरण जपुया, सुजलाम,सुफलाम देश बनविण्यास सज्ज होवु या असा निर्धार केल्यासच २०२३ हे मिलेट वर्ष म्हणुन खऱ्या अर्थाने साजरे होईल.

संदर्भसुची-

1) डॉ. खादरवली सिरीधान्य, रैतुनेस्तम पब्लीकेशन हैद्राबाद
2) शोभा वाघमारे (नाईक) आहारोपचार आणि सामुदायिक पोषण विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा, औरंगाबाद
3) अर्चना ठोंबरे आपल्या आरोग्यात
4) तृणधान्याचे महत्व https:/Marathi.abplive.com7health

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No.36 Sept-Oct 2023

संगीत चिकित्सा की आवश्यकता

डॉ.भागवत लहुबुवा ढोले

शोधकर्ता, स्वरगंध संगीत विद्यालय,आंबेगाव खुर्द ,टेल्को कॉलनी,दत्तनगर पोलीस स्टेशन जवळ ता .हवेली .जिल्हा पुणे ,४११०४६

Corresponding Author- डॉ.भागवत लहुबुवा ढोले

email-drbhagwatdhole89@gmail.com

DOI- 10.5281/zenodo.10352473

सारांश -

संगीत क्या है यह कहा से आया कुछ स्वर समूह हमे बहुत अच्छे लगते है जब की कुछ आवाज हमे परेशान करती है जैसे कुत्तो का भोकना और गाडीओ के हॉर्न की आवाज कुछ लोगो को विज्ञान की अपेक्षा संगीत जल्दी समझ मे आता है और संगीत सुनते समय उनके हाथ या पैर ताल देने लगते है ताल कठीण ही क्यू न हो सम सर्वसाधारण श्रोता को भी समजती हैं। हम संगीत क्यू सुनते है उसका हमारे शरीर मन और भावना पर क्या असर होता है संगीत को स्वस्थ रहने के लिए और रोग ठीक करने के लिए उपयोग किया जा सकत्ता है अभी तक का संगीत चिकित्सा का इतिहास क्या है भारतीय दर्शन आत्मा आयुर्वेद मे संगीत चिकित्सा का विचार हुआ है या नही हुआ है पश्चिमी देशो मे संगीत चिकित्सा के विषय मे संशोधन हुआ है या नही आधुनिक वैद्यक पद्धती से संगीत चिकित्सा का स्पष्टीकरण दे सकते हैं

उद्देश -

1. संगीत जीवन में संगीत का महत्व.
2. संगीत कि महानता.
3. संगीत कि आवश्यकता.
4. विविध संगीत चिकित्सा .

प्रस्तावना-

इन सभी प्रश्न के हाल ढूंढते हुए संशोधन पेपर लिखने से पूर्व चिकित्सा और मन के परस्पर संबंध के विषय पर बडे बडे अस्पताल और सामूहिक आरोग्य केंद्र के डॉक्टर से चर्चा की और तनाव मुक्त देने वाली कई संगीत तज्ञ लोगो से चर्चा कर उनके अनुभव को समझा है चिकित्सा क्षेत्र में अभी सभी प्रवेश लिये हुये साईको निरो इम्युनोलॉजी के चिकित्सा शास्त्र ने शारीरिक और मन के सूक्ष्म अंतरीक संबंध का संशोधन वाला मार्गदर्शन किया है इस नही शाखा मे मानसशास्त्र मज्जातंतू विशेषज्ञ मिलकर संशोधन कर रहे है और आरोग्य क्या है बिछडे हुए आरोग्य की पुनप्राप्ती मे संगीत की भूमिका क्या है इन प्रश्न के उत्तर देने का प्रयत्न इस शोध पेपर का उद्देश है |शरीर अर्थात इंद्रिया मन और आत्मा का सुंदर संयोग यदि मन प्रसन्न है सावधान चित्त है तो रोग नही होंगे लेकिन मन प्रसन्न न हो चिंता से ग्रस्त हो या क्रोध ऐसे तयार शोक से व्याकुल हो तो स्वादिष्ट अन्न भी अच्छा नही लगता इसलिये किसी भी मंगल प्रसंग मे स्वागत समारोह में आनंदमय वातावरण निर्माण के लीये शहनाई बासुरी सीतार आधी वाद्य का प्रयोग किया जाता है ताकी निमंत्रितो का मन प्रसन्न रहे प्राचीन चिकित्सा शास्त्र के अनुसार मनुष्य का शरीर और मन एक ही है दर्शन शास्त्र का भी यह मत है परंतु वर्तमान मे हुए संशोधन की अनुसार उसके भेद और परस्पर संबंधो के बारे मे अधिक माहिती उपलब्ध हुई है उदाहरण के लिए मन की भावनाओ का शरीर के रसायन मे रूपांतर कैसे होता है विचार और भावना का हमारी श्वासो पर कैसा परिणाम होता है प्राणवायू कम हो तो रोगप्रतिकारक शक्ती कैसे कम होती है और हम सहस्ता से बिमारी की गिरफ मे आ जाते हैं भावना वापर निमंत्रण रखने के लिए या मन शांत रखने के लिए संगीत का उपयोग हम कैसे कर सकते है ये विषय भी संगीत चिकित्सा के अंतर्गत आते है संगीत चिकित्सा क्या है इस विषय की पहचान और इसलिये मैने यह शोध पेपर लिखने का प्रयास किया हैं संगीत के व्यक्ती के मन पर कुछ ना कुछ परिणाम होते ही रहते है इसका अनुभव हमे जीवन मे होता है जो हम जानते है मनपसंद गीत सुनकर हमे प्रसन्नता होती है और ना पसंद सुनाई देने पर मन नाराज होता है इसका अर्थ है कि संगीत का मन से संबंध है और पर्याय से संगीत का आरोग्य से भी समंद है इसका विचार करके संगीत और स्वास्थ शारीरिक का निश्चित क्या और कैसे संबंध है इस पर अध्ययन करने के कुछ निष्कर्ष निकाले गये है यही निष्कर्ष यांनी संगीत उपचार इसका अर्थ नही है कि रोगी को किसी भी समय कोई भी समय कोई भी गीत सुनकर रोगमुक्त करना उसका भी शास्त्र है जो मन मे जुडा हुआ है मन का विचार आते ही उनके भाव भावना और विभिन्न विचारो की एक शृंखला का चित्र सामने आत्या है जितने व्यक्ती उतनी प्रकृती उत्तरे स्वभाव उतना शास्त्र गहन आता किसी विकार पर उस समय किस राख से संबंधित गाना सुनाने से लाभ

होगा इसका गहराईस मे जाकर विचार करना आवश्यक है संगीत के प्रभाव का विचार मेंदू से दिमाग से होता है मानव का दिमाग और मज्जा संस्था से मुड वृत्ती तयार होती है यांनी उस मूड मे कुछ विशिष्ट श्राव्य आपने शरीर मे होने वाले परिवर्तन को बनाते है संगीत से पिट्युटरी ग्रंथी कार्यरत होकर उसकी प्रेरणा से दिमाग कार्यरत होने से शरीर का रक्त संचालन सामान्य होत आहे हमारे अनेक विकार रक्त संचलन से जुडे है इसलिये एक बार संगीत का परिणाम हुआ की रक्त संचालन ठीक होकर उससे संबंधित विकार नष्ट हो जाते है वर्तमान काल के उच्च रक्तदान मधुमेह अधिविकार मानसिक स्वास्थ्य से जुडे होने से उसके घटने बढने पर संगीतकार निश्चित हे परिणाम होता है कई बार हमने अपनी पसंद कई संगीत सुनकर मन उदास हो जाता है निराशा होती है इसलिये संगीत उपचार मे निश्चित कोनसा विकार हुआ है इसकी जांच करनी पडती है उसके अनुसार उपचार हेतू कोनसा राग सुनने पर रोगी ठीक होगा इसका निर्णय करना होता है इसमे भी कोई कोई राग प्राप्त काल मे और कोनसा सायंकाळ मे सुनना है यह भी निश्चित करना पडता है संगीत सुनने के लिए बीच मे ही रोगी का मूड बिघड सकता है ऐसे कुछ स्वर आने की संभावना होती है ऐसा न हो इसकी सावधानी बर्तनी पडती है हमने चैनीत किया हुआ राग और रोगी मनुष्य का समन्वय एक रस्ता की कोई कितनी देर सुनना है यह भी निर्णय लेना होता है तभी यह पद्धती गुणकारी उपयोगी हो सकती है परंतु पसंद के का राग योग्य समय मे और योग्य काल तक सुनने का मनुष्य की प्रकृती मे लक्षणीय प्रभाव पडता है इसमे संशय नही है संगीत मे व्यक्ति की सकारात्मक वृत्ती जागृत करने की क्षमता है लाख रुपये खर्च करके भी जो विकार दूर होते नही वे विकार कुछ गाने सुनकर कम खर्च मे ठीक हो जाते है

अनुभूती संगीत का -

मानवीय जीवन मे संगीत का महत्त्व -

रोग से संबंधित रोग का निर्धारण करना -

यशस्वी उपचार की गारंटी -

1. अनुभूती संगीत का -

अनुभूती संगीत उपचार पद्धती पर जब हम विचार करते है तो मन मे एक प्रश्न उत्पन्न होता है की संगीत श्राव्य अनुभूती है या कलात्मक अनुभूती क्यूकी संगीत श्राव्य अनुभूती का प्रकार है ऐसा हम मानते है तो क्या इन दोनो मे श्राव्य और कलात्मक अनुभूती मे अंतर है श्रोता के श्राव्य अनुभूती के साथ कला की परक होना जरुरी है निरंतर संगीत श्रवण से और कलाकार के सहवास मे फरक समृद्धी होती है कलाकार के प्रस्तुतीकरन की खासियत समजने के लिए कलात्मक परक होनी चाहिये उसके लिए संगीत के सात ताल और स्वर का भी ज्ञान श्रोता मे होना अपेक्षित है

2. **मानवीय जीवन में संगीत का महत्व -**

अत्याधिक गर्मी से जमीन फट जाती है परंतु वर्षा ऋतु मे बारिश के जल से बडी हुई दरारे मिल जाती है और सर्वत्र हरियाली छाती है भूमी मे पडी दरारे एक हो जाती है और उसमे शितलता निर्माण होती है उसी प्रकार संगीत रुपी सोलो की बारिश करती है और एक बात मन शांत हो जाये तो शारीरिक पीडा है दूर हो जाती है संगीत के कारन क्या चमत्कार हो सकता है इसकी कल्पना अब समझ मे आई होगी कहने की आवश्यकता नही है संगीत का मानवीय जीवन मे क्या महत्व है यह जानकर उसका योग्य रीती से उपयोग लेना चाहिए वह एक अच्छा मानसिक और शारीरिक उपचार है इसके लिए किसी संगीतोपचार तज्ञ के यहा जाकर सलाह लेने की आवश्यकता नही है मनुष्य स्वयं ही आपनी अनुभव से निर्णय ले सकता है की कोनसा संगीत सुनने से उसे प्रसन्नता का अनुभव होकर मन और शरीर अधिक आनंदित और प्रफुल्लित होगा

3. रोक से संबंधित रोग का निर्धारण -

यहा पर यह कहना जरुरी है कि संगीत चिकित्सा का जब हम विचार करते है तब मुख्यतः कुछ बातो का उल्लेख करना आवश्यक है भारतीय शास्त्रीय संगीत मे अनेक प्रकार के राग है सत्य तो यह है की भारतीय संगीत राग संगीत मेलोडी नाम से ही जगप्रसिद्ध है प्रत्येक राखी स्वयम की प्रकृती और प्रवृत्ती है और उसके परिणाम भी प्रभाव भिन्न-भिन्न होते है चिकित्सा हेतू उपयोग राग व्यक्तिगत परीक्षन के बाद निश्चित किया जा सकता है हम किसी निर्णय पर आते समय यह कर सकते है की संगीत उपचार मे प्रायोगिक दृढता है उपचार ले रहे व्यक्ति को संगीत का ज्ञान समज होना चाहिये ऐसे कोई शर्त नही है जीने शास्त्रीय संगीत की कोई समझ नही है उन पर भी उपचार करना कठीण नही है बेबी संगीत उपचार से ठीक हो सकते है

4. यशस्वी उपचार की गारंटी -

इस शोध पेपर का अर्थ यह कभी भी नही है कि रोगी इस पद्धती का उपयोग योग्य सलाह लिये बिना करे। संगीत चिकित्सा का विषय केवल लेखन तक सीमित न होकर प्रयोग का विषय है अधिक से अधिक लोगो को इसका लाभ मिले है शोध पेपर लिखने का प्रयोजन है यदि रोगीयो को लाभ मिलता है तो आप सभी के प्रतिसाद से मेरा प्रयास फल हो जायेगा यही मैं कहुंगा।

निष्कर्ष -

संगीत हमारी कोशिकाओ के भीतर गहरे मे रहता है और सहज ज्ञान के लिए एक सीधा रास्ता प्रदान करता है संगीत स्वर्ग और पृथ्वी के बीच मे एकुलिया है और हमारे अध्यात्मिक अमर को स्वयम के साथ हमारे मानव नश्वर शरीर को जोडता है संगीत के माध्यम से हम अनुभव प्राप्त करते है और अपने आपको ईश्वर से मिलाते है सरळ शब्द मे कही संगीत द्वारा हमे यह प्रेरणा मिलती है मुझे एक दिन है की हार व्यक्तीने संगीत के द्वारा दिल और आत्मा का अनुभव किया होगा संगीत साधरण चेतना मे बदलाव लागता है बदली स्थिती को भाव स्थिती कहते है संगीत हमे इस भाव स्थिती मे आने की अनुमती देता है इस भाव स्थिती मे स्थापित होने से हमे असीम लाभ होत आहे हमारी संवेदना मे व्यापकता और बौद्धिक सोच मे वृत्ती होती है अध्यात्मिक शक्ती जागृत होती है संगीत ने मुझे प्रेरित किया है और मेरे

जीवन मे कायम है कला संगीत और उपचार का त्रिकोणी संगम है पुराने में नया जोडने के लिए लच्चीला होने की जरुरत है यह लचिलापन खुलापन रचनात्मक और गहरी खुशी मेरे जीवन मे शायद संगीत का सबसे बडा उपहार है। मै संगीत के साथ हु।

संदर्भ -

1. संगीत चिकित्सा , डॉ.विजय तारे,हिंद पोकेट्स बुक
2. संगीत शास्त्र - डॉ . वसंत राजोपाध्ये
3. संगीताचे रस ग्रहण - पंडित राजोपाध्ये
4. कल्पना संगीत - गोविंद टेंभे ,जे,पी,नाईक,कोल्हापूर
5. गन्धर्व वेद - श्री वसंत माधव खाडिलकर ,श्री गंधर्व वेद प्रकाशन ,पुणे 1982

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No.36 Sept-Oct 2023

वर्तमान परिस्थितीत गुरू शिष्य परंपरेतील आवश्यकता

प्रा. चंद्रशेखर हि. मेंडोले
श्रीमती सु.रा.मोहता महिला महाविद्यालय, खामगाव, जिल्हा- बुलडाणा
Corresponding Author- प्रा. चंद्रशेखर हि. मेंडोले
ई मेल-mendole.chandrashekhar@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.10352907

प्रस्तावना-

ब्रिटीश भारतात येण्यापूर्वी भारताची शिक्षण व्यवस्था अशी होती की त्यावेळी भारतात एकही भिकारी नव्हता. एकही बेरोजगार नव्हता. कोणीही मुलभूत गरजांसाठी कोणावरही अवलंबून नव्हते. भारतात संपत्ती इतकी होती की युरोपच्या सगळया शहरांची संपत्ती एकत्रित केली, तरी ती भारताच्या एका (सुरत) शहरापेक्षा कमी होती. भारताची ही संपन्नता शिक्षण पद्धतीमुळे होती. त्यावेळी संपूर्ण भारत देश साक्षर होता. त्यावेळी भारतातील गुरूकुलांमध्ये १८ विषय शिकवले जायचे, असे अनेक ब्रिटिश गव्हर्नर तसेच अधिका-यांच्या अहवालातून स्पष्ट होते.

१६ व्या शतकात बर्निअर या फ्रेंच प्रवाशाने असे लिहिले होते की, भारत हा असा विशाल खडडा आहे की ज्यात चारही बाजूच्या मार्गानी सोने येऊन पडते, परंतु भारतातून सोने बाहेर जाण्याचा एकही मार्ग मला दिसला नाही. ही संपन्नता उत्तमदर्जाची शिक्षण पदधती असल्याशिवाय येऊ शकत नाही. भारतात दोनशे विदयार्थ्यापासून २०,००० विदयार्थ्यापर्यत गुरूकुल अस्तित्वात होते. या गुरूकुलांमधील शिक्षण 'मॉनिटरींग' पद्धतीचे होते. म्हणजे एक गुरूजी ५०-६० विदयार्थ्यांना शिकवायचे. ते ५०-६० विद्यार्थी पुन्हा ५०-६०, ५०-६० विद्यार्थ्यांना शिकवतील अशा पद्धतीची ही व्यवस्था होती. १९ व्या शतकात झालेल्या काही सर्वेक्षणावरून भारतीय शिक्षण पद्धती कशी होती याबाबतचा अंदाज आपल्याला येऊ शकतो. ब्रिटीश जेव्हा भारतावर राज्य करायला आले, तेव्हा सर्वप्रथम त्यांनी भारताच्या शिक्षण व्यवस्थेसंदर्भात काही सर्वे केले. सर्वेक्षणाचे अहवाल इंग्लंड, स्कॉटलंड आणि काही अंश भारतात ही उपलब्ध आहेत सर्वप्रथम बंगालवर शासन प्रस्थापित करतांना ब्रिटीशांच्या असे लक्षात आले की एकुण जमिनीच्या कर उत्पादक जमिनीपैकी ३४% जमिनीपासून कुठलाही कर वसुली केला जात नाही. ही जमीन गुरूकुलांना दिलेली आहे. इ.स.१८१८ मध्ये मराठ्यांचा पराभव केल्यानंतर जवळजवळ संपूर्ण भारतावर ब्रिटीशांचे राज्य प्रस्थापित झाले होते. त्यावेळी मद्रास प्रेसीडेंसीचा गव्हर्नर थॉमस मुन्रो हा होता. याने २५ जून १८२२ रोजी एक आदेश काढला. या अंतर्गत जिल्हा अधिका-यांना आदेश देण्यात आला की, गावातील शाळांचे अध्ययन करून अहवाल सादर करावे. या जिल्हाअधिका-यांनी पाठवेल्या अहवालांचे अध्ययन करायला त्याला 4 वर्ष लागले. 10 मार्च 1826 रोजी हा अहवाल सार्वजनिक करण्यात आला. याचे शीर्षक होते The early measures for education in the Madras Presidency- sir Thomas Munro's minute on education in 1822 and 1826 या अहवालात जनरल मुन्रो ने असे म्हटले आहे की, प्रेसीडेंसीच्या सर्व गावांमध्ये शाळा आहेत. या अहवालाच्या सातव्या अध्ययात जनरल मुन्रो असे लिहितो की, मद्रास प्रेसीडेंसीमध्ये शिक्षणाचा दर्जा इंग्लंडपेक्षा थोडा कमी परंतु युरोपातील बाकी देशांपेक्षा खुपच चांगला आहे. याच अहवालात असे लिहीले आहे की, प्रेसीडेंसीमध्ये १२,४९८ विदयालय आहेत. ज्यात १,८८,६५० विदयार्थी आहेत. याचवेळी बॉम्बे प्रेसीडेंसीचा गव्हर्नर माउंट स्टुअर्ड एलफिन्स्टन याने याच पद्धतीचे आदेश डेक्कनच्या कमिश्नरला व गुजरात आणि कोकणच्या जिल्हाअधिका-यांना दिले. १० मार्च १८२४ चे मुंबई सरकारचे गावांमधील शिक्षण व्यवस्थेच्या संदर्भातील एक पत्र आहे, त्यानुसार लहानमोठया सर्वच गावांमध्ये एक किंवा एकापेक्षा जास्त विद्यालय आहेत. याच काळात विलीयम ॲडमने बंगालमध्ये हे सर्वेक्षणाचे काम केले. विलीयम ॲडमने सन १८३५ ते १८३८ या काळात ३ अहवाल प्रस्तुत केले. आपल्या पहिल्या अहवालात ॲडम लिहितो की, बंगाल आणि बिहारमध्ये जवळपास १ लाख विद्यालय आहेत. या दोन्ही राज्यांची लोकसंख्या ४ कोटीच्या आसपास आहे. विलीयम ॲडमने ज्यांना विद्यालय म्हटले आहे ते मोठमोठे विद्यालय नाहीत. बहुतांश विद्यालय मंदिरामध्ये, मोकळया मैदानात, वडाच्या झाडाखाली व शिकवणा-या सरांच्या घरी भरतात. सर्व प्रकारची मुलभूत, प्राथमिक शिक्षण येथे

दिले जाते. यानंतर जवळपास ५० वर्षांनी संपूर्ण पंजाबवर ब्रिटिशांचे शासन प्रस्थापित झाल्यावर जी.डब्लू. लॅटनरने सर्वेक्षणाचे हे काम केले होते. त्यातील काही सर्वेक्षणाच्या अहवालाच्या आधारावर त्यांनी History of Indigenous Education in Panjab: Since Annexation and in 1882 यात लॅटनर काही खुप चांगल्या गोष्टी लिहितात. त्यांच्या मते भारतात विकेंद्रित शिक्षण पद्धती आहे. जवळपास प्रत्येक गावाचे स्वतःचे एक विद्यालय आहे, जे गावकरी चालवतात. या विद्यालयांना जमीन दिली आहे. ज्याच्या उत्पन्नावर विद्यालयांचा खर्च चालतो. लॅटनर पुढे लिहितात की, यातील ब-याच विद्यालयांचा दर्जा तर आपल्या ऑक्सफर्ड आणि केंब्रिज विदयापीठाच्या बरोबरीच्या आहे. शिक्षकांना चांगले वेतन दिले जाते. लॅटरने १८७०-१८७५ या काळात उत्तर पंजाबच्या होशियारपुर जिल्हयाचे सर्वेक्षण केले, जे पुस्तकाच्रूा रुपात उपलब्ध आहे. त्यात लॅटनरने लिहिले आहे की, या होशियारपुर जिल्हयाचा साक्षरता दर ८४% आहे. ब्रिटीशांच्या भारत सोडतेवेळी 1948 मध्ये केलेल्या सर्वेक्षणात हा दर ९% पर्यंत खाली आला होता. या काळात ब्रिटीशांनी गावच्या विद्यालयांना दिलेल्या जमिनी हडपल्या. विकेंद्रित शिक्षण पद्धती बंद केली. ईस्ट इंडिया कंपनीचे आणखी एक अधिकारी अलेक्झांडर वॉकर हे १० वर्षापेक्षा जास्त काळ भारतात राहिले. त्यांनी केरळ आणि मलबारमध्ये शिक्षण आणि साक्षरतेचे जे वातावरण पाहिले, त्याविषयी लिहून ठेवले आहे की, अत्यंत साध्या आणि नैसर्गिक संसाधनांनी भारतीयांनी आपल्या शिक्षणप्रणालीची रचना केली आहे.

भारत विज्ञान आणि अभियांत्रिकी यात किती प्रगत होता हे पुढील दोन उदाहरणावरून आपल्या लक्षात येते.

मेहरोली चा लोहस्तंभ्

हा लोह स्तंभ दिल्लीमध्ये कुतुब मिनार जवळील एक विशाल लोहस्तंभ आहे. हा स्तंभ प्राचीन भारतीय धातुविज्ञानाचे उन्नत रुप आहे. हा स्तंभ बहुदा राजा चंद्रगुप्त विक्रमादित्य यांनी बनवला असावा, परंतु काही विद्वानाचे असे मत आहे की यापूर्वीच निर्माण केला असावा. बहुदा इ.स.पूर्व ९१२ मध्ये, स्तंभाची उंची जवळपास ७ मीटर आहे आणि पूर्वी हिंदू आणि जैन मंदिराचा एक भाग होता. तेराव्या शतकात कुतुबुद्दीन ऐबकने मंदिर नष्ट करून कुतुब मिनार बांधले. लोहस्तंभामध्ये लोहाची मात्रा जवळपास ९८% आहे आणि आतापर्यंतही जंग लागला नाही. जवळपास १६०० पेक्षा अधिक वर्षांपासून हा मोकळया आकाशाखाली अनेक शतकापासून सर्व ऋतुंमध्ये अविचल उभा आहे. इतक्या वर्षामध्ये त्यात आजपर्यंत जंग लागला नाही. ही गोष्ट जगासाठी आश्चर्याचा विषय आहे. जोपर्यंत या स्तंभाच्या इतिहासाचा प्रश्न आहे हा चौथ्या शतकात बनला या स्तंभावर जे संस्कृतमध्ये कोरले आहे, त्यावरून हा ध्वज स्तंभाच्या रुपात उभारला होता. चंद्रराजद्वारे मथुरेत विष्णू पहाडीवर निर्मित भगवान विष्णूच्या मंदिरासमोर हा ध्वजस्तंभाच्या रुपात उभारला होता. यावर गरूड स्थापित करण्यासाठी बनवला गेला असावा. त्यामुळे याला गरुडस्तंभ ही म्हटले जाते. इ.स.१०५० मध्ये हा स्तंभ दिल्लीचे संस्थापक अनंगपालद्वारे आणला गेला. स्तंभाची उंची ७३५.५ से.मी. आहे. यातील ५० से.मी. जमिनीत आहे. ४५ से.मी चारही बाजूंनी दगडी ओटा आहे. या स्तंभाचा घेर खाली ४१.६ से.मी. आहे. तसेच वरती ३०.४ से.मी. आहे. यावर गरूडाची पूर्वी मूर्ती असावी. स्तंभाचे एकूण वजन ६०९६ कि.ग्रा.आहे १९६१ मध्ये याच्या रासायनिक परिक्षणातून लक्षात आले की, हा स्तंभ आश्चर्यकारक रूपात शुद्ध पोलादाचा बनला आहे. तसेच आजच्या पोलादाच्या तुलनेत यात कार्बनची मात्रा अत्यंत कमी आहे. भारतीय पुरातत्व विभागाचे मुख्य रसायन शास्त्रज्ञ डॉ. बी.बी.लाल या निष्कर्षावर आले आहे की, या स्तंभाची निर्मिती गरम लोहाचे २०-३० किलोचे तुकडे जोडून झाली आहे, असे मानले जाते की १२० कारागिरांनी रात्रंदिवस परिश्रम करून हा स्तंभ तयार केला. आजपासून १६०० वर्षांपूर्वी गरम लोहाचे तुकडे जोडण्याची कला ही आश्चर्याचा विषय आहे. कारण संपूर्ण लोहस्तंभात एकही जोड कुठेही दिसून येत नाही. १६०० वर्षांपासून उघडयावर राहूनही तो जसाच्या तसा उभा असल्यामुळे तज्ञाांना आश्चर्यचकीत केले आहे. यात फॉस्फरसची जास्त प्रमाण तसेच मॅगनीज कमी प्रमाणात आहे. स्लग अधिक प्रमाण एकटे किंवा सामूहिक रुपात जंग प्रतिरोधक क्षमता वाढवतात. या व्यतिरिक्त ५० मायक्रॉन जाड ऑक्साइडचा थर देखील स्तंभाला गंजण्यापासून वाचवते. इतिहासकारांनी मेहरोलीच्या लोहस्तंभाला सम्राट चंद्रगुप्त द्वितीयच्या काळातील सांगितले आहे आणि लोहस्तंभामध्ये वर्णित राजा चंद्रचा संबंध चंद्रगुप्तशी जोडला आहे. काही इतिहासकारांच्या मते त्या लोहस्तंभात जो लेख आहे तो गुप्त लेखांच्या शैलीतला आहे आणि काही म्हणतात की, चंद्रगुप्त द्वितीयच्या धनुर्धारी शिक्क्यांमध्ये एक स्तंभ दिसतो, ज्यावर गरुड आहे. पण तो स्तंभ कमी आणि राजदंड जास्त वाटतो. लोहस्तंभानुसार राजा चंद्रने वंग देशाचा पराभव केला होता आणि सप्तसिंधू नदयांच्या मुखाजवळ वलीला पराभूत केले होते. जेम्स फर्ग्युसनसारखे पाश्चात्य इतिहासकार मानतात की, हा लोहस्तंभ गुप्त वंशाच्या चंद्रगुप्त द्वितीयचा आहे. काही इतिहासकारांच्या मते, हा स्तंभ सम्राट अशोकाचा आहे, जो त्यांनी आपले आजोबा चंद्रगुप्त मौर्याच्या स्मृतीत बनवला होता.आजपासून जवळपास २००० वर्षांपूर्वी कावेरी नदीवर कलनई धरण बांधले गेले होते. जे आजही केवळ सुस्थितीतच नव्हे तर सिंचनाचे एक फार मोठे साधनही आहे. तामिळनाडूमध्ये तिरुचिरापल्ली जिल्हयात कावेरी नदीवर बनलेल्या कल्लनई धरणाचा इतिहास २००० वर्ष जुना आहे. हे धरण

ग्रैंड एनीकट या नावाने ही ओळखले जाते. हे केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वात जुन्या धरणांपैकी एक आहे. या धरणाची निर्मिती चोल काळात राजा करीकर चोलने केले होते. ज्यामुळे कावेरी नदीचा प्रवाह विभाजीत केल्या जाऊ शकेल. कावेरी नदीचा प्रवाह अत्यंत जलदगतीने वाहतो आणि पावसाळ्यात डेल्टा भागात पूर परिस्थिती निर्माण व्हायची, त्यामुळे या नदीवर धरण बांधले गेले, ज्यामुळे हे पाणी सिंचन कार्यासाठी वापरले जाईल. हे धरण जुने असले तरी आजही बरेच मजबूत आहे. तामिळनाडूमध्ये आजही सिंचन कार्यासाठी वापरले जात आहे. या धरणाला आपल्या निर्माण शैलीमुळे स्थापत्य आणि अभियांत्रिकीच्या उत्कृष्ट कौशल्याच्या रुपात पाहिले जाते. संपूर्ण जगासाठी हे एक प्रेरणास्त्रोत मानले जाते. पाण्याच्या तीव्र गतीमुळे या नदीवर कोणतेही निर्माण किंवा धरण टिकणे अत्यंत कठीण काम होते. त्यावेळच्या कारागिरांनी हे आव्हान स्वीकारले आणि नदीच्या तीव्र प्रवाहावर धरण बांधून दिले. जे २००० वर्षांपासून आजही जसेच्या तसे उभे आहे. चोल राजांनी केवळ धरणच बांधले नाही तर शेतक-यांच्या शेतीसाठी पाणी वापरता यावे म्हणून कालवे ही बांधले. धरण बांधतांना मोठ- मोठे दगड नदीत लावले गेले, ज्यामुळे नदीच्या प्रवाहाची दिशा बदलली. त्यावेळी हे धरण ३२९ मीटर लांब, २९ मीटर रूंद आणि ५४ मीटर उंच होते. या धरणामुळे ६९ हजार एकर क्षेत्रफळाचे सिंचन व्हायचे. प्रस्तुत शोध निबंधात आपण् संगीत कलेचे भारतीय ज्ञान परंपरेतील योगदान या विषयाची चर्चा करणार आहोत.

गुरू शिष्य परंपरा

आज ज्या काही मोजक्या विषयांमधून प्राचीन भारतीय शिक्षण प्रणालीचे अवशेष दिसून येतात, त्यात संगीत हा देखील एक विषय आहे. आजही संगीत विषयामध्ये जे कलाकार आपण पाहतो, ती गुरू शिष्य परंपरेची देणगी आहे. या परंपरेत परीक्षा, डिग्री यापेक्षा कला अवगत होण्याला महत्त्व आहे. एखादया शिष्याला जोपर्यंत एक गोष्ट अवगत होत नाही तो पर्यत त्याला पुढची गोष्ट शिकवली जात नाही म्हणजे शिक्षण हे विद्यार्थ्याच्या ग्रहण क्षमतेनुसार दिले जाते. उदा. एखादी गोष्ट एखादया विद्यार्थ्याला दोन महिन्यात अवगत होऊ शकते तर तीच गोष्ट दुस-या एखाद्याला अवगत होण्याकरिता सहा महिनेही लागू शकतात. विद्यार्थ्याला संगीत शिकवता शिकवताच नैतिक मुल्ये नकळत शिकवले जातात.

ब्रिटीश शिक्षण पद्धती व गुरुकुल पद्धतीतील फरक

ब्रिटीश शिक्षण पद्धती ही परीक्षा केंद्रित, डिग्री आधारित आहे. त्यामुळे या शिक्षण पद्धतीतून विद्यार्थी घडवण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. जसे एखादया वर्गात् ५० विद्यार्थी आहे, त्या सर्व विद्यार्थ्यांसाठी एकच अभ्यासक्रम एका निश्चित कालावधीसाठी केला जातो. सर्व विद्यार्थ्याना तो अभ्यासक्रम तेवढा कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक असतो. तो कालावधी पुर्ण झाल्यावर त्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन त्यांना पुढच्या वर्गात प्रवेश दिल्या जातो, त्यामुळे विद्यार्थी कला अवगत होण्याकडे लक्ष देत नाहीत. तर केवळ परीक्षा पास करण्याकरिता आपल्याला काय करता येईल या प्रयत्नात असतात. जसे अमरावती विदयापीठाच्या अभ्यासक्रमात बी.ए., एम.ए चे सर्व मिळून जवळपास ५० राग आहेत. तरी देखील एखादया एम.ए झालेला विद्यार्थी एक राग लोकांना आवडेल असा मंचावर गाऊ शकत नाही. या उलट गुरूकुल शिक्षण पद्धती ही परीक्षाकेंद्रित, डिग्री आधारित नसून विद्यार्थी केंद्रित ज्ञान आधारित असल्यामुळे यातून बाहेर पडणारे विद्यार्थी १००% यशस्वी होऊन बाहेर पडतात. गुरूकुल शिक्षण पद्धतीत विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम ठरवून दिल्या जात नाही किंवा विशिष्ट अभ्यासक्रम विशिष्ट कालावधीत पूर्ण करण्याची अटही नसते. प्रत्येक विद्यार्थी आपल्या ग्रहण क्षमतेनुसार ज्ञान प्राप्त करत असतो्. जसे संगीताच्या अभ्यासाची सुरूवात तंबो-यावर षड्जा अभ्यासाने केली जाते. जर दहा विद्यार्थी शिकत असतील तर प्रत्येक विद्यार्थ्यांचा षड्ज लागण्याचा कालावधी वेगवेगळा असेल. एखाद्याचा एक महिन्यातही सा चांगला लागू शकेल, कोणाचा दोन महिन्यातही लागणार नाही. कोणाला ४-६ महिने लागतील. एखाद्याचा काही केल्या लागणारच नाही त्यामूळे संगीत शिक्षणात पुढे जाण्याचा प्रत्येकाचा कालावधी वेगवेगळा असेल, परंतु शिक्षण पूर्ण झाल्यावर प्रत्येक विद्यार्थी हा एक चांगला कलाकार म्हणूनच बाहेर पडेल.

समारोप-

संगीत विषयाप्रमाणेच इतरही विषय याच पद्धतीने शिकवले गेले तर भारतात प्रत्येक विषयाचे तज्ञ तयार होतील. पूर्वी प्रमाणेच जीवनपयोगी विषय पुन्हा शिकवले गेले तर विद्यार्थ्यांना उपजीविकेसाठी भटकावे लागणार नाही. आपला देश पुन्हा पूर्वी प्रमाणे सोन्याचा महासागर होईल म्हणून भारतात पुन्हा गुरूकुल शिक्षण पद्धती अमलात आली पाहिजे. यासाठी प्रत्येकाने वैयक्तिक रित्या प्राणपणाला लावून प्रयत्न करणे गरजेचे आहे.

निष्कर्ष-

१) ब्रिटीश भारतात येण्यापूर्वी भारत सोन्याचा महासागर होता.

२) भारतीय शिक्षण पद्धती ही एखादया उतरंडीप्रमाणे होती.

३) ब्रिटिशांच्या सर्वेक्षणानुसार १८ व्या शतकापर्यंत भारतात अतिशय उत्तम प्रकारची शिक्षण व्यवस्था होती.

४) भारतात धातू विज्ञानाचे शिक्षण खूप उच्च कोटीचे होते

५) भारतात स्थापत्य आणि अभियांत्रिकीचे शिक्षण उत्तम प्रकारचे होते.

६) गुरूशिष्य परंपरेत विद्यार्थ्याला कला अवगत होण्यावर लक्ष दिले जाते.

७) ब्रिटीश शिक्षण पद्धती परीक्षा आधारित असल्यामुळे विद्यार्थी यशस्वी होण्याचे प्रमाण खूप कमी आहे.

८) गुरुकुल शिक्षण पद्धती ही ज्ञान आधारित असल्यामुळे व परीक्षेची अट वगैरे काही नसल्यामुळे यातून यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण १००% असते.

९) भारताला पुन्हा विश्व गुरू बनवण्यासाठी गुरूकुल शिक्षण पद्धती हाच एकमात्र पर्याय आहे.

संदर्भ ग्रंथ सूची -

1) The Beautiful Tree : Indigenous Indian Education on the Eighteen Century – Dharmpal
2) Education System in Pre-British India – Ram Swarup
3) A Report on the State of Eduacation in Bengal- William Adam
4) Impact of British Raj on the Education System in India: The Process of Modernization in the Princely States of India – The case of Mohindra college, Patiala – Kanika Bansal(2017)
5) The History of British India – james Mill(1948)
6) https://vbsamwad.co.in/how-britishers-demolished-developed-education-system-of-bharat-lets-know-1/
7) https://www.gkexams.com.cdn.ampproject.org
8) http://hindi.thebetterindia.com
9) संगीत विशारद

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No.36 Sept-Oct 2023

संत जनाबाईच्या अभंगातील विठ्ठल भक्ती

प्रा.पुरुषोत्तम एस. निर्मळ
श्री संत गजानन महाराज कला महाविद्यालय, बोरगाव मंजू, ता.जि. अकोला
Corresponding Author- प्रा.पुरुषोत्तम एस. निर्मळ
Email : psnirmal2608@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.10360466

सारांश-

महाराष्ट्रातील एक अतिशय महत्त्वाचा संप्रदाय म्हणून वारकरी संप्रदायाला ओळखले जाते. संत ज्ञानेश्वरांनी स्थापन केलेल्या वारकरी संप्रदायामध्ये समाजातील अठरा पगड जातीचे संत होऊन गेलेले दिसून येतात. वारकरी संप्रदायातील हे सर्व संत पंढरपुरच्या विठ्ठलाला आपले आराध्य दैवत मानतात. विठ्ठलाच्या नामस्मरणाने भक्तांचे कल्याण होते, भक्तावरील संकट निवारणाचे कार्य विठ्ठल करतो अशी वारकरी संप्रदायातील संतांची श्रद्धा आहे. ज्याप्रमाणे संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत गोरा कुंभार, संत नरहरी सोनार, संत सावता माळी इत्यादी अनेक संतांनी वारकरी संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार केला. त्याचप्रमाणे संत जनाबाई, कान्होपात्रा, वेणाबाई, मुक्ताबाई, बहिणाबाई, सोयराबाई इत्यादी स्त्री संतांनी सुद्धा वारकरी संप्रदायांमध्ये सामाजिक समता, स्त्री –पुरुष समानतेचा संदेश दिला.

नामयाची दासी म्हणून वारकरी संप्रदायात परिचित असणाऱ्या संत कवयित्री जनाबाई यांनी जवळजवळ साडेतीनशे अभंग रचले. त्यांच्या अभंगातून परमेश्वरावरील उत्कट भक्ती स्पष्ट होते. विठ्ठलाविषयीचा भक्तीभाव जनाबाईच्या अभंगामधून ओतप्रोत भरून आलेला दिसून येत असून कोमलता, सहनशीलता, त्यागी वृत्ती, आपुलकी, समर्पण वृत्ती, समता इत्यादी वैशिष्ट्ये त्यांच्या अभंगातून दिसून येतात.

नाम विठोबाचे घ्यावे । मग पाऊल टाकावे ।। पक्षी जाय दिगंतरा। बालकासी आणि चारा।। विठो माझा लेकुरवाळा । संगे लेकुरांचा मेळा ।। बाप रखुमाबाई वर। माझे निजाचं माहेर।। इत्यादी विविध अभंगातून संत जनाबाईची विठ्ठलावर असणारी श्रद्धा, भक्ती स्पष्ट होते.

बीज शब्द : जनाबाई, विठ्ठल, वारकरी संप्रदाय, संत, नामस्मरण, भक्ती, महात्म्य.

प्रस्तावना

महाराष्ट्रात जे विविध संप्रदाय निर्माण झालेले दिसून येतात त्यामध्ये संत ज्ञानेश्वरांनी स्थापन केलेल्या वारकरी संप्रदायाचा प्रभाव महाराष्ट्रातील समाजावर मोठ्य प्रमाणावर पडलेला दिसून येतो. वारकरी संप्रदायातील लोक पंढरपुरच्या विठ्ठलाला आपले आराध्य दैवत मानतात. वारकरी संप्रदायालाच भागवत संप्रदाय म्हणुनही ओळखले जाते. वारकरी संप्रदायामध्ये संत ज्ञानेश्वर, नामदेवासोबतच संत तुकारामांचे ही अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. वारकरी संप्रदायातील संतांनी मोठ्य प्रमाणात अभंग, काव्यरचना करून मराठी सारस्वतांची खऱ्या अर्थाने बाग फुलविली. त्यामध्ये मराठी संत कवयित्रींनीसुद्धा अभंग रचना करून मराठी संतवाङ्मय समृद्ध करण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली. त्यामध्ये 'नामयाची दासी' म्हणून प्रसिद्ध असलेल्या जनाबाईचे अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. संत नामदेवांना गुरुस्थानी मानणाऱ्या जनाबाईचा जन्म परभणी जिल्ह्यातील गोदाकाठच्या गंगाखेड या गावी दमा आणि कुरुंड या दांपत्याचे एकुलते एक अपत्य म्हणजे जनाबाई. या वारकरी संप्रदायातील एक श्रेष्ठ कवयित्री म्हणून सर्वश्रुत आहेत. संत कवयित्री जनाबाईच्या अभंगासंदर्भात डॉ. रेखा जगदाळे लिहितात, ''जनाबाईची अभंग रचना म्हणजे परिश्रमशील वृत्तीबरोबरच सहनशील, सात्विक, भोळे –भाबडे श्रद्धाळू व भक्तीमय अशा मनाचे भावपूष्प होय.''[१] वयाच्या पाचव्या– सहाव्या वर्षापासूनच जनाबाई संत नामदेवांच्या घरीच लहानाच्या मोठ्य झाल्या. धुणी–भांडी, सडा–सारवण, दळण– कांडण इत्यादी कामे करीत असतानाच विठ्ठल नामाचे नामस्मरण करू लागल्या.

विषय विवेचन

वारकरी संप्रदायामध्ये ज्या काही संत कवयित्री होऊन गेल्या त्यामध्ये प्रामुख्याने मुक्ताबाई, बहिणाबाई, वेणाबाई, सोयराबाई, कान्होपात्रा, जनाबाई इत्यादी संत कवियत्रींनी मराठी काव्याचा क्षेत्रात आपला भावनांना वाट मोकळी करून दिली. पंढरपुरच्या विठ्ठलाला आपले दैवत मानणाऱ्या वारकरी संप्रदायातील संतांनी विठ्ठलाचे नामस्मरण करून विठ्ठल भक्तीचे दर्शन आपल्या अभंगामधून घडविले. संत कवियत्री जनाबाई यांनी सुद्धा विठ्ठलाच्या नामस्मरणाचा जागर आपल्या अभंगामधून केला. संत जनाबाई आपल्या अभंगात म्हणतात,

नाम विठोबाचे घ्यावे। मग पाऊल टाकावे।।१।।
नाम तारक हे थोर। नामे तारिले अपार ।।२।।
अजामेळ उद्धारीला। चोखामेळा मुक्तीस नेला।।३।।
नाम दळणी कांडणी। म्हणे नामयाची जनी।।४।।

जनाबाईची विठ्ठलावर प्रचंड श्रद्धा आहे. विठ्ठलाशिवाय या जगात काहीच नाही. विठ्ठलाच्या नामस्मरणात मानवी जीवनाचे कल्याण आहे असे त्यांना वाटते म्हणून प्रत्येकाने कोणत्याही प्रसंगी पाऊल टाकण्याआधी विठ्ठलाचे नामस्मरण करावे. विठ्ठलाची भक्तीच मनुष्याचे जीवन सार्थक करू शकते. विठ्ठल हा प्रत्येकाला संकटातून तारणारा आहे. त्याने अनेकांना तारले असून अजामेळ, संत चोखामेळा यांची उदाहरणे देऊन दळण –कांडण करताना सुद्धा विठ्ठलाचे नामस्मरण करण्याचा उपदेश जनाबाई करतात. त्या आपल्या एका अभंगातून म्हणतात,

पक्षी जाय दिगंतरा। बालकासी आणि चारा।।१।।
घार हिंडते आकाशी। झाप घाली पिल्लापाशी।।२।।
माता गुंतली कामाशी। चित्त तिचे बाळापाशी।।३।।
वानर हिंडे झाडावरी। पिली बांधूनी उदरी।।४।।
तैसी आम्हासी विठ्ठलमाये। जनी वेळोवेळा पाहे।।५।।

संत जनाबाई विठ्ठलाचे महात्म्य वर्णन करताना सांगतात, पक्षी, घार, वानर, आई यांचे जसे आपल्या पिल्लांविषयी, मुलांविषयी प्रेम, जिव्हाळा, वासल्यभाव असतो तसाच जिव्हाळा आपले नामस्मरण करणाऱ्या भक्तांविषयी विठ्ठलाला असतो. आपल्या पिल्लांना चारा, अन्न आणण्याकरिता पक्षी घरट्यातून आकाशात उंच भरारी घेतो. यावरून पक्षाची आपल्या पिल्लांविषयी असणारी ममता, माया, स्पष्ट होते. घार आपल्या पिल्लांना सोडून आकाशात गेली तरी तिचे पूर्ण लक्ष आपल्या घरट्यातील पिल्लांकडे असते. आपल्याला पिल्लांच्या

पालनपोषणाची, संरक्षणाची जबाबदारी आपली आहे याची ती जाणीव ठेवते. आई घरात कामे करीत असताना तिचे लक्ष आपल्या लहान बाळाकडे केंद्रित झालेले असते. वानरीन आपल्या पिल्लाला पोटाला बांधून झाडावरील फांद्यांवर उड्या मारत असते. ज्याप्रमाणे पक्षी, घार, आई, वानर यांना आपल्या पिल्लांची काळजी असते, त्यांच्या संरक्षणाची, अन्न, पाण्याची काळजी असते त्याचप्रमाणे आपल्या भक्तांची काळजी विठ्ठलालाच असल्याचे जनाबाई सांगतात. म्हणून विठ्ठलाचे नामस्मरण हाच मानवमुक्तीचा मार्ग असल्याचे त्या सांगतात. संत जनाबाई लेकुरवाळ्या विठ्ठलाचे वर्णन करताना म्हणतात,

विठो माझा लेकुरवाळा । संगे लेकुरांचा मेळा।।१।।
निवृत्ती हा खांद्यावरी। सोपानाचा हात धरी।।२।।
पुढे चाले ज्ञानेश्वर। मागे मुक्ताई सुंदर।।३।।
गोरा कुंभार मांडीवरी। चोखा जीवा बरोबरी।।४।।
बंका कडीयेवरी । नामा करंगळी धरी।।५।।
जनी म्हणे गोपाळा। करी भक्तांचा सोहळा।।६।।

प्रस्तुत अभंगातील विठ्ठलाच्या भक्ती सोहळ्यासंदर्भात डॉ. शांताराम बुटे लिहितात, ''तेराव्या शतकातील विठ्ठलांचे आवडते निष्ठावंत भक्तगण असलेल्या समकालीन संतांचा सुंदर मेळा केला असून लेकुरवाळ्या विठ्ठलाचे भावस्पर्शी वर्णन केले आहे.''[२] वारकरी संप्रदायातील विठ्ठलाचे भक्त विठ्ठलाला माऊली मानतात. विविध समाजातील संत ही विठू माऊलीची लेकुरे असून ते सर्व संत समतेचा संदेश देतात. निवृत्ती, सोपान, मुक्ताबाई, गोरा कुंभार, चोखामेळा, जीवा आणि बंका ही विठू माऊलीची लेकुरे विठू माऊलीच्या अंगाखांद्यावर खेळत आहेत. विठू माऊलीने निवृत्तीनाथांना खांद्यावर घेतले असून सोपानदेवांचा हात धरलेला आहे. संत ज्ञानेश्वर हे पुढे चालत असून मुक्ताबाई मागे चालत आहे. तर संत गोरा कुंभार विठू माऊलीच्या मांडीवर बसलेले असून चोखोबा, जीवा त्यांच्यासोबत आहेत. बंका विठू माऊलीच्या कडेवर असून संत नामदेवांनी विठू माऊलीची करंगळी धरून मार्गक्रमण करीत आहे. अशी ही विठू माऊलीची आवडती लेकुरे माऊलीच्या अंगाखांद्यावर खेळून आनंद सोहळा साजरा करतात. त्यांच्यामध्ये कोणताही भेदभाव नाही. समानता हेच त्यांचे जीवनमूल्य आहे. पंढरपुरच्या विठ्ठलाची महती वर्णन करताना जनाबाई म्हणतात,

बाप रखुमाबाई वर। माझे निजाचं माहेर।१।।
ते हे जाणा पंढरपूर। जग मुक्तीचे माहेर।।२।।
तेथे मुक्ती नाही म्हणे। जनी न पाहे त्याचे वदन।।३।।

स्वत:चे घरदार नसलेल्या जनाबाईचा विवाह झालेला नसल्यामुळे त्यांना पंढरपूर हेच आपले माहेर वाटते. जगातून मुक्ती मिळविण्याचे पंढरपूर हेच पवित्र स्थळ आहे. तेथे मुक्ती नाही असे जर कोणी म्हणत असेल तर त्या व्यक्तीचे मी तोंड सुद्धा पाहणार नाही असे जनाबाई म्हणतात. जनाबाईला आपल्या मात्या पित्याचा सहवास लाभलाच नाही. संत जनाबाई नामदेवांच्या घरी राहूनच सेवाकर्मे करीत राहिल्या. सर्व प्रकारची घरगुती कामे करीत असताना त्यांना कुठेही कमीपणा वाटला नाही. डॉ तारा भवाळकर लिहितात, ''त्यावेळीच्या सर्वसामान्य स्त्रीप्रमाणे सडा–सावरण, धुणी– भांडी, दळण–कांडन, पाणी वाहणे, शेणी वेचणे, गवऱ्या थापणे, ही सगळी अंग मेहनतीची कामे तिला करावी लागतच होती. पण तिच्यावर खऱ्या अर्थाने माया करणारे कोणी नसावे असे वाटण्याजोगी वर्णने तिच्या अभंगातून दिसतात. सगळ्या कष्टाच्या कामात पंढरीचा पांडुरंग एकटा तिला मदत करताना दिसतो.''[३]

संत जनाबाई ह्या विठ्ठलाच्या निष्ठावंत भक्त असतात. विठ्ठलाचे महात्म्य, विठ्ठल भक्ती त्यांच्या अभंगामधून मोठ्या प्रमाणावर आलेली दिसून येते.

निष्कर्ष

१. वारकरी संप्रदायातील संत विठू माऊलीला आपले दैवत मानतात.
२. भक्तांवरील संकट निवारण्याचे कार्य विठू माऊली करतात असे संत जनाबाई सांगतात.
३. संत जनाबाईच्या अभंगातून वारकरी संप्रदायातील समतेचे तत्त्व अधोरेखित होते.
४. संत जनाबाईच्या अभंगातून वारकरी संप्रदायातील संतांची विठू माऊलीवरील श्रद्धा स्पष्ट होते.
५. विठू माऊलीच्या नामस्मरणामुळे मानवी जीवन सार्थक होते असे जनाबाई सांगतात.

संदर्भ ग्रंथसूची

१. जगनाळे डॉ. रेखा, 'संत कवयित्री जनाबाई काव्य दर्शन', विजय प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, २८ ऑक्टोबर २००९, पृष्ठ १
२. बुटे डॉ. शांताराम गोवर्धन, 'संतांची अभंगवाणी', सुनंदा प्रकाशन, अकोला, आवृत्ती पहिली, २३ मार्च २००८, पृष्ठ ७१
३. भवाळकर, डॉ. तारा, 'लोकपरंपरा आणि स्त्री प्रतिभा', लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई, तिसरी आवृत्ती, २००८, पृष्ठ १७६

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No. 36 Sept-Oct 2023

भरड धान्याचे पोषण विषयक महत्त्व आणि आहारातील स्थान

डॉ. मीनल एन.गावंडे
गृह अर्थशास्त्र विभागप्रमुख,
स्व. भास्करराव शिंगणे कला, प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान आणि आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालय
साखरखेर्डा, जिल्हा बुलडाणा.
Corresponding Author- डॉ. मीनल एन.गावंडे
DOI- 10.5281/zenodo.10369426

प्रस्तावना -

संयुक्त राष्ट्राने 2023 हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष घोषित केले आहे. विविध स्तरावर आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष साजरे केले जात आहे. कुपोषण समस्या व पोषणमूल्य सुधारण्यासाठी तृणधान्ये चा आहारात वापर पुन्हा एकदा वाढविणे, त्यांच्या उपयुक्ततेबाबत समाजात जनजागृती करणे अत्यंत जरुरीचे आहे. तृणधान्याचा आहारात समावेश आरोग्यासाठी गरजेचा आहे ही बाब नागरिकांना विविध उपक्रमांच्या माध्यमातून पटवून देण्यात येत आहे.

नवीन पिढीच्या व लहान मुलांच्या आवडीचे पदार्थ जसे की, ब्रेड, बिस्किट, केक, इडली, डोसा, चकली इत्यादी पदार्थ पौष्टिक तृणधान्यावर प्रक्रिया करुन बनविता येतात. असे पदार्थ बनवून त्यांचा आहारात सामावेश वाढविणे आवश्यक आहे. त्यास तृणधान्य वर्षाच्या निमित्ताने मदत होईलच. भारताने 2023 हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरे करण्याचे उचललेले पाऊल हे भारताच्याच नव्हे तर, सर्व जगाच्या पोषण आणि आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे.

आरोग्य आणि पोषणदृष्ट्या भरड धान्यांचे महत्त्व-

भरड धान्य म्हणजे गहू आणि तांदूळ व्यतिरिक्त इतर अन्नधान्ये . ही धान्ये उबदार हंगामातील तृणधान्ये आहेत जी जगाच्या विविध भागांमध्ये त्यांच्या अन्न, खाद्य आणि चारा वापरासाठी महत्त्वपूर्ण आहे. बाजरी हा कॅल्शियमचा सर्वात श्रीमंत स्त्रोत आहे (300 ते 350 मिग्रॅ/100 ग्रॅम धान्य). लहान बाजरी फॉफरस आणि लोहाचा चांगला स्त्रोत आहे. या पौष्टिक गुणधर्मांमुळे ही भरड तृणधान्ये उशिरापर्यंत पोषक तृणधान्ये म्हणूनही नियुक्त केली गेली आहेत. ते यौगिकांनी समृद्ध आहेत जे इस्केमिक स्ट्रोक, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग, कर्करोग, लठ्ठपणा आणि मधुमेह सारख्या अनेक जुनाट आजारांवर मदत करतात. सिस्टिन आणि लाइसिनचे चांगले स्त्रोत असलेल्या प्रथिनांच्या उच्च पातळीमुळे ते पौष्टिकदृष्ट्या तुलनात्मक किंवा गहू आणि तांदूळ सारख्या प्रमुख अन्नधान्यांपेक्षा श्रेष्ठ आहे.

भरड तृणधान्ये दीर्घकाळापासून गरीब माणसाची पिके म्हणून ओळखली जात आहेत, अन्न व्यवस्थेतील त्यांच्या योग्य स्थानाच्या संदर्भात ते दुर्लक्षित राहिले आहेत. या भरड धान्यांच्या पौष्टिक आणि आरोग्याच्या पैलूंबद्दल आणि त्यापासून तयार केल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांबद्दल वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेले ज्ञान ग्रामीण व गरजू लोकापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.

तृणधान्य सेवनाचे अनेक फायदे आहेत.भारत हा जगातील सर्वात मोठा पौष्टिक तृणधान्य उत्पादक देश आहे. आजकालची तरुण पिढी आरोग्यदायी खाणे व राहणे यावर लक्ष केंद्रित करत आहे. तृणधान्यामध्ये मोठ्या प्रमाणावर तंतुमय पदार्थ असल्यामुळे याकडे लोकं 'सुपरफूड' म्हणून पाहू लागले आहेत. बदलत्या जीवनशैलीत आहाराकडे होत असलेले दुर्लक्ष आणि त्यामुळे उद्भवणाऱ्या आजारांवर मात करण्यासाठी तृणधान्याचा आहारात समावेश करणे ही काळाची गरज आहे. ज्वारी, बाजरी, नाचणी, वरई, राळा, राजगिरा यासारखे पौष्टिक तृणधान्ये ही कर्बोदके, प्रथिने, जीवनसत्त्व आणि खनिजांनी समृद्ध आहेत.या निमित्ताने पौष्टिक तृणधान्याचा आहारातील वापर वाढेल .

विविध तृणधान्यांचे पोषणमूल्य -

ज्वारी : रक्तातील सारखेची पातळी नियंत्रित करते. रक्ताभिसरण वाढवते. ज्वारी वजन कमी करण्यास मदत करते. हाडांच्या आरोग्यासाठी ज्वारी उपयुक्त ठरते. शरीरातील ऊर्जा पातळी सुधारते. तसेच हृदयाचे आरोग्यही ज्वारीमुळे सुधारते.

बाजरी : बाजरीमध्ये कॅल्शियम, विटामिन A, B व फॉस्फरस, लोह, मँगेनीज अधिक मात्रेत उपलब्ध असते. रक्तातील मेदाचे प्रमाण नियंत्रित, रक्तदाबावर नियंत्रण, हिमोग्लोबिन वाढवण्यासाठी व ॲनेमिया आजारावर मात करण्यासाठी बाजरी उपयुक्त आहे.

नाचणी : शक्तीवर्धक, पित्तशामक असल्याने नाचणी रक्त शुद्ध करण्यास उपयुक्त आहे. कॅल्शियम आणि लोह मुबलक असल्याने गरोदर माता व वयोवृद्ध व्यक्तींना हाडांसाठी व

ॲनिमियावर नाचणीचे पदार्थ उपयोगी ठरतात. नाचणीमुळे लठ्ठपणा कमी करणे, मधुमेही रुग्णांसाठी गुणकारी, यकृतातील चरबी कमी करण्यास मदत होते.

राळा : यामध्ये लोहाचे प्रमाण जास्त असल्याने मेंदूची कार्यक्षमता वाढवते. त्यातील अँटीऑक्सिडन्ट हा गुणधर्म रोगप्रतिकारक शक्ती वाढवतो. मोड आलेले राळा खाल्ल्यास हाडांचा ठिसूळपणा कमी होऊन हाडे बळकट होतात. तसेच अर्धशिशी, निद्रानाश, कॉलरा, ताप यांच्या उपचार पद्धतीमध्ये राळ्याचा प्रामुख्याने वापर होतो.

वरई : नवजात शिशु, बालक आणि माता यांच्यासाठी उत्तम पोषकधान्य आहे. सदृढ आरोग्य व रोगप्रतिकार क्षमता वाढविण्यास वरई उपयुक्त आहे. वरई मधुमेह, ह्रदयरोग यासारख्या रोगांचा धोका कमी करते.

गहू : जगातील प्रत्येक देशात खाद्यान्न म्हणून गव्हाचा उपयोग केला जातो. गावातील प्रथिनांमध्ये लायसन व थ्री नाईन ही तीक्तामुळे उपस्थित नसतात डाळिंब बरोबर त्याचा उपयोग केल्यास चांगल्या प्रतीची प्रथिने प्राप्त होतात गावांमध्ये पिष्टमय पदार्थाच्या स्वरूपात कर्बोदके असतात स्निग्ध पदार्थांचे प्रमाण अतिशय कमी असते गावामध्ये टायमिंग व निकोटीनेक आम्ल असते. गव्हाच्या कोंड्यामध्ये जीवनसत्वे खनिज पदार्थ व सेलूच भरपूर प्रमाणात असतात व गव्हाच्या कोंबात जीवनसत्व ई असते.

तांदूळ : गव्हाच्या बरोबरीने तांदूळ आहारातील महत्त्वाचे तृणधान्य आहे जगातील जवळपास 50 टक्के लोक मुख्य अन्न म्हणून तांदळाचा वापर करतात. प्रथिनांचा दर्जा उत्तम असतो तसेच पिष्टमय पदार्थाच्या रूपात ह्यामध्ये कर्बोदके आढळतात. तांदुळात जीवनसत्व ब चे प्रमाण भरपूर असते तांदुळाचा विविध खाद्यपदार्थ बनविण्यासाठी उपयोग केला जातो.

मका : भारतात प्रामुख्याने गुजरात आणि राजस्थान या राज्यांमध्ये मक्याचा आहारात उपयोग केला जातो मक्यामध्ये जीवनसत्व अ चा पूर्वसर असतो. कॅल्शियम लोह फॉस्फरस अल्प प्रमाणात असतात मग का हा पचनाच्या दृष्टीने कठीण समजला जातो . यात इतर तृणधान्यांपेक्षा स्निग्धाचे प्रमाण जास्त आढळते.

भारतीय आहारामध्ये भरड धान्याचा वापर वाढविण्यासाठी-

भारतीय आहारात पंरपरेने भरड धान्यांना महत्त्वाचे स्थान आहे. पारंपरिक स्वयंपाकाच्या पद्धती व्यतिरिक्त भरडधान्ये प्रामुख्याने लहान बालक तसेच मोठ्या माणसांसाठी मुख्य अन्न म्हणून जास्त प्रमाणात वापरली जातात. ज्वारीची भाकरी, थालीपीठ, धपाटे, उपमा, खानदेशात कळण्याच्या पिठाची भाकरी (ज्वारी व उडीद एकत्र दळून केलेले पीठ), ज्वारीचे पापड, बिबडे, लाह्या, लाह्यांच्या जाडसर पिठाचे गोड पदार्थ, ज्वारी पीठ आंबवून केलेले धिरडे असे अनेक पारंपरिक पदार्थ आवर्जून आवडीने तयार केले जातात.

- तांदूळ किंवा गव्हाचे प्रमाण कमी करून भरडधान्याचा वापर वाढवावा. सुरुवातीला अर्धे तांदूळ आणि भरडधान्यातील कोणताही प्रकार अर्धा भाग घ्यावा.
- डोसा पीठ बनविताना पूर्ण तांदूळ घेण्याऐवजी काही प्रमाणात भरडधान्यांचा वापर करावा.
- पुलाव तयार करताना तांदळासोबतच आवडीप्रमाणे कोणत्याही एका भरडधान्याचा वापर करून त्यामध्ये भरपूर भाज्या मिसळाव्यात.
- गुळाचा उपयोग करून भरड धान्याच्या पुऱ्या, शंकरपाळे, शेवया, नूडल्स बनवितात.
- बेकरी पदार्थात भरडधान्याचा वापर करावा. त्यावर मनुके, ब्राऊन शुगर किंवा सुकामेवा टाकून लज्जत वाढवावी.
- शिजवलेल्या शेंगा आणि मटार एकत्र करून शाकाहारी 'बर्गर' बनवतात. मका, बटाटा, ब्रेड आणि भरड धान्यांचा वापर करून टिक्कीचा आकार बनवावा. तव्यावर थोड्याशा तेलावर चांगले खरपूस भाजून घ्यावे.
- आपल्या आवडीचे कोणतेही भरड धान्य स्वच्छ धुवावे. थोडा वेळ पाण्यात भिजवावे. कुकरमध्ये वाफवून फोडणी द्यावी. याचा चांगला पौष्टिक नाश्ता तयार होतो.

भारताने संयुक्त राष्ट्रांमध्ये दिलेल्या प्रस्तावाला ७२ देशांनी पाठिंबा दिल्यानंतर युनायटेड नेशनने २०२३ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष' म्हणून घोषित केले आहे त्यामुळे भरड धान्यांचे आहारातील महत्त्व जाणून घेऊन त्यांचा वापर दैनंदिन आहारामध्ये होणे अत्यंत आवश्यक आहे. यांच्या सेवनाने शरीरातील रोगप्रतिकार शक्ती अधिक वाढते. ऊर्जा व पोषण देणाऱ्या भरड धान्यांपासून मिळणारे आरोग्यसंबंधीचे फायदे खूप असल्याने त्याविषयी जनजागृती होऊन पिकाखालील क्षेत्र वाढणे आवश्यक आहे.

संदर्भ:

1. मानवी पोषण आणि आहारशास्त्र - डॉ. संगीता जवंजाळ डॉ. किरण बेलूरकर
2. पोषण आणि स्वास्थ - डॉ. मीनाक्षी तारणेकर
3. Fundamentals of Foods and Nutrition: Sumati R. Mudambi, M.V. Rajagopal

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No.36 Sept-Oct 2023

वामन दादा कर्डक यांची कविता

डॉ. सागर गवई
स्व. भा. शिं. कला, प्रा. ना. गा. विज्ञान व आ. गा. वाणिज्य महाविद्यालय साखरखेर्डा
Corresponding Author- डॉ. सागर गवई
DOI- 10.5281/zenodo.10360499

आंबेडकरी चळवळीतला माणूस वा सर्वसामान्य माणूस असो ज्याचे बाबासाहेबांवर अपार प्रेम, निस्सीम श्रद्धा आहे अशा मराठी माणसाला महाकवी वामनदादा कर्डक यांचे नाव माहिती नाही असे होत नाही. याचे कारण वामनदादांनी लिहिलेली अवीट गोडीची आवेशकारक भीमगीते आणि आंबेडकरी चळवळीची गीते ! वामनदादा कर्डकांची भीमगीते आंबेडकर जयंतीचा अविभाज्य घटक झालीत. ही गीते सामान्य माणसाच्या मनाला भावलीत. नुकतेच मिसरूड फुटलेल्या मुलांपासून ते संघर्षमय जीवनाचा अखेरचा काळ व्यतित करणारे वृद्ध असोत, सर्वांना ही गाणी तोंडपाठ आहेत. वामनदादांनी लिहिलेल्या गाण्यात असे कोणते रसायन आहे की ज्याने माणसाचे रुपांतर भीमसैनिकात होते हे पाहण्यासाठी त्यांच्या गीतांवरून नुसती नजर फिरवली तरी ध्यानी येते की ही लोकांची बोली आहे, हा लोकांचा आवाज आहे,

हा लोकांच्या डोळ्यातला तप्त अंगार आहे, हा निळ्या क्रांतीचा एल्गार आहे, हा जल्लोषही आहे अन वेदनेचा हुंकारही आहे, हा मनामनात दफन केलेल्या उपेक्षेचा आक्रोश आहे, हा धगधगत्या अग्नीकुंडाचा निखारा आहे आणि हा आंबेडकरी जनतेचा बुलंद नारा आहे ! वामनदादा कर्डक आपल्या कविता मागची भूमिका स्पष्ट करतांना म्हणतात, " मी जेथे जन्मलो, ज्या मातीत वाढलो आणि ज्या अन्यायाखाली भरडला गेलो त्याची मला आठवण आहे. ती कैफियत मी शब्दात मांडतो. त्याला तुम्ही कविता म्हणा किंवा म्हणू नका, मला जे प्रामाणिकपणे जाणवले ते मांडले." त्यांची बाबासाहेबांच्या विचारावर असीम श्रद्धा आहे. त्यांच्या नेतृत्वावर त्यांचा विश्वास आहे. त्यांनी दलितांवर होणाऱ्या अन्याय अत्याचार विरुद्ध त्यांच्या मनात जळजळीत अंगार पेटावा यासाठी ते म्हणतात,

"तुफानातले दिवे आम्ही तुफानातले दिवे
तुफानवारा पाऊसधारा मूळी न आम्हा शिवे"
(आम्ही तुफानातले दिवे , पृ. क्र.३७)

अशा शब्दात ते आपली व आंबेडकरी समाजाची ओळख करून देतात. क्रांतीचे गीते उच्च स्वरात गाणारा हा कवी आहे. स्वतंत्र भारतात दलित जमातीवर होणाऱ्या गावोगावच्या अत्याचाराच्या कथा त्यांना सुन्न करतात. त्या अत्याचाराविरुद्ध दलित मन चिडत का नाही, पेटून उठत का नाही याची खंत त्यांच्या मनात आहे. त्यांची कविता म्हणजे त्यांच्या मनात ठसठसत असलेले दुख; त्यांची कविता म्हणजे त्यांच्या संवेदनशील मनाचे आवेग! ते म्हणतात,

" मला चीड येत नाही हाच माझा गुन्हा
माझ्यातला भीम इथे, मीच केला उणा,
दोष देऊ कुणा"
(मला चीड येत नाही, पृ. क्र.३३)

कड्कांच्या कवितेतील हे दुख: बाबासाहेब निधन पावल्यानंतर दलित समाजाला जाणवणाऱ्या पोरकेपणाचे आहे. कड्कांचे कवी मन बाबासाहेबंविषयी कृतज्ञतेने भरलेले आहे.

"जरी संकटाची काळरात होती
तरी भीमराया तुझी साथ होती
तुझी तेवण्याची सुरूवात होती,
प्रकाशात माझी पिढी न्हात होती"
(काळरात होती, पृ. क्र. ६२)

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले आयुष्य पददलित जनतेच्या उद्धारासाठी

वेचले. त्यांचा सारा जीवनप्रवास त्यांनी दलितांच्या व वंचितांच्यासाठी केलेल्या संघर्षाची साक्ष देतो. उपेक्षितांच्या हक्कासाठी त्यांनी आपलं आयुष्य एका लढ्यात परावर्तित केलं. त्यांच्या संघर्षाला यश आलं म्हणून गावकुसाबाहेर अडगळीत पडलेल्या अस्पृश्य म्हणून हिणवल्या गेलेल्या लोकांत त्यांनी आत्मविश्वास जागवला. हजारो वर्षे जातीयतेच्या गाळात आणि दारिद्र्यांत खितपत पडलेल्या समाजाला स्वतःचे अस्तित्व आणि अस्मिता याची प्रथमच जाणीव झाली. बाबासाहेबांच्या प्रेरणेतून पिचलेल्या मनगटात ताकद कशी येत गेली हे काळाला देखील कळले नाही. कणाहीन समाज कधी ताठ उभा राहिला आणि आपल्या वेदनेचे हुंकार मागे टाकून आपल्या हक्काचा टणत्कार कधी बुलंद करू लागला हे लक्षात देखील आले नाही. मात्र समाजबांधवांच्या ठायी हा प्रकाश निर्माण व्हावा म्हणून त्यांनी स्वतःला पेटते ठेवले होते, याचे हळुवार वर्णन 'तुझी तेवण्याची सुरूवात होती' अशा ओजस्वी शब्दांत वामनदादा कर्डक करतात.

गेयता हे वामनदादांच्या कवितेचे नैसर्गिक आणि रसाळ अंग होते. त्यांच्या क्रांतिकारी कवितांना नादमाधुर्याची अद्‌भुत देणगी लाभली होती. मग ही कविता त्याला कशी अपवाद असू शकेल बरे ? वामनदादा सर्वसामान्य दलितांची कैफियत मांडताना सर्वांना एकाच पंक्तीत मांडतात, 'आपली मोजदादच मुळी गुलामात होती अन 'आहे रे' वर्गाला सलाम ठोकण्यात सारी हयात गेली होती !' मात्र केवळ आपल्या पायात असणाऱ्याच नव्हे तर मनामनात वास करून असणारया गुलामगिरीच्या बेडया तोडणे केवळ बाबासाहेबांच्यामुळे शक्य झाले असं ते सहजतेने लिहून जातात. या गुलामगिरीच्या बेड्या तोडण्याचे काम करणारे बाबासाहेब हे झुंजणारया जमातीचे अग्रदूत होते. बाबासाहेबांच्या रूपाने हजारो वर्षांपासून विषमतेच्या अंधारात खितपत पडलेल्या दिनदलितांच्या आयुष्यात नवी पहाट उगवली आणि विकासाची वाट या उपेक्षित जनतेच्या दृष्टीपथात आली.आंबेडकरांनी आपल्या करंगळीला धरून अख्खा समाज ह्या पायवाटेवर आणला अन बघता बघता ह्या पायवाटेचे रुपांतर विकासाच्या विशाल महामार्गात झाले याचा काव्यमय उल्लेख वामनदादा इथे करतात.

"चांदण्याची छाया कापराची काया
चांदण्याची छाया कापराची काया
माऊलीची माया होता माझा भीमराया.."
(चांदण्याची छाया, पृ. क्र.४४)

बाबासाहेब आणि त्यांना प्राणाहून प्रिय मानणाऱ्या आंबेडकरी जनतेचे नाते कसे आहे, त्यांचे हळुवार भावनाप्रधान असं वर्णन या कवितेत आहे. याशिवाय आपला हक्क मागणारी 'आमचा वाटा' या कविता त्यांनी लिहिली. तिला चळवळीत गायले जाऊं लागले. 'आमचा वाटा' ह्या कवितेला ठेका आहे ताल आहे आणि त्यातलं मागणं हे आर्जवाचं नसून हक्काचं आहे त्यामुळे गाणाऱ्याच्या आवाजात रग आणि मनात त्वेष साहजिकच उत्पन्न होतो.

"सांगा आम्हाला बिर्ला बाटा टाटा कुठाय हो?
सांगा धनाचा साठा आमचा वाटा कुठाय हो?"
(आमचा वाटा पृ. क्र. ५२)

असा धगधगता सवाल ते या व्यवस्थेला विचारतात. आंबेडकरी चळवळीत देखील मतभेद होऊ लागले तेंव्हा वामनदादांना राहवले नाही आणि त्यांनी एक अत्यंत तेजस्वी कविता लिहिली. त्यात ते म्हणतात की बाबासाहेबांच्या मताचे मोजके लोक जरी सोबत असते तरी इतिहास बदलला असता.

"भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते
तलवारीचे तयाचे न्यारेच टोक असते.
वाणीत भीम आहे, करणीत भीम असता
वर्तन तुझ्या पिलांचे सारेच चोख असते."
(भीमा तुझ्या मताचे पृ. क्र. ४८)

बाबासाहेबांना उद्देशून वामनदादा लिहिलेली कविता वेगळया धाटणीची आहे, बाबासाहेबांवर प्रेम करणाऱ्या व्यक्तीच्या डोळयात पाणी आणण्याचे सामर्थ्य ह्या कवितेत आहे, यावरून बाबासाहेबांचे जनमनातील अढळ स्थान लक्षात येण्यास मदत होते. बाबासाहेबांनी इतकं सारं सांगूनही शिकवूनही बधीर समाजमन भानावर येत नाही या भावनेने चिडलेले वामनदादा आपल्या कवितेतून आंबेडकरी चळवळीत अद्‌भुत जोश भरतात. अन्याय नष्ट करा अन त्याच्या चिंधड्या उडवा असं आवाहन ते करतात. नराधमांच्या तंगड्या तोडा असं त्वेषाचं बळ ते देतात.

"अन्यायाची चिरा चाम्बडी, चिरा
करा चिंधड्या
चिरा करा चिंधड्या नाही तर भरा
हाती बांगड्या"
(भरा हाती बांगड्या, पृ. क्र. ९०)

वामनदादा कर्डक नित्य वापराच्या शब्दांतून अर्थवाही कविता लिहितात. शब्दलालित्य, छंद वा कृत्रिम काव्यसौंदर्य यावर अजिबात भर न देता दैनंदिन जीवनातील शब्द ते कवितेत वापरत. त्यामुळे त्यांची कविता शब्दबंबाळ वा केवळ शब्दप्रचुर न होता एका जीवनानुभावाचे स्वरूप घेते.आपल्याला जाण कधी आली अन आपल्याला जीवन कधी - कसे कळू लागले याचे रसाळ वर्णन त्यांनी केले आहे,

"केस माझे हे जेव्हा गळू लागले
तेव्हा जीवन मला हे कळू लागले
जात होतो पुढे जात होतो पुढे
ह्यात होतो पुढे त्यात होतो पुढे
पाय त्यांचेच मागे वळू लागले
तेव्हा जीवन मला हे कळू लागले"
(तेव्हा जीवन कळू लागले, पृ. क्र.४१)

अशा शब्दात त्यांना आलेला जीवनाचा प्रत्यय त्यांनी शब्दबद्ध केला आहे. एक काळ होता जेंव्हा समाजात पराकोटीची विषमता होती, अस्पृश्यता पाळली जात होती. दारिद्र्य अन दास्यत्वाच्या अंधःकारात दलित समाज हजारो वर्षे खितपत पडला होता. काळीज पिळवटून टाकणाऱ्या या सामाजिक विषमतेचं तितकंच टोकदार वर्णन कर्डकांनीआपल्या कवितेत केले आहे,

"पाणी वाढ गं माय
लयी नाही मागत भर माझं
इवलंसं गाडगं,
पाणी वाढ गं माय"
(पाणी वाढ ग माय, पृ. क्र. ५३)

या गीतांतून त्यानी आपली व्यथा अशा पद्धतीने मांडली आहे की, वाचणाऱ्याच्या डोळा पाणी यावे. समाजात एकी न ठेवता आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी दुही वाजवून आंबेडकरी विचारांची प्रतारणा करणाऱ्या लोकांवर ते सर्वशक्तिनिशी शब्दांचा आसूड चालवतात. बाबासाहेबांनी दिन दलितांच्या उद्धारासाठी आपले आयुष्य वेचले मात्र त्यांच्या विचारांचे वारसदार म्हणवून घेणाऱ्यांनी स्वतःच्या स्वार्थापायी या आंबेडकरी क्रांतीच्या तटबंदीस सुरुंग लावला. अत्यंतिक वेदनेतून ही कविता प्रसवली आहे त्यामुळे तिचा आशय अर्थातच अणकुचीदार झाला आहे. ते लोकांना चळवळीत सामील होण्यासाठी ते आवाहन करतात. बधीर झालेल्या मनाला हलवून टाकण्याचे सामर्थ्य या कवितेत आहे. क्रांतीसाठी काय काय करावे लागणार आहे याचे अप्रत्यक्ष कथन त्यांनी केले.

आंबेडकरी क्रांती घडण्यासाठी सगळयांनी मिळून लढा उभारणे गरजेचे आहे त्यात सर्वस्व झोकून काम करावे लागणार आहे , तर ती क्रांती शक्य होणार आहे. सारेच जण असं वागले अन ही क्रांती यशस्वी झाली तर समाजात काय चित्र तयार होईल याचे खुमासदार पण स्वाभिमान जागृत करणारे शब्दांकन त्यांनी या कवितेत केलेय. मात्र जातीयतेचा फणा काढणाऱ्यास कसे ठेचायचे हे देखील ही कविता सांगते,

"काल मुजरेच केले रे माझ्या मेलेल्या बापाने
आज मुजरे मला करती भीमाच्या प्रतापाने"
(मुजरेच केले रे, पृ. क्र.१४५)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या महासूर्यामूळे व त्यांनी संविधानात दिलेल्या अधिकारामुळे आज येथील आंबेडकरी समाज सन्मानाचे जीवन जगतो आहे. अशी भावना ते व्यक्त करतात.

सारांश:-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या महासूर्यामूळे व त्यांनी संविधानात दिलेल्या अधिकारामुळे आज येथील आंबेडकरी समाज सन्मानाचे जीवन जगतो आहे अशी भावना वामनदादा कर्डकांच्या कवितेतून व्यक्त होते. जातीयतेचा फणा काढणाऱ्यास वठणीवर आणणारी ही कविता आहे. आंबेडकरी क्रांती घडण्यासाठी सगळयांनी मिळून लढा उभारणे गरजेचे आहे असे आवाहन वामंदांची कविता करते. आंबेडकरी चळवळीची लक्तरे झालेली बघून त्यांचे मन व्यथित होते. नव्या पिढीतील आंबेडकरी कवींना मार्गदर्शन करणारी व चळवळीसाठी प्रेरणा देणारी त्यांची कविता आहे.

संदर्भ :-

1. जाधव सागर, महाकवी वामनदादा कर्डक चरित्रकाव्य , अलोक प्रकाशन, यवतमाळ प्र. आ. २००८
2. वामनदादा कर्डक, मोहोळ, आनंद प्रकाशन, औरंगाबाद, न. आ. २०१६
3. संग्रमपिटक भाग १ संपा. प्रमोद वाळके, युगसाक्षी प्रकाशन नागपूर, प्र. आ. २०१२
4. आचार्य सुर्यकान्त भगत, महान लोककवी वामनदादा कर्डक, उत्कर्ष प्रकाशन, वर्धा, प्र. आ. २०१३

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No.36 Sept-Oct 2023

भारतीय महिलांचे क्रीडा क्षेत्रात सहभागाचे स्थान आणि खेळांमध्ये लैंगिक समानता कशी वाढवायची याचे विश्लेषण

डॉ.रुपाली अ.इंगोले

संचालक शारीरिक शिक्षण व खेळ श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती

Corresponding Author- डॉ.रुपाली अ.इंगोले

DOI- 10.5281/zenodo.10360516

गोषवारा :-

पहिल्या उन्हाळी ऑलिम्पिकमध्ये सहभागी न होण्यापासून ते टोकियो ऑलिंपिक २०२० मध्ये मोठ्या सहभागापर्यंत, "भारताच्या महिलांनी" जागतिक स्तरावर आपली प्रतिभा दाखवली आहे. कुस्ती, बॅडमिंटन, हॉकी, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग आणि ट्रॅक अँड फील्ड या सहा खेळांमध्ये भारताने पहिल्यांदाच ऑलिम्पिक पदके जिंकली. भारताने जिंकलेल्या 7 पदकांपैकी 3 महिलांनी जिंकल्या - ही कामगिरी ज्याने महिला खेळाडूंना जागतिक स्तरावर प्रवृत्त केले. पोडियम फिनिशेस मिळविण्यासाठी महिला खेळाडूंनी दाखवलेली धैर्य आणि दृढनिश्चय देशातील अधिकाधिक महिलांना खेळात सहभागी होण्यास आणि यशस्वी होण्यास मदत करेल. आम्ही भारतातील क्रीडा क्षेत्रातील महिलांची स्थिती आणि लैंगिक समानतेला प्रोत्साहन कसे देऊ शकतो ते पाहू.

बदलाच्या दृष्टीकोनातून भारताने सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या सातत्याने विकास केला आहे. भारतात पूर्वी खेळांचा विचार फक्त पुरुषांसाठी केला जात होता आणि आजही काही लोकांची ही मानसिकता आहे. पण ज्यांनी खेळातील पुरुष संस्कृती वर्चस्वाची लोककथा मोडून काढली त्यांनी भारताला ऑलिम्पिकमध्ये सादर केले. भारतीय समाज या विश्वासावर ठाम आहे की स्त्रिया जन्मजात पुरुषांसाठी द्वेषपूर्ण आहेत कारण त्यांचा असा विश्वास आहे की स्त्रीची जबाबदारी केवळ बाळंतपण आणि मुले आणि कुटुंबाची काळजी घेणे आहे. महिलांसाठी यशाचा मार्ग म्हणजे पूर्वग्रह, सामान्यता आणि भेदभाव विरुद्ध लढा. प्रथा आणि परंपरा त्यांच्या दिशांना परावृत्त करतात.

परिचय :-

"मैं हमेशा ये सोच के रोता रहा कि छोरा होता तो देश के लिये गोल्ड लाता। ये बात मेरे समझ में न आई कि गोल्ड तो गोल्ड होता है, छोरा लावे या छोरी।"आमिर खानच्या 2016 मध्ये आलेल्या दंगल चित्रपटातील हा डायलॉग आपण सर्वांनी ऐकला असेल. हा केवळ एका चित्रपटाचा संवाद नाही ज्याचा आस्वाद घेतला गेला आणि मागे सोडला गेला, तर ही एक अतिशय खोल गोष्ट आहे जी आजपर्यंत आपला भारतीय समाज पूर्णपणे आत्मसात करू शकलेला नाही. होय, आपण स्त्री-पुरुष समानतेबद्दल कितीही बोलतो, परंतु वास्तव हे आहे की आजही भारतात लैंगिक असमानता मोठ्या प्रमाणावर आहे, त्याचे जिवंत उदाहरण हे क्रीडाक्षेत्र आहे. असो, भारताचा खेळाकडे पाहण्याचा दृष्टीकोन नेहमीच सुस्त राहिला आहे, त्यातही महिलांना प्रोत्साहन देणे तर दूरच आहे. अशा परिस्थितीत सामाजिक निषिद्ध आणि पुरेशा पाठिंब्याचा अभाव झुगारून आपला झेंडा फडकवणाऱ्या मेरी कोम, विनेश फोगट, बबिता फोगट, मानसी जोशी, दुती चंद, पीव्ही सिंधू, हिमा दास या महिला खेळाडूंना विसरता येणार नाही. आज या लेखात आपण आपल्या कर्तृत्वाने क्रीडा जगतात आणि समाजात उदाहरण बनलेल्या या महिला खेळाडूंबद्दल तर जाणून घेणार आहोतच, शिवाय या क्षेत्रात महिलांचा सहभाग तुलनेने कमी असण्यामागची कारणे काय आहेत; आजही बहुतांश कुटुंबे आपल्या मुलींना क्रीडा क्षेत्रात करिअर करण्यासाठी पाठबळ का देत नाहीत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळातील पुरुषांच्या वर्चस्वाला आव्हान देणाऱ्या या महिला खेळाडूंच्या संघर्षाच्या कहाण्या ऐकून तुम्हालाही हे सांगायला भाग पडेल. "म्हारी छोरियां छोरों से कम हैं के"।

मेरी कोम - बॉक्सर मेरी कोमचा जन्म 1 मार्च 1983 रोजी भारताच्या ईशान्येकडील मणिपूर राज्यातील एका छोट्या

गावात झाला. त्यांचे बालपणही गरिबीत गेले. बॉक्सिंग सुरू केल्यानंतर, मेरीला माहित होते की बॉक्सिंगमध्ये करिअर करण्याची तिची कल्पना तिचे कुटुंब कधीही स्वीकारणार नाही, ज्यामुळे तिने ही गोष्ट तिच्या कुटुंबापासून गुप्त ठेवली. सन 1998 ते 2000 पर्यंत ती माहिती न देता घरी प्रशिक्षण घेत राहिली. 2000 मध्ये, जेव्हा मेरीने मणिपूरमध्ये 'महिला बॉक्सिंग चॅम्पियनशिप' जिंकली आणि बॉक्सर पुरस्कार प्राप्त केला तेव्हा कुटुंबाला ती बॉक्सर असल्याचे समजले. मोठी गोष्ट म्हणजे ज्या भारतात लग्न आणि मुले ही महिला खेळाडूंच्या कारकिर्दीचा शेवट मानला जातो, तिथे मेरी कोमने आई झाल्यानंतरही खेळणे सोडले नाही. तीन मुलांची आई होऊनही मेरी कोमने वर्ल्ड चॅम्पियनशिप जिंकली. एकूण आठ जागतिक चॅम्पियनशिप पदके जिंकणारी ती जगातील एकमेव बॉक्सर आहे.

हिमा दास-

धिंग एक्सप्रेस या नावाने प्रसिद्ध असलेल्या हिमा दास यांचा जन्म 9 जानेवारी 2000 रोजी आसाममधील नागाव जिल्ह्यातील धिंग गावात झाला. त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. त्यांच्या वडिलांकडे फक्त दोन बिघे जमीन होती त्यावर ते शेती करून आपला उदरनिर्वाह करत होते. सुरुवातीला हिमा तिच्या भाताच्या शेतातच सराव करायची. पैशाअभावी त्याच्याकडे चांगले बूटही नव्हते. हिमाला फुटबॉलमध्ये स्ट्रायकर बनायचे होते. एके दिवशी त्याची धावण्याची क्षमता पाहून कोणीतरी त्याला अॅथलीट होण्याचा सल्ला दिला आणि इथून त्याचा अॅथलीट होण्याचा प्रवास सुरू झाला. सांगताना आनंद होतो की, ट्रॅक इव्हेंटमध्ये जागतिक स्तरावर सुवर्ण जिंकणारी हिमा ही पहिली भारतीय खेळाडू आहे. हिमाची आवड आणि कामगिरी पाहून तिला आसाम पोलिसात उपअधीक्षक (डीएसपी) बनवण्यात आले आहे. हिमा दासने अनेक स्पर्धांमध्ये सुवर्णपदके जिंकली आहेत.

विनेश फोगट- कुस्तीपटू विनेश फोगटचा जन्म 25 ऑगस्ट 1994 रोजी भारतातील हरियाणा राज्यात झाला, जे भारतातील सर्वात कमी लिंग गुणोत्तर राज्यांपैकी एक आहे. जेव्हा विनेशने तिच्या गावात कुस्तीचा सराव सुरू केला तेव्हा विनेशला कुस्ती, मुलांचा खेळ समजला जाणारा खेळ, कपड्यांची निवड यासाठी खूप त्रास सहन करावा लागला. पण विनेशने हार मानली नाही आणि या प्रवासात वडिलांच्या पश्चात काकांनी साथ दिली. या क्रीडा विश्वात विनेशने जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक आणि राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून तिरंग्याची शान उंचावली आहे. जाणून घेणे देखील महत्त्वाचे आहे की, जागतिक स्पर्धेत दोन पदके जिंकणारी विनेश ही देशातील पहिली महिला कुस्तीपटू आहे.

दुती चंद –

विनेश फोगट सारख्या खेळाडूंनी पितृसत्ताक मानसिकतेला आव्हान दिले होते, तर दुती चंद यांनी गरिबी आणि लिंग यांच्यातील रूढीवादी कल्पना तोडल्या. दुती यांचा जन्म ३ फेब्रुवारी १९९६ रोजी ओरिसा राज्यातील जाजपूर जिल्ह्यात झाला. त्याचे वडील विणकर होते. त्याची आईही विणकराचे काम करायची. घरची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती, पण दुतीची मेहनत पाहून एक दिवस ती खूप पुढे जाईल याची तिच्या घरातील आणि गावातील सर्वांना खात्री होती. होनाहर बिरवान के चिकने पात' ही म्हण द्युतींना पूर्णपणे लागू पडते. इतकंच नाही तर या गेममध्ये सहभागी होण्यासाठी दुतीला कायदेशीर लढाईही लढावी लागली, पण ही लढाईही दुतीने जिंकली. आज दुती हा भारतातील सर्वात वेगवान धावपटूंपैकी एक आहे.

पीव्ही सिंधू-

तेलंगणाची असलेली पीव्ही सिंधू वयाच्या २१ व्या वर्षी रिओ ऑलिम्पिकमध्ये रौप्य पदक जिंकणारी पहिली भारतीय बॅडमिंटनपटू आहे. जगातील टॉप-10 खेळाडूंमध्ये त्याचा समावेश होतो. सिंधूपूर्वी कोणत्याही भारतीय खेळाडूने, मग तो पुरुष असो वा महिला, जागतिक बॅडमिंटन चॅम्पियनशिप जिंकलेली नाही.

साईखोम मीराबाई चानू –

यांचा जन्म 8 ऑगस्ट 1994 रोजी नॉन्गपोक काकचिंग येथे इम्फाळ शहर, मणिपूरपासून सुमारे 30 किमी दूर[या प्रदेशातील एक योद्धा कुळातील मेतेई कुटुंबात झाला होता. ती फक्त 12 वर्षांची असताना तिच्या कुटुंबाने तिची ताकद ओळखली. तिच्या मोठ्या भावाला ते उचलणे सुद्धा कठीण जात असताना तिला जळाऊ लाकडाचा मोठा बंडल सहज घरी नेऊ शकत. मीराबाई चानूने CWG 2022 मध्ये सुवर्णपदक जिंकून एकूण 201 किलो वजन उचलले. तिने 2020 टोकियो ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या 49 किलो गटात रौप्य पदक जिंकले. मीराबाई चानूने कॉमनवेल्थ गेम्समध्ये वर्ल्ड चॅम्पियनशिप आणि अनेक पदके जिंकली आहेत.

<u>महिलांच्या खेळाबद्दल भारतीयांचे काय मत आहे?</u>

द न्यू इंडियन एक्सप्रेस मधे प्रकाशित झालेल्या लेखांअन्वे 2020 मध्ये, बीबीसीच्या नेतृत्वाखालील सर्वेक्षणात भारतीयांना विचारले गेले की स्त्रिया खेळात पुरुषांइतकीच चांगली आहेत का. तेव्हा मोठ्या संख्येने उपस्थित लोकांनी होकार दिला. तथापि, 42% सहभागींचा असा विश्वास आहे की महिलांचे खेळ पुरुषांसारखे "आनंददायक" नाहीत. तिचे स्वरूप आणि मुले होण्याच्या क्षमतेबद्दल काही विरोधाभासी विधाने देखील होती. संशोधनातून असे दिसून आले आहे की सुमारे 64% भारतीय प्रौढांनी कोणत्याही प्रकारच्या खेळात किंवा शारीरिक हालचालींमध्ये भाग घेतला नाही. लिंगानुसार विभक्त केल्यावर ही आकृती खूपच भयानक होती.

क्रीडाक्षेत्रातील शक्तीस्थान असलेले मणिपूर आता कसे नाजूक होत चालले आहे?

आज मनिपुर सारख्या खेळप्रेमी राज्याची परिस्थिती भारतापासूनच नव्हे तर जगापासून लपली नाही महिलांना मिळणारे असुरक्षित स्थान समाजामधील तणाव या सर्व गोष्टींमुळे मणिपूर येथील महिलांच्या क्रीडा प्रशिक्षण व खेळामध्ये सहभागाच्या दरामध्ये वाढ न होता दिवसेंदिवस घटस होत असताना दिसत आहे. मणिपूरने बॉक्सिंगमध्ये सहा वेळा विश्वविजेती आणि ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती मेरी कोमपासून टोकियो ऑलिम्पिकमधील रौप्यपदक विजेत्या वेटलिफ्टिंग स्टार मीराबाई चानूपर्यंत अपवादात्मक ॲथलीट तयार केले आहेत. पण दुर्दैवाने, मणिपूरमध्ये आता एक विचित्र परिस्थिती आहे जिथे 48% महिला खेळाडूंनी नमूद केले आहे कि किरदा सुविधान पर्यंत पोहचण्य साठी त्यांना १० किलोमीटर पेक्षा जास्त अंतर गाठाव लागत . काही अहवालांमध्ये असे म्हटले आहे की प्रशासकीय संस्थांमध्ये महिला प्रतिनिधित्वाचा अभाव, क्रीडा सुविधांमध्ये कमी प्रवेश, सुरक्षिततेची चिंता, महिला प्रशिक्षकांची संख्या, असुरक्षित प्रवास आणि भेदभाव यासारख्या समस्यांमुळे महिला खेळाडूंच्या क्रीडा भावना कमी झाल्या आहेत.

महिलांचा खेळातील सहभाग किती?

आकडेवारीबद्दल सांगायचे तर, गेल्या पाच वर्षांत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर महिला खेळाडूंच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. क्रीडा मंत्रालयाच्या अहवालानुसार, 2018 ते 2020 या कालावधीत खेलो इंडिया गेम्समध्ये महिला खेळाडूंच्या सहभागामध्ये एकूण 160 टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्याच वेळी, ऑलिम्पिक डेटाबेसनुसार, 2000 मध्ये, ऑलिम्पिक खेळांमध्ये महिलांचा एकूण सहभाग 38 टक्के होता, जो 2016 मध्ये 45 टक्के आणि 2020 मध्ये 47 टक्के इतका वाढला.

शेवटी महिलांचा खेळातील सहभाग कमी का?

खेळांमध्ये पुरेशा प्रमाणात महिलांचा सहभाग नसण्याची काही कारणे असू शकतात-

- एका संशोधनादरम्यान लोकांनी सांगितले की, शाळांकडून खेळांवर भर न देणे आणि सुविधांचा अभाव ही यामागची प्रमुख कारणे आहेत.
- महिलांना दैनंदिन लैंगिकतेच्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते, मग ते कामाचे ठिकाण असो किंवा घर. त्यांचा पेहराव, त्यांचे संभाषण आणि वागणूक यावर लक्ष ठेवले जाते आणि त्या आधारे त्यांचे मूल्यांकन केले जाते.
- बहुतेक लोकांचा असा विश्वास आहे की महिला खेळाडूंना मातृत्व आणि क्रीडा कारकीर्द संतुलित करण्यासाठी आव्हानांचा सामना करावा लागतो.
- या व्यतिरिक्त, महिला खेळाडूंना पुरुष खेळाडूंपेक्षा कमी मानधन दिले जाते, ज्यामुळे त्यांना स्पर्धा करणे आणि दीर्घ कालावधीसाठी खेळात सहभागी राहणे कठीण होते.
- क्रीडा विश्वातील महिलांच्या अथक प्रयत्नांनंतरही, त्यांना त्यांच्या पुरुष समकक्षांच्या तुलनेत समान सन्मान किंवा मान्यता मिळत नाही.
- अनेक वेळा सुरक्षित पर्याय नसल्यामुळे इतर कुटुंबांसोबत कारपूल करणे किंवा मुलीला कुटुंबासह घरी राहण्याशिवाय पर्याय नसतो.
- अलीकडील प्रगती असूनही, वास्तविक किंवा कथित लैंगिक अभिमुखता आणि लिंग ओळखीच्या आधारावर महिला खेळाडूंविरुद्ध भेदभाव कायम आहे.
- प्रशिक्षित आणि दर्जेदार प्रशिक्षकाचा अभाव हेही एक मोठे कारण आहे. काहीवेळा प्रशिक्षक त्या मुलांना प्रशिक्षण देण्यावर अधिक लक्ष केंद्रित करतात ज्यांच्याकडे प्रशिक्षणासाठी जास्त पैसे असतात.
- माध्यमांमध्ये महिला खेळांचे अनेकदा कमी प्रतिनिधित्व केले जाते, ज्यामुळे महिला खेळाडूंना मान्यता आणि प्रायोजकत्वाच्या संधी मिळणे कठीण होते.

<u>भारतातील खेळांमध्ये महिलांच्या कमी सहभागास कारणीभूत आणखी काही घटक</u>

१.वडिलांचे प्रोत्साहन नाही –

सामाजिक नियम आणि मानकांमुळे कुटुंब आपल्या मुलींना खेळ खेळण्यासाठी प्रोत्साहन देत नाही. त्यांना असे वाटते की खेळ फक्त पुरुषांसाठी बनवले जातात, महिलांनी त्यांच्या कुटुंबाची काळजी घेणे आणि मुलांना जन्म देणे याबद्दल अधिक काळजी घेतली पाहिजे. अलीकडच्या काळात पापा की परी असे टायटल मिळवणाऱ्या मुली ह्या वडिलांच्या कायमच लाडाच्या असतात त्यामुळे त्यांनी शरीर ताकतीची किंवा अंग मेहनतीची कुठलीही काम करू नये किंवा त्यांच्या सौंदर्यावर त्या गोष्टींचा परिणाम होईल अशा गोष्टींमध्ये त्यांनी सहभाग घेऊ नये असेच कायम एका वडिलाला वाटत असतं . मुली म्हणजे वडीलाच्या घरून आपल्या सासरी सुखरूप पाठवली जाणारी माहेरची एक ठेव असंच कायम वडिलांना वाटत असते. आणि म्हणूनच मुलींनी कुठल्याही खेळामध्ये किंवा संघर्षात्मक खेळामध्ये सहभागी व्हावे अशी वडिलांची फारशी इच्छा नसते.

2.थोडे ज्ञान –

आजही महिलांनी खेळात भाग घेणे सामान्य नाही. खेळाविषयी जागरुकता आणि ज्ञानाच्या अभावामुळे असे घडते. पालकांकडून व काही प्रमाणात क्रीडा शिक्षकांकडून सुद्धा मुलींना खेळाविषयीचे योग्य ज्ञान मिळतच नाही खेळामुळे होणारे फायदे व त्याचा आपल्या आयुष्यावर होणारा सकारात्मक परिणाम यासंबंधीची जितकीशी माहिती त्यांना मिळायला पाहिजे तितकीशी माहिती त्यांना योग्य वयात मिळत नाही आणि म्हणूनही त्या खेळामध्ये सहभाग घेण्यापासून वंचित राहतात

३.पुराणमतवादी दृष्टीकोन –

लोकांचा असा विश्वास आहे की कुस्ती आणि बॉक्सिंगसारखे काही खेळ स्त्रियांसाठी 'अयोग्य' म्हणून पाहिले जातात. त्यांचा असा विश्वास आहे की हे खेळ फक्त माचो पुरुषांसाठी बनवले जातात जे मजबूत आणि निरोगी आहेत. तसे पाहिले तर ताकतीचे खेळ हे महिलांसाठी नाहीतच असा ग्रह समाजाने परिवाराने केलेला आहे खेळ म्हटलं की तिथे फक्त ताकद लागते असा ठाम विश्वास त्यांचा आहे त्यामुळे महिलांनी याच्या दूर राहावे किंवा संघर्षात्मक खेळात सहभाग घेऊच नये असे त्यांना कायम वाटते कारण त्याचा परिणाम कदाचित मुलींच्या वाढीमध्ये किंवा प्रजनन संस्थेतील कार्यामध्ये येऊ शकतो असा त्यांचा ग्रह असतो

४.ओळख नाही –

जरी एखाद्या महिला खेळाडूने क्रीडा क्षेत्रात मार्ग काढला तरी तिच्या यशोगाथांना फारसे प्राधान्य दिले जात नाही. महिला खेळाडूंना मीडिया कव्हरेज आणि इतर सहाय्यक सुविधांमध्ये भेदभावाचा सामना करावा लागतो. प्रसारमाध्यमांकडून तिला हवी तितकी आणि आवश्यक तितकी कर्तुत्वाची ओळख मिळत नाही त्याच प्रमाणामध्ये पुरुषांच्या छोट्या सुद्धा यशाचे अतिरिक्त प्रदर्शन प्रसारमाध्यमांकडून मानले जाते त्या प्रमाणात महिलांची कारकीर्द आणि तिचे प्रदर्शन उत्तम असून सुद्धा त्याकडे प्रसार माध्यमाचे पुरेशी लक्ष जातच नाही व तिला आवश्यक ती सन्मानाची ओळख समाजात मिळत नाही

<u>पुढील काही कारणाने महिलांचा खेळातील सहभाग वाढू शकतो .</u>

- महिलांच्या खेळातील सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना त्यांच्या कुटुंबीयांचा पाठिंबा मिळणे सर्वात महत्त्वाचे आहे.
- योजना अधिक चांगल्या पद्धतीने राबविण्यात याव्यात जेणेकरून सर्व गरजूंना त्यांचा लाभ मिळू शकेल.महिला खेळाडूंना आर्थिक मदत करण्याबरोबरच खेळाशी संबंधित सुविधा देण्याची गरज आहे.
- स्थानिक स्तरावर महिलांसाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे जेणेकरुन चांगले खेळाडू ओळखता येतील आणि त्यांच्या कलागुणांना वाव मिळू शकेल.

<u>खेळांमध्ये लैंगिक समानता या कडे सकारात्मक पाऊले उचाल्याने महिलांचा खेळातील सहभाग वाढू शकतो .</u>

१.गुंतवणूक/निधी अंतर भरून काढा

आजही अनेक खेळाचे महिला संघ संघटनेकडे पुरेसा निधी नाही म्हणून स्पर्धेमध्ये पाठविल्या जात नाही किंवा त्यांचा सहभाग त्या स्पर्धेमध्ये नसतो. अपुरा निधी हा अनेक क्रीडा संघांना भेडसावणाऱ्या समस्यांपैकी एक आहे. बहुतेक वेळा, पुरुष संघांना प्रायोजकत्व आणि टेलिव्हिजन सौदे बहुतेक मिळतात. बहुतेक कंपन्या महिलांच्या खेळांना पाठिंबा देण्यास नाखूष असतात कारण लोकांना सामान्यतः स्वारस्य नसते आणि ज्यांना ते गुंतवणुकीऐवजी नैतिक बंधन म्हणून पाहतात महिला खेळाडूंसाठी निधी/प्रायोजकत्वाचा विस्तार आर्थिक दरी भरून काढू शकतो. यामुळे महिला खेळाडूंना सहभागी होण्यासाठी अधिक पर्याय उपलब्ध होतील

मध्यम धोका

२. माध्यमांचा धोका

क्रीडा आणि क्रीडापटूंचे मीडिया चित्रण हानिकारक लिंग स्टिरियोटाइपच्या विकासात भर घालते, कारण मीडिया सामान्यत: महिला खेळाडूंना महिला प्रथम आणि क्रीडापटू दुसऱ्या स्थानावर चित्रित करतात. ते माहिती प्रसारित करण्यासाठी आणि व्यक्तींच्या विश्वास आणि पद्धतींवर प्रभाव टाकण्यासाठी एक शक्तिशाली साधन म्हणून काम करतात. त्यांनी प्रेक्षकांना महिला क्रीडापटूंच्या भावनेशी आणि दृढनिश्चयाशी जोडले पाहिजे. क्रीडा उद्योगातील महिला पत्रकारांचे प्रशिक्षण आणि सहभाग देखील क्रीडा क्षेत्रातील लैंगिक असमानता दूर करण्यासाठी आणि क्रीडा क्षेत्रात महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी योगदान देऊ शकते.

३. पुरुषांना हिरो मानणे बंद करा

खेळांमध्ये लिंग समानता वाढवण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे पुरुषांची अपेक्षा करणे आणि त्यांना चांगले खेळाडू म्हणून चित्रित करणे थांबवणे. पुरुषांना त्यांच्या शरीराच्या आकारामुळे इतर लिंगांपेक्षा खेळांमध्ये चांगले, मजबूत आणि वेगवान मानले जाते. समाजामध्ये आणि परिवारामध्ये सुद्धा पुरुष खेळाडूंनाच आपला हिरो आणि प्रेरणास्थान मानून चालणे बंद केले पाहिजे कारण खेळ कुठलाही असो त्यामध्ये समान ताकद आणि चुरस ही लागतेच मग पुरुषांच्या प्रभुत्व असलेल्या अनेक खेळांमध्ये जर महिला पदक आणत असतील किंबहुना आणत आहेत तर त्या आपल्या प्रेरणास्थान किंवा हिरो का नाहीत. समाजाची हीच धारणा आपण मोडून काढली पाहिजे तरच महिला खेळायला प्राबल्य मिळेल

४. लैंगिक समानतेसाठी धोरण तयार करा

अशा महिला खेळाडूंसाठी धोरणे तयार केली जावी ज्यात समान परिश्रम आणि दृढनिश्चय असेल आणि समान सहभाग धोरणे, निधी, मान्यता आणि आर्थिक सहाय्य मिळण्यास पात्र असावे. पुरुष आणि महिला या दोन्ही गटासाठी समान पद्धतीचे मानधन समान पद्धतीचे पुरस्कार व समान संधी या उपलब्ध करून दिल्याच पाहिजे

५.तळागाळातील शिक्षण

भारतातील क्रीडा क्षेत्रातील प्राथमिक स्तरावरील जागरुकता हा क्रीडा क्षेत्रातील महिलांचा दर्जा उंचावण्यासाठी एक उत्तम उपक्रम ठरू शकतो. मुलांना तळागाळातील विविध खेळांची ओळख करून दिल्याने त्यांना भविष्यात ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्यास मदत होईल. शारीरिक शिक्षण व खेळ हे प्राथमिक स्तरापासूनच सक्तीचे करून त्यानंतर सर्वच स्तरावर त्याचे योग्य मार्गदर्शन व योग्य सरावासाठी क्रीडा शिक्षक व प्रशिक्षक उपलब्ध करून दिले पाहिजे कारण तळागाळातून आलेले खेळाडू हे उद्या महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण भारताला ऑलम्पिक स्तरावर पदक प्राप्त करण्यासाठी कधी सहाय्यभूत ठरतील हे आपल्याला कळणार देखील नाही आणि जास्त ग्रामीण क्षेत्रांमध्ये खेळाची जागृती आणि सहभागाप्रती गोडी निर्माण करणे अनिवार्य आहे

६.शिबिरे, परिसंवाद आणि कार्यशाळांचे आयोजन

भारताच्या क्रीडामंत्र्यांनी विविध कार्यक्रम सुरू करावेत आणि लैंगिक समानतेला प्रोत्साहन द्यावे. प्रसिध्द खेळाडू आणि प्रशिक्षकांवर जनजागृती आणि महिलांना खेळ खेळण्यासाठी प्रोत्साहन देण्याची जबाबदारी दिली पाहिजे. याशिवाय राज्य सरकारांनी खेळातील सहभागासंबंधी चर्चासत्रे आणि शिबिरे आयोजित करावीत जेणेकरून महिलांना तसेच त्यांच्या कुटुंबियांनाही खेळाविषयी माहिती व्हावी. इतक्याच नव्हे तर खेळणी आहे प्रत्येक खेळाडूंना किंवा त्याच्या परिवार जनाला त्या खेळाविषयीची कार्यशाळा किंवा परिसंवाद अनिवार्य रूपाने आपला सहभाग नोंदवून पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहित करावे

निष्कर्ष:-

शेवटी, आपण असे म्हणू शकतो की ऑलिम्पिक आणि पॅरालिम्पिकमध्ये भारतीय महिलांची अप्रतिम कामगिरी हे एक संकेत आहे की बदलाची लाट सुरू आहे जी खूप पुढे जाईल. केवळ व्यावहारिक आणि सामाजिक बदलामुळेच महिलांना पुढे येण्याची दारे खुली होतील. स्त्रिया जसजसे त्यांचे शिक्षण, करिअर आणि त्यांच्या आयुष्याबाबत निर्णय घेण्यास अधिक सक्षम होत जातील तसतसे लोक ते स्वीकारू लागतील आणि खेळासारख्या क्षेत्रातही त्यांचा सहभाग वाढेल. थोडक्यात, आपण सर्वांनी आपल्या परंपरागत विचारसरणीतून बाहेर पडून "पदक विजेते झाडांवर उगवत नाहीत, ते प्रेमाने, मेहनतीने आणि समर्पणाने घडवावे लागतात" हे स्वीकारले पाहिजे.

आम्हाला खरोखरच त्या काळातील महिला खेळाडू हव्या आहेत ज्या राजवटीचा सामना करतील आणि येणाऱ्या पिढ्यांना सक्षम बनवतील. आपल्या समाजाला मोठ्या प्रमाणात सामाजिक बदल घडवून आणण्याची गरज आहे जिथे आपण भारतातील खेळांमध्ये महिलांना प्रोत्साहन देऊ शकू आणि त्यानंतर आपल्याला एक उत्कृष्ट आणि निरोगी कठोर परिश्रम नीति मिळेल. गेल्या काही वर्षांपासून महिला खेळाडूंमुळे क्रीडा क्षेत्रात योग्य प्रकारचा गदारोळ होत आहे. ते केवळ लैंगिक रूढींचे बंधन तोडून ऑलिम्पिक आणि पॅरालिम्पिकमध्ये भारताचे अभिमानाने प्रतिनिधित्व करत

नाहीत, तर अनेक तरुण खेळाडूंसाठी प्रेरणा आणि प्रेरणा म्हणूनही ते स्वत:ला प्रस्थापित करत आहेत. भारतीय महिला खेळाडू या परिस्थितीसाठी सुसज्ज आहेत आणि त्या जगाचा सामना करू शकतात.

संदर्भ :-

1. https://www.drishtiias.com/daily-updates/daily-news-analysis/issues-faced-by-females-in-sports
2. https://ijellh.com/OJS/index.php/OJS/article/view/1845
3. KPMG India. The Business of Sports: Playing to win as the game unfurls. September 2016. Retrieved from, https://home.kpmg.com/in/en/home/insights/2016/09/the-businessofsports.html
4. Burton LJ, Leberman S. Women in sport leadership: research and practice for change. Routledge, New York, 2017
5. Ashitha M., Women and Sports-Gender Politics in Contemporary Kerala (2012)
6. Harikrishnan D., Sreena K., Dinesh Babu S., Transition in imaging of female protagonists in contemporary Disney animation films, Journal of Advanced Research in Dynamical and Control Systems 9 (2017), 815-822.
7. Sports, Media and Stereotypes Women and Men in Sports and Media (2006). http://www.mujerydeporte.org/documentos/docs/sms_summary_r eport.pdf
8. Kian E.M., Gender in sports writing by the print media: An exploratory examination of writers' experiences and attitudes, The SMART Journal (2007), 1–112.
9. Menon M.U., Sreena K., Newspapers in 'Pockets': A Study on the Newspaper Reading Habits of Youth, Journal of Advanced Research in Dynamical and Control Systems (2017)
10. https://www.bbc.com/mediacentre/latestnews/2020/indian-women-play-any-sports

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No. 36 Sept-Oct 2023

मलकापुर तालुक्यातील शेतकरी परिषदा : एक चिकित्सक अध्ययन

डॉ. वसंत डोंगरे
संशोधक तथा मार्गदर्शकए प्राध्यापक तथा इतिहास विभाग प्रमुख सु.रा. महिला महाविद्यालय, खामगाव
Corresponding Author- डॉ. वसंत डोंगरे
DOI- 10.5281/zenodo.10360521

प्रस्तावना :—

इ.स. १९०० पासुन वऱ्हाड प्रांतात सामाजिक परिवर्तनाची सुरूवात झाली होती. सत्यशोधक चळवळ, ब्राम्हणेतर चळवळ,अस्पृश्य दलित चळवळ, मराठा चळवळ इत्यांदी चळवळीबरोबर शेतकरी चळवळी ही सुरू झाल्या. वंचित दलित बहुजन समाजाचा मुख्य आधार स्वंभ शेती होता. कृषीप्रधान भारत देशात शेती हा मुख्य अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे वेळोवेळी शेतकरी हिताचे काय सदय स्थितीत शासन करीत असते. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव देणे कर्ज उपलब्ध करून देणे. बि—बियाणे पुरवणे पिक मार्गदर्शन शिबीरांचे आयोजन करणे इत्यादी महत्वाची कामे शासन करीत असते. एकोणविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात शेती हाच मुख्य खेड्यातील बहुजन समाजाचा व्यवसाय होता. सत्यशोधक चळवळ, ब्राम्हणेतर चळवळ, दलित चळवळीत काम करणारे असंख्य पुढारी हे शेतकरी कुटुंबातून होते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी या पुढाऱ्यांनी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती व्हावी, शासन दरबारी शेतकऱ्यांच्या मागण्या मांडणे, कर्ज सुविधा उपलब्ध करून देणे, जिल्हा कौन्सील बोर्डामार्फत शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहीती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य शेतकरी चळवळीने केले. शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी विविध सभा अधिवेशनांचे आयोजन वऱ्हाड प्रांतातील अकोला, बुलडाणा, अमरावती जिल्ह्यामध्ये १९२० ते १९५० या कालावधीत झाले. स्वातंत्र्यापुर्वी वऱ्हाड प्रांतातील शेतकरी चळवळीची माहिती आणि शेतकऱ्यांवर या चळवळीचा झालेला परिणाम आपण अभ्यासणार आहोत.

शोधनिबंधाचा उद्देश :—

१. मलकापूर तालुक्यातील शेतकरी परिषदांचे अध्ययन करणे.
२. शेतकरी परिषदांची यशस्वीता अभ्यासणे.

१) जिल्हास्तरीय शेतकरी सभा, मेंढळी ता. मलकापूर १९२४:—

बुलडाणा जिल्ह्यामध्ये आनंदस्वामी, पंढरीनाथ पाटील यांनी शेतकरी चळवळीचे लोण सर्वत्र पसरवले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची शासन दरबारी दखल करण्याचे कार्य नेमस्तांनी केल्यामुळे बुलडाणा जिल्ह्यातील असंख्य सभामध्ये पंढरीनाथ पाटील आणि आनंदस्वामी यांना बोलावू लागले. मलकापूर तालुक्यातील ग्राम मेंढळी येथे बुलडाणा जिल्हास्तरीय शेतकरी सभेचे आयोजन जगदेवराव भालेराव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेमध्ये बुलडाण जिल्ह्यातील दोन हजारांवर शेतकरी आवर्जुन उपस्थित होते. या सभेमध्ये बुलडाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे नेते व्यास साहेब, अण्णासाहेब आणेकर, भिकमसिंग लोटु महाराज, पंढरीनाथ पाटील, ओझरकर तसेच जगदेवराव भालेराव आणि आनंदस्वामी यांची प्रेरणादायी भाषणे झाली. या सभेमध्ये सारावाढीबाबत एका महिन्याची मुदत अपूरी असून ती सहा महिने करावी तसेच सरकारी रिपोर्टात म्हटल्याप्रमाणे शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारली नसुन खालावली आहे. हे सरकारला पटवून देऊन शेतसारा वाढीला विरोध करावा यासारखे ठराव मंजुर करण्यात आले. मेंढळी येथील परिषदेच्या यशस्वीतेमुळे संपूर्ण बुलडाणा जिल्ह्यामध्ये शेतकरी चळवळीचा पाया खऱ्या अर्थाने रचला गेला. पुढील काळामध्ये बुलडाणा जिल्ह्यामध्ये असंख्य शेतकरी परिषदांचे आयोजन करण्यात आले.

२) कर्जदार शेतकऱ्यांची सभा येरळी ता. मलकापूर १९३३ :—

इसवी सन १९३० नंतर पंढरीनाथ पाटील शेतकऱ्यांसाठी सावकारांच्या विरोधात व्यापक लढा उभारला गेला इसवी सन १९२८ मध्ये ब्रिटीश सरकारने शेतसारा वाढवल्यामुळे शेतकरी वर्ग सावकारांच्या पाशात अडकत गेला. अशाच परिस्थितीत इसवीसन १९२६ व १९२७ या दोन वर्षात बुलडाणा जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी झाल्याने

शेतकऱ्यांची स्थिती दयनीय झाली होती. त्यातच शेतसारा वाढल्याने संकटाला कर देण्यासाठी शेतकऱ्यांना सावकारांचे कर्ज काढावे लागले. सावकारांनी अव्वच्यासव्व व्याज आकारणी करून प्रसंगी शेतकऱ्यांच्या जमिनी हडप केल्या. बुलडाणा जिल्ह्यामध्ये कापसाचे मोठ्या प्रमाणावर उत्पन्न घेतले जात होते. कापसाचे महत्व जाणूनच ब्रिटीश सरकारने खामगाव तालुक्यामध्ये सुतगिरण्यांची स्थापना करून कापुस खरेदी केंद्रे सुरू केली होती. परंतु कापसाचे पिकासाठी शेतकऱ्यांना खर्च जास्त येत होता. त्यासाठी वारंवार कर्ज काढावे लागे. त्यामुळे शेतकऱ्यांना सावकारांच्या कर्जाशिवाय पर्याय नव्हता अशाच परिस्थितीत बुलडाणा जिल्ह्यातील शेतकरी चळवळीतील अग्रणी पुढारी वेदशास्त्री आनंदस्वामी यांच्या नेतृत्वाखाली बुलडाणा जिल्ह्यामध्ये व्यापक स्वरूपात सावकारशाही विरोधात लढा उभारला गेला. कर्जबाजारी शेतकऱ्यांना साहुकारांच्या जाचातुन बाहेर काढण्यासाठी बुलडाणा जिल्ह्यातील लोकनेत्यांनी संपुर्ण जिल्ह्यामध्ये चळवळी सुरू केल्या.

बुलडाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांची कर्जदार शेतकरी सभेचे आयोजन दि. २३ एप्रिल १९३३ मध्ये ग्राम येरळी ता. मलकापूर येथे केले होते. या सभेचे अध्यक्षस्थानी तत्कालीन जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष रावबहादूर दादासाहेब कोरडे अकोला हे होते(१३). या सभेमध्ये शेतकऱ्यांची खालावलेली शोषनिय स्थिती लक्षात घेऊन प्रांतिक सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जाची परतफेड करण्याचा कायदा पास केला होता. परंतु त्या कायद्याची वऱ्हाड प्रांतात अंमलबजावणी सुरू झालेली नव्हती सबब या बाबतीत विचार विनीमय करून प्रसंगी कायद्यात काही दुरूस्त्या सुचवून हा कायदा वऱ्हाड प्रांतात लागु करण्यात याव अशा महत्वाच्या विषयावर सर्वानुमते ठराव मांडण्यात आला. या परिषदेमध्ये झालेल ठरावाची प्रत जिल्हा कौन्सिल मार्फत प्रांतीक मंडळाकडे पाठवण्यात आली. यासभेमध्ये प्रामुख्याने निनाजी पाटील, तुकाराम रामू पाटील, संपत माधव पाटील, मिठाराम सोनाजी पाटील, केशवराव दामोदर, दत्तु पाटील, कृष्णराव रामजी पाटील बोरीआडगावकर, नामदेव तुकाराम पाटील, तुकाराम एकोबा पाटील, रावजी पाटील, काशीराम महादु पाटील, पुंडलीक मारोती पाटील, महिपत दलपत पाटील यांसारख्या बुलडाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

३) मलकापूर तालुका शेतकरी परिषद देवधाबा ता.मलकापूर १९३६ :—

बुलडाणा जिल्ह्यातील शेतकरी वर्गाच्या हितासाठी विविध परिषदांचे आयोजन जिल्हा कौन्सिलचे सदस्य तथा शेतकरी नेते करीत होते. दिनांक १९ मार्च १९३६ मध्ये देवधाबा तालुका मलकापूर येथे तालुकास्तरीय शेतकरी परिषदेचे आयोजन अमरावती येथील शंकरराव वाटाणे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या सभेमध्ये १९३६ साली झालेल्या नापीकीमुळे शेतसारा सरकारने माफ करावा अथवा काही कालासाठी तहकुब करावा शेतकऱ्यांना आर्थिक मदम करावी कर्ज लवाद कायदा लागु करावा. सावरकारी व्याजाचे दर सरकारने ठरवून द्यावे यांसरख्या महत्वपूर्ण विषयावर ठराव मांडण्यात आले. या परिषदेसाठी दादासाहेब कोरडे मुर्तिजापूर, नारायणराव पाटील यवतमाळ, एक.के.कुरकुरे अमरावती, पंढरीनाथ सिताराम पाटील बुलडाणा, कृष्णराव रामजी पाटील बोरीअडगाव, नानासाहेब बोबडे खामगाव, नामदेव पाटील पिंपळगाव काळे, गुलाबराव पाटील पळसखेड, एस.एल.भटकर चिखली, यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. या परिषेच्या याशस्वीतेसाठी सदाशिव पाटील देवधाबा, अभय कुमार देवधाबा, रामभाऊ गोविंदा बोराडे, छोटुसिंग राजपूत, धन्नु धनगर, सेनु महाजन, ओंकार कांदेले, उखर्डा राधो तेली, तुकाराम महाजन, मोतीलाल माखार्डी या वरखेड येथील पुढाऱ्यांबरोबरच मोतीराम धोबी, व्यंकटराव पाटील वरखेड, दौलतराव जानराव पाटील मोमीनाबाद, हसनाव देवराव देशमुख नारखेड, मार्तंडराव देशमुख अलमपूर, राघोजी पाटील लासुरा ह्या बुलडाणा जिल्ह्यातील पुढाऱ्यांनी मेहनत घेतली.

४) मलकापूर शेतकरी मजुर परिषद मेंढळी मलकापूर १९३६:—

दिनांक ७ एप्रिल १९३६ मध्ये मलकापूर तालुका शेतकरी मजुर परिषदेचे आयोजन मौजे मेंढळी ता. मलकापूर येथे जगदेवराव भालेराव यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत केले होते. शेतकऱ्यांच्या हिताबरोबरच शेतमजुरांच्या प्रश्नांबाबतही जिल्हा कौन्सिलने पुढाकार घ्यावा तसेच शेतकरी मजुरांची संघटना स्थापन करणे, शेतसाऱ्या संबंधी सरकारला निवेदन देऊन शेतसाऱ्यामध्ये सुट मिळवणे, कर्ज निवारण संबंधी विधायक योजनांची अंमलबजावणी करणे, शेतकरी मजुर संघाचे प्रतिनीधी जिल्हा कौन्सिलमध्ये पाठवणे इत्यादी विषयांच्या हेतुने या परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेमध्ये एस.एन.पवार, पि.आर.पाटील, नाफडे साहेब, सिताराम राघो पाटील तसेच मलकापूर तालुक्यातील शेतकरी चळवळीत काम करणारे असंख्य पुढारी उपस्थित होते.

इसवी सन १९३६ साली मध्यप्रांतात विधीमंडळाने इसवीसन १९३३ मध्ये परित केलेला कर्ज लवाद कायदा लागु व्हावा यासाठी जळगाव जामोद तालुक्यात विविध ठिकाणी शेतकरी मजुन परिषदांचे आयेजन करण्यात आले होते. बुलडाणा जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष पंढरीनाथ सिताराम पाटील, शेतकरी नेते आनंदस्वामी, शेतकरी मजुर परिषदेचे सचिव सुगदेवराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली जळगाव जामोद तालुक्यामध्ये सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये पिंपळगाव काळे १६ ऑक्टोबर १९३६, आसलगाव १७ ऑक्टोबर १९३६, वडशिंगी १८ ऑक्टोबर १९३६, सुनगाव १९ ऑक्टोबर १९३६, सोनाळा २० ऑक्टोबर १९३६, तामगाव २१ ऑक्टोबर १९३६, पातुर्डा २२ ऑक्टोबर १९३६ या सभांचा प्रमुख्याने समावेश होता.

शेतकरी चळवळीची यशस्वीता :—

बुलडाणा, अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे हितासाठी असंख्य पुढारी झाले होते. जिल्ह कौन्सिल, प्रांतीक विधीमंडळे यांचेकडे शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी, सावकारी कर्जातून सुटका व्हावी, कर्जाचा दर सरकारने ठरवाव, आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख शेतकऱ्यांना व्हावी याबरोबरच सरकारने केलेल्या विविध कायद्याची अंमलबजावणी करावी यासाठी सतत शेतकरी वर्ग विविध परिषदांचे आयोजन करून आपल्या मान्य मांडण्याचे कार्य करीत होता. पंढरीनाथ पाटील, आनंदस्वामी, गणपतराव पाटील, कृष्णराव पाटील यासारखे असंख्य शेतकऱ्यांचे नेते शेतकऱ्यांना संघटीत करण्यासाठी पुढाकार घेत होते. शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करणारे विविध ठराव मान्य करून ते ठराव प्रांतिक सरकारकडे पाठविण्याचे कार्य करीत होते. वऱ्हाड प्रांतातील शेतकऱ्यांचा असंतोष वाढत असतानाच त्याला संघटनात्मक बांधणी करण्यासाठी इ.स. १९३३ मध्ये वऱ्हाडाचे मंत्री पंजाबराव देशमुख यांनी पुढाकार घेतला शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रांतिक विधीमंडळाकडे मांडलेल्या कर्ज लवाद कायद्याचा पाठपुरावा करून असंख्य शेतकरी नेत्यांच्या सहकार्याने तो पारित करून घेतला. या कायद्याची अंमलबजावणीही व्हावी यासाठी शेतकऱ्यांना लढा उभारावा लागला हा कायदा वऱ्हाड प्रांतातील जिल्ह्यामध्ये लागु झाल्यानंतर वऱ्हाड प्रांतातील शेतकऱ्यांना अल्पसा दिलासा मिळाला.

संदर्भ साधने :—

१. मुळ प्रसिध्दी पत्रक जिल्हा स्तरीय शेतकरी सभा मेंढळी ता. मलकापूर, इ.स. १९२४.

२. मुळ प्रसिध्दी पत्रक शेतकरी सभा येरळी, ता. मलकापूर, इ.स. १९३३.

३. मुळ प्रसिध्दी पत्रक मलकापूर शेतकरी परिषद, देवधाबा, ता. मलाकपूर, इ.स. १९३६.

४. मलकापूर तालुका शेतकरी परिषद मेंढळी, ता. मलकापूर, इ.स. १९३६.

५. वानखडे डॉ. किशोर, पश्चिम विदर्भातील सामाजिक चळवळी, आधार प्रकाशन, अमरावती, इ.स. जुलै २०२१.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No.36 Sept-Oct 2023

भारतीय इतिहास लेखनातील बदलत्या प्रवाहाचा अभ्यास

प्रा श्रीपाद सतीश वाणी
इतिहास विभाग,
भुसावळ कला, विज्ञान आणि पु. ओं. नाहाटाए, वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ, जि. जळगाव
Corresponding Author- प्रा श्रीपाद सतीश वाणी
DOI- 10.5281/zenodo.10360541

Abstract-

संशोधन लेखामध्ये भारतीय इतिहास लेखनामध्ये होणारे बदल दर्शविले आहेत. मनुष्य स्वभाव किंवा त्याचा काळ बदलला की इतिहास लेखन कला बदलत जाते. इतिहास म्हणजे 'जित्यांचा इतिहास' असे सुरुवातीला म्हटले जात होते म्हणजेच त्या इतिहासातील नायकाबद्दल लिहिलेली माहिती ही आपल्याला सुरुवातीच्या इतिहास लेखनातून मिळते. आज आपण समासाबाहेरील व्यक्तीचा शोध हा इतिहासामध्ये घेत आहोत. इतिहास समजण्यासाठी आपल्याला इतिहास लेखनशास्त्र समजले पाहिजे. इतिहास कोणी कोणासाठी लिहिला यावरून त्याचे इतिहास लेखन निर्माण होते. आधुनिक भारताच्या इतिहासात सुरुवातीच्या कालखंडाचा जो इतिहास लिहिला गेला आहे तो ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी दृष्टिकोनातून लिहिला गेलेला आहे. त्याला उत्तर म्हणून नंतरच्या काळात भारतीय इतिहासकारांनी राष्ट्रवादी विचारांनी नवीन असे इतिहास लेखन त्याला प्रत्युत्तर म्हणून निर्माण केले. इतिहास लेखनशास्त्र हे काळसापेक्ष आहे. आधुनिक भारताच्या सुरुवातीला जशी साम्राज्यवादी व राष्ट्रवादी लेखन निर्माण झाले त्याचप्रमाणे नंतरच्या काळात अनेक नवीन इतिहास लेखन हे निर्माण झाले उदाहरणार्थ सबाल्टन इतिहास लेखन शास्त्र, मार्क्सवादी इतिहास लेखनशास्त्र, स्त्रीवादी इतिहास लेखनशास्त्र इ.

प्राचीन भारतीय कालखंडाचा अभ्यास करायचा असल्यास प्रामुख्याने धार्मिक इतिहासलेखन हे उपलब्ध आहे. मध्ययुगामध्ये मराठा साम्राज्याचा विचार केला तर मुघल इतिहासलेखन मराठ्यांना लुटारू किंवा दुरयम वागणूक देते तर मराठी इतिहासकार त्यांच्या इतिहासात राष्ट्रवादी नैतिकतेचे व प्रामाणिकपणाचे अधिष्ठान मराठी सत्तेला त्यांच्या इतिहासलेखनात दर्शवितात.

की वर्ड्स : इतिहास, भारतीय इतिहास लेखन, इतिहास लेखनातील विचारप्रवाह.

प्रस्तावना :

भारताचा इतिहास हा सहा ते सात हजार वर्ष प्राचीन आहे, त्यामुळे ऐतिहासिक सांस्कृतिक प्रचंड असा एक मोठा वारसा हा आपल्यापुढे आहे. या प्राचीन इतिहासात विविधता आहे. मेसोपोटेमियाअन संस्कृतीपासून भारतीय व्यापार हा सुरु आहे, या हजारो वर्षांच्या इतिहासात भारताने अनेक राज्य साम्राज्य पाहिले आणि या सर्व कालखंडात ऐतिहासिक ठिकाणे आपल्याला आढळतात. पहिल्या भारतीय नागरीकरण सिंधू संस्कृतीत लिखित साधने मिळाली आहे, पण त्याचा अर्थ लावण्यात इतिहासकारांना शक्य झाले नाही हे सर्व काळात प्रवास वर्णन, धार्मिक साहित्य, रामायण, महाभारत, जातक कथा ,जैन ग्रंथ असे विविधांगी विपुल असे लेखन झाले आहेत. काही काळाच्या वर टिकून राहिले तर बहुतांश आणि नैसर्गिक आणि मानवी आपत्तीमुळे नष्ट झाले.

भारतीय परंपरेत लेखी साहित्यापेक्षा मौखिक साहित्य, परंपरा एकाकडून दुसऱ्या पिढीकडे सांगितली जातात असा समज आहे आणि त्याचबरोबर ऐतिहासिक लेखन परंपरा नव्हती असा एक समज नेहमी आहे. या समजाला रजतरांगणी, अर्थशास्त्र, गाथा सप्तशती, अष्टाध्यायी, हर्षचरित्र, उपनिषद, पद्मावत, अकबरनामा असे काही ग्रंथ दूसरी बाजू दाखवतात. इतिहास लेखनाचे प्रामुख्याने वैशिष्टय सांगितले जाते की, तो तटस्थ कोणत्याही वैचारिक प्रभाव नसलेला असावा पण बहुतेक वेळा लेखक विविध पातळीवर त्याच्या कळत नकळत विचारांनी बांधला असतो. त्याची समाज परिस्थिती, लोकप्रवाह, भौगोलिक परिस्थिती, राजकीय परिस्थिती असे असंख्य दृष्टिकोन हे त्याच्या लेखनात उमटत असते. इतिहासात विविध अंगीभूत वैचारिक परिणाम असतो. 'इतिहास म्हणजे पुराव्याने निश्चित केलेला तथ्यांचा संग्रह. '[1] इतिहास म्हणजे काय या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न करतो तेव्हा आपल्याला उत्तरात आपण ज्या काळात जगत असतो त्या काळाची प्रतिमा पडणार हे उघडच आहे. इतिहास लेखन स्वतंत्र विषय नसून त्याचे अवलंबित्व त्याला सहाय्य करणाऱ्या प्रत्येक शास्त्रात असते, 'इतिहास म्हणजे इतिहासकाराने केलेली इतिहासाची पुनर्बांधणी.'[2] सुरवातीच्या काळात नायक हिरो हा मध्यबिंदू म्हणून इतिहास लेखन केले जात होते. हे प्रकार बदलून आता अनेक बाजूला मांडलेल्या घटना मनुष्य समाज यांचा इतिहास दिला जातो, बघितला जातो.

भारतीय प्राचीन इतिहास लेखन :

काही इतिहासकारांना भारतात प्राचीन कालखंडात इतिहास लेखन करण्याची कला माहित नव्हती असे म्हणतात. तर काही मतांप्रमाणे प्राचीन काळात इतिहासात विपुल लेखन झाले, पण बहुतेक भाग काळाच्या स्वाधीन झाला तर एक मोठा हिस्सा परकीय आक्रमणाच्या स्वारीत नष्ट झाला. डॉक्टर शेख अली यांच्या मतानुसार तत्त्वज्ञान, नाट्यशास्त्र, व्याकरण, ज्योतिष, वैद्य कला, वास्तुकला यांवर आधारित विस्तृत असे लेखन उपलब्ध आहेत. तेव्हा आपण प्राचीन भारतीय इतिहास लेखन मानले पाहिजे.

रामायण, महाभारत, अर्थशास्त्र, विक्रमदेव चरित्र, कादंबरी, प्रबंधचिंतामणी ही भारतीय प्राचीन इतिहास लेखनाची उदाहरणे आहेत.

भारतीय मध्ययुगीन इतिहास लेखन :

मध्ययुगीन इतिहास लेखन हे बहुतांश इस्लामी आक्रमणानंतर इतिहासकारांनी निर्माण केले आहे. दिल्लीच्या सुलतानशाही कालखंडापासून हे इतिहास लेखन सुरू होते. या कालखंडात अत्यंत मोठे विस्तृत पद्धतीने इतिहास लेखन झाले आहे. धार्मिक इतिहासासोबत सामाजिक रुढी-परंपरा, आर्थिक जीवन, व्यापार, कायदे यांचे लेखन झाले. मध्ययुगीन कालखंडाबद्दल व्यापार आणि प्रवास यातून इतिहास लेखन झाले आहे. मध्ययुगीन भारतीय इतिहास लेखन दोन टप्यात विभागाता येते :

१ सुलतानशाही कालखंड

२ मोगल कालखंड

सुलतान काळापेक्षा मोगल कालखंडातील इतिहास लेखन अधिक परिपक्व जाणवते. मोगल कालखंडात लेखनाबद्दल विविधता निर्माण झाली. सामाजिक संस्था, समाज, आर्थिक जीवन, व्यापारी, संस्कृ ती या जीवनाच्या विविध अंगाचे लिखाण या काळात झाले. मुघल कालखंडात इतिहास लेखन अतिशय विस्तृत परिपूर्ण आणि मोठ्या प्रमाणात झाले आहे. पहिल्या मुघल बादशहा बाबर यांना स्वत: दैनंदिन लिहिण्याची सवय लावली असल्यामुळे समरकंद ते दिल्ली अशी विस्तृत माहिती प्राप्त झाली. मुघल दरबारात राज्यसत्तेकडून दरबारातील दैनंदिन घटना लिहिण्याचा प्रकार सुरू झाला होता. मुघल काळखंडात इतिहास लेखनशास्त्र म्हणून पाहण्यात आले.

सुलतान कालखंडातील इतिहास लेखन अमीर खुसरो, इबन बतुता, फेरिश्ता असे इतिहासकार महत्वपूर्ण योगदान देतात. मुघल काळात अबू फझल, खाफीखान, गुलबदन बेगम असे इतिहासकार झाले.

भारतीय आधुनिक इतिहास लेखन :

भारतीय स्वातंत्र राज्य नष्ट पावली, त्यानंतर १८५८ चा कायद्यानुसार पूर्णपणे इंग्रजी सत्ता भारतावर राज्य करू लागली. या काळाखंडात ब्रिटिशांनी शास्त्रीय अशा दृष्टिकोनातून नवीन इतिहास लेखन केले. सत्तेमुळे ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारताचा एक नव्या दृष्टिकोनातून भारतीय इतिहासाचे शास्त्रीय पद्धतीने लिखाण केले. पत्रव्यवहार, दरबार त्यांच्या आठवणी, सामाजिक चालीरीती, जाती, धर्म, भूगोल, परंपरा, राजसत्ता, वनस्पती, प्राणी अशा विविध अंगी विषयांचा अभ्यास शास्त्रीय पद्धतीने झाला आणि नवीन इतिहास लेखन शैली निर्माण झाली. आधुनिक ब्रिटिश इतिहास लेखनातून भारतीय इतिहासाचे दोन प्रवाह निर्माण झाले.

१ पुराणतवादी (ओरिएंटल, इंडोलॉजीकल) :

भारताचा शोध घेऊन इतिहास लेखन केले. भारतीय प्राचीन परंपरा ज्ञान हे त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. भारतीय शिलालेख, ग्रंथ यांचा शास्त्रीय अभ्यास त्यांनी केला. भारतीय ज्ञान शोधण्यासाठी रॉयल एशियाटिक सोसायटीची स्थापना ,एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल ची स्थापना करण्यात आली, ब्राह्मी, पाली अशा लिपी शोधून अशोका, चंद्रगुप्त, गुप्त साम्राज्य, कनिष्क हा भारतीय इतिहासाचा सुवर्णकाळ होता असे लिखाण केले. विल्यम जोन्स, जेम्स प्रिन्सेप हे या विचारप्रणालीचे प्रमुख इतिहासकार होते.

२ साम्राज्यवादी(कोलोनियल, इम्पेरियलस्टिक) :

या कालखंडात इतिहास लेखनाचा हा विचार निर्माण झाला की, भारत पूर्णपणे रानटी अप्रगत असा देश आहे. अशा दृष्टिकोनातून भारतीय इतिहास लेखन झाले. रुदयार्ड किपलिंग यांच्या सिद्धांतानुसार याला व्हाइट मॅन बर्डन असे म्हटले जाते. म्हणजे देवाने अप्रगत रानटी अशा भारताला सुधारण्यासाठी ब्रिटिशांची निवड केली. या इतिहास लेखनाचे प्रमुख जेम्स मिल, मोरलॅंड असे इतिहासकार होते.

राष्ट्रवादी इतिहास लेखन :

१९ व्या शतकात इंग्रजी शिक्षण पद्धतीमध्ये शिकून तयार झालेला भारतीय तरुण भारताच्या प्राचीन वैभवाचा व जाणिवेचा भारतीय जनमानसात अस्मिता जागृत करण्यासाठी या लेखनाची सुरुवात झाली या कालखंडाला राष्ट्रवादी इतिहास लेखन असे म्हणतात. ब्रिटिशांनी भारताचे उभारलेले खोटे वर्णन प्राचीन पुरावांच्या आधारे यांनी खोडून काढले व वसाहत काळात ब्रिटिशांनी भारतावर जो अत्याचार व शोषण याचे वर्णन केले. प्राचीन ग्रंथ, इतिहास लेख, पुराभिलेख शास्त्र, पुरातत्त्वशास्त्र अशा साधनांचा वापर करून भारतीय प्राचीन इतिहास ह्या इतिहास लिखाणातून समोर आला वेदांचा कालखंड ,सिंधु संस्कृतीचा अभ्यास यावरून भारतीय समाजाचे प्राचीनत्व सिद्ध झाले.

राष्ट्रवादी इतिहास लेखनातून राष्ट्रवादी विचार, धर्म, भाषा, संस्कृती राष्ट्रनिष्ठा, समर्पण, त्याग, बलिदान इत्यादींची जपणूक केली गेली. साम्राज्यवादी इतिहास लेखन खोडण्याबरोबर राष्ट्रवादी इतिहास लेखनाची प्रमुख अशी उद्दिष्ट होती.

- भारतीय इतिहास व संस्कृती यावर ब्रिटिशांनी केलेल्या मांडणीची नव्याने इतिहास लेखन करणे.
- परकीय इतिहास लेखनातून निर्माण झालेले गैरसमज दूर करणे.
- भारतीयांमध्ये निर्माण झालेला न्यूनगंड नवीन इतिहास लेखनातून नाहीसा करणे.
- ऐतिहासिक साधनांचे निरीक्षण करून इतिहासाचे भारतीय दृष्टीने पुनर्लेखन करणे.

राष्ट्रवादी दृष्टिकोनातून भांडारकर यांनी द अर्ली हिस्ट्री ऑफ डेक्कन, अर्ली हिस्ट्री ऑफ इंडिया असे महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहून प्राचीन भारताचे इतिहास लेखन केले. भांडारकर रोमेशचंद्र दत्त, राधा कुमुद मुखर्जी, गो. स. सरदेसाई, नीलकंठ शास्त्री, आर. सी. मुजुमदार, मोहम्मद हबीब ही राष्ट्रवादी इतिहास लेखनाची प्रमुख नावे आहेत.

मार्क्सवादी इतिहास लेखन :

भारतीय स्वातंत्र्यानंतर एक नवीन इतिहास लेखन प्रवाह विकसित झाला. यात विचार होता की, ब्रिटिश इतिहास लेखन पद्धत चुकीची आहे पण त्यासोबत राष्ट्रवादी इतिहास लेखनाबद्दल काही प्रमाणात चुकीच्या पद्धतीने मांडण्यात आलेला आहे. ब्रिटिश काळात राष्ट्रवादी भावना निर्माण करण्याची गरज वाटत असल्याच्या कारणामुळे याची निर्मिती झाली होती. आता स्वातंत्र्य

प्राप्तीनंतर या विचारांची आवश्यकता नसल्यामुळे भारतीय इतिहास लेखनाचे नव्याने बांधणी होण्यासाठी काल मार्क्स यांची विचार प्रणाली प्रमाणभूत मानून पुन्हा नवीन पद्धतीने इतिहास लेखन झाले. कार्ल मार्क्सच्या म्हणण्यानुसार इतिहास म्हणजे समाजातील निरंतर विकासाची कहाणी. ज्यामध्ये परिवर्तनाची शक्ती स्त्रोत उत्पन्नासंबंधी भौतिक परिस्थिती अंतर्भूत असते. भारतीय इतिहास लेखनात वर्ग संघर्ष हा वर्ण आणि जाती संघर्षाच्या माध्यमात घेण्यात आला. मार्क्सवादी इतिहास लेखन पद्धतीमध्ये पहिल्यांदा इतिहास लेखन राज्यापासून समाज आणि लोकांच्या सामाजिक आर्थिक जीवनाशी लिखाण करणारे होते. सामान्य लोकांच्या जीवनाच्या जीवनाशी इतिहास लेखन केंद्रित झाले. डी. डी. कोसंबी रोमिला थापर, आर. एस. शर्मा, बिपिनचंद्र इरफान हबीब या विचारकांनी इतिहास लेखन केले

सबाल्टन इतिहास लेखन :

सबाल्टन इतिहास लेखन हा नवीन इतिहास लेखन दृष्टिकोन भारतीय परंपरेमध्ये अलीकडच्या काळामध्ये सुरू झालेला आहे. सबाल्टन म्हणजे कमी दर्जाचा, खालच्या दर्जाचा अधिकारी. म्हणजेच समाजातील कमी लेखलेल्या दर्जातील व्यक्ती. जसं समाजामध्ये समाजाबाहेरील व्यक्ती ज्या व्यक्तीला इतिहासामध्ये कधी स्थान नव्हते, त्याचा विचार केला गेला नाही. अशा व्यक्तींचा अशा सामाजिक जाणिवेचा अभ्यास करणे, इटालियन विचारवंत अँटेनियो ग्रामसे यांनी ही लेखनशैली पहिल्यांदा वापरली. भारतीय परिपक्षात पहिल्यांदा या विचारसरणीचा वापर १९८४ मध्ये रणजीत गोवा यांनी भारतात जाती आणि वर्ण शेतकरी, शेतमजूर अशा घटना यामध्ये समाविष्ट केले.

निष्कर्ष :

- इतिहासाला नवीन दिशा देण्यासाठी इतिहासाचे पुनर्लेखन आवश्यक आहे.
- नवीन साधने, विचार, सामाजिक गरज, इतिहास पुनर्लेखनासाठी सहायक ठरतात.
- इतिहास लेखन हे परिस्थितीसापेक्ष असते.
- इतिहास हा ठराविक वर्गाचा नसून तो पूर्ण समाजाचा आहे.

संदर्भ :

1. कोठेकर डॉ. शांता - इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, सहावी आवृत्ती, २०२१.
2. राजदेरकर सुहास - इतिहास लेखनशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, १९९८.
3. Sheikh ali b., History, it's theory and method, MacMillan, 1981.
4. Shreedharan E., a textbook of historiography 500 bc to ad 2000, orient Blackstone private limited, New Delhi, first Ed. 2004.
5. Shreedharan E., a manual of historical research methodology, center for south Indian studies, Trivandrum, 2007.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No.36 Sept-Oct 2023

" विदर्भातील सहकारी चळवळीची वाटचाल - एक तुलनात्मक अध्ययन "

डॉ. विष्णु एकनाथ घुमटकर
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, श्रीमती सु.रा. मोहता महिला महाविद्यालय खामगाव.
Corresponding Author- डॉ. विष्णु एकनाथ घुमटकर
DOI- 10.5281/zenodo.10360549

प्रस्तावना :

सहकार ही लोकशाही, चारित्र्य, बंधुभाव शांतता आणि प्रगती च्या अधिष्ठानावर आधारलेली एक आदर्श समाजव्यवस्था आहे. मानवाच्या सर्वांगीण प्रगतीचे मूळ हे सहकारात आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत अनेक प्रकारचे दोष आढळून येतात. ज्यामध्ये उत्पादनाच्या साधनांवर मर्यादित व्यक्तींचा अधिकार, आर्थिक दृष्ट्या दुर्बलांचे शोषण, वर्गसंघर्ष संपत्तीचे असमान वितरण इत्यादी. यामुळे भांडवलशाही अर्थव्यवस्थेस पर्याय म्हणून सहकारास महत्त्वाचे स्थान आहे. भारताच्या आर्थिक विकासात सहकार क्षेत्राची भूमिका ही महत्त्वपूर्ण राहिलेली आहे. ज्या भौगोलिक क्षेत्रात सहकार चळवळ यशस्वीपणे पोहोचू शकली त्या क्षेत्राचा विकास झपाट्याने झाल्याचे दिसून येते.

शोध निबंधाची उद्दिष्टे:-

महाराष्ट्रातील व विदर्भातील सहकारी चळवळीचा अभ्यास करून प्रादेशीक दृष्ट्या सहकारी चळवळीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

संशोधन पद्धती.:-

सदर शोधनिबंधा करिता द्वितीय साधन सामग्रीचा वापर केलेला आहे. यामध्ये सहकार क्षेत्रावर आधारित पुस्तके, महाराष्ट्र सरकार द्वारा प्रकाशित विविध प्रकाशने, सहकार क्षेत्राद्वारे प्रकाशित विविध प्रकाशने यांचा आधार घेतलेला आहे.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विकास:-

महाराष्ट्र राज्य हे देशातील आर्थिक दृष्ट्या एक प्रगत राज्य आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात सहकारी चळवळीची भूमिका महत्वाची राहिलेली आहे. महाराष्ट्रात कापड गिरण्या, साखर उद्योग, अधिकोषण व इतर अन्य उद्योगांच्या विकासात सहकाराचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीने या राज्याच्या आर्थिक , सामाजिक व राजकीय जीवनात महत्त्वाचे स्थान मिळविले आहे. जनतेचा पुढाकार व शासनाचा सहभाग यातून ही सहकार चळवळ अधिक विकसित झालेली आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागाचे आर्थिक व सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यात सहकारी चळवळीचा वाटा सिंहाचा आहे. सहकारी चळवळ केवळ पतपुरवठा करण्यापुरतीच मर्यादित नसून त्यात लघुउद्योग, प्रक्रिया उद्योग, कृषी पूरक उद्योग, सेवा व्यवसाय, गृहनिर्माण इत्यादी पर्यंत ही चळवळ व्यापक झालेली आहे. सहकार महर्षी विखे-पाटील, वैकुंठभाई मेहता, धनंजयराव गाडगीळ, वसंतदादा पाटील, गोपाळ कृष्ण गोखले, विठ्ठलदास ठाकरसी, रत्नाप्पा कुंभार , तात्यासाहेब कोरे, यशवंतराव चव्हाण इत्यादी मान्यवरांचे महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या विकासात मोठे योगदान आहे. महाराष्ट्रात सहकारी चळवळीने हरितक्रांती, धवलक्रांती, औद्योगिक क्रांती घडून आलेली दिसून येते. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विकास खालील तक्त्यावरून स्पष्ट होतो.

(तक्ता क्रमांक-१) महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विकास दर्शक तक्ता

वर्ष	एकूण सहकारी संस्थांची संख्या	एकूण सभासद संख्या (लाखात)	एकूण भांडवल (कोटीत)	एकूण ठेवी (कोटीमध्ये)	एकूण कर्ज पुरवठा (कोटीमध्ये)
१९६१	३१५६५	४२	५३	७६	९५
१९७१	४२६०३	८६	२३८	३१५	३४८
१९८१	६०७४७	१४८	६००	१९३९	१११६
१९९१	१०४६२०	२७०	१९५७	११०४८	६३००
२००१	१५८०१६	४३०	७५६०	७४६४२	४३३९२
२०१६	१९६९०७	५३०	१९९४५	१६९४२५	१४७३७६
२०१७	१९५३०१	५४६	२०८९२	१७९२०९	१४९७४४

स्रोत- https://sahakarayukta.maharashtra.gov.in, महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टिक्षेपात- वार्षिक अंक

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की १९६१ ते २०१६ पर्यंत महाराष्ट्रातील सहकारी संस्थांच्या संख्येत सातत्याने वाढ झालेली दिसून येते. 1961 मध्ये एकूण सहकारी संस्था ३१५६५ असून त्या २०१६ मध्ये १९६९०७ झाल्या. परंतु त्यानंतर मात्र संस्थांच्या संख्येत घट होतांना दिसून येते. २०१७ मध्ये एकूण सहकारी संस्थांची संख्या १९५३०१ दिसून येते. परंतु एकूण सभासद संख्येमध्ये, भाग भांडवलामध्ये, ठेवी व कर्जपुरवठ्यामध्ये सातत्याने वाढ झालेली आहे .

विदर्भाचा थोडक्यात परिचय :-

विदर्भ हा महाराष्ट्र राज्याच्या ईशान्य दिशेला असलेला एक नैसर्गिक साधन संपत्तीने संपन्न असलेला प्रदेश आहे. विदर्भाचे क्षेत्रफळ ९७३२१ चौ. किमी. असून, महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळाच्या ३१.६ टक्के आहे. तर विदर्भात वास्तव्य करणारी लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार २.३० कोटी असून ती महाराष्ट्राच्या लोकसंख्येच्या २१.३ टक्के आहे. विदर्भाची अर्थव्यवस्था कृषिप्रधान असून या प्रदेशात कापूस, संत्री, सोयाबीन, ज्वारी बाजरी तुर इत्यादी प्रमुख पिके घेतली जातात. विदर्भ हा वनसंपत्ती ने आणि खनिज संपत्तीने संपन्न असा प्रदेश आहे. महाराष्ट्रातील सर्व व्याघ्र प्रकल्प विदर्भात असलेली दिसून येतात यामध्ये प्रामुख्याने मेळघाट, ताडोबा, पेंच यांचा उल्लेख करावा लागेल. या ठिकाणी जंगल पर्यटनासाठी लोक संपूर्ण भारतामधून येत असल्याचे दिसून येतात. विदर्भात प्रामुख्याने कोळसा आणि मॅगनिजच्या मोठ्या प्रमाणात खाणी आहेत. विदर्भात नागपूर, अमरावती, चंद्रपूर, अकोला, वर्धा ,बुलढाणा, यवतमाळ, भंडारा ,गोंदिया, वाशिम आणि गडचिरोली अशा एकूण अकरा जिल्ह्यांचा समावेश होतो.

विदर्भातील सहकारी चळवळीचा विकास:-

विदर्भ हा पश्चिम महाराष्ट्राच्या, व मराठवाड्याच्या तुलनेत आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे. सहकारी चळवळ ज्याप्रमाणे पश्चिम महाराष्ट्रात व मराठवाड्यात यशस्वी होऊ शकली. त्या प्रमाणात ती विदर्भात होऊ शकलेली नाही. विदर्भाच्या मागासलेपणाची जी अनेक कारणे आहेत. त्यातील एक महत्त्वाचे कारण सहकाराच्या बाबतीतही सांगितले जाते. विदर्भातील सहकारी चळवळीची वाटचाल पुढील तक्त्यावरून स्पष्ट होते.

(तक्ता क्रमांक-२) विदर्भातील जिल्हानिहाय सहकारी चळवळ दर्शक तक्ता.

जिल्हा / वर्ष	२००४	२००६	२००९	२०१५	२०१७
बुलढाणा	१९०१	२२३५	२६५१	१८१२	१७३१
अकोला	१६३६	१७८४	१९१७	१९१५	१२६२
वाशिम	१०२०	११३८	१३३५	१२५२	१०९८
अमरावती	२५७१	२८५२	३२३७	२९८७	२१४८

यवतमाळ	२४२३	२६१५	२९७८	२६१०	१८७५
वर्धा	१६३५	१७६९	१८७५	१०७९	९५०
नागपूर	४३०७	४७०५	४९५९	४२०९	३५५१
भंडारा	१४०१	१५५१	१७७६	१४८६	१२७९
गोंदिया	१०८५	१३२५	१७९७	१४१२	१२५२
चंद्रपूर	१७५८	१९५८	२१५७	१४८५	१३८०
गडचिरोली	७७४	८१३	९२६	६५८	५५७
एकुण संस्था	**२०५११**	**२२७४५**	**२५६०८**	**२०८९५**	**१७०८३**

स्त्रोत- https://sahakarayukta.maharashtra.gov.in, प्रकाशने - -सहकार आयुक्त आणि निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की, विदर्भातील जिल्हानिहाय सहकारी संस्थांच्या संख्येत सुरुवातीला वाढ झालेली व अलीकडील काळात घट झालेली दिसून येते. विदर्भात नागपूर जिल्ह्यामध्ये सर्वाधिक सहकारी संस्थांची संख्या दिसून येत असून गडचिरोली जिल्ह्यामध्ये सर्वात कमी सहकारी संस्था असलेल्या दिसून येतात. अलीकडील काळात सहकारी संस्थांच्या संख्येत सतत घट होताना दिसून येते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे सहकार क्षेत्रात वाढलेला भ्रष्टाचार, वाढलेले भ्रष्ट राजकारण, स्वार्थी नेतृत्व इत्यादी होय.

(तक्ता क्रमांक-३) विदर्भातील जिल्हानिहाय व प्रकारनिहाय सहकारी संस्था- वर्ष २०१७

		जिल्हा[1]										
अ. क्र.	**संस्थांचा प्रकार**	**बुलढाणा**	**अकोला**	**वाशिम**	**अमरावती**	**यवतमाळ**	**वर्धा**	**नागपूर**	**भंडारा**	**गोंदिया**	**चंद्रपूर**	**गडचिरोली**
१	**प्राथमिक शेती पतसंस्था**	५६६	४११	४२४	५८०	५०२	३३९	५७४	३६७	२८९	३३२	१३४
२	**कृषक सेवा संस्था**	१	१	-	-	१	-	-	१	१	-	-
३	**आदिवासी संस्था**	-	-	-	३३	९२	२	१३	-	३९	६३	१२०
४	**सहकारी बँका**	९	३	१	११	४	५	१६	-	२	४	२
५	**पगारदार नोकरांच्या पतसंस्था**	१७२	१६५	६६	२३८	१४१	८६	३७६	४०	५७	१७३	५७
६	**बिगरशेती पतसंस्था**	२३७	५२	४२	१०७	१००	११९	७२०	१००	१५१	२०७	४६
७	**पणन संस्था**	१९	१४	८	२०	१७	१४	१४	६	६	११	६
८	**साखर कारखाने**	-	-	-	-	१	१	-	-	-	-	-
९	**भात गिरण्या**	-	-	-	-	-	-	२	१६	-	१२	५
१०	**सूतगिरण्या**	३	३	२	२	४	-	-	-	-	-	-
११	**विणकर संस्था**	२	१	३	१	-	१	५१	१	-	-	-
१२	**ग्राहक भांडार**	१९	१४	८	९६	३०	३६	१९१	८	१४	१६	-
१३	**गृह रचना संस्था**	८५	९४	६४	३६५	१२७	६८	७६६	४४	३०	६४	७
१४	**दुग्ध व पशु संस्था**	८९	२०३	१३६	१३२	३७	७४	९९	२७४	१४८	१२	११
१५	**औद्योगिक संस्था**	९९	५२	२९	५२	७२	२४	११४	२५	४६	३०	१२
१६	**मच्छीमार संस्था**	१७८	५९	१५४	६८	१९५	३५	१०९	१३८	१३४	१५६	६७

1

१७	जलसिंचन संस्था	३९	४	२०	४१	७२	१४	५	३३	२९	२३	-
१८	जंगल कामगार संस्था	१	४	२	९	१८	१८	१९	१६	१६	४	२७
१९	मजूर संस्था	१२६	७२	६४	९७	१३९	३८	१२५	१०४	१०६	९४	२७
२०	औद्योगिक वसाहत संस्था	१	-	१	३	-	१	१	१	-	१	०
२१	इतर सहकारी संस्था	८५	११०	७४	२९३	३२३	७५	३५६	१०५	१८४	१७८	३६
एकुण सहकारी संस्था		१७३१	१२६२	१०९८	२१४८	१८७५	९५०	३५५१	१२७९	१२५२	१३८०	५५७

स्त्रोत- महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टिक्षेपात- २०१७,

वरील जिल्हा निहाय व प्रकार निहाय सहकारी संस्थांच्या तक्त्यावरून दिसून येते की विदर्भात सर्वाधिक सहकारी संस्था अमरावती जिल्ह्यामध्ये असून त्यांची संख्या ३५५१ एवढी आहे. तर सर्वात कमी सहकारी संस्थांची संख्या गडचिरोली जिल्ह्यामध्ये असून त्यांची संख्या ५५७ एवढी आहे. विदर्भात सहकारी संस्थांचे अनेक प्रकार दिसून येतात. त्यापैकी सर्वाधिक सहकारी संस्थांची संख्या प्राथमिक शेती पतसंस्थांची दिसून येते. तर सर्वात कमी संख्या सहकारी साखर कारखान्यांची दिसून येते .

प्रादेशिकदृष्ट्या सहकारी संस्थांचे तुलनात्मक अध्ययन:-

महाराष्ट्रामध्ये प्रादेशीक दृष्ट्या विदर्भ मागासलेला राहण्याच्या अनेक कारणांपैकी एक महत्त्वाचे कारण म्हणजे विदर्भात सुदृढ सहकारी चळवळीच्या विकासाचा अभाव होय. पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यामध्ये ज्या प्रमाणात सहकारी चळवळ विकसित झाली त्या तुलनेत विदर्भात होऊ शकली नाही हे खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

(तक्ता क्रमांक-४) तुलनात्मक अध्ययन दर्शक तक्ता.

प्रादेशिक विभाग / वर्ष	२००४	२००६	२००९	२०१५	२०१७[2]
पश्चिम महाराष्ट्र (समाविष्ट जिल्हे-७)	७१३३८	७५५४९	७९१५१	६६३४७	६४८२३
मराठवाडा (समाविष्ट जिल्हे-८)	२५००५	२७९८१	३०२१४	२५५०२	१८२४४
विदर्भ (समाविष्ट जिल्हे- ११)	२०५११	२२७४५	२५६०८	२०८९५	१७०८३

स्त्रोत- महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टिक्षेपात- वार्षिक अंक २००४, २००६, २००९, २०१५,२०१७

2

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की २००४ मध्ये विदर्भातील सहकारी संस्थांची संख्या केवळ २०५११ होती परंतु पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी संस्थांची संख्या तिप्पटी पेक्षाही जास्त म्हणजेच ७१३३८ होती. असाच फरक वर्ष २००६, ००९, २०१५ व २०१७ मध्ये असलेला दिसून येतो. वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अलीकडील काळात पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भातील सहकारी संस्थांच्या संख्येमध्ये घट होतांना दिसून येते परंतु इतर प्रादेशिक विभागांच्या तुलनेत विदर्भातील सहकारी संस्थांच्या संख्येत घट होण्याचा वेग अधिक असल्याचे दिसून येते.

निष्कर्ष:-

1. महाराष्ट्रातील सहकारी संस्थांच्या संख्येत २०१६ पर्यंत वाढ झालेली दिसून येते. परंतु त्यानंतर मात्र सहकारी संस्थांच्या संख्येत घट होतांना दिसून येते
2. महाराष्ट्रात विविध प्रकारच्या सहकारी संस्थांचा विकास झालेला दिसतो.
3. विदर्भात सर्वाधिक सहकारी संस्था नागपूर जिल्ह्यामध्ये व सर्वात कमी संस्था गडचिरोली जिल्ह्यामध्ये दिसून येतात.
4. विदर्भात सर्वाधिक सहकारी संस्था प्राथमिक शेती पतपुरवठ्या संदर्भात दिसून येतात. तर सर्वात कमी संस्था सहकारी साखर कारखान्यां संदर्भात दिसून येतात.
5. विदर्भाच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी संस्थांची संख्या चारपट अधिक असलेली दिसून येते. २०१७ मध्ये विदर्भातील एकूण सहकारी संस्थांची संख्या १७०८३ असून पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी संस्थांची संख्या ८४८२३ असलेली दिसून येते.
6. मराठवाड्यातील सहकारी संस्थांची संख्या विदर्भातील सहकारी संस्थांच्या तुलनेत अधिक आहे. परंतु यामध्ये असलेला फरक अल्प आहे. २०१७ मध्ये मराठवाड्यातील एकूण सहकारी संस्थांची संख्या १८२४४ आहे.
7. अलीकडील काळात विदर्भातील सहकारी संस्थांची संख्या पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत अधिक वेगाने कमी होत आहे.

आज सहकार क्षेत्रासमोर अनेक समस्या असल्या तरी महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात सहकार क्षेत्राची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. आज आर्थिक सत्तेचे वाढते केंद्रीकरण, देशात वाढती आर्थिक विषमता, ग्रामीण क्षेत्रकडे होत असलेले दुर्लक्ष, घटता रोजगार इत्यादी समस्यांवर सहकार क्षेत्र रामबाण उपाय होऊ शकते. आणि म्हणून विदर्भातच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात सहकार क्षेत्राचे पुनरुज्जीवन करणे अत्यावश्यक आहे.

संदर्भ ग्रंथ सूची:-

1. भराडी पी. ई., कायदे पाटील.- ' भारतातील सहकार'
2. कापडनिस पी. के. - सहकारी महाराष्ट्र.
3. भावसार अनिल, बोंदरे अरविंद, किल्लोळ जगदीश, भारतातील सहकारी चळवळ तत्वे व व्यवहार, नचिकेत प्रकाशन
4. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टिक्षेपात वार्षिक अंक-२००४, २००६, २००९, २०१५, २०१७.
5. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी- अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.
6. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्थांची सर्वेक्षणे.
7. https://sahakarayukta.maharashtra.gov.in
8. https://www.nitinsir.in

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No. 36 Sept-Oct 2023

वऱ्हाडातील गडकिल्ल्यांवरील औषधी वनस्पती

डॉ.किशोर मारोती वानखेडे
संशोधक विद्यार्थी
Corresponding Author- डॉ.किशोर मारोती वानखेडे
DOI- 10.5281/zenodo.10360554

Abstract-

महाराष्ट्र हा प्राचीन काळापासून राजकीय, सामाजिक दृष्टीने अत्यंत महत्वाचा भूभाग राहिला आहे. प्राचीन इतिहासात या प्रदेशाचा उल्लेख महारठ्ठ, तथा महाराष्ट्री म्हणूनही सर्वश्रृत आहे. मध्ययुगीन काळात या प्रदेशाच्या नैसर्गिक साधनसंपत्ती, नद्यांमुळे सुपीक झालेल्या जमिनीमुळे आर्थिक बाबतीने महत्व वाढीस लागले. प्राकृतिक रचनेतही, सह्याद्री पर्वतरांगा महादेवाचे डोंगर बालाघाट डोंगर, सातमाळडोंगर, अजिंठ्याचे डोंगर, सातपुडा पर्वतरांगा निर्मल पर्वतरांगामुळे या प्रदेशाला नैसर्गिक बळकटीच आली आहे. या पर्वत रांगांमध्ये राज्यकर्त्यांनी असंख्य किल्ले बांधत राज्यांचे संरक्षण केले. राजकीय तथा आर्थिक बाबतीत केंद्रस्थाने असलेली ही किल्ले औषधी वनस्पतींनीही परिपूर्ण आहेत. परंतु या अनुषंगाने आजपर्यंत संशोधन झाले नाही. प्रस्तुत शोध निंबधात वऱ्हाडातील गडकिल्ल्यांवरील औषधी वनस्पतींवर लेखन केलेले आहे.

शोध निंबधाचा उद्देश —

१. वऱ्हाडातील गडकिल्ल्यांवरील औषधी वनस्पतींचा शोध घेणे.
२. वनस्पतीचे महत्व किल्ल्याच्या, सैनिकांच्या दृष्टीने अभ्यासणे.
३. वनस्पती तथा किल्ला जतनास प्राधान्य देणे.

वऱ्हाड अर्थात सोन्याची कऱ्हाड ही म्हण इतिहासात प्रसिध्द आहेच याच भागात प्राचीन, मध्ययुगीन तथा आधुनिक काळात राजकीय स्थित्यंतरे घडून आली. सम्राट अशोका पासून लिखित संदर्भीय साधने उपलब्ध आहेत. कनिष्क, वाकाटक, चालुक्य, खिलजी, तुघलक, बहामनी, इमादशाही, मोगल, निजाम, आदिलशाह, मराठा, नागपूरकर भोसले ते ब्रिटीशांपर्यंतचे राज्यकर्त्यांनी या प्रदेशावर राज्य केले. अत्यंत सुपीक आणि विपुल प्रमाणात कर उत्पन्न देणारा हा प्रदेश आपल्याच ताब्यात असावा या दृष्टीने राज्यकर्त्यांत प्रसंगाने युध्देही झाली. हजारो सैनिक या युध्दात बळी पडले तर जखमीही झाले. या जखमी सैनिकांना वऱ्हाडातील किल्ल्यांनी आश्रयही दिला तर शांततेच्या वेळी गडकिल्ल्यांवर शांततही नांदली. राजपरिवारांची निवासस्थाने असलेले हे किल्ले सर्वसामान्यांचेही आश्रयस्थाने म्हणून उदयास आली. वऱ्हाड प्रांतात गाविलगड, नरनाळा, असदगड, अचलपूर, मैलगड, भैरवगड, वसाली, जामोद, जाललखेड, जामनेर, पिंपळडोह, वसाली, झिल्पी आमनेर यांसारखी अनेक सातपुडा पर्वत रांगांमध्ये विराजमान असलेली किल्ले आहेत. या किल्ल्यांवर अनेकांनी संशोधने केलीत. परंतू याच किल्ल्यांवर जखमांवर, आरोग्यवर उपचार करणाऱ्या अनेक औषधी वनस्पती आजही आढळतात. इतिहासातही वैद्यांनी सैनिकांचे, सर्वसामान्यांचे आरोग्याची देखभाल करतांना येथील औषधी वनस्पतींचा आधार घेतला. राजकीय बाबीने महत्वाची असलेली हि किल्ले औषधी वनस्पतीनीही परिपूर्ण आहेत.

नरनाळा, गाविलगड किल्ल्यांवरील औषधी वनस्पती —

सह्याद्री पर्वतरांगा अत्यंत महत्वाची पर्वतरांग आहे. दुर्गम भागात याच पर्वतरांगांवर गडकिल्ल्यांची उभारणी झाली. या किल्ल्यांवर औषधी वनस्पतीही मोठ्या प्रमाणात उगवतात. या औषधी वनस्पती मध्ये कारवी, टोपली कारवी, अबोली, कुंती, त्रिधारी, आमरी, पंचधारी, दगडफुल, खाजकुईरी, रामेण, आमरी, हॅबेनारीचया, मल्टी कॉडेटा, क्रोटोलरिया, पिलीपेस, श्रावण आमरी, सोनकी, सफेद मुसळी, शतावरी, अग्नीशिखा, काळाकुडा, अनंतमुळ, भूईआवळा, गुंजबिया, जंगली हळद, दुर्वाची पाने, जखम जोडी, करंज, निर्गुडी, अर्जुनची साल, आसकंद, तुळस, पपई, जंगली पानफुटी, मोरखरपुडी, सोनकी, पिवळा तेरडा, श्वेतांबरा, रानकेळी, गजकर्नीका, रानआले, सोनजाई, सापकांदा, कुळी, जांभळा बराका, तलावातील पान वनस्पती, शेवाळ यांसारख्या अनेक वनस्पती वऱ्हाडातील गडकिल्ल्यांवर फार मोठ्या प्रमाणात उगवतात. याच औषधी वनस्पतींच्या सहाय्याने तत्कालीन वैद्य जनसामान्यांचे उपचार करीत होते. संरक्षणाच्या बाबतीत जितके गडकिल्ले उपयुक्त आहेत तीतकेच औषधी वनस्पतींच्या दृष्टीनेही महत्वाचे आहेत. राज्यकर्त्यांनीही निवास करतानाच गडांवर वनस्पतीची लागवड केली. औषधी वनस्पतीबरोबरच साग या बहुउपयोगी वनस्पतीही गडकिल्ल्यांवर आढळतात. यामुळेच गडकिल्ले हे औषधी वनस्पतीच्या अनुषंगानेही महत्वाची आहेत.

निष्कर्ष :—

वऱ्हाडातील गडकिल्ले राजकीय बाबींनी महत्वाची असली तरी औषधी वनस्पतीचे अनुषंगाने महत्वाची आहेत. आजारपण घालवणे, जखमांवर उपचारार्थ गडकिल्ल्यांवरील व्यक्ती तथा वैद्य या वनस्पतींचा उपयोग करीत असत. वर्तमान काळात गडकिल्ल्यांचे संवर्धनार्थ अनेक संघटना तथा शासन कार्य करीत असले तरी या बाबींबरोबर किल्ल्यांवरील औषधी वनस्पतींचे जतन केल्यास वनस्पती शास्त्राच्या दृष्टीने महत्वाचे

ठरले. ह्या औषधी वनस्पती केवळ वनस्पतीशास्त्र विषयाचे दृष्टीने महत्वाचे असून त्या किल्ल्यांचा एक महत्वाचा भाग असल्यामुळे इतिहासाचे दृष्टीने महत्वाचा आहेत. त्यामुळे त्यांचे संवर्धन करणे काळाची गरज आहे.

संदर्भ साधने :—

१. मराठे, प्रा. डॉ. विशाल, फ्लोरा ऑफ अमरावती, प्रकाशित शोध निबंध.
२. कांबळे, डॉ. शा.य. फ्लोरा ऑफ अकोला.
३. दातार, डॉ. मंदर निळकंठ, गडकिल्ल्यांवरील वनस्पती, स्नेहल प्रकाशन, पुणे — २०११.
४. वानखडे, डॉ. किशोर यांचे किल्ल्यांवरील औषधी वनस्पतींचे प्रत्यक्ष निरिक्षण.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No. 36 Sept-Oct 2023

संगीत उपचाराची गरज

प्रा. विद्या प्र. गावंडे
संगीत विभाग, मधूकरराव पवार कला. महा. मूर्तिजापूर.
Corresponding Author- प्रा. विद्या प्र. गावंडे
DOI- 10.5281/zenodo.10360572

प्रस्तावना :-

संगीत कला ही सर्व कलांमध्ये श्रेष्ठ कला मानली जाते. संगीत ऐकल्याने आपले मन अगदी प्रसन्न होते. संगीत माणसाला मानसिक स्वास्थ प्रदान करण्याचे माध्यम आहे. ध्वनी ही एक भौतिक क्रिया असल्यामूळे त्याचा मेंदू , हृदय व एकंदरीतच शरीरावर परीणाम दिसून येतो. संगीतातील नाद व स्वरांना मंत्रशक्ती प्रसन्नता, चैतन्य, उर्जा, शारीरिक बळ यांचा संचार होवून शरीरात प्राणवायूंची वृध्दी होते. आजची पीढी जर आपल्याला सर्जनशील व जबाबदार झालेली पहायची असल्यास तिच्यावर संगीताचे संस्कार शालेय वयापासूनच करणे आवश्यक आहे. संगीताच्या सहाय्याने विविध आजारांवर उपचार करणे शक्य आहे. संगीतामूळे आपल्या शरीरात प्रसन्नता, चैतन्य, उर्जा, शारीरिक बळ यांचा संचार होऊन शरीरात प्राणवायूची वृध्दी होते. भारतीय अभिजात शास्त्रीय संगीतातील नाद व स्वरांचा वैज्ञानिकदृष्ट्या कसा उपयोग होईल. याचे जगभरात संशोधन झाले आणि त्या संशोधनातूनच असा निष्कर्ष काढण्यात आला की, संगीताच्या सहाय्याने विविध आजारांवर उपचार करणे शक्य झाले आहे.
शारीरिक आणि भावनिक आरोग्य सूधारण्यासाठी संगीताच्या पैलूंचा वापर करणे याला संगीत थेरपी असे म्हटल्या जाते.

संगीत थेरपीचे प्रकार-

1) मार्गदर्शित ध्यान
2) न्यूरोलॉजिकल संगीत थेरपी
3) बोनी पध्दत
4) नॉडॉफ-रॉबिन्स
5) मेंदू लहरी मोड

महान शास्त्रज्ञ ॲरीस्टॉटल यांनी म्हटले आहे की, संगीताचा आनंद हा नैसर्गिक आनंद आहे. संगीत हा कलाकार आणि श्रोता यांच्यामधला संवाद साधणारा दूवा आहे. शास्त्रीय संगीत हा केवळ रीयाज नसून ती एक प्रकारची साधना आहे. जन्मापासून तर मृत्यूपर्यंत संगीत सर्वाच्या उपयोगी पडते. खेळणे, वाजताच लहान बाळ जसा प्रतिसाद देतो तसेच बॅड, ढोल वाजायला लागले की एक वेगळीच वातावरण निर्मिती होते. मिल्ट्रीमध्ये बँड वाजताच सैनीक लढाई करीता तयार होतात. मंदीरामध्ये घंटा वाजली की अध्यात्मीक भाव जागृत होतात. निरोगी आरोग्याकरीता संगीत खूप महत्वाचे आहे. स्मरणशक्तीवर सूध्दा संगीताचा परीणाम होतो.

संगीत थेरपीचे फायदे :-

1. संगीत थेरपीचा वापर हालचाली सूलभ करण्यासाठी आणि एकूणच शारीरिक पूनवर्सन आणि रुग्णाला उपचारासाठी सामोरे जाण्यासाठी संगीत उपचाराचा उपयोग केला जातो.
2. कुटूंबियांना भावनिक आधार देऊ शकते.
3. चिंता आणि तणावामुळे शरीरावर जो परीणाम तो संगीत थेरपीमूळे कमी होऊ शकते.
4. मानसिक विकारांची लक्षणे कमी करण्यास मदत करते.
5. संगीत थेरपीमुळे आत्मविश्वास वाढण्यास मदत होते.
6. वृध्दांमधील एकांकीपणा आणि नैराश्य कमी करण्यास मदत करते.
7. संगीत उपचारामूळे रुग्णांचे लक्ष, भावना आकलन, वर्तन आणि संप्रेषण प्रभावित ठरु शकते.
8. संगीत थेरपी आराम आणि आनंद आणण्यास मदत करु शकते.
9. रोग प्रतिकारशक्ती सूधारण्याकरीता संगीत थेरपीचा उपयोग होतो.
10. 10) संगीताचा मेंदूच्या संरचनेच्या मोठ्या श्रेणीच्या क्रियाकलापावर विविध प्रभाव पडतो.
11. उदा. म्यूझिक थेरपीने काँग्रेस वुमन गेबी, गिफर्डसना तिच्या मेंदूला गोळी लागल्याने
12. तिला तिचे बोलणे परत मिळण्यास मदत केली.

13. 11) म्युझिक थेरपीत उपयोग स्मृतिभ्रशांचे परिणाम कमी करण्यासाठी तसेच लहान मूले
14. आणि प्रौढांमध्ये दम्याचे प्रमाण कमी करण्यासाठी होतो.
15. 12) जन्मतःच ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर असलेल्या मूलांना त्यांची संवाद क्षमता
16. सूधारण्यासाठी म्यूझिक थेरपीचा फायदा होतो. जन्मलेल्या अर्भकांना झोपण्यासाठी
17. तसेच त्यांचे वजन वाढण्यासाठी सूध्दा या थेरपीचा उपयोग होतो.
18. 13) एखादे वाद्य शिकल्याने सूध्दा आपल्या मनाला प्रसन्नता मिळते. तसेच संगीताने
19. ताणलेल्या स्नायूंना आराम मिळू शकतो.
20. 14) आजार अपंगत्व, कोम्यामध्ये गेलेले रुग्ण या सर्वांवर सतत संगीत ऐकल्याने चांगला
21. परीणाम झालेला दिसून येतो.

संगीत थेरपी आणि प्रौढांसाठी व्यायाम :-

संगीत उपचाराची पध्दत ही वेगवेगळ्या प्रकारे वापरली जाते.

1. संगीत उपचारामध्ये रुग्णांना वेगवेगळी गाणी ऐकणे.
2. उदा. शास्त्रीय संगीतातील काही रागगायनामूळे सूध्दा रुग्णामधल्या व्याधी कमी होऊ शकते.
3. व्हायब्रोकॉस्टिक थेरपी हा संगीत थेरपीचा ग्रहणशील प्रकार आहे. यामध्ये खूर्ची, गादी किंवा पलंगामध्ये तयार केलेल्या स्पीकरद्वारे संगीत ऐकवले जाते.
4. संगीत आणि हालचाल यामध्ये नृत्य शिकणे, लोकनृत्यासारखे प्रकार त्यांच्याकडून करुन घेणे हा सूध्दा एक सांगीतिक व्यायाम आहे.
5. संगीत ऐकण्यासाठी उत्तेजीत करणे तसेच त्यांच्या कडून गीतलेखन करुन घेणे.
6. रुग्णांना गाणे गाण्यासाठी प्रेरीत करणे. त्यांच्या आवडीचे योग्य गाण्याची निवड करण्यास प्रोत्साहीत करणे, वाद्य वाजवणे, नाचणे, गाणे हे रुग्णांच्या पसंतीवर अवलंबून असते.
7. संगीत थेरपी ही वैद्यकीय रुग्णालये, कर्करोग केंद्रे, शाळा, मनोरुग्णालय, नर्सिग होम यामध्ये वापरली जाते. मूळात संगीत थेरपीचा उद्देशच शारीरिक आणि मानसिक फायदा मिळवून देणे आहे. म्यूझिक थेरपीमध्ये हृदय गती सूधारणा, चिंता कमी करणे, मेंदूला चालणा देणे इ. गोष्टींना फायदा होते. संगीत थेरपिस्टना मानसशास्त्र जीवशास्त्र आणि न्यूरोलॉजीमध्ये प्रशिक्षण दिले जाते. त्यामूळे त्यांना तरुण किंवा वृध्द रुग्णांना सेवा प्रदान करण्यास मदत करते.

निष्कर्ष :-

आधूनिक काळात संगीत उपचार पध्दती खूपच फायद्याची आहे कारण धावपळीच्या काळात मणूष्याकडे पैसा भरपूर आहे पण स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष द्यायला वेळ नाही त्यामूळे कमी वयातच वेगवेगळ्या विकाराचा सामना करावा लागतो. उदा. बी.पी., शूगर, हृदयाचे विकार हे वाढलेल्या तणावामूळे आपल्याला दिसून येतो. भारतीय अभिजात शास्त्रीय संगीतातील नाद व स्वरांचा वैज्ञानिकदृष्ट्या कसा उपयोग होईल याचे जगभरात संशोधन झाले आणि त्या संशोधनातूनच निष्कर्ष काढला की, संगीतामार्फत विविध रोगांवर उपचार करणे शक्य आहे. सर्वांना निरोगी जिवन जगण्यासाठी भारतीय शास्त्रीय संगीत हे खरोखरच संजीवनीचे काम करते. संगीत थेरपी ही कमी पैशात चांगली उपचार पध्दती आहे. जीवनातील सूख-दूःखात संगीता चा वापर केला जातो.

संदर्भ ग्रंथ सूची :-

1. https//maharashtratimes.com
2. https://mr1.warbietoncounsil.org
3. https://wsw.idiva.com.health
4. Naturemagazine1993 Mozort Effect Research Centre.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No. 36 Sept-Oct 2023

'सलाम' कहानी संग्रह : दलितों की पीड़ा, संघर्ष तथा शोषण का दस्तावेज़

डॉ. विभा लाड
सहायक प्रोफ़ेसर, हिंदी विभाग, गणपत पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, हरमल-गोवा
Corresponding Author- डॉ. विभा लाड
DOI- 10.5281/zenodo.10360607

शोध सार-

अस्सी के दशक में आधुनिक हिंदी साहित्य में दलित विमर्श उभरकर आया। 'विमर्श' का अर्थ है अपने अधिकारों के प्रति आवाज उठाना और 'दलित' वह वर्ग है जो उपेक्षित सामाजिक जीवन का अनुभव करता है। जिसे मात्र जन्म के आधार पर समाज में तुच्छ जीवन जीने के लिए मजबूर किया जाता है। आजादी के बाद दलित शब्द का प्रचलन रहा है। इस जाति को भारतीय संविधान में अनुसूचित जाति का दर्जा दिया है ताकि उनकी स्थिति में सुधार आ सकें। दलित साहित्यकार इसी उद्देश्य की पूर्ति के लिए अपने जीवन के संघर्ष को व्यक्त करते हैं उनमें चेतना निर्माण करने की कोशिश करते हैं। दलित आलोचक कंवल भारती के अनुसार "दलित साहित्य से अभिप्राय उस साहित्य से है, जिनमें दलितों ने स्वयं अपनी पीड़ा को रुपायित किया है, अपने जीवन संघर्ष में जिस यथार्थ को भोगा है, दलित साहित्य उनका उसी की अभिव्यक्ति का साहित्य है। यह कला के लिए कला का नहीं बल्कि जीवन का और जीवन की जिजीविषा का साहित्य है।" ओमप्रकाश वाल्मीकि द्वारा लिखित 'सलाम' कहानी संग्रह में सम्मिलित कहानियाँ भी जीवन की इसी जिजीविषा की कहानियाँ हैं। इन कहानियों का हर एक पात्र बेहतर तथा सम्मानजनक जीवन जीने के लिए संघर्ष करता है। लेखन ने इस कहानी के माध्यम से समाज के दबे कुचले, शोषित वर्ग की पीड़ा, संघर्ष तथा शोषण को वाणी देने की कोशिश की है।

बीज शब्द- दलित विमर्श, संविधान, अनुसूचित, जिजीविषा, अभिव्यक्ति।

मूल आलेखः

भारतीय समाज व्यवस्था चार वर्णों पर आधारित है। जिनमें से चतुर्थ वर्ण को जाति के आधार पर हमेशा सवर्णों द्वारा शोषण का सामना करना पड़ा है। इसी शोषण तथा संघर्ष का अत्यंत मार्मिक चित्रण ओमप्रकाश वाल्मीकि अपने सलाम कहानी संग्रह में करते है। इस कहानी संग्रह में कुल 14 कहानियाँ हैं। प्रत्येक कहानी एक पीड़ा तथा शोषण का अहसास पाठक को कराती है। जैसे अपनी हवस तथा गलत इरादों को प्रत्यक्ष रूप देने के लिए शास्त्र तथा धर्म से जोड़कर सवर्णों ने दलितों को रस्म के नाम पर प्रताड़ित किया इसका उदाहरण हमें 'गोहत्या' तथा 'सलाम' जैसी कहानियों में मिलता है। 'गोहत्या' कहानी का नायक सुक्का गांव के मुखिया का नौकर है। उसकी दुल्हन के रंग रूप की चर्चा मुखिया तक पहुँचती है। वह उसे देखने के लिए आतुर हो उठता है। वह सुक्का को अपनी पत्नी को उसकी हवेली में भेजने के लिए कहता है जिसको सुक्का मना कर देता है। तब मुखिया को यह अपना अपमान लगता है। इसी बात का बदला लेने के लिए वह सुक्का पर गोहत्या का इल्जाम लगाता है और निष्ठुर पंचों द्वारा धर्म के नाम पर गर्म लोहे की फाल निर्दयतापूर्वक उसके हाथ में थमायी जाती है। अंधविश्वास के नाम पर पूरा गांव बेबस इस हत्याकांड को सुनी आंखों से देखने के अलावा कुछ नहीं कर पाता। वहीं 'सलाम' कहानी संग्रह में नायक हरीश अपने विवाह के अवसर पर सवर्णों के घर जाकर सलामी देने और बख्शीशी पाने की सदियों से चली आ रही प्रथा का विरोध करने का साहस दिखाता है। जब रांघडों को पता चलता है कि हरीशने सलाम पर आने से मना कर दिया है तो बल्लू रांघड़ खुद हरीश के ससूर जुम्मन के दरवाजे पर आकर उसे कहता है- "इन सहर वालों कू कह देणा- कव्वा कबी बी हंस ना बण सके है।"[1] और गुस्से से चला जाता है।

संविधान ने सभी को समान शिक्षा का अधिकार दिया है। किंतु प्रश्न यह है कि क्या हमारे देश में सभी को समान शिक्षा का अधिकार प्राप्त है? इसी पीड़ा का अंकन 'कहाँ जाए सतीश' इस कहानी के माध्यम से लेखक ने किया है। सतीश के पिता नगरपालिका में सफाई कर्मचारी है। चाहते है उनके बाद सतीश वह काम संभाले। सतीश उस काम से आजादी पाना चाहता है। पढ़ लिखकर सवर्णों की तरह साफ सुथरी जिंदगी जीना चाहता है। वह घर से भागकर शहर आता है और मिसेज पंत नामक महिला के घर भाड़े पर अपनी जाति छिपाकर रहने लगता है। मिसेज पंत उसे अपने बेटे की तरह मानती है। उनकी बेटी सतीश की कलाई पर राखी बांधती है। लेकिन जब सतीश के माँ बाप के माध्यम से उनके सामने उसकी भंगी जाति का होने का राज खुलता है तो वह उससे जानवरों से भी बत्तर बर्ताव करती है। कुछ समय पहले जिसके लिए सतीश बेटे के समान था वही बाद में उससे सीधे बात तक करने के लिए तैयार नहीं है- "मैं कुछ नहीं जानती। उससे कहो वह इसी वक्त चला जाए। इतने दिन अपनी जात

छुपाकर रहा.. यही क्या कम है"[2] कहकर आधी रात को उसे घर से बाहर निकालती है। बेसहारा सतिश लाचार होकर सुनसान सड़क पर चलता रहता है।

शिक्षित दलित शहर में आकर सवर्णों की बस्ती में अपनी जाति छुपाकर रहने के लिए विवश हैं। उन्हें पता है कि जाति खुलते ही उनके साथ अमानवीय व्यवहार किया जायेगा। उन्हें सभ्य समाज से बेदखल किया जाएगा। इसी भय का शिकार 'भय' कहानी का नायक दिनेश तथा 'अंधड' कहानी का नायक मि. लाल बनते हैं। मि. लाल अपनी पत्नी से कहते है- मैं जिस गंदगी से तुम्हें बाहर निकालना चाहता हूँ.. तुम लौट लौटकर उसी में जाना चाहती हो। तुम वहाँ जाओगी, तो वो भी यहाँ आएंगे। मैं नहीं चाहता , यहाँ लोगों को पता चले कि हम शेड्यूल्ड कास्ट है"[3] वहीं 'भय' कहानी का नायक दिनेश एक ओर समाज की रस्म, संस्कृति, माँ तथा समाज के डर में फँस जाता है। वह सवर्णों की बस्ती में अपनी जाति को छुपाकर अपने परिवार के साथ रह रहा है। उसे भय है कि उसकी जाति खुल जाने पर सवर्ण लोग उसका स्वीकार नहीं करेंगे। यह भय उसे सहज होकर जीने नहीं दोता। प्रस्तुत कहानी में दिनेश की सवर्णों में अपने को देखने की लालसा तथा लाचारी का चित्रण हुआ है।

आज आरक्षण के नाम पर दलितों को नौकरी जरूर मिल रही है लेकिन प्रश्न यह है कि क्या उन्हें अन्य सवर्ण सहकर्मियों द्वारा उन्हें स्वीकार किया जाता है? इसका जवाब हमें 'कुचक्र' मे मिलता है। कहानी का नायक मि. आर. बी. का नाम आरक्षण के आधार पर प्रमोशन की सूचि में आ जाता है तो सवर्ण जाति के निशीकांत के अहंकार को ठेस पहुँचती है। वह कहता है- कुछ भी करो शर्मा जी, इससे बुरा वक्त अब और क्या आएगा कि आर.बी. के नीचे काम करना पडेगा।"[4] दरअसल आर. बी. एक होनहार कर्मचारी है। परंतु प्रमोशन की लिस्ट में उसके नाम की बात पता चलते है हर कोई उससे एक दूरी बनाएं रखते हैं। अंत में आर. बी. निशिकांत की जान बचाने के लिए जाता है किंतु उसे ही दोषी साबित करके जेल में बंद कर दिया जाता है। ताकि उसका प्रमोशन रद्द हो सके। उसी प्रकार से इस कहानी संग्रह में 'बिरम की बहू' कहानी सवर्ण स्त्रियों द्वारा दलितों के उत्पीड़न पर भाष्य करती है। अपने स्त्रीत्व को पूर्णत्व देने के लिए दलित युवक रमेसर का इस्तेमाल करती है । बिरम की बहू पर बच्चा पैदा न कर सकने का झूठा आरोप लगता है। बिरम मात्र पुरूष होने के कारण इस आरोप से मुक्त रहता है। तब सामाजिक दबाव के कारण वह भंगी जाति का युवक रमेसूर से संबंध स्थापित करके गर्भवती बनती है। खोया हुआ मान सम्मान उसे फिरसे प्राप्त होने लगता है। जब रमेसर तक यह बात पहुँचती है तब वह उसको एक बार देखने की इच्छा से मंदिर के बाहर खड़ा हो जाता है और चन्द्रमुखी उसे अनदेखा करके निकल जाती है। प्रस्तुत कहानी के माध्यम से सवर्ण स्त्रियाँ भी अपने स्त्रीत्व को पूर्णत्व देने के लिए दलितों की भावनाओं के साथ किस प्रकार से खिलवाड करती है यह बताने की कोशिश लेखक ने की है। किंतु लेखक ओमप्रकाश वाल्मीकि का बडप्पन यहीं है कि उन्होंने बिरम की बहू का चरित्र पूरी सहानुभूति के साथ तैयार किया है। इस लिए बिरम की बहू से इतना बड़ा गुनाह अवश्य होता है पर उसके प्रति उसकी असाहयता के प्रति पाठक पूरी तरह से सहमत हो जाते हैं। किंतु रमेसर जिस मानसिक पीड़ा से गुजरता है उसे भी नजरअंदाज नहीं किया जा सकता।

'सलाम' कहानी संग्रह में दलित सिर्फ सहते रहते हैं वह मारपीट का जवाब मारपीट से नहीं देते। भले चौधरी जमींदारों से उन्हें कितनी भी नफरत मिले फटकार मिले वह पलटकर जवाब नहीं देते। सदियों से उन्हें शिक्षा से वंचित रखा गया ताकि वह इसी तरह गुलाम बनकर सवर्णों की गंदगी उठाते फिरे। प्रस्तुत कहानियों के माध्यम से लेखक यही बताना चाहते हैं कि अब दलितों को इस दलदल से बाहर निकलना होगा। 'सलाम' कहानी का नायक सलाम प्रथा का विरोध करता है तो उसके अंदर शिक्षा के कारण चेताना आयी है। उसी प्रकार से दलित युवक शिक्षित होने के पश्चात् अपनी जाति के लोगों से खुद रिश्ता छुपाता फिरता है इस सत्य को भी मि. लाल, दिनेश जैसे युवकों के माध्यम से बताने की कोशिश लेखक करते है। वहीं कमल और ऋषी जो सवर्ण है पढ़े लिखे युवक है वह खुलकर दलितों की सहायता के लिए आगे बढ़ते हैं आज दलितों के प्रति सवर्णों के बदलते दृष्टिकोण को भी चित्रित करने की कोशिश लेखक करते हैं।

सलाम कहानी संग्रह की भाषा संप्रेषणीय है। उन्होंने आम बोलचाल की भाषा तथा शुध्द साहित्यिक भाषा का प्रयोग किया जैसे "अबे, उल्लू कू दूम.. एक बार चलके तो देख ले। फेर कहणा" [5] मि. लाल की भाषा "मैं तुम्हें जिस गंदगी से निकालना चाहती हूं तुम लौट लौटकर उसी में जाना चाहती हो"[6] अंग्रेजी भाषा का प्रयोग जैसे डॅड, आर.बी, मि. लाल, अल्सो गाईंग वीथ यू इत्यादि। देहाति पात्रों द्वारा गालियाँ आदि के माध्यम से सभी पात्र सजीव लगते हैं।

अतः हम कह सकते हैं कि 'सलाम' कहानी संग्रह के माध्यम से लेखक ओम प्रकाश वाल्मीकि ने दलित की पीड़ा, शोषण तथा संघर्ष का अंकन तो किया ही है साथ उससे बाहर निकलने का मार्ग यानी शिक्षा पर भी जोर दिया है। वह चाहते हैं कि दलित युवा वर्ग शिक्षा के अपने अधिकार का उपयोग करके अपना भी जीवन बदले तथा अपनी जाति के लोगों को भी प्रेरित करे। उनसे रिश्ता न तोड़े। सभ्य समाज को अपनी मानसिकता बदलनी होगी। संविधान ने सभी भारतीय नागरिकों को समानता का अधिकार दिया है। संविधान का सम्मान करते हुए यह सभी उच्च वर्णिय समाज का दायित्व बनता है कि दलित वर्ग के मार्ग की बाधा न बनते हुए उन्हें अपने साथ कदम से कदम मिलाकर चलने का अवसर दे।

संदर्भ ग्रंथ सूची

ओमप्रकाश वाल्मीकि, सलाम (कहानी संग्रह)- राधाकृष्ण प्रकाशन, नई दिल्ली, 2000 पृ.18

वहीं – पृ. 53

वहीं - पृ. 86

वहीं - पृ. 105

वहीं - पृ. 19

वहीं- पृ. 86

सहायक ग्रंथ सूची

1. ओमप्रकाश वाल्मीकि, जूठन, राधाकृष्ण प्रकाशन, नयी दिल्ली
2. https:/hindi.livelaw.in
3. https:/sahjal-rahiba.blogspot.com

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No.36 Sept-Oct 2023

'ICMR च्या शिफारशीप्रमाणे ग्रामीण व शहरी विभागातील किशोरींना मिळत असलेल्या पोषकत्वांचा अभ्यास.'

डॉ.मालती पांडुरंग सातव.
सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय, खामगाव.
Corresponding Author- डॉ.मालती पांडुरंग सातव
Email- maltisatao@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.10369175

किशोरवयं म्हणजेच मी कोण? माझं या कुटुंबात, या समाजात स्थान काय आहे? असे प्रश्न पडायला लागण्याचं हे वयं! एक स्वतंत्र विचारी व्यक्तिमत्वं तयार होण्याचं हे वयं! तसचं नवनविनं नाती निर्माण करण्याचं, जुन्या नात्याची पुनर्रचना करण्याचंही हे वयं! लॅटिन भाषेतील Adolescere या शब्दावरुन Adolescence ही संकल्पना रुढ झाली. Adolescence या शब्दाचा शब्दश: अर्थ बाहेर येणे, वाढ होणे, परिपक्व होणे, असा आहे.

'किशोरावस्था' 'पिआजे' यांच्या मते,

''किशोरावस्था म्हणजे बालकांचा प्रौढ समाजामध्ये समावेश करणे होय''

किशोरावस्थेच्या काळात मुलांचा विकास हा मुलींच्या विकासाच्या तुलनेत थोडा उशिरा होतो. सामान्यपणे दहा ते सोळा वर्षाच्या सुमारास मुलींत स्त्रीत्वाची व मुलांत पुरूषत्वाची भावना निर्माण होऊन दोघानांही संभ्रमात टाकणारा हा काळ असल्यामुळे याला 'वादळी' अवस्थेचा काळ असे म्हणतात. या काळात मुलींत वजन, उंची, शरीर यात वाढ होऊन रजोदर्शनाची सुरुवात होऊन स्त्रीत्वाच्या भावनेचा विकास होऊ लागतो. त्याचप्रमाणे मुलींचे खांदे खाली येऊ लागतात, कटिभाग रुंदावतो, वक्षस्थळांना गोलाई येवू लागते, चेहऱ्यात बदल होऊ लागतो, शरीरास गोलाई येते, मुलीत स्त्री–सुलभ लज्जा ही स्थिती निर्माण होऊन मुली ह्या लाजाळु बनतात. अंत:स्त्रावी ग्रंथीचे कार्यही वेगाने सुरू होते. मस्तीष्क ग्रंथीतुन स्त्रवणाऱ्या स्त्रावामुळे मुलींची उंची, दंड, हात, पाय यांची वाढ अधिक वेगाने होते. वेगाने होणाऱ्या मुलींच्या शरीराच्या वाढीमुळे व विकासामुळे, शरीरचनेतील अंतर्गत व बाह्य बदलामुळे मुलीतील प्रजजन संस्थेच्या विकासामुळे, मासिक पाळीच्या वेळी रक्त निघून जात असल्यामुळे मुलींना या अवस्थेत अन्नात असणाऱ्या विविध पोषक घटकांची अत्यंत आवश्यकता असते. कारण आहारातून मिळणाऱ्या विविध पोषक घटकांवरच अशा मुलींची वाढ व विकास अवलंबून असतो. किशोरावस्था हा मुलींच्या जीवनातील वाढीचा शेवटचा टप्पा असल्यामुळे शरीराच्या पोषणविषयक वाढत्या गरजा पुर्ण करण्याकरिता, आवश्यक उर्जा पुरविण्यासाठी, शरीराचे संसर्गजन्य रोगापासुन संरक्षण करण्यासाठी संतुलित आहाराची गरज असते. 'ICMR' ने सुचविल्याप्रमाणे, ''१२ ते १८ वर्षापर्यंतच्या मुलींना २५०० कॅलरी व ५० ग्रॅम प्रथिनांची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे हाडांच्या व दातांच्या मजबूतीकरिता, शरीरातील हिमोग्लोबीन निर्मितीसाठी, कॅल्शियम, फॉस्फरस, व लोहाची आवश्यकता असते. तसेच व्हिटामीन 'क' व 'ड' यांचीही गरज असते. या घटकांच्या पुर्ततेमुळे किशोरींचे शारीरिक पोषण योग्य होते.''

संशोधनाची उद्दिष्टे :–


१. ग्रामीण व शहरी विभागातील किशोरवयीन मुलींच्या पोषणाच्या अभ्यास करणे.
२. किशोरवयीन मुलींच्या दृष्टीकोनातुन पोषणाचे महत्व स्पष्ट करणे.
३. ग्रामीण व शहरी विभागातील किशोरवयीन मुलींच्या पोषण दर्जाची तुलना ICMR ने प्रमाणीत केलेल्या दर्जाशी करणे.
४. अयोग्य पोषणामुळे किशोरींच्या पोषणावर होणाऱ्या परिणामाची मिमांसा करुन किशोरींचा पोषण दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने उपाय योजना सुचविणे.

संशोधन कार्यपध्दती :–प्रस्तुत संशोधनात बुलढाणा जिल्ह्यातील शहरी विभागाचा व या शहरीविभागांतर्गत येणाऱ्या विविध ग्रामीण विभागाचा यामध्ये समावेश केला असुन शहरी विभागातील २५० व ग्रामीण विभागामधिल २५० अशा एकूण ५०० किशोरवयीन मुलींची रॅण्डम पध्दतीने नमुन्यासाठी निवड करण्यात आली. संकलनानंतर सामग्रीचे संख्याशास्त्रीय पध्दती नुसार विश्लेषण करण्यात आले. यासाठी सरासरी, '**t**' चाचणी, '**r**' चाचणी ही संख्याशास्त्रीय पध्दती वापरली आहे.

परिणाम व चर्चा

ग्रामीण व शहरी विभागातील एकूण किशोरी मुलींच्या पोषक घटकांची तुलना

	(Rural) ग्रामीण		(Urban) शहरी		t-value	p-value
	(Mean) सरासरी	(SD)स्टॅण्डर्ड डेव्हिऐशन	(Mean) सरासरी	(SD)स्टॅण्डर्ड डेव्हिऐशन		
Grams	668.02	59.59	719.77	78.42	8.308	0.0001,**S**
Protein	56.24	6.39	60.85	7.23	7.559	0.0001,**S**
Vasa	38.75	10.19	43.49	10.11	5.226	0.0001,**S**
Fiber	5.72	1.26	6.78	1.42	8.841	0.0001,**S**
Carbohydrate	362.18	39.57	388.75	46.78	6.855	0.0001,**S**
Calorie	2076.95	177.03	2231.69	184.84	9.559	0.0001,**S**
Calcium	427.35	73.91	468.91	96.51	5.406	0.0001,**S**
Phosphorous	1256.69	222.55	1319.66	230.42	3.108	0.002,**S**
Iron	21.62	4.74	23.82	5.22	4.921	0.0001,**S**
Carotain	496.72	275.29	510.42	275.04	0.556	0.578,**NS**
Thaimin	2.10	0.41	2.33	0.53	5.294	0.0001,**S**
Riboflavin	1.03	0.32	1.13	0.49	2.667	0.008,**S**
Niacine	17.39	3.19	19.07	3.39	5.691	0.0001,**S**
Vitamin B6	3.08	2.23	3.52	2.21	2.206	0.028,**S**
Folic Acid	54.62	8.03	58.98	8.54	5.875	0.0001,**S**
Vitamin C	16.68	9.36	20.94	14.83	3.838	0.0001,**S**



आलेख I ग्रामीण व शहरी विभागातील एकूण किशोरी मुलींच्या पोषक घटकांची तुलना.

प्रस्तुत संशोधन अभ्यासात एकूण 11-19 वयोगट असणाऱ्या ग्रामीण व शहरी विभागातील एकूण 500 किशोरी मुलींना दररोज मिळत असलेल्या पोषक घटकांची आपसात तुलना केली असता केवळ (Carotain) कॅरोटिनच्या प्रमाणात लक्षणीय व स्विकारार्ह असा फरक आढळून आला नसून तो परस्परसंबंधित असल्याचे आढळून आले आहे. तर प्रथिने, स्निग्धे, तंतू, कर्बोदके, कॅलरी, कॅल्शियम, फॉस्फरस, लोह, थायमाइन, रीबोफ्लेविन, नियासिन, व्हिटामीन B6, फोलिक ॲसिड, व्हिटामीन C, या सर्व पोषक घटकात मात्र लक्षणीय व स्विकारार्ह असा फरक आढळून आला आहे. म्हणजेच ग्रामीण व शहरी विभागातील किशोरी मुलींच्या पोषक घटकांची तुलना केली असता असे दिसून आले आहे की ग्रामीण विभागातील किशोरी मुलींच्या तुलनेत शहरी विभागातील किशोरी मुलींना केवळ कॅरोटिन वगळता बाकी सर्व पोषकघटक अधिक मिळत असल्याचे येथे स्पष्ट आढळून आले आहे.

ICMR ने प्रमाणीत केलेल्या पोषक घटकांसोबत किशोरीना मिळत असलेल्या सरासरी एक दिवसीय पोषक घटकांची तुलना.

Nutritive Value Book of Indian Food (NIN-ICMR) आणि Dietary Guidelines for Indians A Manual ICMR, Hyderabad ने प्रमाणीत केलेल्या पोषक घटकांशी केल्यानंतर जी वस्तुस्थिती आढळली ती पुढीलप्रमाणे.

(Nutrition) Vitamin	11 ते 13 वर्ष	14 ते 16 वर्ष	17 ते 19 वर्ष
Protein	40.4	51.9	55.1
Vasa	35	40	35
Calorie	2100	2200	2200
Calcium	800	800	800
Iron	27	27	26
Carotain 'A'	2400	750	750

Thaimin	1	1.2	1
Riboflavin	1.2	1.4	1.2
Niacine	13	14	14
Vitamin B6	1.6	2	2
Folic Acid	50-100	30-50	30-50
Vitamin C	30-50	14	14

सर्वेक्षणांती एकूण तीनही वयोगटातील किशोरींना दररोज मिळत असलेले सरासरी एक दिवसीय पोषक घटकांचे प्रमाण.

(Nutrition)	वयोगट 11 ते 13 वर्ष		वयोगट 14 ते 16 वर्ष		वयोगट 17 ते 19 वर्ष	
	ग्रामीण	शहरी	ग्रामीण	शहरी	ग्रामीण	शहरी
Grams	637.54	669.55	659.90	711.87	676.04	726.37
Protein	49.57	55.95	55.99	60.69	57.13	61.31
Vasa	31.84	40.97	38.31	42.63	39.75	43.96
Fiber	4.67	5.99	5.81	7.10	5.77	6.75
Carbohydrate	337.70	358.63	355.14	385.60	368.92	392.22
Calorie	1891.13	2063.78	2056.37	2203.63	2108.99	2254.25
Calcium	441.15	425.62	428.43	484.69	425.22	467.70
Phosphorous	1185.85	1319.26	1283.67	1318.76	1248.68	1319.97
Iron	17.78	20.01	20.50	24.11	22.69	24.05
Carotain	541.06	465.11	488.20	536.46	496.89	506.24
Thaimin	1.91	2.18	2.06	2.38	2.15	2.32
Riboflavin	0.88	1.01	1.02	1.22	1.06	1.11
Niacine	15.14	18.93	17.50	19.63	17.57	18.91
Vitamin B6	3.28	2.68	3.33	3.17	2.92	3.70
Folic Acid	50.77	53.98	54.46	58.44	55.13	59.56
Vitamin C	14.53	15.04	15.52	24.83	17.59	20.25

ICMR ने प्रमाणीत केलेल्या पोषक घटकांशी तुलना केल्यानंतर जे निष्कर्ष मिळाले ते पुढीलप्रमाणे.

वयोगटानुसार एकूण ग्रामीण व शहरी विभागातील मुलींना मिळालेल्या पोषक घटकांची तुलना ICMR ने प्रमाणीत केलेल्या पोषक घटकांसोबत केली असता असे आढळले की, 11 ते 13 वयोगटातील ग्रामीण किशोरी मुलींना प्रथिने, नायसिन, व्हिटामीन बी६, शिफारशीपेक्षा अधिक मिळतात. तर सिग्धे, कॅल्शियम, लोह, कॅरोटीन 'अ', व्हिटामीन सी, कॅलरी कमी मिळत असल्याचे आढळले आहे. तर रिबोफ्लेव्हिन, थायमीन, फोलीक ॲसीड, ICMR ने प्रमाणीत केलेल्या पोषक घटकांच्या समतुल्य मिळत असल्याचे आढळून आले आहे. तर शहरी मुलींना प्रथिने, सिग्धे, थायमीन, व्हिटामीन बी६, नियसिन, कॅरोटीन 'अ', व्हिटामीन सी, कॅलरी कमी मीळतात. तर रिबोफ्लेव्हिन, फोलीक ॲसीड, ICMR ने प्रमाणीत केलेल्या पोषक घटकांच्या समतुल्य मिळत असल्याचे आढळून आले आहे.

14 ते 16 वयोगटातील ग्रामीण किशोरींना प्रथिने, नियसिन, व्हिटामीन बी६, व्हिटामीन सी, फोलीक ॲसीड, शिफारशीपेक्षा अधिक तर, सिग्धे, कॅल्शियम, लोह, कॅरोटीन 'अ', कॅलरी कमी मिळत असल्याचे आढळले आहे. तर रिबोफ्लेव्हिन, थायमीन, ICMR ने प्रमाणीत केलेल्या पोषक घटकांच्या समतुल्य मिळतात तरए शहरी मुलींना प्रथिने, सिग्धे, थायमीन, व्हिटामीन बी६, नियसिन, व्हिटामीन सी, फोलीक ॲसिड, कॅलरी, अधिक मीळतात. कॅल्शियम, लोह, कॅरोटीन 'अ', कमी मिळत असल्याचे आढळून आले असुन रिबोफ्लेव्हिन, समतुल्य मिळत असल्याचे आढळून आले आहे. 17 ते 19 वयोगटातील ग्रामीण किशोरीना प्रथिने, सिग्धे, नियसिन, थायमीन, व्हिटामीन सी, फोलीक ॲसिड, कॅलरी शिफारशीपेक्षा अधिक मिळतात. तर कॅल्शियम, लोह, कॅरोटीन 'अ' कमी मिळत असल्याचे आढळले. तर व्हिटामीन बी६, रिबोफ्लेव्हिन, ICMR ने प्रमाणीत केलेल्या पोषक घटकांच्या समतुल्य मिळत असल्याचे आढळून आले आहे.

तर शहरी मुलींना प्रथिने, सिग्धे, थायमीन, व्हिटामीन बी६, नियसिन, व्हिटामीन सी, कॅलरी, फोलीक ॲसिड अधिक मीळतात. कॅल्शियम, लोह, कॅरोटीन 'अ', कमी मिळत असल्याचे आढळून आले आहे. तर रिबोफ्लेव्हिन, समतुल्य मिळत असल्याचे आढळून आले आहे. 11-13 व 17-19 वयोगट असलेल्या ग्रामीण व शहरी किशोरी मुलींत दररोज मिळणाऱ्या रिबोफ्लेव्हीन व व्हिटामिन 'सी' च्या प्रमाणात स्विकारार्ह असा फरक आढळून आलेला नाही. म्हणजेच ग्रामीण व शहरी विभागातील किशोरी मुलींना मिळणारे हे पोषक घटक जवळपास सारख्याच प्रमाणात मिळत असल्याने त्यामध्ये लक्षणीय व स्विकारार्ह असा फरक आढळून आलेला नाही. मात्र 14-16 या वयोगटातील मुलींमध्ये रिबोफ्लेव्हीनव व्हिटामिन 'सी' या पोषक घटकांमध्ये लक्षणीय असा फरक असलेला आढळून आला असुन ग्रामीण मुलींच्या तुलनेत शहरी किशोरींना मिळणारे हे पोषक घटक अधिक प्रमाणात मिळत असल्याचे आढळून आले. 11-13 व 14-16 वयोगट असलेल्या ग्रामीण व शहरी विभागातील किशोरीना दररोज मिळणाऱ्या

व्हिटामिन 'B6' व फॉस्फरसच्या प्रमाणात स्विकारार्ह असा फरक आढळून आलेला नसून ग्रामीण व शहरी किशोरीना मिळणारे हे पोषक घटक जवळपास सारख्याच प्रमाणात मिळत असल्याचे आढळले. मात्र 17-19 या वयोगटातील मुलीमध्ये व्हिटामिन 'B6' व फॉस्फरस या पोषक घटकांमध्ये लक्षणीय व स्विकारार्ह असा फरक असलेला आढळून आला असून ग्रामीण किशोरींच्या तुलनेत शहरी किशोरींना मिळणारे हे पोषक घटक अधिक प्रमाणात मिळत असल्याचे आढळून आले आहे. 11-13 वयोगट असलेल्या ग्रामीण व शहरी विभागातील किशोरींत दररोज मिळणाऱ्या सरासरी सर्व ग्रॅम, कर्बोदके, लोह, कॅल्शियम, फॉस्फरस, कॅरोटिन, फोलिक ॲसिडच्या या पोषक घटकांमध्ये लक्षणीय असा फरक असलेला आढळून आला नाही.

तसेच एकूण ग्रामीण व शहरी विभागातील किशोरीना दररोज मिळणाऱ्या कॅरोटीनच्या प्रमाणात स्विकारार्ह असा फरक आढळून आलेला नाही. मात्र प्रथिने, स्निग्धे, तंतू, कर्बोदके, कॅलरी, कॅल्शियम, फॉस्फरस, लोह, थायमाइन, रिबोफ्लेविन, नियासिन, व्हिटामीन B6, फोलिक ॲसिड, व्हिटामीन C, या सर्व पोषक घटकांत मात्र लक्षणीय व स्विकारार्ह असा फरक आढळून आला आहे. म्हणजेच ग्रामीण व शहरी विभागातील किशोरी मुलींच्या पोषक घटकांची आपसात तुलना केली असता असे दिसून आले आहे की ग्रामीण विभागातील किशोरी मुलींच्या तुलनेत शहरी विभागातील किशोरी मुलींना केवळ कॅरोटिन वगळता बाकी सर्व पोषकघटक अधिक मिळत असल्याचे आढळून आले आहे. तसेच कायस्केयर चाचणीचा उपयोग करून पाहिले असता ग्रामीण व शहरी विभागातील किशोरी मुलींतील पोषक घटकात लक्षणीय व स्विकारार्ह असा फरक असलेला आढळून आला आहे.

निष्कर्ष-

– एकूण ग्रामीण व शहरी किशोरी मुलींच्या प्रोटिन, सिग्धे, फायबर, कर्बोदक, कॅलरी, कॅल्शियम, फॉस्फरस, लोह, थायमाइन, रिबोफ्लेविन, नियासिन, व्हिटामिन 'बी६' फोलीक ॲसिड, व्हिटामिन 'सी' यामध्ये संबंध प्रस्थपित केला असता यात लक्षणीय व स्विकारार्ह असा फरक आढळून आला आहे. मात्र कॅरोटिन यामध्ये लक्षणीय असा फरक आढळून आला नसून तो परस्परसंबंधित असल्याचे आढळले आहे.

– ग्रामीण व शहरी विभागातील किशोरी मुलींच्या पोषणाच्या सबंध प्रस्थापित केला असता ग्रामीण विभागातील मुलींच्या तुलनेत शहरी विभागातील मुलींचे पोषण हे उत्कृष्ट असल्याचे आढळून आले आहे.

– ग्रामीण किशोरींना मिळत असलेल्या पोषक घटकांची तुलना शहरी किशोरींना मिळत असलेल्या पोषक घटकांशी केली असता ग्रामीण किशोरी मुलींच्या तुलनेत शहरी विभागातील मुलींना अधिक पोषक घटक मिळत असल्याचे आढळून आले आहे.

– ग्रामीण व शहरी विभागातील मुलींना मिळालेल्या पोषक घटकांची तुलना ICMR ने प्रमाणीत केलेल्या पोषक घटकांसोबत केली असता 11 ते 13 वयोगटातील ग्रामीण किशोरींना प्रथिने, नायसिन, व्हिटामीन बी६, शिफारशीपेक्षा अधिक मिळतात. तर सिग्धे, कॅल्शियम, लोह, कॅरोटीन 'अ', व्हिटामीन सी, कॅलरी कमी मिळतात. रिबोफ्लेव्हिन, थायमीन, फोलीक ॲसीड, ICMR ने प्रमाणीत केलेल्या पोषक घटकांच्या समतुल्य मिळत असल्याचे आढळले तर, शहरी मुलींना प्रथिने, सिग्धे, थायमीन, व्हिटामीन बी६, नियसिन, अधिक तर कॅरोटीन 'अ', व्हिटामीन सी, कॅलरी कमी मिळतात. रिबोफ्लेव्हिन, फोलीक ॲसीड, ICMR ने प्रमाणीत केलेल्या पोषक घटकांच्या समतुल्य मिळत असल्याचे आढळून आले आहे.

– 14 ते 16 वयोगटातील ग्रामीण किशोरींना प्रथिने, नियसिन, व्हिटामीन बी६, व्हिटामीन सी, शिफारशीपेक्षा अधिक तर सिग्धे, कॅल्शियम, लोह, कॅरोटीन 'अ', कॅलरी कमी तर, रिबोफ्लेव्हिन, थायमीन, फोलीक ॲसीड, ICMR ने प्रमाणीत केलेल्या पोषक घटकांच्या समतुल्य मिळत असल्याचे आढळून आले. आणि शहरी मुलींना प्रथिने, सिग्धे, थायमीन, व्हिटामीन बी६, नियसिन, व्हिटामीन सी, फोलीक ॲसिड, कॅलरी, अधिक मीळतात तर कॅल्शियम, लोह, कॅरोटीन 'अ', कमी मिळत असल्याचे आढळून आले आणि रिबोफ्लेव्हिन समतुल्य मिळत असल्याचे आढळून आले आहे.

– 17 ते 19 वयोगटातील ग्रामीण किशोरींना प्रथिने, सिग्धे, नियसिन, थायमीन, व्हिटामीन सी, कॅलरी शिफारशीपेक्षा अधिक तर कॅल्शियम, लोह, कॅरोटीन 'अ', कमी मिळत असल्याचे आढळले. व्हिटामीन बी६, रिबोफ्लेव्हिन, फोलीक ॲसीड, ICMR ने प्रमाणीत केलेल्या पोषक घटकांच्या समतुल्य मिळत असल्याचे आढळून आले. शहरी मुलींना प्रथिने, सिग्धे, थायमीन, व्हिटामीन बी६, नियसिन, व्हिटामीन सी, कॅलरी, अधिक तर कॅल्शियम, लोह, कॅरोटीन 'अ', कमी मिळत असल्याचे आढळून आले आहे. व रिबोफ्लेव्हिन, फोलीक ॲसिड, समतुल्य मिळत असल्याचे आढळून आले आहे.

– यावरून सर्वेक्षणांती मिळालेल्या एकूण तीनही वयोगटातील किशोरी मुलींना मिळालेल्या सरासरी एक दिवसीय पोषकघटकांची तुलना केली असता असे आढळून आले की, किशोरी मुलींना शिफारस केलेल्या पोषकघटकापेक्षा काही पोषकघटक (काही टक्के) किंचीत कमी प्रमाणात, (काही टक्के) थोड्या अधिक प्रमाणात, तर काही पोषकघटक (काही टक्के) समतुल्य प्रमाणात मीळत असल्याचे आढळून आले आहे.

डॉ.मालती पांडुरंग सातव

संदर्भग्रंथ सूची-

1. अनामीका. (१९ फेब्रुवारी २०१५). किशोरवयातील समस्या. दैनिक देशोन्नती. नागपूर. पानं क्रं. १५
2. आय. सी. डी. एस. (२०१८). पौंगडावस्थेतील मुलींची काळजी..... प्रकाशक, सौंजन्य राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग महाराष्ट्रराज्य, नवी मुंबई. पानं क्रं. २,४,५,६,९
3. गोंगे, सुलभा., फरकाडे, त्रिवेणी. (जून २०१०). पोषण आणि आहारशास्त्र. प्रकाशन, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिंशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्यूटर्स नागपूर. पानं क्रं. १३२,१३४
4. कांडलकर, लिना. (जुलै २०००). मानव विकास. विद्या प्रकाशन, नागपूर. पानं क्रं. ९,२५,२०५,२०६.
5. किर्तणी, सुषमा. (21 Feb. 2020). किशोरवयीन मुलामुलींच्या समस्या- naveprabha. e-paper, time 12.37 pm.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No. 36 Sept-Oct 2023

स्थानिक इतिहास लेखन काळाची गरज

प्रा. डॉ. रवींद्र पुंडलिक झनके
स्व. भास्करराव शिंगणे कला, प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालय, साखरखेर्डा ता. सिंदखेड राजा जि. बुलढाणा
Corresponding Author- प्रा. डॉ. रवींद्र पुंडलिक झनके
DOI- 10.5281/zenodo.10369183

Abstract-

इतिहास लेखनाचे अनेक प्रवाह उदयास आलेले आहेत यामध्ये अलीकडच्या काळात विशेष प्रसिद्धी आलेला इतिहास लेखन प्रवाह म्हणजे स्थानिक इतिहास लेखन होय. स्थान म्हणजे ठिकाण म्हणजे स्थानांचा अथवा ठिकाणांचा इतिहास असा शब्दप्रयोग सर्रास केला जातो. भारतामध्ये ही संकल्पना नवीन असली तरी या संकल्पनेतून या अगोदरच अनेक शहरांचा इतिहास लिहिलेला आहे. प्राचीन काळात आपल्याकडे जी स्थलमहात्मे होती त्यातूनच हा आधुनिक व शास्त्रीय अवतार मानला जातो. स्थानिक इतिहास लेखनात भौगोलिक संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे त्या स्थानिकांची स्वाभाविकपणे आपल्या गावाशी एक विशिष्ट नाळ आणि भावना जोडलेल्या असतात. स्थानिक इतिहासकार इतिहास लिहिताना त्या भावना ऐतिहासिक घटना आणि त्या घटनांशी संबंधित असलेल्या व्यक्ती यांच्या माध्यमातून शब्दबद्ध करतो. आपल्या गावाचा किंवा शहराचा ऋणानुबंधाबद्दल आपुलकी व अभिमान वाटणं ही सहज भावना आहे. आपल्या गावाच्या काही आठवणी आनंददायक तर काही दुःखदायक असू शकतात. परंतु घटना घडवून बरीच वर्ष झाल्यानंतर अशा दोन्ही स्मृतिंबद्दल कातरता येत असते. स्मृती प्रभावी शैलीत पकडण्यावर स्थानीय इतिहासकाराचे यश अवलंबून असते. एकूणच स्थानिक इतिहास हा प्रादेशिक इतिहासाचा एक उपविभाग आहे. एखाद्या ठिकाणाभोवती केंद्रित राहून त्याचे इतिहास लेखन करणे म्हणजे स्थानिक इतिहास होय.

स्थानिक इतिहास लेखन पद्धती :-

ही संकल्पना आज झपाट्याने विकसित होत आहे. यासाठी अनेक नवनवीन आधुनिक पद्धती वापरल्या जात आहेत. स्थानिक इतिहास लिहिताना ऐतिहासिक संशोधन पद्धती, क्षेत्रीय भेट, सर्वेक्षण, मुलाखत , प्रश्नावली, मौखिक परंपरा, प्रथा, परंपरा व पद्धती, संकेत, दंतकथा किंवा आख्यायिका व पुरातत्वीय साधने या विविध माध्यमांच्या आधारे स्थानिक इतिहास लेखन केले जाऊ शकते. स्थानिक इतिहास लेखनाची सुरुवात इ.स. सोळाव्या शतकात इतिहास लेखन या संकल्पनेचा उदय झाला. स्थानिक इतिहास लेखनाच्या माध्यमातून लंडन विद्यापीठात " इन्स्टिट्यूट ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च " ही संस्था स्थापन झाली. त्यामुळे लंडन शहराला स्थानिक इतिहासाची जननी असे म्हणतात. 19 व्या शतकामध्ये इतिहास लेखनाचा हा प्रवाह अमेरिकेमध्ये पोहोचला. तेथील व्यापारी, उद्योगपती, चर्चचा कारभार पाहणारे अधिकारी व मिशनरी यांनी आपल्या क्षेत्रातील उद्योग, व्यवसायाचा इतिहास लिहिण्यास सुरुवात केली. इंग्लंडमधून अमेरिकेमध्ये स्थायिक झालेल्या लोकांनीही स्थानिक इतिहासाची मांडणी केली.

स्थानिक इतिहास लेखनाचा भारताच्या विशेषता महाराष्ट्राच्या दृष्टिकोनातून विचार केला तर इ.स.1836 मध्ये गोविंद माडगावकरांचे 'मुंबईचे वर्णन' त्यानंतर जोशी यांचे 'पुणे शहराचे वर्णन' अशा ग्रंथाद्वारे 19 व्या शतकामध्ये स्थानिक इतिहासाचा पाया घातला गेला. विसाव्या शतकात त्यामध्ये बरीच वाढ झाली. नागपूरचा सांस्कृतिक इतिहास, चंद्रपूरचा इतिहास, जागृत सातारा यासारख्या अनेक ग्रंथांचा उल्लेख स्थानिक इतिहासामध्ये केला जातो. मात्र अखिल भारतीय स्तरावर स्थानिक इतिहास लेखनाची संकल्पना व श्रद्धांजली रोमीला थापर यांनी इ.स. 1976 मधील पंजाब इतिहास परिषदेच्या अध्यक्षपदावरून केलेल्या प्रादेशिक व स्थानिक इतिहास या विषयावर व्यक्त केलेल्या विचारातून मानले जाते. तेंव्हापासून खऱ्या अर्थाने नवीन विचार प्रवाह सुरू झाला.

प्रादेशिक इतिहासाकडून स्थानिक इतिहासाकडे :-

इतिहासाची व्याप्ती स्थल कालसापेक्ष आहे. प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक अशी काळाच्या आधारावर त्याची विभागणी केली जाते. जागतिक राष्ट्रीय प्रादेशिक आणि स्थानिक इतिहास या संदर्भात राजा दीक्षित यांनी प्रादेशिक इतिहासाची मांडणी करताना स्थानिक इतिहासाला केंद्रस्थानी ठेवले आहे. विसाव्या शतकात प्रादेशिक इतिहास ही संकल्पना संशोधनाचा एक भाग बनली आहे. त्याचे सूक्ष्म अध्ययन करण्यासाठी लहान लहान भागात विभाजन करून स्थानिक इतिहास या संकल्पनेचा इतिहासाच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाचा वाटा निर्माण केला. प्रत्येक स्तरातील व्यक्ती घटना यांच्या माध्यमातून स्थानिक व प्रादेशिक इतिहासातून राष्ट्रीय इतिहास आकार घेतो. स्थानिक व प्रादेशिक इतिहासाच्या साह्याने राष्ट्राचा सर्वांगीण इतिहास लिहिला जाऊ शकतो. प्रादेशिक व स्थानिक इतिहास हा राष्ट्रीय इतिहासाचा अविभाज्य भाग आहे.

स्थानिक इतिहास लेखनाचे उद्देश्य :-

इतिहास संशोधक किंवा अभ्यासक यांना जागतिक, राष्ट्रीय किंवा राज्य पातळीवरील घटना माहीत असतात. मात्र एखाद्या गावातील घटना किंवा वास्तूची माहिती नसते. वास्तविक ती व्यक्ती किंवा व्यक्तीसमूह स्थानिक इतिहासाशी जवळीक ठेवणारे असतात. स्थानिकता हे पारंपारिक भारतीय समाज व्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे. प्रत्येक गावावर प्राचीन ते आधुनिक काळापर्यंत अनेक राजसत्तांनी राज्य केलेले आहे. या राजसत्तेच्या बदलाच्या अनेक खानाखुणा अनेक गावागावात विखुरलेले आहेत. सांस्कृतिक , सामाजिक व धार्मिक वैशिष्ट्यांमुळे प्रसिद्धीस आलेले बरीच गावे असतात. या स्थानिक ठिकाणांचा व घटनांचा अभ्यास करणे हाच इतिहास लेखनाचा मुख्य उद्देश आहे.

स्थानिक इतिहास लेखनाचे महत्त्व:-

स्थानिक इतिहास लेखनात व्यक्ती आणि स्थळ हे मुख्य विषय असतात. मानवी जीवनाचा अभ्यास समजण्यासाठी समाजाचा इतिहास समजणे महत्त्वाचे आहे. समाजाची जीवनप्रणाली, चालीरीती, रूढी , परंपरा, संस्कृती, धार्मिक निष्ठा, भिन्न घटकांचे परस्पर संबंध, कुटुंब संस्था त्यांचे स्वरूप, उदरनिर्वाहाची साधने, उद्योग , मनोरंजनाची साधने, कला, विविध सामाजिक संस्था अशा अनेक विषयांचा अभ्यास यामध्ये समाविष्ट असतो. स्थानिक इतिहास हा भौगोलिक दृष्ट्या स्थानिक संदर्भाच्या विशेषता स्थानिक समुदायावर लक्ष केंद्रित करतो. यामध्ये प्रामुख्याने सांस्कृतिक व सामाजिक पैलूंचा अंतर्भाव असतो. स्थानिक इतिहासातून आर्थिक इतिहासाचेही अध्ययन होत असते. शेती, उद्योगधंदे, व्यापार, दळणवळण, व्यापारी संस्था, ग्रामीण बँका यांचे महत्त्व मान्य केले जाते. तसेच दोन भूभागांचा सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून तुलनात्मक अभ्यास केला जातो.

स्थानिक इतिहास लेखनाच्या माध्यमातून एखाद्या गावाची घटनेची ठिकाणाची सूक्ष्मपणे व विस्तृत मांडणी करू शकतो. स्थानिक इतिहास लेखनाच्या माध्यमातून संस्कृती संवर्धनाचा प्रयत्न करू शकतो. समाज जीवनाची नैतिक आचारसंहिता मांडू शकतो. स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून लोकसंस्कृतीचा अभ्यास करू शकतो. दुर्लक्षित घटक, प्रथा, परंपरा , आचार विचार, कथा, पुराणकथा, दंतकथा यांचा नव्याने विचार करू शकतो.

स्थानिक इतिहास लेखनातील महत्त्वाचे घटक:-

स्थानिक इतिहास लिहितांना काही घटकांचा स्वतंत्रपणे अभ्यास केला जाऊ शकतो. त्यामध्ये अ) स्थानिक इतिहास लेखनामध्ये ऐतिहासिक पार्श्वभूमीला विशेष महत्त्व आहे. ब) कोणत्याही एका ऐतिहासिक गावाचे महत्व गावाची प्राचीनता गावाच्या नावाची उत्पत्ती गावाशी संबंधित पुराणकथा लोक समजूती ह्या गोष्टी अतिशय महत्त्वाच्या असतात. क) प्रत्येक गावाला प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक असा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे मात्र पुरेशा प्रमाणात लिखित पुरावे नसल्यामुळे हजारो गावांचा इतिहास शब्दबद्ध झालेला नाही त्यामुळे स्थानिक इतिहास लेखनामध्ये त्या गावांची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासली जाणे महत्त्वाचे असते. ड) याशिवाय इतिहास लेखनाला भौगोलिक घटकही जबाबदार असतात विशिष्ट भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास स्थानिक इतिहास लेखनात केला जाऊ शकतो. इ) इतिहास आणि ऐतिहासिक घटनांवर भौगोलिक घटक परिणाम करत असतो त्यामुळे या भौगोलिक घटकांचा त्याच्या गावावर काय परिणाम होतो याचाही आपण अभ्यास करू शकतो.

भारतातील बहुतांश खेड्यांची अथवा गावांचे अर्थकारण हे शेती म्हणजेच कृषी जीवनावर आधारित आहे. त्यांच्या गावातील जमीन, जमिनीचे प्रकार ,शेती ,शेतीचे

प्रकार, शेतीवर आधारित जोडधंदे, व्यापार, दळणवळण, व्यवसाय इत्यादींचा अभ्यास स्थानिक इतिहास लेखनाच्या माध्यमातून गाव त्यातून त्या गावाचे अर्थकारण समजावून घेऊ शकतो. मोठमोठ्या गावांमध्ये शेतीच्या माध्यमातून होणारी प्रचंड उलाढाल याचाही अभ्यास होऊ शकतो. अर्थकारणासोबतच राजकिय व प्रशासकीय घटकांमध्ये एखाद्या गावाचे, देश, राज्य, जिल्हा, तालुका पातळीवरील राजकारणातले योगदान, प्रशासनातील भूमिका, राजकीय घडामोडी, स्वातंत्र्य, सहकार चळवळीतील योगदान, कर्तृत्ववान व्यक्ती किंवा संस्था यांचाही अभ्यास केला जाऊ शकतो. प्रत्येक गावाची एक विशिष्ट सामाजिक संरचना असते. स्थानिक इतिहास लेखनाचे त्या गावातील सामाजिक जीवन व त्यामध्ये झालेले स्थित्यंतर समाविष्ट करू शकतो. गावातील लोकसंख्या, कुटुंब संस्था, विविध जाती, पोट जाती, प्रथा, रूढी, परंपरा आचार विचार, आभूषणे, आहार अशा अनेक अंगाने स्थानिक इतिहासाचे लेखन केले जाऊ शकते. एखाद्या गावातील सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करताना सुद्धा धार्मिक परंपरा, सण, उत्सव, जत्रा, यात्रा महोत्सव त्यातील प्रथा, परंपरा, पूजा विधि, दंतकथा, पुराणकथा यांचाही अभ्यास करणे गरजेचे असते. कारण प्रत्येक गावात विविध देवी देवतांची मंदिरे, दर्गे , मशिदी त्यांच्या गावात विशिष्ट पद्धतीने त्यांच्या जत्रा, यात्रा, सण , उत्सव साजरे करतात. याची नोंद स्थानिक इतिहासात होणे गरजेचे आहे. याशिवाय काही गावात विशिष्ट खेळ, क्रीडा प्रकार, मनोरंजनाची साधने व कलाप्रकार आहेत. त्याचाही या ठिकाणी सखोल अभ्यास केला जाऊ शकतो.

सारांश-

इतिहास लेखन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. स्थलकालपरत्वे त्यामध्ये बदल होत गेले. नवनवीन विचार व पद्धती अस्तित्वात आल्या व कालांतराने त्या रूढही झाल्यात. इतिहासाचे परीक्षेत्र बदलले. पारंपारिक इतिहास लेखनाबरोबरच इतर प्रवाह व दृष्टिकोन प्रस्तुत झाले या नवीन प्रवाहातून इतिहासातील घटनांचे पुनर्लेखन व नव्याने विश्लेषण करण्याची आवश्यकता निर्माण झाली. मानवाच्या गतकाळातील घटनांची नोंद घेतली गेली. त्याचे विश्लेषण केले गेले. मात्र या अभीजनवादी इतिहासामध्ये वंचित शोषित पीडित तळागाळातील दुसऱ्या भाषेत बोलायचे झाले तर अगदी शुल्लक किरकोळ घटना आहेत, समूह आहेत त्याकडे दुर्लक्ष केले गेले. त्यांच्या इतिहासाची नोंदच घेतली गेली नाही. इतिहास लेखनात अलीकडे युक्तिवाद मागे पडून नवीन दृष्टिकोन इतिहास लेखनात आलेले आहेत. इतिहासकाराने पुराव्यांच्या मागे न लागता स्वतःच पुरावा निर्माण करणे हे अलीकडील इतिहासाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. समकालीन इतिहासात खूप सार्‌या लहान मोठ्या घटना घडत असतात. मात्र इतिहासकार त्या लहान व स्थानिक घटनांकडे दुर्लक्ष करतो. अलीकडे इतिहासाबरोबरच स्थानिक इतिहास लेखनाची मान्यता मिळत आहे. प्रांतिक इतिहासाचा अविभाज्य घटक असलेला स्थानिक इतिहास लेखनाचा प्रकार नवीन इतिहासकारांमध्ये प्रसिद्धीस येत आहे.

संदर्भ ग्रंथ -

1. वांबुरकर जास्वंदी- संपादक, इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड पब्लिकेशन, पुणे - 2014
2. 2)इतिहास लेखन मिमांसा, लोक वाङ्मय गृह, मुंबई - 2010
3. पाटील अवनीश- समकालीन इतिहास लेखन, विभागीय अध्यक्षीय भाषण, अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद,
4. संशोधन पत्रिका- 2016
5. पाटील अवनीश - मायक्रो हिस्टरी परिचयात्मक टिपण, निवडक शोध निबंध संग्रह, शिवाजी विद्यापीठ, इतिहास
6. परिषद, कोल्हापूर - 2013
7. इतिहास लेखनातील नवे प्रवाह, डॉ. व्हि.डी. नांदवडेकर , कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर- 2019
8. Giovanni Levi - "On Microhistory in Peter Burke (ed)" New Perspectives on Historical writings,
9. Pennsylvania State University, 1992.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No. 36 Sept-Oct 2023

संगीत चिकित्सा की आवश्यकता

सहा.प्रा.ज्ञानेश्वर बोंपिलवार
संगीत विभाग , श्रीमती सु.रा.मोहता महिला महाविद्यालय, खामगांव.
Corresponding Author- सहा.प्रा.ज्ञानेश्वर बोंपिलवार
DOI- 10.5281/zenodo.10369191

सारांश

पं. शारंगदेव जी द्वारा 'गीतं, वाद्यं तथा नृत्यं त्रयं संगीतमुच्यते' इस प्रकार संगीत की परिभाषा की गई है । संगीत नामक कला में गायन, वादन तथा नृत्य इस तीन उपकलाओं का समावेश किया गया है । संगीत से केवल आनंदाभुति ही नहीं होती, ध्वनियां मानसिक स्थितियों की भी सूचक होती है । भारत में पुरातन काल से ही वेद और पुराण के सहयोग से रोग निवारण किया जाता था । यह विविध ग्रंथों में प्राप्त उल्लेखों से संगीत चिकित्सा पद्धति की प्राचीनता का पता चलता है । संगीत एवं चिकित्सा का यह संबंध बहुत प्राचीन है। मनुष्य ने बहुत समय पूर्व ही संगीत के चिकित्सकीय उपयोग के विषय में जानकारी प्राप्त की थी तथा उसका उपयोग चिकित्सा के रूप में करने लगे थे। आज दुनियाभर में भारतीय संगीत चिकित्सा के माध्यम से रोगों का निदान किया जा रहा है। संगीत की इस शक्ति का लाभ उठाकर आधुनिक काल में संगीत चिकित्सा पद्धति का प्रतिदिन विकास शुरू है।

प्रस्तावना

ललित कलाओं में संगीत का स्थान अत्यंत महत्वपूर्ण है। संगीत एक अद्भुत ललित कला है जिसके द्वारा आनंद प्राप्त होता है। जिसे सुनकर मनुष्य ही नहीं पशु- पक्षी भी अपनी सुध खो बैठते हैं। संगीत वह साध्य है जिसके द्वारा सहज ही मनुष्य परमात्मा के पास पहुंच जाता है। संगीत वह विद्या है जिसका कोई अंत नहीं। संगीत कला भारतीय संस्कृति की आत्मा है ।भारतीय संस्कृति के उद्भव काल से ही संगीत इसका अभिन्न अंग रहा है। वर्तमान समय में व्यस्त तनावपूर्ण एवं प्रतियोगी सामाजिक परिस्थितियों में संगीत ही एक ऐसी कला है जो मनुष्य के आहत मन एवं आत्मा को कुछ समय के लिए ही सही सुख प्रदान करती है।

संगीत है शक्ति ईश्वर की,
हर स्वर में बसे हैं राम,
रागी जो सुनाएं रागिनी,
रोगी को मिले आराम।

उपरोक्त पंक्ति से संगीत का महत्व दिखाई देता है। संगीत मानवीय मनोविकारों का शमन करने की एक श्रेष्ठ उपचार पद्धति है। इसका प्रभाव गहरा होता है। संगीत की भावना मन के गहरे तल को स्पर्श करती है तथा वहां सुप्त और कटु विकारों को दूर कर आल्हाद एवं आनंद का निर्झर भरती है ।इससे मानसिक अशांति दूर होती है एवं भावनात्मक अतृप्ति मिटती है। इसके इस विशिष्ट गुण के कारण ही वर्तमान समय में 'संगीत चिकित्सा' का प्रचलन बढ़ा है। इस चिकित्सा के प्रभाव से न केवल मानसिक मनोविकृतियां दूर होती हैं बल्कि शारीरिक स्वास्थ्य की भी प्राप्ति होती हैं। संगीत चिकित्सा से रोग उपचार की प्रक्रिया अति पुरातन एवं प्राचीन है । भारत में पुरातन काल से ही वेद और पुराण के सहयोग से रोग निवारण किया जाता था। भारतीय दर्शन में नाद की सर्वोच्च शक्ति का वर्णन प्राप्त होता है। हमारे ऋषि- मुनियों ने नाद को नादब्रह्म की संज्ञा प्रदान की है जो संपूर्ण सृष्टि का मूल है। गंधर्व वेद सामवेद का ही एक अंग होने के कारण गंधर्ववेद के अंगों के उच्चारण से अलग-अलग रोगों का इलाज किया जाता था। सात सुरो से ही संगीत की उत्पत्ति हुई है। उसमें हर सुर का अपना एक अस्तित्व होने के साथ उसका एक अलग अर्थ भी है, इन्हीं सभी सुरों के स्वर समुदायों को लेकर रागों की निर्मित की गई है।भारतीय शास्त्रीय संगीत के विभिन्न रागों से अनेक प्रकार की अद्भुत कार्य संपन्न होते थे। अनेक प्राचीन ग्रंथो में संगीत द्वारा रोग उपचार की विधि वर्णित है। चरक ऋषि ने अपनी पुस्तक सिद्धनाथ के छठे अध्याय में संगीत के चिकित्सीय प्रभाव का वर्णन किया है। आयुर्वेद के अनुसार दोष एवं धातु के असंतुलन से ही बीमारियों का जन्म होता है। शरीर और मस्तिष्क में इनका संतुलन बनाए रखना ही चिकित्सकों का कार्य होता है। सांगितिक स्वर लहरियां इसे संतुलित करने में सक्षम है। संगीत द्वारा चिकित्सा भी संभव है।

भारतीय चिकित्सा शारीरिक एवं मानसिक रोगों के उत्पन्न के वात, पित्त और कफ ये तीन प्रमुख कारण मानती है। कोई भी चिकित्सा पद्धति इन्हीं को संतुलित करती है। जोधपुर मेडिकल कॉलेज के चिकित्सकों ने भी रोगियों पर संगीत चिकित्सा के प्रभाव का अध्ययन किया उनके अनुसार संगीत के मधुर स्वर प्रभाव के कारण रोगी अपनी चिंता

तथा दुख भूल जाते हैं इसलिए जल्दी ठीक हो जाते हैं। अरस्तू , प्लेटो, पाइथागोरस को संगीत के माध्यम से रोगों की उपचार प्रक्रिया भलीभांति ज्ञात थी। सन १८७० में जब ग्रामोफोन की खोज हुई तब संगीत उपचार में गुणात्मक परिवर्तन हुआ। यूरोप में संगीत चिकित्सा को बड़े सम्मान के साथ देखा गया तथा इसका प्रयोग मानसिक रोगों को ठीक करने के लिए किया जाने लगा। सन १९२७ से इसके द्वारा अवसाध एवं तनाव जन्य रोगों को दूर करने हेतु प्रक्रिया चली। संगीत चिकित्सा का प्रयोग युद्ध से प्रभावित मनोरोगों से मुक्ति हेतु किया गया। संगीत उपचार की विद्या सन १९७०-८० के दशक में अमेरिका में **न्यू एज म्यूजिक** के रूप में प्रसिद्ध हुई । क्योंकि इस दौरान मानव चेतना में तनाव प्रवेश करने लग गया था और इसे मुक्त होने के लिए संगीत का सहारा लिया गया था। भारतीय संगीत हमारे तन मन और भावना में नव जागृति भर देती है। संगीत की इस दिव्य क्षमता का प्रभाव शरीर और मन पर बड़े बिना नहीं रह सकता। संगीत हृदय की अतृप्ति को शांत करता है। संगीत तनाव, हार्मोन के रूप में जाने वाली कार्टिसोल की मात्रा को कम कर देता है। इसलिए शरीर शांत और तनाव मुक्त हो जाता है।

संगीत के मधुर धुनों को सुनने से रोगियों का रक्त दबाव, हृदय गति, मांसपेशियों की जकड़न के साथ अनिद्रा तनाव कम हो जाता है। संगीत से अनेक प्रकार के रोगों से मुक्ति दिला सकते हैं। मधुर संगीत से मानसिक एवं भावनात्मक विकारों को दूर कर चिंतन एवं भावना शक्ति में अभिवृद्धि की जा सकती है। बाइबल के एक टेस्टमेंट में भी संगीत चिकित्सा की चर्चा आती है। आधुनिक चिकित्सा विज्ञान के जनक Egypt भी बीमारियों के इलाज के लिए संगीत का प्रयोग करते थे। प्रसिद्ध दक्षिण भारतीय संगीतज्ञ त्यागराजजी ने राग बिहारी में अपनी संगीत रचना नवजीवन धारा के द्वारा एक मृतक को जीवित कर दिया था।

सुप्रसिद्ध सांगीतिक समीक्षक ऑरसन ली ने A Short Account of Indian Music नामक पुस्तक में लिखा है कि मुगल दरबार के तानसेन एक बड़े चमत्कारी गायक थे। उन्होंने दीपक राग गाकर अकबर बादशाह को आश्चर्य में डुबो दिया था। इस राग को गाने पर अग्नि प्रज्वलित हो उठती थी।

बीसवीं सदी में पाश्चात्य देशों ने संगीत चिकित्सा पर व्यापक रूप से अनुसंधान करके इसका प्रचुर मात्रा में प्रयोग आरंभ किया। १९४४ ई. में मिशिगन विश्वविद्यालय द्वारा संगीत चिकित्सा का प्रथम पाठ्यक्रम तैयार किया गया। इस पाठ्यक्रम के माध्यम से छात्रों को शिक्षा दी जाने लगी। इस पाठ्यक्रम को सन १९४६ में सबसे पहले कन्यास विश्वविद्यालय में प्रारंभ किया गया था। तत्पश्चात अन्य विश्वविद्यालयों ने भी इसे अपना लिया। सन १९५० ई. में **नेशनल एसोसिएशन फॉर म्यूजिक थेरेपी** नाम से इस कार्य के लिए एक संस्था स्थापित कर दी। इस संस्था के द्वारा संगीत चिकित्सा के प्रमाण पत्र दिए जाने लगे और पंजीकरण आदि होने लगे।

रागों द्वारा रोगों के उपचार की संक्षिप्त सारणी संगीत प्रेमियों के अवलोकनार्थ निम्नलिखित प्रस्तुत है-

१) राग अहीर भैरव-अपच, संधिवात या जोड़ों का दर्द, गठिया, हाइपरटेंशन।

२) राग दरबारी कानडा-सिर दर्द, रक्तदाब।

३) राग जौनपुरी-अतिसार,सिर दर्द, कब्ज ।

४) राग आसावरी-निम्न रक्तचाप।

५) राग जय-जयवंती-अतिसार, संधिवात,सिर दर्द।

६) राग यमन कल्याण-तनाव।

७) राग भैरवी-रक्तदाब, तनाव, अनिद्रा, जोड़ों का दर्द।

८) राग केदार-कमर दर्द, कफ, दमा,सिर दर्द।

९) राग काफी-अनिद्रा और नींद संबंधी विकारों में कारगर।

१०) राग चंद्र कंस-मधुमेह, उच्च रक्तचाप, और हृदय संबंधी रोग।

इस प्रकार विभिन्न रागों के अभ्यास व सुनने से अनेकों रोगों का उपचार किया जा सकता है। संगीत का प्रभाव केवल मनुष्य पर ही नहीं समस्त प्राणी तथा वनस्पतियों पर भी स्पष्ट रूप से दर्शाया जा चुका है। खोयी हुई हिरण को राग तोड़ी सुनाकर बैजू बावरा द्वारा बुलाया गया, तानसेन के द्वारा मियां मल्हार राग से वर्षा का आना,राग दीपक से दीप जलवाना यह सभी संगीत के माध्यम से ही संभव हुआ करता था ऐसा उल्लेख मिलता है।

निष्कर्ष

इस प्रकार वर्तमान समय में वैज्ञानिकों व संगीत तल्यों ने नित्य नए शोध कार्यों द्वारा इस तथ्य को प्रमाणित कर दिया है कि विभिन्न शारीरिक एवं मानसिक रोगों की चिकित्सा में संगीत का महत्वपूर्ण योगदान है आज संगीत चिकित्सा भारत में ही नहीं अभी तो पूरे विश्व में एक संगीत चिकित्सा नाम से जानी जाती है। जैसे आयुर्वेदिक, होम्योपैथिक, एलोपैथिक की तरह संगीत चिकित्सा पद्धति का भी अपना एक महत्वपूर्ण स्थान निर्माण हो गया है। निष्कर्ष रूप से कहा जाता है कि संगीत चिकित्सा रोगों के उपचार में उपयोगी सिद्ध हो गई है। इसके लिए यह जरूरी नहीं कि रोगी को शास्त्रीय संगीत आता हो जिन्हें इस संगीत की समझ नहीं है उनकी भी इस पद्धति से संगीत चिकित्सा संभव हो रही है।

संदर्भ ग्रंथ

1) तबला पुराण- पं. विजय शंकर मिश्रा
2) भारतीय संगीत एवं मनोविज्ञान- डॉ. वसुधा कुलकर्णी
3) संगीत पत्रिका- हाथरस द्वारा प्रकाशित दिसंबर २००९

सहा.प्रा.ज्ञानेश्वर बोंपिलवार

4) संगीत चिकित्सा- डॉ. सतीश वर्मा
5) संगीत संजीवनी- लावण्य कीर्ति सिंह
6) संगीत कला विहार- अ. भा. गां. महाविद्यालय मंडल मुंबई- अप्रैल/ में २०१०
7) प्रणव भारती- पं. ओमकारनाथ ठाकुर
8) समाचार पत्र - दैनिक जागरण दिनांक ५ नवंबर २००६
9) संगीत चिकित्सा- डॉ. विजय तारे

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No.36 Sept-Oct 2023

सबाल्टर्न प्रणालीचे आद्य जनक इतिहासकार महात्मा फुले एक शोध

फकिरा भगवान राजगुरू
(प्रा.शिक्षक)
मु.पो. देऊळगांव माळी ता. मेहकर, जि.बुलडाणा
Corresponding Author- फकिरा भगवान राजगुरू
Email-Fakirarajguru36@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.10369216

सारांश-

आधुनिकीकरणामुळे बदललेली जीवनशैली, स्थलांतर शहरीकरण या विविध कारणामुळे लोकांच्या आहाराविषयक सवयी बदलल्या. बेकरी पदार्थाला जास्त, पसंती दिल्या गेली व मैद्याचा वापर आहारात वाढला. जसे मैद्याची बिस्किटे, ब्रेड, केक, मॅगी, पिझ्झा, बर्गर, पास्ता, नूडल्स या रेडी टू ईट,पॅकेट मधील पदार्थ, प्रिझर्व्हेटिव्ह पदार्थ लोकांनी खाणे पसंत केले. त्यामुळे या आहारातून शरीराला आवश्यक असलेले पोषक घटक मिळूच शकत नाही. या चुकीच्या अन्नग्रहणामुळे लोकांना विविध आजाराने ग्रासले आहे.मधुमेह, कर्करोग, अतीलठ्ठपणा, बद्धकोष्ठता, हृदयविकार, कुपोषण इत्यादी. असे विविध आजार शरीरात ठाण मांडून बसले आहेत. शरीरातील ८०% आजार चुकीच्या आहारामुळे निर्माण झाली. आरोग्याची हानी होऊन रोगप्रतिकारशक्ती सुद्धा नाहीशी झाली. त्याचा सर्वात मोठा फटका हा कोरोणा काळात संपूर्ण विश्वाला बसला. निरोगी आणि सुदृढ आयुष्य जगायचे असेल तर पारंपारिक पिकाचा वापर आहारात व्हायला हवा. हे लोकांना कळून चुकले आहे.उत्तम आरोग्या करिता बदलत्या जीवनशैलीमधे पोषणाच्या दृष्टीने भरडधान्याचे आहारात महत्व वाढले आहे.शाश्वत अन्नप्रणालीमध्ये याचा समावेश करता येऊ शकतो. ''२०२३ वर्ष अंतरराष्ट्रीय भरडधान्य म्हणून घोषित करण्यात आले आहे''.दैनंदिन आहारात ज्वारी, बाजरी, नाचणी, रागी, राजगिरा, भगर,राळा, बार्ली, यांचा समावेश वाढवला पाहिजे.भरडधान्या मधील पोषक घटकाचा,उत्पादनाचा व, साठवणुकीचा विचार केला असता भरडधान्याला सुपरफुड मानले गेले आहे. तत्सम तृणधान्ये आरोग्याच्या दृष्टीने,शेतकरी आणि पर्यावरणाच्या दृष्टीने ग्राहकांच्या दृष्टीने, सर्व वयोगटाकरिता उत्तम पोषणाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरतात.

की वर्ड – जीवनशैली, पोषण, तत्सम,तृणधान्य, माल्टेड.

प्रस्तावना

भारत देशाला कृषिप्रधान देश म्हणून संपूर्ण विश्वात ओळखले जाते. भारतातील ७० ते ७५% लोक ग्रामीण भागात राहतात. त्यांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे. औदयोगिकीकरण व जागतीकरणाच्या दृष्टिने शेतीला अनन्यसाधारण महत्व आहे. भारतातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करता येथे तृणधान्याचे पिक घेण्यास प्राधान्य दिले जाते. भारतात शतकानुशतके पौष्टिक तत्सम तृणधान्यांची पिके घेतली जातात.या पिकांना पारंपारिक पिकेही मानले जाते. पूर्वीच्या काळातील लोकांचा अन्नग्रहण करण्याच्या पद्धतीचा मागोवा घेतला असता असे लक्षात येते की या पारंपारिक भरड धान्याचा वापर सर्वात जास्त केला जायचा.त्यांच्या आहारात ज्वारी, बाजरी नाचणी, भगर, राजगिरा, बार्ली, विविध डाळीं,दूध,दही, तूप, लोणी हिरव्या पालेभाज्या असा संपुर्ण पोष्टीक आहाराचा समावेश असायचा. त्या मुळे तेव्हाचे लोक हे काकट व आजारमुक्त होते.(८)आजही आपण ८० ते ९० वर्ष वयोगटातील लोकांना पाहीले तर ते कोणत्याही आजाराने ग्रस्त नसल्याचे दिसते. कारण त्यांनी आहाराच्या सवयी अजुनही बदललेल्या नाहीत.परंतु मागील काही दशकात लोकसंख्या प्रचंड वाढली व लोकांना अन्नाची कमतरता भासु लागली त्यामुळेच हरितक्रांतीने शेती क्षेत्रात प्रगती केली व कमीत कमी वेळात भरघोस पिक, जास्तीत जास्त उत्पन्न काढण्यासाठी भरमसाट खते, संकरित वाणाचा वापर वाढला त्यातुनच गहू, तांदूळ, हरभरा, तूर, कापूस, सोयाबीन या पिकांना प्राधान्यक्रम मिळाला व पारंपारिक पिक कालबाह्य ठरली.

आधुनिकीकरणामुळे बदललेली जीवनशैली, स्थलांतर, शहरीकरण या विविध कारणामुळे लोकांच्या आहाराविषयक सवयी बदलत गेल्या.बेकरी पदार्थाला जास्त पसंती दिल्या गेली व मैद्याचा वापर आहारात वाढला.मैद्याची बिस्किटे, ब्रेड, कुकीज,केक, मँगी, पिझा, बर्गर, पास्ता, नूडल्स ,रेडी टू ईट पॅकेटमधील पदार्थ, प्रिझर्व्हेटिव्ह पदार्थ लोकांनी खाणे पसंत केले. त्यामुळे या आहारातून शरीराला आवश्यक पोषक घटक मिळू शकत नाही. या चुकीच्या अन्नग्रहणा मुळे लोकांना विविध आजाराने ग्रासले आहे. मधुमेह, कर्करोग, अतीलठ्ठपणा, बद्धकोष्ठता, हृदयविकार, असे विविध रोग शरीरात ठाण मांडून बसली आहेत. शरीरातील ८०% आजार या चुकीच्या आहारामुळे निर्माण होतात.या मुळे आरोग्याची हानी होऊन

रोगप्रतिकार शक्ती सुद्धा नाहीशी झाली. त्याचा सर्वात मोठा फटका हा कोरोणा काळात संपूर्ण विश्वाला बसला. लोकांच्या चुकीच्या आहारामुळे त्यांच्यात रोगप्रतीकारक शक्तीच उरली नाही याची जाणीव प्रत्येकाला या जागतिक महामारीच्या वेळी झाली. निरोगी आणि सुदृढ आयुष्य जगायचे असेल तर पारंपारिक भरड धान्यांचा वापर आहारात व्हायला हवा.हे लोकांना कळून चुकले आहे. उत्तम आरोग्या करिता पोषक अन्न आहार म्हणून तृणधान्ये उत्तम पर्याय असू शकतो.'' आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष म्हणून २०२३ घोषित करण्यात आले आहे. दैनंदिन आहारात भरड धान्याचा वापर केला गेला पाहिजे. ही भरडधान्ये तृणधान्ये प्रकारात मोडतात यात ज्वारी, बाजरी, नाचणी, रागी, बार्ली यांच्या समावेश होतो. तृणधान्यातील पोषक घटकांचा,उत्पादनक्षमतेचा व साठवणुकिचा विचार केला असता तृणधान्ये-हे एक सुपरफुड मानले गेले आहे

तृणधान्याचे (डपससमजे) प्रकार : ज्वारी,नाचणी,बाजरी,कोदो,भगर,राळे,कुटकी,सावा,जवस,राजगिरा.

तत्सम तृणधान्यातील पोषक तत्वे (100 gm)

तृणधान्ये	कॅलरी	प्रथिने (gm)	स्निग्ध(gm)	कार्बोदके (gm)	जीवनसत्वे B.1 (m.gm)	कॅल्शियम (m.gm)	लोह (m.gm)	फायबर्स (m.gm)
ज्वारी	349	10.4	1.9	72.6	0.37	25.0	5.8	1.6
बाजरी	361	11.6	5.0	67.5	0.33	42.0	8.0	1.2
नाचणी	328	7.3	1.3	72.0	0.42	344	6.4	3.6
कोदो	15.3	8.9	2.6	66.2	0.3	15.3	1.7	6.4
राळे	331	12.3	4.3	60.1	0.6	31.0	2.8	-
भगर	341.1	12.5	1.1	70.4	0.4	14.0	0.8	-
सावा	307.1	6.2	2.2	65.6	0.3	20.0	5.0	-
कुटकी	346.3	10.1	3.9	65.6	0.3	16.1	1.3	7.7

तत्सम तृणधान्यातील पोषक घटकांचा विचार करून मिलेट्सचा आहारात समावेश व्हावा, प्रचार व प्रसार व्हावा म्हणून G २० मध्ये सुध्दा - Milletचे विविध पदार्थ पाहुन्यांना खाण्याकरिता बनविले गेले. पौष्टिक तृणधान्ये G २० चे विषश आकर्षण ठरले.(७)

आहारातील महत्व.

millets मध्ये विविध पोषक घटकांचा समावेश होतो. याच्या सेवनाने पोषक, सकस आहार मिळण्यास मदत होते. प्रथिनांचा उत्तम स्रोत आहे. जे लोक शाकाहारी आहेत त्यांच्या आहारात milles चा वापर केल्यास प्रथिनांची कमतरता भासणार नाही.व शरीराच्या मजबुती करिता फायद्याचे होईल. भरड धान्यामध्ये गव्हातील ग्लुटेन सारखा चिकटपणा नसतो.त्यामुळे सेलिआग रोगाने ग्रस्त व्यक्ती करिता योग्य आहार आहे.(६)उच्चप्रतिचे तंतुमय पदार्थ यात असतात त्यामुळे बद्धकोष्ठतेचा त्रास टाळता येतो.भुक लवकर लागत नाही म्हणून वजनसुद्धा वाढत नाही.(७)हृदयाच्या आरोग्यावर चांगला परिणाम होतो.त्यात ओमेगा -३ आणि ओमेगा-६ सारखे फायदेशीर फॅटी ऍसिड असल्यामुळे चांगल्या कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रित ठेवून हृदय व धमन्यांचे आरोग्य उत्तम ठेवण्यास मदत होते. लोहाचे प्रमाण भरपूर असते त्यामुळे शरीरातील हिमोग्लोबीन वाढण्यास मदत होते. नाचणीमध्ये सर्वाधिक कैल्शियम चे प्रमाण आढळते त्याच्या सेवनाने हाडे मजबूत होतात. यामध्ये अँटिऑक्सिडंट, जीवनसत्वे, तंतुमय घटक उत्तम प्रमाणाव असतात यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते. तृणध्यान्यातील लॅक्टिक अँसिड मोठ्या आतड्यांना फायदेशीर ठरते. पचनक्रिया सुधारते मोठ्या आतड्यांचा कर्करोग होण्याचा धोका कमी होतो. आरोग्यदायी जीवन लाभते. तृणधान्याच्या सेवनाने आजार होत नाही त्यातील अँटिऑक्सिडंट मुळे रोगप्रतीकारक शक्ती वाढते. परंतु रोगाचा प्रादुर्भाव झालाच तर शरीराची झीज भरून काढण्यास मदत होते. कोरोणा काळात या धान्याने आरोग्य सुधारण्यास महत्वाचे योगदान दिले. भरड धान्यांमध्ये उपस्थित आरोग्यवर्धक पोषक घटकांमुळे या धान्याचे सेवन आहारात महत्त्वाचे ठरते. म्हणून बदलत्या काळातील पोषणाच्या दृष्टीने भरड धान्याचे (डपससमजे) चे महत्व वाढले आहे. अन्नप्रक्रिया तंत्रज्ञानाद्वारे पारंपारिक पदार्थांमध्ये काही बदल करून नवीन खाद्यपदार्थ बनविल्यास भरड धान्यापासून नाविन्यपूर्ण पदार्थ बनविता येतील यातून नवीन स्टार्टअप करिता प्रोत्साहन मिळेल.

सर्व वयोगटाकरिता महत्त्वाचे दुधतोडण्याच्या वयातील लहान बाळाला माल्टेड नाचणी सत्व दिल्या जाते.(३)गर्भावस्थेतील महिला, स्तनदामाता,वाढत्यावयाची मुल व तरुणवर्ग तसेच वृध्द लोकान करिता डपससमजे चा आहारात समावेश करणे अत्यंत आवश्यक आहे. भरडधान्याचा आहारात समावेश वाढावा याकरिता याधांन्याचे वाटप स्वस्त धान्य दुकानावर व्हायला पाहिजे. जेणेकरून दारिर्द्य रेषेखालील लोकांना सुद्धा पोषक आहार मिळेल. शाळेतील मध्यान्य भोजनात पोषक आहार म्हणून भरडध्यान्याचे पदार्थ दयावे जसे, बाजरीयी खिचडी, इडली, आप्पे, इत्यादी हे पोषणमुल्य असलेले सुपर फुड प्रत्येक स्तरापर्यंत पोहले पाहिजे.

दुष्काळग्रस्त भागात महत्वाचे.

दुष्काळी प्रदेशात जीथे पाण्याचे प्रमाण कमी आहे. त्या ठिकाणी Millets उत्पादीत होऊ शकतात.तेथील लोकांना पोषक आहार मिळण्या करिता सहाय्यक ठरतील. कुपोषण ग्रस्त भागात तृणधान्ये वरदान ठरतील. कुपोषण समस्या व पोषणमूल्य सुधारण्याकरिता शाश्वत विकास अन्न प्रणालीमध्ये या धान्याचे योगदान मिळू शकते.

शेतकऱ्यांसाठी उपयुक्त

Miliets हे शेतकऱ्यांकरिता उपयुक्त आहेत.या धान्याचे पिक कमी वेळात घेतले जाते. त्यामुळे शेतकऱ्याला उत्पन्नात वाढ होते.तृणध्यान्या करिता फारसा खर्च लागत नाही. रासायनिक खते व कीटकनाशके यांचा वापर कमी प्रमाणात होतो.उत्पादन खर्च कमी येतो. उत्पादनात वाढ होते. या पिकाकरिता जास्त पाण्याची गरज नसते. पाण्याचा ताण सहन करून भरपूर उत्पन्न होते. हलक्या प्रतीच्या जमिनीमध्ये व कोरडवाहू भागात तृणधान्य वाढतात. व जमीनीचा पोत सुधारतो.त्यामुळे शेतकऱ्याला यांचा फायदाच होतो. शेतकऱ्यांना हे पिक घेण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. याकरिता कृषी अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन कार्यक्रम प्रत्येक गावात राबवल्यात आले पाहिजे. त्यामुळे भरड धान्याच्या उत्पादनाला प्रोत्साहन मिळेल.

पर्यावरणाला उपयुक्त

तृणधान्याच्या धाड्यांचा गुरांना चारा होतो. पक्षांचे तृणधान्याचे दाणे आवडते खाद्य आहे.मानसा प्रमाणे पशु पक्षांना सुद्धा अन्न म्हणून तृणधान्याचा वापर करता येतो. तृणधान्यावर कीटकनाशकांचा व खताचा वापर कमी होतो. त्यामुळे जमीनीची धुप थांबते. पर्यावरण व जमीनीचे प्रदुषण होत नाही. पाण्याची बचत होते. हे पिक पुर्णपणे पावसावर अवलंबून असते. दुष्काळी भागातही हे पिक उत्तम प्रकारे उत्पादन देते. हवामानास अनुकुल पिक आहे, त्यामुळे या पिकाचे उत्पादन वाढायला हवे. शाश्वत शेतीकरीता पर्यावरण पुरक पिक असू शकते

ग्राहकांनकरिता उपयुक्त

तृणधांन्या पासुन बेकरी पदार्थ, रेडी टू कुक पिठ, रेडी टू ईट पदार्थ- पास्ता नुडल्स, केक, बिस्किट, कुकीज, संरक्षणात्मक पदार्थ, इत्यादी ग्राहकांन करिता बाजारपेठेत उपलब्ध करून देता येतात व त्याचा उपयोग ग्राहकांचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी मदत होते. ग्राहकांनी तृणधान्ये युक्त पदार्थांचा आहारात जास्तीत जोस्त वापर करावा या करिता जनजागृती कार्यक्रम राबवने आवश्यक आहे. तृणधान्यावर प्रक्रिया करून अन्न पदार्थ बनवण्या करिता प्रशिक्षण कार्यक्रम असायला पाहिजे. ग्रामिण महिलांना हे प्रशिक्षण देवून महिला बचत गटाकडून हा व्यवसाय सुरू केला गेला पाहिजे. त्यामुळे शेतकऱ्यांना,ग्रामिण महिलांना आर्थिक लाभ घेता येईल.त्याच बरोबर पोष्टिक भरड धान्य रेसिपी पुस्तिका निर्माण केले गेले पाहिजे त्यातून गृहिणी पौष्टिक पदार्थ बनवू शकतील.

संशोधनाची उदिष्टे -

१) आरोग्यवर्धक millet ला प्रोत्साहन देणे.

२) शेतकरी, पर्यावरण,आरोग्याच्या हिताकरिता जनजागृती करणे.

३) बदलत्या जीवनशैलीच्या दृष्टिने Millet चा आहारात समावेश करणें

४) गृहअर्थशास्त्र या विषयाची एक शाखा आहारशास्त्राच्या अभ्यासक्रमात Millet समाविष्ट करण्यात प्रोत्साहन देणे.

निष्कर्ष

आधुनिकीकरणाच्या विळख्यात मनुष्य गुरुफटत गेल्यामुळे.चुकीच्या अन्नग्रहणाची सवय त्याला लागली.त्याचे गंभीर परिणाम मानसाच्या आरोग्यावर प्रकर्षाने दिसु लागले. त्यातुन मानसाच्या आरोग्याची नासाडी होऊन विविध आजाराने तो ग्रस्त झाला आहे.यातुन बाहेर पडायचे असेल तर आरोग्यदायी अन्न ग्रहण करण्याची सवय मानसाने स्विकारली पाहिजे.त्याकरिता भरड धान्या सारखे सुपर फुड त्याच्या आहारात असायला पाहीजे. संयुक्त संघाने (UN) "आंतरराष्ट्रिय (IYOM) २०२३ पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून घोषित केले आहे. त्यामागील महत्वाचा उद्देश म्हणजे पारंपारिक पिकाची लागवड करण्याकरिता शेतकाऱ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन देणे, ग्रामीण शेतकरी महिलांना अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान प्रशिक्षण देणे व सर्वसामान्य गृहिणींना भरड धान्यांपासून तयार होणारे पौष्टिक पदार्थांची रेसिपी पुस्तिका उपलब्ध करून देणे.नवीन स्टार्टअप करिता तरुण वर्गाला व शेतकरी वर्गाला प्रोत्साहित करणे हा आहे. बदलत्या जीवनशैलीमध्ये पोषणाच्या दृष्टीने तत्सम तृणधान्याने किती लाभदायी आहेत. या करिता डपससमजे ला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

संदर्भ-

१) Millets as a super foMd %A Review & Aaditya S.Bhandari,
Kundan B Jat. Anirudha A. Kanse] Pruthimesh D. Gorade.Research Gate 31may 2023

(२) बाजरी : अन्न आणि पाणी सुरक्षेशी लढण्यासाठी सुपर फुड- शोधा सुरी ६ एप्रिल २०२२

३) मानवी पोषण व आहारशास्त्रीय मूलतत्वे - डॉ.आशा देऊस्कर, प्र.क्र - ३६२, पुर्नमुद्रण -२००४, विद्या प्रकाशन नागपुर. पौष्टिक

४) "आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ण (IYOM) २०२३" पौष्टिक तृणधान्यांना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज - सुनील चव्हान,भाप्रसे अयुक्त कृषी,महाराष्ट्र राज्य पुणे,Jan-.३१-२०२३ संपदा,

५) तृणधान्य पिकाचे आहारातील महत्व - शेतकरी सेवार्थ,April -०२-२०२३

६) "सुपरफूड म्हणून बाजरी" तुमचे अन्न तुमचे औषध असूद्या, अनुराग जेना, विशाल शर्मा आणि उषा दत्ता :१८ - May - १०३

७) G२० मे रही जिन मिलेट्स की धूम - हिमानी दीवान, Sep-११-२०२३

८) निरामय आरोग्यप्रद बाजरी: प्रा. वृषाली ओक , तरुण भारत ,विशेषांक -२०२३

९) तृणधान्य सुधारित पोषण, आरोग्य आणि शाखत अन्नप्रणाली, सचिन अडगुळ, तरुण भारत विशेषांक - २०२३

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No. 36 Sept-Oct 2023

स्थानिक इतिहास व त्याचे महत्त्व

शेक नसीम अहेमद
संशोधक
Corresponding Author- शेक नसीम अहेमद
DOI- 10.5281/zenodo.10369356

प्रस्तावना :

इतिहास म्हणजे भौगोलिकदृष्ट्या लहान क्षेत्रावर लक्षकेंद्रित करणारे ऐतिहासिकलेखन. याशिवाय, हा एक अशिक्षित प्रेक्षकांसाठी लिहिलेला 1/4 इतिहास आहे. हा स्थानिक इतिहास 18 व्या आणि 19 व्याशतकात पाश्चात्य देशांमध्ये, विशेषतः ब्रिटन, फ्रान्स आणि अमेरिकेत उच्चवर्णीय (एलिटक्लास) यांनी लिहिला होता. 19 वे शतक, स्थानिक इतिहास लेखनाचाविस्तार झाला आणि स्थानिक इतिहास लिहिण्यासाठी अनेक संस्थाही निर्माण झाल्या. 19 व्या शतकात युरोपात औद्योगिक क्रांती झाली, ज्यामुळे शहरीकरणाला चालना मिळाली. त्यामुळे लोक इकडून तिकडे जाऊ लागले. रोजगारा चा शोध, ज्यामुळे स्थानिक समुदाय अव्यवस्थित झाला. त्यानंतर त्यांची ओळख हरवली, अशा वेळी ही कल्पना आली. स्थानिक आणि प्रादेशिक स्तरावर इतिहास लेखन व्हायला हवे असे बौद्धिक वर्गात 1860 पर्यंत अनेक इतिहासकार आणि गट उदयास आले ज्यांनी स्थानिक इतिहास लेखन पुढे नेण्यात स्वारस्य दाखवले.

वंशावळी आणि कौटुंबिक इतिहास यासारखे काही मनोरंजक विषय स्थानिक इतिहासात जोडले गेले. अमेरिकेत 19 व्या शतकात, या इतिहास लेखनाला तिथल्या उच्चवर्णीयांनी महत्त्व दिले जे सामाजिक जीवनाचे अस्तित्व सुनिश्चित करेल. त्यांनी राजकीय आणि स्थानिक सरदारांची यादी तयार केली. सन 1930 पर्यंत, स्थानिक इतिहासाच्या क्षेत्रात व्यापारीकरण दिसून आले आणि या काळात अनेक पुस्तके लिहिली गेली. त्याचप्रमाणे स्वीडनमध्ये, फ्रान्समध्ये, अमेरिकेत, स्थानिक इतिहासाच्या बळकटीसाठी हातभार लावला. ब्रिटनमध्ये लायसेंटिएट 1947 मध्ये, स्थानिक इतिहासाचा पहिला विभाग उघडण्यात आला जिथे स्थानिक इतिहास शिकवण्यास सुरुवात झाली. नंतर ते लायसेंटिएट स्कूल बनले. या शाळांचा उद्देश स्थानिक इतिहासाला महत्व देणे होते. फिनबर्ग आणि हॉस्किन हे त्या काळातील महत्त्वाचे इतिहासकार होते. त्यांनी अनेक प्रसंगी स्थानिक इतिहास लेखनावर टीका केली. ते म्हणाले की, पारंपारिक इतिहास लेखनात सरंजामशाही घराण्यांबद्दलचे लेखन हे उच्चभ् डिग्री वर्ग आणि पुराणमतवादी वर्गाने केले आहे. फिनवर्ग म्हणतो की स्थानिक माणसाची उत्पत्ती, विकास, उदय आणि पतन या विषयांवर लिहिणे आवश्यक आहे.

आशिया आणि आफ्रिकेत स्थानिक इतिहासाचे स्वरूप वेगळे आहे, येथे स्थानिक इतिहास मौखिक स्वरूपात आढळतो. राजघराणे आणि युद्ध हे येथील परंपरेचे मुख्य विषय आहेत. भारतातही राजवंशाचा इतिहास आणि सैनिकांच्या कर्तृत्वाचे वर्णन मौखिक स्वरूपात केले गेले. हौशी आणि अशिक्षित लोकांसाठी स्थानिक इतिहास हे मुख्य आकर्षण होते. हे लोक त्यांच्या समाजात आणि भूतकाळात अधिक रस घेऊ लागले. यातील अनेक इतिहासकारहे 19 व्याशतकात ज्या समाजात जन्माला आले. त्यांनी त्याच समुदायावर लिहिले.

पारंपारिक स्थानिक इतिहास मौखिक होते, तर नवीन स्थानिक इतिहास लिहिले आणि प्रकाशित केले गेले, नवीन स्थानिक इतिहास लेखनात स्थानिक मौखिक आणि प्राथमिक स्त्रोतांचा वापर केला गेला, जुन्या इतिहास लेखनात नवीन इतिहास लेखनाचे मार्गदर्शन केले गेले, नवीन स्थानिक इतिहास पाश्चात्य स्त्रोत पद्धती वापरून लिहिला गेला. एक पद्धतशीर रीतीने. त्यांचे लेखन कोणत्याही काल्पनिक धार्मिक विषयांवर आधारित नव्हते तर ते उत्क्रांतीच्या दृष्टिकोनावर आधारित होते.

उद्देश-

1) स्थानिक इतिहासाचा परिचय करून देणे.
2) स्थानिक इतिहास लेखनाची सुरुवात। पूर्वपिरीका समजून घेणे.
3) स्थानिक इतिहासाचे महत्व समजून घेणे
4) स्थानिक इतिहासाचे फायदे स्पष्ट करणे.
5) स्थानिक इतिहासाचे जीवनातील स्थान अभ्यासणे

स्थानिक इतिहासाचे महत्त्व-

ई.एल.हसलक यांनी स्थानिक इतिहासाचे महत्त्व विशद करताना त्यांनी लिहिले आहे "स्थानिक इतिहासाच्या अभ्यासाला खरे महत्त्व आहे". राष्ट्रीय इतिहासावर प्रभाव टाकणाऱ्या आणि स्थानिक परिस्थितीला सौंदर्याने मांडणाऱ्या विविध ऐतिहासिक चळवळींचे रंजक आणि तपशीलवार वर्णन यात केले आहे. विद्यार्थ्यांना मनोरंजक आणि मनोरंजक. ऐतिहासिक देखावे, नावे आणि वास्तू इत्यादींशी दैनंदिन संपर्क स्थापित करून विद्यार्थ्यांसाठी एक मनोरंजक आणि वास्तविक वातावरण तयार करते. यामुळे विद्यार्थ्यांना वर्तमानाबद्दल विचार करण्यास प्रवृत्त करते.ते त्या वस्तुस्थिती आणि गोष्टी काढून टाकते आणि त्यांच्याकडे नेते, जे गेले आहे, म्हणजेच ते गेलेल्या गोष्टींबद्दल विचार करण्यास तयार करते."

स्थानिक इतिहासाचा अर्थ आणि महत्त्व पाहिल्यानंतर प्रश्न पडतो की स्थानिक इतिहासाचे फायदे काय? यातून मिळणारे

फायदे पुढीलप्रमाणे आहेत-

1) स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून मुलांमध्ये त्यांच्या स्थानिक परंपरा आणि चालीरीतींबद्दल आदराची भावना निर्माण होऊ शकते. यापरंपरा आणि चालीरीती त्या त्या ठिकाणच्या नैतिक जीवनाचे प्रतिबिंब आहेत.
2) या द्वारे पुराणमतवादाची भावना दूर करून मुलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक करता येईल.
3) स्थानिक इतिहास आपल्याला आपल्या पूर्वजांशी ओळख करून देतो आणि त्याच्या ज्ञानाने आपण आपल्या भूतकाळाचे ज्ञान मिळवू शकतो. यातून मुलांमध्ये त्या जागेबद्दल प्रेम आणि भक्तीची भावना निर्माण होते.
4) स्थानिक इतिहासाच्या शिकवण्या मुळे गरीब लोकांच्या जीवनाबद्दल मुलांमध्ये सद्भावना आणि सहानुभूती निर्माण होते आणि त्यांच्या ज्ञानाने ते त्यांच्या गरिबीचे कारण असलेल्या समस्या समजूनघेण्याचा प्रयत्न करतात.
5) स्थानिक इतिहासा मुळे मुलांमध्ये वैज्ञानिक स्वभाव विकसित होतो.
6) आधुनिक युगात सह-अभ्यासक्रमांवर अधिक भर दिलाजात आहे. परंतु स्थानिक इतिहास मुलांच्या विकासासाठी एक नवीन मार्ग तयार करतो. हे शिकवून त्यांचे चारित्र्य सहजतेने घडवता येते.

समारोप-

स्थानिक इतिहासामुळे लोकांमध्ये जागरूकता निर्माण होईल. तसेच त्यांना त्यांच्या स्थानिक इतिहासचे महत्त्व कळेल. आणि स्थानीक इतिहास जोपासण्यासाठी प्रादेशिक, स्थानिक लोकांचा सहभाग प्राप्त करता येईल. स्थानिक इतिहासातून शिकून स्थानीक लोकांना त्यांचा जीवनमान उंचावता येईल.

संदर्भसूची-

1) डॉ.साहेबराव गाठाळ - इतिहासलेखन शास्त्र व इतिहासकार (कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद)
2) WILLA K. BAUM - Oral History for the Local Historical Society.
3) (Third Edition, RevisedA Division of Rowman & Littlefield Publishers, INC. New York-Oxford)

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No. 36 Sept-Oct 2023

A Study of Interest towards Sports Activities among Students of Rural Academic Colleges

Dr. Pravin D. Lamkhade
Rani Indirabai Bhosle Mahavidyalaya, Kuhi, Nagpur
Corresponding Author- Dr. Pravin D. Lamkhade
Email: lamkhade.pd@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.10369379

Abstract-

The purpose of this study was to access the Interest towards sports activities among students of rural Academic colleges. Total 200 students of rural Academic colleges under Kuhi tehsil area were selected as samples by implying Simple random sampling technique taking 100 from each session like Humanities - Arts Group & Science -Technology Studies. Data were collected through questionnaire containing 10 sub items, which was constructed under the supervision of subject experts. The reliability and validity of the questionnaire were adopted by using test-retest method. Responses which were on five point scale were tabulated and converted into percentages and for statistical analyses, χ^2 (chi square) test was adopted. The obtained results of this study reveal that the respondents from rural colleges have positive opinion for interest towards sports activities.

Key words: Interest, sports activities, rural students

Introduction

Human body is one of the most good-looking as well as the most multifarious thing nature has shaped. The intelligent ways with which this exceptional creation acts, reacts and interacts is anexceptional phenomenon.

It has been accepted that sporting activity is any bodily movement that is produced by the contraction of skeletal muscles and that substantially increases the amount of energy you expend is the main cause of Physical Activeness. Therefore, it should be an essential part of life. Physical Activeness depends on mainly two factors. One is balanced diet which gives us essential energy to do the daily exertion. Second is Physical Activity which has come into focus as the new form of education, and focalize games & sports for the total development of human to stay healthy and active for a longer time.

To many psychologists, interest is a vague, everyday term that denotes a personal characteristic or an affective state and that has already been thoroughly investigated by modern motivational psychology. Interest is closely related to learning. It allows for correct and complete recognition of an object, leads to meaningful learning, promotes long-term storage of knowledge, and provides motivation for further learning. Interest is a content-specific concept. It is constantly related to specific topics, tasks or activities. Interest is ainstruction force.

Methodology

To study the interest towards sports activities, this study was conducted on 200 students participated as samples, selected by adopting random sampling technique, of two govt. rural colleges of H.P. i.e. HAG and STS.

A questionnaire was developed by the researcher to obtain the requisite information from the respondents to know their interest towards sports activities. After discussing the experts of psychology, a questionnaire consisting 10 sub items was prepared and each of the item was to be responded on five point scale i.e. Strongly Agree (SA), Agree (A), Undecided (U), Disagree (D), Strongly Disagree (SD).


The responses collected on five point scale were converted into numerical values and were arranged in frequencies to apply χ^2 test of statistics for the interpretation and analyses of the tabulated data. The statements were made according to these sub items i.e. Reading Sports News, Watching Live Match, Sports Environment, Life Long Discipline, Regaining Energy, Interest in Adventure Sports, Sports Persons as Role Model, Lure of Physical Fitness, Sports as Challenge, Infrastructure not a Hurdle.


Findings:

Responses of Respondents Regarding Interest for Sports Activities

	No. of Respondents	Responses: +ve ← N → -ve										Chi square ($\chi 2$)
		S.A.		A		U		D		SD		
		Obs. Res.	%	Obs. Res.	%	Obs. Res.	%	Obs. Res.	%	Obs. Res.	%	
Reading sports news	100	54	54 %	10	10 %	16	16 %	14	14 %	6	6 %	37.600**
	100	16	16 %	16	16 %	22	22 %	40	40 %	6	6 %	15.800**
Watching Live Match	100	38	38 %	52	52 %	8	8%	2	2%	0	0 %	34.320**
	100	6	6%	54	54 %	30	30 %	4	4%	6	6 %	47.600**
Sports Environment	100	46	46 %	50	50 %	2	2%	2	2%	0	0 %	42.480**
	100	24	24 %	72	72 %	4	4%	0	0%	0	0 %	36.640**
Life Long Discipline	100	28	28 %	66	66 %	6	6%	0	0%	0	0 %	27.640**
	100	12	12 %	62	62 %	20	20 %	6	6%	0	0 %	38.480**
Regaining Energy	100	26	26 %	44	44 %	20	20 %	10	10 %	0	0 %	12.240**
	100	4	4%	34	34 %	20	20 %	36	36 %	6	6 %	22.6000**
Interest in adventure sports	100	44	44 %	46	46 %	10	10 %	0	0%	0	0 %	12.280**
	100	28	28 %	68	68 %	4	4%	0	0%	0	0 %	31.360**
Sports person as role model	100	38	38 %	54	54 %	8	8%	0	0%	0	0 %	16.360**
	100	38	38 %	50	50 %	12	12 %	0	0%	0	0 %	11.320**
Lure of physical fitness	100	30	30 %	62	62 %	6	6%	2	2%	0	0 %	45.680**
	100	28	28 %	52	52 %	20	20 %	0	0%	0	0 %	8.320
Regarding Sports as Challenge	100	44	44 %	52	52 %	4	4%	0	0%	0	0 %	19.840**
	100	32	32 %	44	44 %	18	18 %	6	6%	0	0 %	16.900**
Regarding Infrastructure, not a hurdle	100	30	30 %	42	42 %	6	6%	16	16 %	6	6 %	24.800**
	100	10	10 %	26	26 %	30	30 %	28	28 %	6	6 %	12.400

** Significant at .01 level of significance





Discussion on Finding:

Item no. I deal with reading sports news. It is evident that value of χ^2 came out to be significant at .01 level of significance from the responses collected from both rural colleges. It reveals that 48% of the total sample agrees to the statement, 19% are neutral and others disagree to the statement. So it may be interpreted that no concrete opinion emerged from the respondents for reading sports news.

After analyzing the data for watching live match, the χ^2 value came out to be significant at .01 level of significance from the responses collected from the sample. The analysis reveals that 75% of the responses of total sample are positive towards the scale. From this it may be interpreted that respondents are of the opinion that watching a live match is very good life time experience for individuals.

After analyzing the data for sports environment the χ^2 value came out to be significant at .01 level of significance from the responses from the sample of both rural colleges and is seen that concentration of frequencies lies towards positive side of the scale with 96% of positive responses. So it may be interpreted that respondents agree to the statement and think that interest for sports can be inculcated if the sports environment is provided to the individuals.

When the data for lifelong discipline is analyzedthe χ^2 value came out to be significant at .01 level of significance from the responses. It reveals that 84%of the total sample agrees to the statement. Since the responses lie towards the positive side of the scale, so it may be interpreted that significantly higher no of respondents are of the opinion that interest in team sports leads an individual to lifelong discipline.

After analyzing the data for regaining energy the χ^2 value came out to be significant at .01 level of significance from the responses from the total sample. The analyses reveal that 55 % of total sample were agreed to the statement where 20% were indecisive and 25% were disagreed, so it may be interpreted that no concrete opinion emerged from the responses.

When the data for Interest in Adventure sports was analyzed, the value of χ^2 came out to be significant at .01 level of significance from responses; the analyses reveal that concentration of frequencies lies towards positive side of the scale with 91% of the positive responses. So it may be interpreted that significantly higher no of respondents have interest to watch adventure sports activities and think that they are full of thrill.

It is evident that value of χ^2 for sports person as role model came out to be significant at .01 level of significance. The analysis reveals that concentration of frequencies lies towards positive side of the scale with average 90% of positive responses. From this it may be interpreted that significantly higher no of respondents think that sports persons are role model for youngsters and seeing them playing creates interest for sports activities.

After analyzing the data for Lure of physical fitness the value of χ^2 came out to be significant at .01 level of significance from the responses the analyses of the data reveals that 85% of the total sample agrees to the statement. Since the responses lie towards positive side of the scale so it may be interpreted that significantly higher no of respondents are of the opinion that interest to remain physically fit also makes people join sports activities.

When the data for Sports as challenge were analyzed the value of χ^2 came out to be significant at .01 level of significance with 81% of total positive responses. From this it may be interpreted that significantly higher no. of respondents are of the opinion that challenge of playing & winning for your team creates interest towards sports activities.

When the data forinfrastructure, not a hurdle were analyzed the value of χ^2 came out to be significant from the respondents from HAG but did not come out to be significant at .01 level of significance from the sample of STS , The analyses reveals that 54% of the respondents agree to the statement and 18% were neutral and other 28% were not agreed to the statement so it may be interpreted that interest in sports does not see any infrastructure, whereas some think differently that infrastructure is needed for sports activities. So no concrete opinion emerged from the responses

Result

1. The researcher came to the conclusion after analyzing the data for, reading sports news, that the mixed trend of responses is seen. Some of the respondents agree that they read the sports section first whereas almost half of the respondents totally disagree to the statement. Hence the hypotheses framed for this sub item is partially approved and partially disapproved.

2. After analyzing the data the investigator reached the positive agreement and the conclusion drawn for watching live match is this that majority of the respondents are of the opinion that watching live match is a life time experience. Most of the respondents agree to the statement where very few are indecisive also. Hence the hypotheses framed for this sub item is approved.

3. The researcher came to the conclusion, after analyzing the data for enhanced sportsmanship and friendship, that the trend of responses of majority of the respondents are positive and they agree that ethics like sportsmanship and friendship can be best enhanced through sports activities. Hence the hypotheses framed for this sub item is approved.

4. After analyzing the data the investigator reached the positive agreement and the conclusion drawn for lifelong discipline is this that majority of the respondents are of the opinion that interest in team sports leads to lifelong discipline in individuals. Hence the hypotheses framed for this sub item is approved.

5. The researcher came to the conclusion after analyzing the data for regaining energy that the mixed trend of responses is seen. Some of the respondents agree to the item regaining energy where as almost half of the respondents disagree or are indecisive and are of the opinion that even if they play but do not regain energy before the important events. This shows less interest of sports before important events. Hence the hypotheses framed for this sub item is partially approved and partially disapproved.

6. The researcher came to the conclusion after analyzing the data for interest in adventure sports, that majority of the respondents are of the opinion that they have an interest in adventure sports and these activities are very thrilling to watch. Hence the hypotheses framed for this sub item is approved.

7.After analyzing the data the investigator came to the conclusion that majority of the respondents are of the opinion that sports persons are role model for youngsters, and seeing them playing creates interest for sports in youngsters. Hence the hypotheses framed for this sub item is approved.

8. The investigator came to the conclusion; after analyzing the data for, lure of physical fitness, that majority of the respondents have given positive agreement, and they think that interest to remain fit make people join sports activities. Hence the hypotheses framed for this sub item is approved.

9. Challenge of playing and winning when this item was analyzed by the researcher, the same positive results and same conclusion is drawn that respondents have given positive agreement that challenge of playing and winning creates interest towards sports activities. Hence the hypotheses framed for this sub item is approved.

10. The researcher came to the conclusion after analyzing the data for infrastructure, not a hurdle, mixed trend is seen from the respondents, some of respondents have given positive agreement, some are negative towards the thought where as one fourth of the respondents are indecisive towards the opinion. Hence the hypotheses framed for this sub item is partially approved and partially disapproved.

Conclusions

Investigations have shown that the respondents from rural colleges are generally positive towards the psychological attribute Interest. In spite of many facts like difficult studies, detailed curriculum, less sports facilities, geographical conditions are not conducive, hectic schedules, lifestyle, and overburdened although all these factors are basically obstacles for sports activities or one can say that due to these factors the interest towards sports activities may be affected. But after concluding all the sub items one by one researcher came to the conclusion that hypotheses framed by the investigator is approved.

References

1. Abraham, Mercy and Arjun, N.K. Environmental interest of secondary school students in relation to their environmental Attitude. The perspectives in education, Vol. 21 (2005) No.2.
2. Ajay Kumar, "A study of Involvement and participation in physical Education Activities of Boys and Girls with Respect to Science and Art Students, Ph. D Thesis, Choudhary Charan Singh University, Meerut, U.P. (2007) pp. 1-19.
3. Carlson T.B. "Why students hate, tolerate, or love gym; a study of attitude formation and associated behavior in physical education" Doctoral dissertation, university of Massachusetts dissertation international, 55-03A, (1994), 0 502.
4. Cerar Katja, Kondric Miran, Ochiana Nicolae, and Sindi k Josko, "Exercise Participation Motives and Engaging In Sports Activity among University of Ljubljana Students". J Med Sci.(2017 Oct 15) 5(6): 794–799.Published online 2017
5. Park, Y. S., Kim, B. S. K., Chiang, J., & M. Ju, C. "Acculturation, enculturation, parental adherence to Asian cultural values, parenting styles, and family conflict among Asian American college students". Asian American Journal of Psychology, 1, 1, (2010) pp. 167-79.
6. INTERNET: Wikipedia, the free encyclopedia

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No. 36 Sept-Oct 2023

स्थानिक इतिहासाचे महत्व

मोहमद इस्माईल हनिफ
संशोधक
Corresponding Author- मोहमद इस्माईल हनिफ
DOI- 10.5281/zenodo.10369392

प्रस्तावना :

वर्तमान काळात जगत असताना भूतकाळातील बऱ्या वाईट प्रसंगाचे योग्य आकलन करून डोळसपणे भविष्याकडे पाहणे आवश्यक असते हाच प्रमुख हेतू इतिहास शिकविण्यामागे व शिकण्यामागे असतो. इतिहास हे माणसाची समाजाची किंवा देशाची स्मूर्ती जगविणारे शास्त्र आहे हेरोडॉटस या आद्य ग्रीक तत्त्ववेत्याने इतिहास म्हणजे भूतकाळातील भूतकालीन मनोवेधक आणि संस्मरणीय घटनांचा मागवा घेणे असे म्हटले आहे, व हेनरी स्टील कॉमेजर म्हणतो जर समाजाला इतिहास नसेल तर स्मुर्ती नसलेल्या माणसाच्या अवस्थेसारखी त्याची भयानक परिस्थिती होते.

यामध्ये स्थानिक इतिहासही इतिहासाचा एक महत्त्वाचा प्रकार आहे. आपण जगातील विविध देशाचा, खंडांचा अभ्यास करतो, परंतु आपल्याला आपला स्थानिक इतिहास माहित नसतो. आपणास आपल्या गावातील डोंगर, दऱ्या , वाडे, किल्ले, मंदिरे, मस्जिदी, लेण्या, ताम्रपट, शिलालेख इत्यादीची माहिती नसते. स्थानिक इतिहासत समाजातील आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि धार्मिक इत्यादी बाबींचा समावेश असणे अगत्याचे असते. स्थानिक इतिहास हा राष्ट्रीय इतिहासाचा एक भाग असतो इतिहासकार रेनीयर म्हणतो स्थानिक इतिहास हा अशा पद्धतीने लिहिला पाहिजे की तो देशाच्या इतिहासामध्ये चपखल बसला पाहिजे.

स्थानिक इतिहास हा सामान्य लोकांच्या दैनंदिन संघर्षाचा आणि विजयाचा अभ्यास आहे. स्थानिक इतिहास म्हणजे प्रदेश, राज्य, परगाना, शहर, गाव किंवा अतिपरिचित क्षेत्र अशा भौगोलिक दृष्ट्या बद्ध प्रादेशिक इतिहासाचा अभ्यास होय. शिवाय स्थानिक इतिहास हा ठिकाणाचा इतिहास होय.

उद्देश :

1. स्थानिक इतिहासाची ओळख करून देणे.
2. स्थानिक इतिहासाचे जीवनातील महत्त्व समजून घेणे.
3. स्थानिक इतिहासाचे इतिहास लेखनात महत्त्व जाणून घेणे.
4. स्थानिक इतिहास आणि परंपरांचा अभ्यास करणे.
5. स्थानिक इतिहास लेखनाला स्थान मिळवून देणे.

स्थानिक इतिहासाचे महत्त्व :

स्थानिक इतिहासाला आपल्या जीवनात अनन्य साधारण महत्व आहे. स्थानिक इतिहास वर्तमानशी जोडण्यासाठी सखोल संशोधनास अनुमती देतो. स्थानिक इतिहास केवळ भूतकाळ नाही तर वर्तमान आणि अगदी एका अर्थाने भविष्यकाळ देखील आहे. कारण आजची घटना ही भविष्याचा इतिहास होय.

स्थानिक इतिहासाच्या अभ्यासाने आपल्याला सभोवतालच्या परिसरातील चाली, रीती, परंपरा , आचार - विचार, वेशभुषा, खान-पान, सण समारंभ, उत्सव , सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक प्रथा, राजकीय,धार्मिक स्थिती शैक्षणिक दर्जा इत्यादी समजण्यास मदत होते. सभोतालच्या परिसरात असलेले ऐतिहासिक वास्तू, किल्ले, गड, मंदिरे, वाडे, भौगोलिक रचना इत्यादीच्या अभ्यासाने तत्कालीन समाजाची आर्थिक, सामाजिक, राजकीय सांस्कृतिक धार्मिक माहिती मिळण्यास मदत होते व त्याचा वारसा जपून आपल्याला आपली संस्कृती टिकवण्यासाठी महत्त्वाची मदत होते म्हणून स्थानिक इतिहासाला आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान आहे असे आपणास सांगता येईल .

समारोप :

स्थानिक इतिहासाच्या अभ्यासाने आपल्याला आपल्या सभोवतांच्या ठिकाणांची ओळख होऊन, आपल्या परंपरा संस्कृती - आचार विचार व ऐतिहासिक वारसा टिकवण्यासाठी मोलाची मदत होते.

संदर्भ ग्रंथ :

1. डॉ. वसंत डोंगरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि इतिहास मिमांसा, देवयानी प्रकाशन - एरोली नवी मुंबई -२०१४.
2. डॉ. साहेबराव गाठाळ - इतिहास लेखन शास्त्र व इतिहासकार, कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद-२०००.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No. 36 Sept-Oct 2023

मराठी संस्कृतीतील सामाजिक उत्सव रुजविण्यामध्ये संगीताची भूमिका

प्रा. वंदना मधुकरराव देशमुख
(संगीत विभाग), कला महाविद्यालय मलकापूर, अकोला.
Corresponding Author- प्रा. वंदना मधुकरराव देशमुख
Email: deshmukhvud@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.10427044

सारांश :-

मराठी संस्कृती ही प्राचीन काळापासून अव्याहतपणे चालू असलेली प्रक्रिया आहे. संस्कृती ही मानवी जीवनाला व्यापकत्व प्रदान करणारी असते. मानवी जीवनाच्या पद्धती, राहणीमान, धार्मिक- सामाजिक समजूती, चालेल ती रूढी परंपरा सण उत्सव यासारख्या अनेक गोष्टींचा संचय हा संस्कृतीमध्ये होत असतो. प्रस्तुत शोध निबंधाचा विषय हा मराठी संस्कृतीतील सामाजिक उत्सवाशी संबंधित असून या उत्सवांना संगीतकलेने मागील पिढीपासून संक्रमित करून संवर्धित केले आहे. संस्कृतीचा तरी गुणधर्म असला की प्रथा परंपरा यांना एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित करणे मात्र यांना संवर्धित करण्याची कार्य हे संगीतातून झाल्याचे स्पष्ट होते. तेव्हा प्रस्तुत शोधनिबंधाकरिता मराठी संस्कृतीतील सामाजिक उत्सवांना रुजविण्यामध्ये संगीताची भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे.

संशोधनाची आवश्यकता :-

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये मराठी संस्कृतीतील ग्राम देवतेचे महत्व विशद करण्यात आले आहे. या ग्रामदेवतांचे दैनंदिन पुजल्या जाणाऱ्या देवतांमध्ये अनन्यसाधारण असे महत्त्व मराठी समाज जीवनातून पाळल्या जाते. हा उत्सव स्त्रियांच्या मार्फत साजरा केला जातो. तेव्हा या उत्सवाला सामाजिक तेचे स्वरूप मिळते. या छोटेखानी होत असलेल्या सामाजिक उत्सवाचे मराठी संस्कृतीतील महत्व टिकून असून ते नवीन पिढीला अवगत करून देण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन विषयाची आवश्यकता निर्माण झाली.

संशोधन उद्देश :-

संगीतातील गीत गायनाच्या माध्यमातून मराठी संस्कृतीतील सामाजिक उत्सवाचे संवर्धन झालेले दिसून येते. आणि तेच संवर्धन विविध गीतांच्या माध्यमातून आजतागायत नवीन पिढीपर्यंत पारंपारिक रित्या टिकून आहे. थोडक्यात संगीतातून सामाजिक उत्सवाची जोपासना करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका आहे हाच प्रस्तुत संशोधनाचा उद्देश होय.

विषय प्रवेश:-

संस्कृती ही त्या त्या प्रदेशानुसार प्रांतानुसार ओळखले जाते.संस्कृतीची ही ओळख त्या त्या प्रदेशावरील सामाजिक, धार्मिक, कौटुंबिक जीवना मधून साजरे केल्या जात असलेल्या उत्सवातून नावारूपाला येते. त्यामुळे वेगवेगळ्या सामाजिक उत्सवांचे मराठी संस्कृतीमध्ये अनन्य साधारण असे महत्त्व आहे. अशा मराठी संस्कृतीमध्ये सामाजिक उत्सवांचे विविध रूप बघायला मिळते. त्यामुळेमराठी संस्कृती ही संमिश्र देवी देवतांना पुजणारी संस्कृती मानली जाते. प्रत्येक कुटुंबामध्ये देवतांच्या स्थानांमध्ये देवी आणि देवता अशा दोन्ही स्वरूपातील देवतांचे पूजन करण्याची एक परंपरा मराठी संस्कृतीमध्ये रूढ आहे. याच देवी देवतांच्या पूजनामध्ये ग्रामीण देवतांचा समावेश होतांना दिसून येतो. त्यांना मराठी संस्कृतीमध्ये ग्रामदेवता म्हणून संबोधले जाते. आणि या ग्राम देवतांना सामाजिक जीवनातून मानण्याची प्रथा उत्सवातून साजरी होताना दिसून येते.

प्रस्तुत शोध निबंधासाठी निवडण्यात आलेल्या सामाजिक ग्रामदेवतांमध्ये प्रचलित भुलाबाई या देवतांचा उल्लेख करण्यात आला आहे. या ग्राम देवतांचा उत्सव लहान वयोगटापासून ते वयोवृद्धांपर्यंत साजरा केला जातो. या भुलाबाई ग्रामदेवतेचे स्वरूप हे 'भुलोजी ' म्हणजे पुरुष देवता जी शंकर देवाच्या नावाने ओळखल्या जाते.तर 'भुलाबाई ' म्हणजे स्त्री देवता जी की पार्वती या देवतेच्या नावाने ओळखिली जाते. यांचा उत्सव मराठी समाज जीवनामध्ये भाद्रपद अश्विन असा एक महिना केला जातो. तर काही भागांमध्ये अश्विन या मराठी महिन्यामध्ये येणाऱ्या पौर्णिमेला साजरा केल्या जातो. त्या पौर्णिमेला 'कोजागिरी पौर्णिमा' असे म्हटले जाते. या दिवशी भुलोजी आणि भुलाबाई यांचा मूर्तीची स्थापना केलीजाऊनयथासांग पूजाविधी केला जातो. या सामाजिक उत्सवातील देवतांची पूजा ही अतिशय सोप्या पद्धतीने मांडली जाते.भुलाबाई भुलोजींच्या मुर्तिची स्थापना घरातल्या देवडीत साध्या पद्धतीने केली जाते . सायंकाळी गल्लीतल्या मुली, मैत्रीणी टिपऱ्या घेऊन भुलाबाई भुलोजी जी गाणी म्हणतात . यात पहिली ग भुलाबाई देवा देवा सांजे, येथून दाणा पेरत जाऊ माळीयाच्या दारी, सा बाई सूं बेलाच्या झाडाखाली महादेवा तू , अडवणि की गोडवणी दुधा खालचं धारवणी, एवढीशी गंगा झुळु झुळू वाहे, आपे दुध तापे त्यावर पिवळी

साय, हककुंड बाळा हककुंड बाळा या सह सुंदर चालींवर व टिप- यांच्या निनादात गाणी म्हटली जातात . यांसारखी विविध गाणी म्हटले जातात.

तसेच महिनाभर हा सामाजिक उत्सव खूप आनंदाने गाणी गात ,वेगवेगळी खेळ खेळीत साजरा केला जातो . आणि ह्या उत्सवाच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच कोजागिरी पौर्णिमा म्हणजेच शरद पौर्णिमेला ह्या सणाचे सर्व जण मिळून रात्रभर जागरण करतात . त्यात ते सर्व स्त्रिया त्यांच्या भुलाबाईची मूर्ती एकत्र एका ठिकाणी अंगणात पाटावर मांडतात.आणि रात्रभर गाणीगातात आणिखेळ खेळतात.अशा विविध विषयातील विविध गीतांची सुरुवात केली जाते.

या पूजा विधीला डॉ. शरद व्यवहारे शिवशक्तीची पूजाविधि म्हणतात. या उत्सवा संबंधी अशी विचारधारा मराठी समाज जीवनामध्ये प्रचलित आहे की, भुलाबाई म्हणजे पार्वती ही देवता माहेरवाशिण म्हणून माहेरी येते. आणि या माहेरवाशीनीच्या जीवनात कोणकोणत्या गोष्टी घडतात.याची उत्सुकता जाणून घेतली जाते. त्यामध्ये अनेक विषय असतात.ते विषय विविध गीतातून मांडले जातात. आणि विविध गीतांच्या माध्यमातून या सामाजिक ग्रामदेवतेचे महत्त्व मराठी संस्कृतीमध्ये आजही टिकून असल्याचे दिसून येते. अशा गीतांमध्ये विविध आशयाचे विषय मांडण्यात आले आहे. ते खालील गीतांतून सांगता येईल. प्रस्तुत गीत हे कौटुंबिक आशयाचे आहे.

चांदण्या रात्री भुलाबाई जागवल्या जागवल्या,
सासू पुसते सुनेला सुनेला,
सुनबाई, सुनबाई पाटल्याचा जोड काय केला,
काय केला, हरविला हरविला
तुमचं काय जाते माझ्या बापान घडविला घडविला,
चांदण्या रात्री भुलाबाई जागवल्या जागवल्या.....

अशा प्रश्नोत्तरी स्वरूपात सुद्धा भुलाबाईंच्या सामाजिक उत्सवाचा विषय रंगताना दिसून येतो.

पुढील गीतामध्ये सासरची विविध नातेवाईक सुनेला प्रश्न करतात व सुन त्यावर उत्तर देत गीताला रंगत येते. प्रस्तुत गीतामध्ये शब्दांची मात्रा अधिक असल्याने गीतालाद्रुतलयीचीजोड दिल्या जाते व त्या द्रुतलयीमध्ये गीत म्हटले जाते त्यासोबतच गीतालागात असताना सारख्या प्रमाणात ठेका सुद्धा दिला जातो जो टाळीवर सोप्या पद्धतीने दिला जाऊन गाण्याला रंजकता प्रदान होते.अशाच सामाजिक उत्सवातील आणखी एक गीत पुढील प्रमाणे आहे जो वेगळा विषय घेऊन गायले जाते

यादव राsssया राणी रुसून बैसली कैसी,
यादव राsssया राणी घरासी येईना कैसी,
सासरे गेले समजावयाला
चला चला सुनबाई आपुल्या घराला. घराच्या
चाव्या देतो तुम्हाला
घराच्या चाव्या नको मजला,
मी नाही यायची आपुल्या घराला.
यादव राsss या राणी रुसून बैसली कैसी,

प्रस्तुत गीतामध्ये सासरच्या विविध सदस्यांची नावे घालून मराठी संस्कृतीतील विविध पारंपारिक दाग दागिन्यांची गुंफण करून गीताला गायले जाते. वरील गीतामध्ये शब्दांच्या पाठीमागे येणारा आकार (sss) विशिष्ट स्वराच्या आधाराने लांबविला जातो. तर गीतातील प्रत्येक शब्दावर जोड देऊन म्हटल्या जात असल्यामुळे गीताला ठेका मिळतो. आणि संपूर्ण गीत ठेक्यावर म्हटले जाते. हा ठेका लोकसंगीतातील असल्यामुळे हाताच्या टाळीवर दिला जातो. त्यामुळे टाळीच्या आवाजातून विशिष्ट असा नाद निर्माण होतो. त्या नादामुळे लय धरली जाते. अशाप्रकारे सामूहिक गायनाच्या माध्यमातून वरील गीत म्हटले जाते. याच पद्धतीतील आणखी एक गीत उदाहरणादाखल खालील प्रमाणे सांगता येईल अशा गीताला भुलाबाईच्या गीतांमध्ये पाळणा म्हटल्या जातो. ते गीत पुढील प्रमाणे –

अखमली टोपी मखमली टोपी बाळ खेळतो
दिव्याच्या ज्योती
बाळाची आई कुठे ग गेली गेली असेल शिंपीदाकडे
शिंपी दादा शिंपी दादा,
बाळाचे कपडे झाले की नाही आता देतो मी, मग देतो मी,
असे म्हणूनी उशीर केला घरी बाळाने गोंधळ केला
जो जो रे बाळा जो जो

अशाप्रकारे प्रस्तुत गीतामध्ये समाजातील विभिन्न जातीवाचक व्यावसायिकांची नावे गुंफून त्यानुसार कपडे, दागिने, खेळणे यांचा उल्लेख करून गीत लांबविले जाते. गीतातील 'जो जो रे बाळा जो जो' या ओळीनुसार संपूर्ण गीताला पाळण्याच्या झोक्यानुसार स्वरांचे हेलकावे दिले जाते. तर काही ठिकाणी स्वरांना सारख्या प्रमाणातही म्हटले जाते. गीतामध्ये शब्दांची मात्रा अधिक असल्याने गीताला द्रुत लयीत गायले जाते. तर शब्दातील अक्षर संख्येनुसार पाच ते सहा शब्दांनंतर येणाऱ्या शब्दावर जोर दिला जातो. गीताला ताल धरला जाऊन हाताच्या टाळीवर म्हंटल्या जातो. त्यामुळे शारीरिक हालचाल निर्माण होऊन उत्साह येतो आणि आपसूकच आवाजाला गती येऊन गीतामध्ये चढ-उतारपणा दिसून येतो. हा चढउतारपणा संगीतातील आरोह अवरोही स्वरांच्या माध्यमातून घेतल्या जातो. अशाप्रकारे विविध गीत गायनाच्या माध्यमातून मराठी संस्कृतीतील या सामाजिक उत्सवातून ग्रामदेवतेचे महत्त्व असलेले दिसून येते.

अशाप्रकारे मराठी संस्कृतीमध्ये विविध सामाजिक उत्सवांपैकी भुलाबाई या सामाजिक उत्सवांचे महत्त्व आहे. जे लोकसंगीताच्या माध्यमातून संवर्धितझालेले दिसून

येते.प्रस्तुत शोधनिबंधामध्ये निवडण्यात आलेल्या भुलाबाई या सामाजिक उत्सवाला रुजविण्यामध्ये संगीताची भूमिका असलेली दिसून येते.

संदर्भसूची:-

1. डायमंड महाराष्ट्र संस्कृती कोश- डॉ. दुर्गा दीक्षित
2. लोकसंस्कृतीचा अंत: प्रवाह:- डॉ.शरद व्यवहारे.
3. लोक संस्कृतीतील पाऊल खुणा - डॉ.द. ता. भोसले.
4. मराठी स्त्री गीते - डॉ. शरद व्यवहारे.

Chief Editor
P. R. Talekar
Secretary,
Young Researcher Association, Kolhapur(M.S), India

Editorial & Advisory Board

Dr. S. D. Shinde	Dr. M. B. Potdar	Dr. P. K. Pandey
Dr. L. R. Rathod	Mr. V. P. Dhulap	Dr. A. G. Koppad
Dr. S. B. Abhang	Dr. S. P. Mali	Dr. G. B. Kalyanshetti
Dr. M. H. Lohgaonkar	Dr. R. D. Bodare	Dr. D. T. Bornare